


सुरुची नाईक

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

## २







ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

## भाग २

लेखिका : सुरूची नाईक

# नर्मदा परिक्रमा-२

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती- भाग २

लेखिका : सुरूची नाईक, नागपूर

संपर्क: ९८२३६५३५११ (कृपया मेसेज करून वेळ ठरवावी)

संकेत स्थळ : www.thetbhet.wordpress.com.

ई-मेल: suruchisuruchister@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठा :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ जून २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

माझी ओळख

नर्मदे हर

खरंतर माझी ओळख देणे हा एक मोठा विरोधाभास आहे असे मी म्हणेन; कारण नर्मदा परिक्रमेने मला नर्मदामय केलं, तिथे "मी" म्हणून कुणी उरतच नाही. किंबहुना माझ्यामधील ही "मी" दूर व्हावी असंच माझं माझ्या नर्मदामैय्याला मनापासून सांगणं आहे. ह्या देहातून ही "मी" सुटली तर माझ्या माईची माझ्यावर फार मोठी कृपा आहे असे मी समजेन.

या अनुभवकथन पुस्तिकेसाठी म्हणून जर माझी ओळख द्यायची असं म्हटलं तर मी कुणी लेखिका नाही हे मी आवर्जून सांगेन. आवड म्हणून लिहिलेल्या कथा, कविता कधीही पुस्तक स्वरूपात आजतागायत आलेल्या नाहीत. स्वतः ई साहित्य प्रकाशनाची संस्थापक सदस्या असूनही. कदाचित यामागे एक कारण असले पाहिजे. ते असं की माझ्याकरवी करवून घेण्यात आलेल्या नर्मदा परिक्रमेचं आणि साक्षात नर्मदा मैयाने माझ्या प्रारब्धात घातलेल्या अनुभवांचं ह्या देहाकडून लिहिल्या जाणारं हे पहिलं पुस्तक असावं ही देखील माझ्या नर्मदा माईची ईच्छा असेल कदाचित.

आणि म्हणूनच दुसऱ्या कुठल्याही ओळखीपेक्षा एक परिक्रमावासी, नर्मदाभक्त आणि अगदी माझ्या नावाचाच उल्लेख करायचा झाल्यास मला माझी ओळख "रेवारूचि-सुरुचि" म्हणून करून द्यायला आवडेल.

पहिल्या भागाचे मनोगत

नर्मदे हर

आपण सर्वजणच अमुक एखादी गोष्ट करतो ती त्या मागे असलेल्या कारणांमुळे. मी अमुक केलं की असं होईल, म्हणून हे करायचं, आणि तमुक केलं की तसं होईल म्हणून ते करायचं. सरते शेवटी प्रत्येकाचा शोध एका ठिकाणी येऊन थांबतो. आपल्यासारखे सर्व सामान्य लोक त्याला “सुख” असं म्हणतात. आणि खरं सांगू का, या सुखाच्या शोधातच मला नर्मदा परिक्रमेचा आणि त्यातून मिळालेल्या अनुभूतीचा शोध लागला.

पी एच डी करणं मला फार कष्टप्रद जात होतं. शेवटचं प्रकरण हाताबाहेर जात होतं. नोकरी, घर, मुलाचा अभ्यास, स्वत:चा अभ्यास, यात मी इतकी वैतागून जात होते की सगळं सोडून पळून जावं सं वाटायला लागलं. नमूद करावे आणि करू नये अश्या अनेक कारणांनी मला गिळंकृत करून झालं होतं. नकळता मी डिप्रेशन नावाच्या आजाराचा शिकार व्हायला लागले होते, नव्हे झालेच होते.

पण यातून बाहेर पडायचं होतं, मार्ग सापडत नव्हता.. तात्पुरतं मन रमवायचं, आणि पुन्हा पुन्हा, अनेकदा या सगळ्या प्रश्नांनी आघात करायचे.. हे असच सुरु होतं. मात्र हत्ती जाऊन शेपूट उरावं इतकं पी एच डीचं थेसिस राहिलेलं. वयाच्या १३ व्या वर्षीपासूनचं स्वप्न, जंगलात राहून अखंड मेहनतीने काढलेले दिवस, हे सोडून द्यायलाही मन तयार नव्हतंच.. अन विचार करता करता मी पुन्हा वयाच्या १३ व्या वर्षात पोहोचले. नर्मदा परिक्रमा करावी हा विचार त्यावेळी पहिल्यांदा मनात आला होता, तो विचारच माझ्या परिक्रमेचं बीज आणि या डिप्रेशनचा आधार ठरला, आणि माझा सुखाचा शोध सुरु झाला.

माझे गुरु पं. पु नाना महाराज तराणेकर यांच्या पोथीमध्ये वाचलेले नर्मदा माईचे अनुभव माझी प्रेरणा झालेत, त्यांचे आशीर्वाद माझं कवच झालं, आणि काही वेड्या लोकांचे अनुभव

माझं वेड झालेत. वेडात सुख असेल कदाचित… हो असेलच… या वेडाचा ध्यास लागला… मन तळमळू लागलं.. जळी, स्थळी काष्ठी पाषाणी फक्त माझी माउली दिसू लागली...

आस तुझी जीवा तुझी तळमळ । तुझ्याशीच नाळ जुळते माझी…॥१॥

ध्यास तुझा चित्ती लागियेला ऐसा । मत्स्यालागी जैसा जळावीण ॥२॥

पाऊले वळती तुझेचि नी वाट । मनी काठोकाठ तूची वसे ॥३॥

घातलीसे हाक अता लेकराला । फ़ेक पावलांना आप पडे ॥४॥

माय माऊलीचा करू हो गजर । "नरमदे हर" मंत्र दिधला ॥५॥

मज ज्ञान अल्प, तैसाचि संकल्प । तूचि आता कल्प पूर्ण करी ॥६॥

मैया किनाऱ्याला, घडो माझा वास । "रेवा मैया" श्वास जडो देवा ॥११॥

"सुरुचि" म्हणे रुचि रेवा चरणासी । शरणास दासी, सांभाळीजे ॥१२॥

संकल्प घेतला, आणि सगळं काही माझ्या माउलीवर सोडून दिलं. तिनीही जातीनं लक्ष घातलं आणि परिक्रमा पूर्ण करवून घेतली.

१ नोव्हेंबर २०१७पासून २२ मार्च २०१८पर्यंत चा कालावधी माझ्या अयुष्यात असा काही आला की त्यानंतर आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला, किंवा संपलाच असं मी म्हणेन … आई नर्मदेच्या सान्निध्यात आणि त्याही नंतर आज जे काही आहे ते, ते आहे इतकंच मी सांगू शकेन एखादी गोष्ट आहे आणि म्हणून तिचा स्वीकार करायचा, म्हणजे त्या गोष्टीच्या असण्याचा स्वीकार करायचा तर एखादी गोष्ट नाही तर म्हणून ती नाही हे ही मान्य करायचं.. म्हणजे ठरवून नव्हे हं.. आपोआप, अगदी कुठल्याही प्रयत्ना शिवाय.. अशी काहीशी सवय लागली… चांगली की वाईट ते माहित नाही…पण लागली. त्याचे फ़ायदे तोटे माहित नाही

आणि माहित करून घेण्याची इच्छा देखील नाही…आणि हे नेमकं कसं घडलं ते ही माहित नाही…

मात्र आता समोर येणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे साक्षीदाराच्या भुमिकेतून बघितल्या जातं. म्हणजे कसं तर एखाद्या कोर्ट केस मधला साक्षीदार नजरेसमोर आणू… जी काही घटना घडली ती या सक्षीदाराने पाहिली.. मात्र झालेल्या घटनेत त्याचा सकर्म सहभाग नाही, तो केवळ साक्षीदार आहे आणि जे झालं ते सांगण हेच त्याचं काम आहे.. आणि ते ही गरज पडली तर.. गरज पडली नाही तर फ़क्त तो अनुभव गाठीशी कुठेतरी असतो, इतकंच! जेव्हा प्रत्येकच गोष्टींकडे असं पाहिल्या जातं तेव्हा त्याचा न आनंद होतो, न दु:ख! कारण मुळात आनंद किंवा दु:ख हे त्या त्या अपेक्षेवर अवलंबून असतं. इथे या साक्षीदाराला घडलेल्या घटनेकडून कुठलीही अपेक्षा नसते.. त्यातून त्याला काहीही नको असतं… आणि म्हणूनच तो त्यावर विचार देखिल करत नाही, साक्ष देतो आणि मोकळा होतो…

"मोकळा होतो" हा शब्दच किती सूचक आहे नं…. म्हणजे तो बांधल्या जात नाही किंवा अडकून पडत नाही. म्हणजे समोर काहिही असो… तो तिथे असतो, पण त्यात गुंतत नाही… ते जे काही आहे ते आहे तोवर बघायचं, आणि ते संपलं की संपल. ते संपण्याचा आनंदही नाही आणि दु:ख तर अजिबात नाही.. मग दुसरं काहीतरी समोर येणारच.. आणि ते ही कधीतरी जाणारच.. हे माहितच आहे… या "काहीतरी" च्या मागे जाण्याची इच्छाच न होणं ही मोकळीक…. मला सियाराम बाबांचे शब्द आठवले…. ते म्हणतात.. " मै तो सिर्फ़ तमाशा देखता हूं" … तसं फ़क्त मोकळेपणानी तमाशा बघायलाच आवडू लागलंय… मग समोर काहिही असो… पुन्हा तसाच तमाशा असावा अशी इच्छा नाही, तसा नसावाच असं ही मत नाही…. कारण काय समोर येतंय हे आपल्या हातात नसतं आणि ते आपल्याला माहित ही नसतं.. आपण आपली फ़क्त गंमत बघायची…ही गंमत बघायला मन आपोआप शिकलं ते मैयाच्या कृपेमुळे... अंगवळणी पडल्यासारखं झालं.. कुठला निर्णय घ्यायला लागला नाही का

कुठलं नियंत्रण ठेवावं लागलं नाही... खरं सांगू का.. सुखरूप आनंद काय असतो ते उमगू लागलं... जी अवस्था इतर कुठल्याही अवस्थेवर किंवा घटनांवर, अपेक्षांवर, व्यक्तीं वर अवलंबून नाही त्या अवस्थेला सुखरूप असं म्हणता येईल कदाचित... आणि दु:ख नाही म्ह्णून आनंद म्हणूयात.... आणि हे असं हसत खेळत, आईच्या पदराशी जसं लहान मूल घुटमळतं तसं त्या माईच्या किनाऱ्याशी घुटमळत, तिने दिलेल्या अनुभवाच्या शिक्षणातून असं काही साध्य झालं की आता दुसरं काही शिल्लक राहिलेलं नाही. जे काही मिळायचं होतं ते मिळून झालेलं आहे.. जे काही समोर येतय ते पानात वाढलेलं आहे, आणि जोवर ह्या जड देहाच्या पिंजऱ्यात हा जीव आहे तोवर ते जे काही समोर येणार आहे बघावच लागणार आहे.. मात्र ते बघताना एखादी फ़िल्म बघावी अशी त्रयस्थाची भूमिकाच मनाकडून आपोआप आणि कायम घेतली जाऊ शकणं हे केवढं मोठं भाग्य!

आता ह्यात दु:ख नक्कीच नाहीये.. सुख आहे का ते माहित नाही, कारण ते कसं असतं नक्की याची जाणीवच नाहीये…. आणि आता ते जाणून घेण्याची इच्छा ही नाहीये, मात्र हे जे काही आहे त्याला, म्हणजे या अवस्थेला जर सुख म्हणत असतील तर मला समर्थ रामदास स्वामींची क्षमा मागून असच म्हणावं लागेल.. "जगी सर्व सुखी अशी मीच आहे…"

आणि आता काहीही नकोय... हवाय तो फक्त ध्यास, माझ्या माउलीचा. माझं हे जे काही झालंय त्याला अनेक वेड्या लोकांची साथ मिळाली आणि माझ्यातलं हे वेड जोपासल्या गेलं, ज्याने माझ्या जीवनाचं सार्थक झालंय. मला काय मिळालय नक्की हे शब्दात सांगता येणार नाही, ती अनुभूतीच मोठी विलक्षण आहे.

श्वास श्वास रेवा, ध्यास ध्यास रेवा। अंतरीचा ठेवा रेवामाई॥१॥

प्रारब्धाचे देणे, म्हणोनी भोगणे। खंडून नुरणे अंती काही॥२॥

कर्पूराची जैसी, जळते आरती। येत काय हाती गंधा वीण?||३||

तोचि अनुबंध, तैसाची संबंध। देह ते प्रारब्ध, गंध रेवामाई॥४॥

काय आणि देणे, काय आता घेणे | रेवारुचि म्हणे रेवा रेवा ||५||

सुरवातीला मला अनेक जण म्हणाले, आपले अनुभव सांगू नयेत, सांगितले की परत तसे अनुभव यायचे नाही, मात्र माझी अनुभूती आणि गुरु आज्ञा म्हणतात, संचय करूच नये, मग अनुभवाचा तरी का करायचा? वाटून टाक.. जसं इतरांचं वेड घेऊन तुझं आयुष्य घडलं, ज्या आत्मानंदाची गोडी तू चाखतेयस, ती ही वाटून टाक.. आणि म्हणून हे लिखाण...


रेवारूची-सुरुचि

संपर्क: ९८२३६५३५११

संकेत स्थळ : www. thetbhet. wordpress. com

दुसरा भाग वाचण्यापुर्वी पहिला भाग वाचावा ही विनंती. ज्यांनी वाचला असेल त्यांनी एकदा चाळावा यासाठी खाली लिंक देत आहोत.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/narmadaa_parikrama_suruchi_naik.pdf



**“नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती”** या अनुभव मालिकेचा

दुसरा भाग प्रकाशित करण्यापूर्वी...

सर्वप्रथम माझ्या नर्मदामैयाला आणि माझ्या सद्गुरूंना शिरसाष्टांग नमन! आज हे मनोगत लिहीताना मला अतिशय आनंद होतोय. ह्या आनंदाचं कारण या परिक्रमेत आलेल्या अनुभवांइतकंच विलक्षण सुंदर असं आहे. मी नेहमीच म्हणत असते, माझ्या नर्मदामैयानी मला भरभरून दिलंय! ती अजूनही देतेय, देतेच आहे! एक पायी परिक्रमा तिने माझ्याकडून पूर्ण करून घेतली ती कशी ते आपण वाचत आहातच पण त्यासोबत रोज, अगदी दररोज ती मला तिच्या कुठल्या ना कुठल्या काठावर घेऊन जाते. अगदी एका दिवसात अनेक परिक्रमा माझ्याकडून ती घडवून आणते. गेल्या दोन वर्षांत माझ्याकडून अशा हजारोंनी परिक्रमा तिने करवून घेतल्यात, मात्र या परिक्रमांचं श्रेय मला न जाता ते मला मिळालेल्या संवेदनशील, नर्मदा भक्तीने तुडुंब भरलेल्या वाचक वर्गाला जातं! हा वाचक वर्ग मला मिळाला तो ई-साहित्य प्रतिष्ठानमुळे... म्हणून या हजारोंनी, दररोज होणाऱ्या नर्मदा परिक्रमेचं श्रेय माझ्या ईसाहित्यचं!

रोज किमान वीस ते तीस फोन येतात. समोरून कधी कोणी लहानशी बारा-तेरा वर्षांची नर्मदामैया माझ्याशी बोलत असते तर कधी नव्वदीच्या घरात पोचलेली मायाळू, हळवी, भावूक आजी माझ्याशी बोलत असते, माझं अभिनंदन करत असते, कौतुक करत असते आणि आशीर्वाद देत असते. कधी एखादा मोठा भाऊ पाठीवर शाबासकीची थाप घालत असतो तर कधी एखादा लहानगा "ताई मला पण सांग ना काहीतरी माहिती, मला पण परिक्रमा करायची आहे" अशी लडिवाळ विचारपूस माझ्याकडे करतो. किती किती म्हणून नाती दिलीत मैयाने मला!

कधीकधी या नर्मदा नात्यांचे शब्द मला दूर कुठेतरी नेऊन ठेवतात.. कधी मी हमसून हमसून रडू लागते, तिच्या कृपेची जाणीव होताना आणि कधी काही शब्द मला निशब्द करतात.

कारवारच्या कावरे आजी, डोंबिवलीच्या देशपांडे आजी या दोघींचे शब्द ऐकले त्यावेळी मला माझ्या गुरुंनी "अनुभव वाटून टाक" हे का सांगितलं त्याचा अर्थ समजला. ज्या वेळेला सद्‌गुरु बाबा महाराज तराणेकर यांनी मला "अनुभव वाटून टाक" असं सांगितलं त्या वेळेला त्या अनुभवांचा ही संचय नको असा अर्थ मला प्रतीत झाला होता मात्र त्यामागचा अर्थ खूप वेगळा होता.

नर्मदामैया आणि माझ्या सद्‌गुरूंनी माझी निवड एका वेगळ्याच कार्यासाठी केली होती. कावरे आजी आणि देशपांडे आजी यांचे शब्द ऐकून ते जाणवतंय. **नव्वद वर्ष पूर्ण झालेल्या देशपांडे आजी म्हणाल्या " माझं वय असं आहे की मी गाडीने देखील परिक्रमा करू शकत नाही. माझी सून मला तुझे सगळे अनुभव वाचून दाखवत असते. मला डोळ्यांनी अजिबात दिसत नाही मात्र माझे कान का शाबूत राहिलेत हे मला समजतंय आता. माझी नर्मदा परिक्रमा करणं झालं नाही याची मला आता अजिबात खंत वाटत नाही कारण न दिसणाऱ्या डोळ्यांनी आणि ऐकू येणाऱ्या कानां मार्फत तुझ्या अनुभवांचा हात धरून तुझ्याच सोबत मी देखील ही परिक्रमा पूर्ण केली आहे असं माझं मत आहे. मला नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याचं समाधान आणि भाग्य नक्कीच लाभलेलं आहे तुझ्या अनुभव कथनामुळे" या अभिप्रायापेक्षा मोठा अभिप्राय काय असू शकतो?कारवारच्या कावरे आजी तर "तुझ्याशी बोलून झालं आणि माझं नर्मदा दर्शनाचं इप्सित पूर्ण झालं" असं बोलून ढसढसा रडू लागल्या!**

बडोद्याची यशश्री, जळगावची मंजिरी, पुण्याची मेधा, नागपूरची मयूरा आणि अशा असंख्य मैत्रिणी मला नर्मदामैया नी दिल्या. या मैत्रिणींची लहानगी आपल्या आयांकडे हट्ट

करतात "सुरूची मावशीचा तो हनुमानाच्या दर्शनाचा अनुभव सांग, तिला नर्मदामैया नी कसं उचललं होतं ते सांग" आणि हे असं झालं की वाटतं की इतक्या इवल्या-इवल्या मनांमध्ये भक्तीचे बीज माझ्या करवी पेरण्याचं भाग्य मला माझ्या सद्‌गुरुंनी आणि माझ्या मैया ने दिलं ही केवढी कृपा माझ्यावर!

स्वीडनचे प्रियतम चव्हाण दादा, दुबईचे अभिषेक दादा, फिजीचे अमित देशपांडे दादा, अश्या कितीतरी भारताबाहेर राहणाऱ्या नर्मदा भक्तांनी आवर्जून फोन केलेत, कौतुक केलं अभिनंदन केलं!नर्मदामैया, सद्‌गुरु नाना महाराज यांनी मला खूप मोठा परिवार दिला. या खूप मोठ्या परिवाराचं खूप खूप प्रेम मला मिळालं आहे, मीळतं आहेखरं तर आताच, म्हणजे हा "**नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग-2"** प्रकाशित करायचं ठरवलं त्याच दिवशीची गोष्ट. गुरुपुष्यामृत योग. शुभ दिवस. हा दिवस माझ्यासाठी एक मंगलमय दिवस होता. रोज फोन येतात तसाच एक फोन त्यादिवशी ही आला मात्र हा फोन रोजच्या फोनपेक्षा निश्चितपणे वेगळा होता. **"मी नाशिक हुन माधव गिरी महाराजांचा शिष्य बोलतो आहे. माधव गिरी महाराज गेल्या 13 वर्षापासून मौन आहेत. त्यांना जर कधी काही सांगायचं असेल तर ते पाटीवर लिहून देतात. तुमचं नर्मदा परिक्रमेचा पुस्तक मी महाराजांना वाचायला दिलं. महाराजांना तुमचं पुस्तक अतिशय आवडलं. तुमची अध्यात्मिक बैठक नक्कीच प्रगतीवर आहे असं महाराज म्हणालेत. महाराजांच्या पाटीचे दोन फोटो पाठवीत आहे. "** या फोन नंतर लगेचच एक व्हिडिओ कॉल आला. व्हिडिओ कॉल घेता क्षणी समोर बसलेले माधवगिरी महाराज दिसू लागले. विनम्रपणे हात जोडून महाराज बसले होते. मी प्रणाम करताच स्मितहास्य करत आशीर्वादाचा हात त्यांनी वर केला. हा खरंतर ग्रीन सिग्नलच म्हणायचा दुसऱ्या भागाच्या प्रकाशनासाठी. मला पुन्हा एकदा बाबा महाराज तराणेकर, गुरुमहाराजांचे शब्द पुन्हा आठवले "वाटून टाक" आणि घेतला निर्णय. खरं तर संपूर्ण पुस्तक पूर्ण करून मगच भाग २ प्रकाशित करायचं असं आधी ठरवलं होतं पण अंदाजे किती भाग होणार, ते लिहून कधी होणार आणि मग प्रकाशित कधी होणार याची कल्पनाच

येत नाहीये अजूनही. मग काय, जितकं झालंय, तितकं करायचं प्रकाशित! कारण आता माझा हा वाचक वर्ग माझ्यासाठी परका उरला नाहीये, इथे कसलीही औपचारीकता दाखवण्याची गरज नाहीये. नर्मदा माईंनी दिलेली ही माझी जिवाभावाची माणसं आहेत त्यामुळे मी अगदी मनमोकळं वागतेय.. माझ्या वाचक परिवारालाही असच आवडेल याची खात्रीच आहे मला. यापुढे जेवढे भाग लिहून होतील ते “नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग -३” असेल.

खरंतर यापुढे आणि याहून वेगळं काय लिहू हेच मला समजत नाहीये. "नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग-1" हे फक्त महेश्वरपर्यंतच्या अनुभव कथनाचं फळ आहे. आता "**नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग-2"** आम्ही वाचकांपुढे ठेवत आहोत. या भागात भाग ५१ ते भाग ९०चं एकत्रीकरण केलेलं आहे. तसेच आधीच्या भागातील भाग ४९ व ५० हे वाचकांना निरंतरतेसाठी जोडले आहेत. हे भाग अगदी जसे लिहिल्या गेले तसेच ठेवलेयेत, काहीही बदल न करता. याचं कारण असं की हे भाग लिहित असताना त्या प्रत्येक भागातून मला वाचकांची उत्सुकता जाणवलीय. उगाच पुस्तक रुपात आणताना मला त्या उत्सुकतेशी, त्या भावनांशी कसलीच तडजोड करावीशी वाटत नाही. मैयाने जे जसं लिहवून घेतलं ते तसंच तिच्या सर्व लेकरांसाठी असावं हीच इच्छा.

या "**नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग-2"ला** देखील वाचकांचे प्रेम, वाचकांचे आशीर्वाद मिळोत आणि नर्मदा मैया आणि सद्गुरूंनी माझ्यासाठी नेमून ठेवलेलं कार्य विनाविघ्न पूर्ण होवो अशीच प्रार्थना करते!

नर्मदे हर

सौ सुरुचि नाईक

# अर्पणपत्रिका

माये, माझी मती तोकडी

शब्द ब्रम्हा कैसे घडी?

तुज जे जैसे आवडी

लिहवीती झाली....

तूचि शब्द, तूचि वाणी

तूचि दृष्टी, तू देखणी

तूचि तू, अन मीही आणि

वेगळाले कशाचे?

आई नर्मदे, अनुभव तुझे, वाणी तुझी आणि लेखणी ही तुझीच!

आता परसावी उक्ति

स्वये गाता सरस्वती

काय कथा येती हाती

लीला अवघी कळेना...

तुझ्या अनुभवातून, तूच दिलेली ही अनुभव मालिका तुलाच अर्पण

**प्रार्थना**

नरमदा माझे माई।
ध्यान लागो तुझे ठाई ॥१॥

नाम तुझे येता चित्ती।
भय भिती नुरतसे ॥२॥

नाम तुझे येता ओठी।
दु:खी कष्टी सुखी होत॥३॥

भेटी आले तुज, मज।
सारासार उमगले॥४॥

"रुचि" म्हणे रेवा रेवा
रेवा मय जीव व्हावा॥५॥

-रेवारुची सुरुचि

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

### भाग २

नर्मदा परिक्रमा -एक विलक्षण अनुभूती – भाग-४९

नर्मदे हर..

मागच्या भागात मी महेश्वरला झालेल्या गोष्टींबद्दल सांगत होते. आज तर महेश्वर चा पहिलाच दिवस होता.. मात्र इथून माझ्या आयुष्याची दिशा बदलली असं मी म्हणालेय… मी ३ दिवस होते इथे आणि हे तीनही दिवस माझ्यासाठी खूप महत्वाचे आहेत. दुसऱ्या दिवशी जो संवाद झाला त्या वेळी मी पुरती गोंधळात पडले, मला सावरायला वेळच लागला.. कारण हा संवाद होता माझ्या नाळेशी जोडलेला… माझ्या आईशी आणि माझ्या बाळाशी पण…. पण तो संवाद आणि ती स्थिती मला मागच्या भागात सांगता आली नव्हती, ती आता सांगते, पण थोडं आधीपासून.

रात्रीचा हा “साक्षी” चा संवाद ऐकून मी झोपी गेले. बाबा कधीचाच झोपून गेला होता. मला रात्रभर व्यावस्थित अशी झोप लागली नाही मात्र थकवा ही आला नाही. साक्षी होणे या एका विचारावर माझी रात्र आनंदाने सरत गेली होती. मला स्वामीजी आणि माताजी आवर्जून साक्षी म्हणतात.. अजूनही! किंबहुना साक्षी हेच माझं नाव असावं इतकी सहजता त्यांच्या मला साक्षी बोलावण्यात असते, आणि तितकीच माझ्या प्रत्युत्तराला पण! तर दुसऱ्या दिवशी सकाळी मला लवकर जाग आली, अगदी साडे चार ला. परिक्रमेत तशीही लवकर उठण्याची सवय होऊनच जाते.

मी खाली गेली तर माताजी आणि स्वामीजी उठले होते. माताजी स्वयंपाक घरात काहीतरी काम करत होत्या आणि स्वामी जी अंगण झाडत होते. मीसुद्धा जवळ असलेला एक खराटा घेतला आणि अंगण झाडू लागले. आमचं अंगण झाडून झाल्यावर माताजीन्नी मला

बसवलं, मला ओवाळलं आणि भिजवलेले तीळ वाटून केलेलं उटणं माझ्या अंगाला लावून म्हणाल्या " जाओ अब मैयाजी मे स्नान करके आओ, तुम्हारे लिये एक काम रक्खा है" ती संक्रांत होती. मी स्नान करून आल्यावर माझ्याकडून मंदिराची साफ सफाई आणि पूजा करवून घेतली. अगदी फुलं तोडण्यापासून ते नैवेद्याचा स्वयंपाक आणि नैवेद्यसुद्धा माझ्या हाताने दाखवला आणि हे सगळं करताना कधी माताजी तर कधी स्वामीजी माझ्या सोबत होते, एखाद्या आईने बोट धरून लहान मुलाला चालायला शिकवावं तसं एक एक गोष्ट ते मला सांगत होते. "चलो आज दो चीजे हो गयी, परिक्रमावासी के हाथ से पूजा हुई और तुम्हारे कर्मो मे अगर कोई बडा भोग होगा तो भी कट गया होगा, मंदिर मे सफाई करने का मौका मिले तो कभी मत छोडना, उससे कर्म कम हो जाते है" हे ऐकून खूप समाधान वाटलं, वाटलं चला, काही भोग तर झाले बाबा कमी… आणि सगळं आटोपल्यावर मी तिथेच मंदिराच्या खाली मैयाच्या घाटावर बसले तेव्हा झाला आजचा संवाद.. माझ्या नाळेशी जोडलेला, ज्याबद्दल मी मागच्या भागात बोलत होते नं तोच..

कालचा संवाद, आज सकाळपासून झालेल्या घडामोडी, ते बगीचातून फुलं तोडणं, आपल्याच धुंदीत मस्त श्लोक म्हणण, मनसोक्त पूजा करणं.. कितीतरी दिवस इतकं निवांत पणे मी हे केलंच नव्हतं. शाळेची घाई, त्यात घाई घाईत पूजा, आणि सुट्टीच्या दिवशी बाकी कामांची रीघ लागलेली. इथे मात्र मी आणि माझी मैया… आणि हा निवांत पणे स्वतःला समजून घेण्याची संधी.. मला हे सगळं हवं हवं सं वाटत होतं. काळ इथेच थांबून रहावा असं वाटत होतं. मी पायरीवर बसले होते, माझ्यासमोर मैया होती आणि अचानक मला रडू आलं.. रडू म्हणजे अगदी हलकं नाही बरं का, आवंढेच येऊ लागले. मी हमसून हमसून रडू लागले.. माझा हा निवांतपणा, माझं हे समाधान, माझी ही मैया, हे सगळं सोडून मला परत जावच लागेल या विचारांनी असेल बहुधा.. पण मला इथेच थांबून राहावंसं वाटत होतं.. परिक्रमा संपूच नये कधी असं वाटत होतं. मला रडताना ऐकून स्वामीजी तिथे आले, आणि हा संवाद सुरु झाला.

"क्या हुआ? क्यू रो ही हो साक्षी?" त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला, आणि मला म्हणाले "मुझे बताओ, शायद तुम्हारी समस्या दूर हो जाये" . मी मला जे जे वाटत होतं ते ते सांगितलं. मी माझी द्विधा मनस्थिती सांगितली. मला इथेच राहावंसं वाटत होतं, पण माझं घर, माझा नवरा, माझा मुलगा, माझे आईवडील, माझं विश्व तिकडे माझी वाट बघत असणारे हे मला माहित होतं. माझा जीव अडकला होता माझ्या नाळेशी.. बाकी सगळ्यांचं एक वेळ ठीक होतं हो, पण माझं लेकरू? माझा एकुलता एक मुलगा? त्याच्यासाठी तरी मला जायलाच हवं होतं.. आई आहे मी त्याची आणि आज सगळ्यात जास्त जर कुणाला माझी गरज असेल तर ती माझ्या लेकराला आहे, आणि त्यामुळे माझं इथून जाणं हे निश्चित आहे… आणि इथे मी माझ्या माई ला, माझ्या आईला सोडून जाऊ तरी कशी? काही कळत नव्हतं… अशा परिस्थितीत समोर घडेल ते साक्षी होऊन बघणं कसं जमेल मला? मी नं माझ्या मैयाला सोडू शकत होते, न माझ्या लेकराला… मी जरा शांत झाल्यावर मला स्वामीजी म्हणाले.. "बस इतनी सी बात? और तुम इतना रो रही हो? सुनो, अब तुम्हे जाना तो है ना तुम्हारे बेटे के लिये? तो जाओ ना? जो मैया तुम्हे बुला सकती है, उसे नही पता क्या तुम्हारे बेटे के बारेमे? वो नही चाहेगी की तुम उसकी मैया बनो, जैसे वो तुम्हारी मैया है? तुम्हारे फर्ज से दूर वो कभी नही करेगी तुमको साक्षी! और फिर तुम्हारे फर्ज पुरे करने के बाद तो तुम आ ही सकती हो… हे ऐकून मला जरा धीर आला, आणि मग मात्र ते जे काही बोलले तो खरा संवाद.

मी शांत झालेले पाहून ते म्हणाले, "साक्षी एक बात बोलू, यहा कोई किसीका कुछ नही होता है. हर कोई अपने अपने रास्ते चल रहा है. तुम कैसे कहती हो की ओंकार तुम्हारा बेटा है, जरा बताना तो?" हा कसा प्रश्न आहे? ९ महिने पोटात सांभाळलेल्या पोटच्या गोळ्याला मी माझं बाळ कसं नको म्हणू? लहानाचा मोठा केलाय त्याला, माझंच बाळ आहे ते, माझा जीव की प्राण आहे तो…. मी सांगितलं त्यांना.. ते म्हणाले "हा वो तो सही है, लेकीन तुम कौन हो?" आता मात्र मला उत्तर देता येईना. जिथे मीच कोण हे माहित नाही तिथे माझं कोण, माझं काय, याबद्दल काय बोलू मी? माझा झालेला गोंधळ स्वामीजींना लक्षात आला. ते हसले, म्हणाले "

इस जनम मे तुम सुरुचि हो, हा मरे लिये तुम साक्षी हो, और आगे न जाने क्या होगी, पर ये नाम तो केवल इस देह के है, सच कहे तो तुम परमात्मा का अंश हो जो अपने मार्ग मे चल रही हो, वैसे ही तुम्हारा बच्चा है, जो अपनी मार्ग मे चल रहा है. समझाता हूं.

समझो की तुम्हे नागपूर से मुंबई जाना है, तब तुम क्या करोगी? तुम नागपूर से मुंबई जाने वाली गाडी देखोगी, बस देखोगी, ट्रेन देखोगी या फ्लाईट देखोगी, है न? उसके बाद तुम एक कोई वाहन तय करोगी, मानो की ट्रेन! अब तुम अपने हिसाब से जानेवाली, सही समय पर, और सही जगह पर पहुचाने वाली कोई एक ट्रेन को चुनोगी जो तुम्हे तुम्हारे ध्येय के सबसे पास, और उचित समय पर पहुचा सके.. ठीक है न? तुम खुद चुनती हो ना तुम्हारे सफर का वाहन? बस इतना ही तो आसान है! हम सब एक सफर कर है, हर एक का सफर अलग है लेकीन ध्येय एक है.. मोक्ष! इस सफर मे कोई आगे है तो कोई पिछे है.. लेकीन जाना सबको वही है.. सब अपना अपना वाहन खुद चुनते है, जैसे तुम्हारे बेटे ने तुम्हे चुना है. जब एक जन्म से निकल कर दुसरे जन्म की स्थीती मे आत्मा प्रवेश कर रहा होता है तब उसे पुरा ज्ञान होता है, लेकीन जनम मे नही होता. जब वो जन्म लेता है तब वो देह के पिंजरे मे बंद होता है जहा से उसे उस जनम के पहले और बाद का ज्ञान नही होता, वह जनम के बंधन मे इस तर्ह बांध लिया जाता है की उसे कुछ भी याद नही रहता. जब वो अपना जन्म खत्म कर मुक्त होता है तब उसे फिरसे उसके ध्येय की याद आती है और वह रास्ते खोजता है की कौनसा रास्ता उसे अपने ध्येय तक पहुचा सके. वह ऐसे माता पिता की खोज करता है जो उसका हाथ पकड कर ध्येय के सबसे करीब ले जाये. तुमने तुम्हारे माता पिता के घर शायद इसीलिये जन्म लिया की वही माता पिता तुम्हे तुम्हारी नर्मदा मैया तक पहुचा सके! और तुम्हारे बच्चे ने भी तुम्हारे कोख से अपने ध्येय के लिये ही जन्म लिया है. तुम्हारा और उसका और कोई रिश्ता है ही नही! तुम दोनो ही इस सफरके यात्री हो जो थोडे समय के लिये साथ मे सफर कर रहे हो"
…

माझ्यासारख्या सर्व साधारण व्यक्तीच्या भावनांवर झालेला हा आघाताच होता एक प्रमाणे. एका झटक्यात मी माझ्या आई वडिलांपासून आणि माझ्या मुलापासून वेगळे झाले होते.. एका क्षणात माझा आणि त्यांचा संबध फक्त सहप्रवाश्या इतकाच राहिला होता, आणि हे इतक्या लवकर आत्मसात करणं मला कठीण जात होतं.. आतापर्यंत चा हा सगळ्यात मोठा धडा होता मिळालेला, आणि सगळ्यात कठीण! “इदं न मम” मला समजून झालं होतं, पण अंगवळणी पडलं नव्हतं हे आज समजलं, कारण आजवर माझे आई वडील आणि माझा मुलगा ह्या दोघांना मी माझ्यापासून वेगळे समजतच नव्हते. पण आपण एकट आलेलो आहोत, आणि एकटंच जायचं आहे, आपला प्रवास हा एकट्याचाच प्रवास आहे हे कित्येकदा ऐकलेलं, कित्येकदा वाचलेलं असूनसुद्धा ते भिनायची सुरवात आजवर झालीच नव्हती. अनेकदा अनेक गोष्टी आपल्याला माहित असतात, समजत असतात, पण आपल्याकडून घडत नसतात… तसं काहीसं होत होतं… हळू हळू माझं एक मन या सत्याला आत्मसात करण्याची तयारी करत होतं आणि दुसरं अजूनही या धक्क्यातून बाहेर यायला तयार नव्हतं. तोंडानी बोलणं खूप सोपं असतं हो.. क्लासला गेलेल्या मुलाला घरी यायला तासभर उशीर होऊदेत, तेव्हा आपली जी घालमेल होते ना ती या ममते पोटीच, जीव्हाळयापोटीच न? जिथे हे “माझे” पण येतं नं, गुंता होतो नं जिथे, तिथे गाठ पडणार, आणि गाठ पडली सोडवायला कठीण अगदी.. खरंच कठीण असतं हे असं एकदम पटवून घेणं…. पण सांगू.. हे एकदा पटलं की मार्ग सुलभ होतात.. माझा सुन्न चेहरा आणि शून्य प्रतिसाद पाहून महाराज पुढे बोलू लागले… ” होता है साक्षी, अभी अभी समझ रहा है तुमको, ये अवस्था होना स्वाभाविक है, चिंता की बात नही है. थोडा और समझाता हूं तो तुम्हे एकदम शांती मिलेगी. हा ये सच है की वह तुम्हारा कोई नही है, लेकीन इस देह की वजह से तुम एकसाथ हो, तो इसको थोडा आसान बनाते है… देखो, अब तुम पुरी तऱ्ह से समझ जाओगी” . खरं तर ते आता काय म्हणताहेत याची मला जरा भीतीच वाटली, पण ते जे काही बोलले त्या नंतर मात्र माझं मन अगदीच शांत झालं… पण हा संवाद देखील महत्वाचा आणि मोठा आहे. याच भागात नाही सांगता यायचा.. खरं तर हा अपूर्ण संवाद आणि

अजूनही माझ्या आयुष्याच्या बदलत्या दिशेचा आणिक एक अनुभव आहे… माझं नागपूर कसं अचानक सुटलं त्याचा.. पण पुढच्या भागात आधी हा संवाद पूर्ण करेन…



नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५०

नर्मदे हर..

तर मागच्या भागात मी म्हणाले होते की महेश्वर चा अजून एक संवाद आणि एक अनुभव बाकी आहे. माहं मन शांत झालं होतं. स्वामीजी बोलत होते आणि मी ऐकत होते. ते म्हणाले "तो इस जनम मे, याने की जब तक तुम्हारा और तुम्हारे बच्चे का देह है, याने की जब तक तुम दोनो ही इस पिंजरे मे बंद हो तब तक तुम चाहो या ना चाहो तुम्हे साथ रहना तो है, और जिसके लिये तुम इस जनम मे आये हो, वह कार्य भी पुरा करना है. तुम्हे माँ होने का कर्तव्य निभाना है, और उन्हे बेटा होने का··· वह तो तुम अबतक निभाती आ रही हो, और आगे भी निभाओगी.. सवाल तो इसके बाद का है··· तुम्हे यह सब करने के लिये मै मना नही कर रहा हू, लेकीन यह पिंजरा जब खुल जायेगा, जब तुम्हे आझादी मिलेगी, तब तुम्हे जाना होगा, आगे की ओर.. हम सब इस पिंजरे मे ही इतना खो जाते है की यहा से निकलना ही नही चाहते··· और पिंजरा तो जीर्ण हो चुका है, टूट चुका है, लेकीन हम उसे छोड ही नही पाते है ··· तकलीफ तो तब होती है··· और इसीलिये इस सत्य को समझने की जरुरत तो है ही.. अपने आप को याद दिलाने की जरुरत तो है ही.. जितना जल्दी समझ जाओगी उतना ही जल्दी आगे होने वाली तकलीफ से बच पाओगी साक्षी. यही तो है तुम्हारा "साक्षी" होना..

हे साक्षी होणं आता मला समजू लागलं होतं, आवडू ही लागलं होतं आणि माझ्या मनानी त्याचं साक्षी होणं मान्य ही केलं होतं, फक्त त्याची सवय व्हायला वेळ लागणार होता हे नक्की. आणि या साक्षी होण्यात सगळाच साक्षी भाव होता. माझं म्हणून मी जे काही म्हणते त्या

सगळ्याशी माझा असलेला संबंध हा एकीकडे मान्य होत होता तर दुसरीकडे तो आहे याचा फक्त स्वीकार होत होता. इथे अमान्य असं काहीच नव्हतं. होता तो फक्त स्वीकार, मग तो कुठलाही असो, कशाचाही असो… अगदी माझी परिक्रमा एक दिवस संपून जाणार म्हणून उद्विग्न झालेल्या माझ्या मनाच्या अवस्थेपासून सुरु झालेला हा संवाद आणि ही विचार प्रकिया मला पुन्हा याच ठिकाणी आणून ठेवत होती, मात्र आता त्यात स्वीकार होता… हो माझी परिक्रमा एक दिवस संपून मला घरी परत जायचं आहे आणि जर असं घडायचं आहे तर तिथे माझा पूर्ण स्वीकार असणं म्हणजेच माझं साक्षी होणं आहे.. मला साक्षी व्हायचंय आणि म्हणून मी हे स्वीकारायला हवं.. पण माहितीये का? जेव्हा तुम्ही इतक्या शुद्धतेने एखाद्या गोष्टीचा स्वीकार करता नं तेव्हा कुठेतरी तुमच्या मनाची काळजी घेणारी ती माउली तुमच्याकडे बघत असते. तुमच्याहीपेक्षा तुमच्या भावनांची, तुमच्या निस्सीम प्रेमाची ती नर्मदा मायसुद्धा भुकेली असावी कदाचित की काय माहित नाही पण, तिच्या लेकरांना समाधान मिळत राहील याच्याकडे तिचं फार लक्ष असतं.. असाच हा पुढचा अनुभव.. पुन्हा त्याच सुरवातीच्या संवादा नंतरचा.

तर जेव्हा मला स्वामीजी म्हणाले की “तुम बादमे भी मैया किनारे आ सकती हो” , आणि त्या नंतर जेव्हा साक्षी होण्याचा आणि नाळेच्या संबंधांचा खुलासा झाला त्या आधीचा हा संवाद आहे, फक्त त्याचा परिणाम एका अनुभवात झाल्यामुळे तो नंतर सांगतेय. मी रडत असताना माझी समजूत काढायला स्वामीजी म्हणाले होते “रो क्यू रही हो? तुम्हे मैया किनारे आना है ना, आ जाओ… ” माझं घर दार सोडून मला येता येणार नाहीये म्हणून मी अधिकच त्रस्त झाले होते तेव्हा स्वामीजी मला म्हणाले.. “उनको छोडकर नही आ सकती तो सबको लेकर आजाओ.. ” मला सांत्वना द्यायला म्हणत असावे ते असं वाटलं मला.. मुलगी रडतेय, धीर द्यावा तिला म्हणून बोलले असतील ते असं वाटलं.. मात्र ते अजून एक वाक्य बोलले होते. ते म्हणाले, “साक्षी, तुम या तो १ साल मे, या तो ५ साल मे मैया के पास आ जाओगी., ५ साल के अंदर नही आयी तो दसवे साल सब छोड के आओगी.. ”. मी या बोलण्यावर अजिबात

विश्वास ठेवला नव्हता कारण माझ्या मते हे मला धीर देण्यासाठी केलेलं वाच्य होतं. पण बरेचदा तसं नसतं… किंबहुना जे आपल्याला अजिबात महत्वाचं वाटत नाही तेच कधी कधी सगळ्यात जास्त महत्वाचं ठरतं. इथेही तसंच झालं.

माझं महेश्वरचं दाणा पाणी संपायला आलेलं. स्वामिजींकडून अनेक टिप्स आणि खूप सारा सत्संग घेऊन मी निघाले. ते नंतरही मला फोन वर अनेक गोष्टी सांगत असत.. पण ते नंतर सांगते.. आता सांगते मी महेश्वर हून निघून दहा दिवसात मला आलेला हा तो महत्वाचा अनुभव. मी महेश्वर हून पुढे निघाले आणि माझ्या यजमानांचा मला फोन आला एक दिवस. “अगं तुला एक महत्वाचा निर्णय सांगायचा आहे” ते म्हणाले. “आपल्या राहुल नी नवीन कंपनी सुरु करायचं ठरवलंय आणि मी पण त्याच्यासोबतच काम करायचं ठरवलं आहे तेव्हा तू परीक्रमेहून आलीस की आपण इंदोरला शिफ्ट व्हायचय” .. राहुल, माझा दीर इंदोरला असायचा तेव्हा आणि आम्ही नागपूरला, आणि आता आम्ही इंदोरला शिफ्ट होणार होतो.. म्हणजे स्वामीजी म्हणाले ते खरं होतं तर… मी परिक्रमा पूर्ण करून आले आणि २ महिन्याच्या आत इंदोरला शिफ्ट झालेसुद्धा… “घरवालो को छोड के नही आ सकती तो उन्हे लेकर आजाना” हे स्वामीजी म्हणाले होते ते अगदी खरं ठरलं होतं.. माझ्या मैयांनी आणि माझ्या गुरुंनी मला त्यांच्या जवळ बोलावून घेतलं होतं. इंदोरला माझं गुरूस्थान आहे, नाना महाराज तराणेकरांच आणि इंदोरपासून फक्त ७० किमी वर माझी मैया आहे. माझ्या आयुष्याची दिशा बदलत गेली ती अशी. मी नागपूर सोडून कुठे कधी जाईन हे स्वप्नातही वाटलं नव्हतं मला, पण ते झालंय.. माझ्या हातून नक्की काहीतरी करवून घेण्याची गुरुंची आणि मैयाची इच्छा दिसतेय पण नक्की काय ते अजून नीट समजलं नाही.. मला घाई नाहीच कारण जे जेव्हा करणं माझ्या भाग्यात असणार ते तेव्हा तेव्हा होणार याची मला आता खात्री आहे.

माझी परिक्रमा सुरु असताना आणि नंतर देखील या महेश्वरच्या महाराजांशी माझा संपर्क कायम होताच, आणि तसतसे अनुभव पण मला आले. त्यातला एक इथे आवर्जून सांगते,

पुढचे मात्र जसं जसं आपण परिक्रमेत पुढे जाऊ तसतसे सांगेन. आम्ही म्हणजे मी आणि बाबा बरगी कॉलनी वरून पुढे निघालो तेव्हाची गोष्ट बरं का. त्या दिवशी स्वामीजींचा मला फोन आलेला. "साक्षी कैसे हो? आज हमने एक निर्णय लिया है, तुम्हारी परिक्रमा पूर्ण होणे के बाद तुमको महेश्वर आना है, और वो भी जल्दी… तुम्हारे लिये कूछ खास है.. भाग खुलने वाले है तुम्हारे, लेकीन आज की बात सुनो आज तुम्हे तीन अलग अलग जगह पार की लोग रास्ता बतायेंगे, लेकीन जो रास्ता कोई चाय या हॉटेल वाला बातायेगा वही लेना, कल माताजी को सपना आया है, इसलिये बाता रहा हू"   मला जरा आश्चर्य वाटलं पण काय हरकत आहे ऐकून घ्यायला.. म्हणून मी लक्षात ठेवलं.

आम्ही तिलावारा घाटला जायला निघालो. फार रमणीय रस्ता, जंगलातून जाणारा, पहाड, पळसाची झाडं लागलेली.. (हा अमरकंटक हून ओमकारेश्वरला येताना चा अनुभव आहे, पण महेश्वरच्या महराजांचा आहे म्हणून आता सांगतेय, अजून आपण अमरकंटकला पोचायचे आहोत, या भागाचे अनुभव लिहिताना या अनुभवाची आठवण करून देईनच पुन्हा) पहाड चढून उतरून अधून मधून टुमदार कसबे वजा गावं लागायची, असा हा रस्ता. एका गावात आम्हाला एका दुकानात चाहावाल्यांनी थांबवलं… त्यांनी चहा पाजला आणि "तिलावारा घाट क्यू जा राहे हो, उलटा हो जायेगा ना.. यहासे आगे निकलके दाये मोड पे जाना, सीधा त्रिशूल घाट जाओगे"   त्याच्या या सांगण्यावरून तिथेच असलेल्या एका त्याच्या गीऱ्हाईकाच दुमत पण झालं त्याच्याशी… मात्र चहा वाल्याचं ऐक असा फोन सकाळीच झाला होता आणि म्हणून आम्ही त्याचं ऐकलं, आणि आता त्रिशूल घाटाकडे निघालो. वाटेत नाना खेडा नावाचं गाव लागतं, तिथे मुक्काम केला, तर तिथल्या माणसाने सांगितलं की तुम्ही उजवीकडे गेले असते तर तिल्वारा घाट लागला असता, आता उलटं जाऊ नका उद्या, त्रिशूल घाट जवळ आहे, तिकडे जा, पण दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एका चहावाल्याच्या दुकानात असताना त्याने सांगितलं, तिकडे कशाला जाताय, एक वाट शेतातून जाते, एक दोन नाले पार करावे लागतात, पण तुम्ही सरळ जा तुम्हाला डूंडवारा नावाचं गाव लागेल, तिथून भेडाघाटला जा

सरळ. तसंच झालं, आम्ही सरळ भेडाघाटला पोचलो देखील… जवळ जवळ ३० किमी चा रस्ता कमी झाला होता आमचा…

पुढे परिक्रमा झाल्यावर मी ओंकारेश्वरला पोहोचली तेव्हा तिथे दारात माझं स्वागत करण्यासाठी हे महेश्वरचे स्वामीजी उभे होते. मला हे अनपेक्षित होतं. माझ्या कधीची, कान्यापुजनाची सगळी व्यवस्था झाली होती आणि एक स्कोर्पियो गाडी माझी वाट बघत होती. माझं सगळं आटोपून झालं आणि स्वामीजी मला महेश्वरला घेऊन गेलेत. तिथे गेल्यावर माझ्याकडून यज्ञ करवण्यात आला. माझ्या हातून रामजन्म करवण्यात आला. तो रामानवमीचा दिवस होता. आणि नंतर न मागता मला एक अद्भुत भेट मिळाली. मला बीजमंत्राची दीक्षा मिळाली. बीज मंत्राची दीक्षा मागूनही न मिळणारी आणि ती जेव्हा न मागता आणि सन्यासिनी कडून मिळणं हे केवढं भाग्य! त्या जपाचे अनुभव अजूनच वेगळे आहेत, पण ते सांगू केव्हातरी.

असे अजूनही अनुभव आहेत, पण ते नंतर सांगते, आधी सांगते मंडलेश्वरला जाताना चा आणि तिथला अनुभव, गुरु कसे आपल्याकडे लक्ष ठेवून असतात आणि कशी आपल्याला सतत आठवण देतात त्याची आलेली प्रचीती आणि नर्मदा मैयाचे दुसऱ्यांदा झालेले दर्शन…. आणि ते दर्शन का झालं त्या मागचं कारणसुद्धा! हा अनुभव आहे गंगातखेडी चा, इथून आम्ही रस्ता चुकलो. जवळ जवळ २२ किमी चालून झालं असेल पण या रस्त्यात न अन्न मिळालं नं पाणी… पण तरीही आम्ही तहानलेले ही नव्हतो, आणि भुकेलेले तर अजिबात नाही? असं कसं होईल, काहीही न मिळता?.. सांगते, पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५१

नर्मदे हर.

मित्रांनो, माझ्या प्रिय वाचकांनो आज आधी तुम्हा सगळ्यांचे मला आभार मानायला हवेत. मागचा भाग म्हणजे आपल्या अनुभव कथन मालिकेचा ५० वा भाग होता. नर्मदा मैयाच्या एका लहानश्या लेकराचे बोबडे बोल हे अर्धशतकापर्यंत जाऊन पोहोचतील असं कधीही मला वाटलं नाही, मात्र तुम्ही वाचकांनी दिलेल्या प्रतिसादातून मला दर वेळी नवी उर्जा मिळत गेली आणि प्रत्येक वेळी एका नव्या भागाचं सृजन होत गेलं. त्यामुळे या अनुभवकथन मालिकेच्या वृद्धीचं सगळं सगळं श्रेय माझ्या वाचकांना, आणि माझ्याकडून तुम्हाला आवडेल अशा भाषेत, तुम्हाला आवडेल अश्या शैलीत लिहवून घेण्याचं कार्य करणाऱ्या माझ्या नर्मदा माई ला. मला समजलेली (खरं तर अजूनही नक्की माहित नाही) नर्मदा मैया तुमच्या समोर माझ्या माध्यमातून मांडून ती माई मला पुन्हा एका पुण्याकर्माशी जोडतेय आणि तिची कृपा दृष्टी माझ्यावर कायम ठेवते आहे हेच खरं.

या अनुभव मालिकेचे किती भाग आहेत असा प्रश्न मला अनेकांनी विचारला. त्याचं उत्तर अजूनही माझ्याकडे नाहीये, कारण अजूनही माझं लिखाण पूर्ण झालेलं नाहीये. ते आता त्या मैयावर सोडून मी फक्त लिहिण्याचे कार्य सुरु ठेवतेय. तिला जितकं माझ्याकडून लिहवून घ्यायचं असेल तितकं ती लिहवून घेईल, काही राहिलंच शिल्लक तर “नर्मदे हर”.. अजून काय…नाही का?

परिक्रमेच्या वाटचालीचा आढावा घेत असता ओंकारेश्वर पासून निघून, शूलपाणीची झाडी, समुद्र पार करून महेश्वरपर्यंत येणं म्हणजे जवळ जवळ अर्धी परिक्रमा होत आलीये. आणि आता महेश्वरच्या पुढे जाऊन अमरकंटक आणि मग फिरून पुन्हा ओंकारेश्वर अशी अर्धी अजून बाकी आहे. ही अनुभव मालिका मी रोजनिशी सारखी लिहिलेली नाही त्यामुळे तारीख, वार, वेळ यावर भर नं देता अनुभव आणि निसर्ग यावर काय तो भर दिलेला आहे. बरेचदा एका पाठोपाठ एक असे सतत अनुभव येत राहिलेत आणि बरेचदा काहीही अनुभव न येता दिवस सरत गेले. जेवढे जमतील तेवढे लिहिले आणि बाकीचे मैयार्पण झालेत. त्यामुळे आता पुढे येणारे अनुभव आणि आतापर्यंत आलेले अनुभव एकसारखेच असतील, तितकेच प्रभावी असतील किंवा काहीतरी नवीन असतीलच असं सांगता यायचं नाही. अमुक अनुभव मोठा आणि अमुक लहान हे असं वर्गीकरण परिक्रमावासीला करताच येत नाही. कारण आलेला प्रत्येक अनुभव हा त्या त्या वेळी मिळत असलेल्या समाधानाचं प्रतिक असतो. त्या त्या परिस्थितीशी तितकाच जुळलेला असतो. अगदी रस्ता चुकणे, आणि कुणीतरी येऊन रस्ता सांगणे हा अनुभव प्रत्येकालाच येतो, तरीही त्या वेळेची परिस्थिती मात्र भिन्न असते आणि म्हणून तो अनुभव एक वेगळा अनुभव म्हणून गाठीशी राहात असतो. हे सगळं मी का सांगतेय? तर एक वाचक म्हणून तुम्ही जेव्हा माझ्या अनुभवांच्या माध्यमातून मैयाची अनुभूती घेता त्यावेळी तुमच्या जाणीवेशी मी देखील नकळत जोडली जातेच नं? तुमच्या त्या जाणीवा जश्या आतापर्यंत जपल्या गेल्या तश्या आताही जपल्या जाव्या, आणि आतापर्यंत, म्हणजे अर्ध्या वाटेपर्यंत तुम्ही जशी साथ मला करत आला आहात तशी साथ मिळत राहावी या साठी हा सगळा उहापोह. यापुढे काय असा प्रश्न तुमच्या मनात प्रत्येकच भागा अखेरीस असतो, तसाच तो माझ्याही पुढे असतोच.... अनुभव माझे असतात पण ते मांडताना प्रामाणिक पणा खेरीज दुसरं काहीही येवू नये, अहंकाराचा स्पर्श देखील येऊ नये हेच सतत मनात असतं...त्यामुळे त्या माईला स्मरून, आणि तिच्यावर सोपवून मी फक्त कागदावर उतरवण्याचे

काम करत असते... आणि म्हणूनच मी देखील तुमच्या इतकीच अजाण असते. तरीही नम्र विनंती इतकीच की हे प्रेम असं कायम राहू द्या...

आज अजून एका मैयाबद्दल लिहिणार आहे. जिच्यामुळे या लेख मालिकेला सुरवात झाली ती माझी सखी अमृता. डॉ. अमृता इंदूरकर, माझी बाल मैत्रीण. मला आलेले अनुभव आले, मी अनुभवले असं म्हणून मी शांत होते. ते लिहून काढायचं वगैरे काहीही माझ्या मनात नव्हतं, मात्र ह्या माउली ने माझ्या जवळ हट्टच धरला. " ते काही नाही सुरु, तू तुझे अनुभव लिहायलाच हवेत. तू परिक्रमा करून आलीयेस, काहीतरी मिळालय नं तुला? मग ते स्वत;पुरतं ठेवतेयस? काय अर्थ मग त्या परिक्रमेला? असच अजून एक हक्काचं माणूस म्हणजे माझा बालमित्र घना, श्री घनश्याम सहस्रभोजनी. तू छान लिहितेस, लिहून तर बघ... लिहिलंस का? असं सारखं विचारून पाठपुरावा करणारा घना आणि अमृ यांच्या या उद्गारांनी मला जाणवलं... जे काही मला मिळालय त्याची उजळणी जर मी करत राहिली नाही तर ते मला अंमलात कधीच आणता येणार नाही. आणि ते जर चारित्र्यात उतरलं नाही तर काय अर्थ आहे? कठीण आहे मान्य आहे... पण निदान या लिखाणामुळे मी पुन्हा पुन्हा त्या त्या अनुभवातून जाते आणि पुन्हा पुन्हा अनेक वळणावर न वळता, माझ्या मार्गाची मला आठवण होते. कारण हे अनुभवण, शिकणं आणि आपण तसं घडत जाणं ह्या तीनही वेगळ्या प्रक्रिया आहेत, आणि त्या पार पाडण्यासाठी काल नामक सहाय्याची गरज लागणार आहेच. तेव्हा या कालचक्रात मला माझ्या मैयाशी जोडून ठेवून, माझ्या मार्गाची जाणीव करून देणारे हे अनुभव या लेखमालिकेच्या स्वरूपात पुढे आणणाऱ्या माझ्या अमृता माईचे, आणि "घनशाम बाबा"चे शतश: आभार !

आता त्या लोकांबद्दल ज्यांच्या भरवश्यावर ही परिक्रमा पूर्ण होवू शकली. नर्मदा माई ज्यांच्या ज्यांच्या म्हणून रुपात येऊन मला जेवू खाऊ घालून गेली, ज्यांच्या ज्यांच्या म्हणून घरी माझा दाणा पाणी त्या मैयांनी लिहून ठेवलं होतं त्या सगळ्या सगळ्यांच्या चरणी प्रणाम फक्त काय तो मी करू शकते.. आभार ही तर औपचारिकता आणि ती करावीशी वाटत नाही कारण

या ऋणातून मला बाहेर पडायचं नाहीचे मुळी. मला आठवतो तो खापारामाळचा शांतीलाल पावरा, त्याची बायको.. स्वत: उपाशी राहून आम्हाला खाऊ घालायला तयार असलेली... मी नाही विसरू शकत माझ्या बाबाला, माझी अतोनात सेवा केली होती त्याने मी आजारी असताना, नारेश्वर ला.... मोलगीचे नाईक काय किंवा बगवानीयाची ती दोन लहान मुलं काय......ते म्हातारे लाल पुरी बाबा, आमच्या साठी भर थंडी अंगावर आभाळ पांघरून झोपतात, ती कुक्षी मा.. माझा वाढदिवस साजरा करते, मला कपडे करते... त्या मध्यप्रदेशातल्या परिक्रमावासी मैया बलाबला कुंडला येऊन माझी चौकशी करणाऱ्या, राज घाटला रात्री ११ वाजता फक्त मला भेटायला येणारे मांगीलालचे जावई, ५० किमीपर्यंत जेवणाचा डबा घेऊन येणारी मोनिका, मांगीलाल, हरी ओम भाई, किती किती नावं घेऊ? ही संपता न संपणारी यादी आहे. या प्रत्येकाकडून माझी काळजी घेतली गेलीये, माझं संगोपन केलं गेलय, माझं पालन पोषण केलं गेलंय, मला योग्य वाटेवर नेऊन ठेवण्याच्या या प्रक्रियेत बहुमोलाचा वाटा या प्रत्येकाचा आहे आणि म्हणून हे श्रेय त्या प्रत्येकालाच! माझ्या आई वडिलांची पुण्याई म्हणून ही संधी मला मिळाली. माझे पाठीराखे भाऊ, माझी नवी नवेली भावजय, हे सगळे माझ्या निर्णयाच्या मागे खंबीर पणे उभे राहिले म्हणून हे शक्य झालं. परिक्रमेला जातेय म्हटल्या वर डोळ्यात पाणी आलेली आणि मायेनी डोक्यावरून हात फिरवणारी, आशीर्वाद देणारी माझी ९५ वर्षाची आजी, माझा परिवार, माझा नवरा, सासू सासरे, दीर जाऊ, माझा लेक आणि माझ्या लहानग्या पुतण्या यांचं सहकार्य मिळालं आणि म्हणूनच घर सोडून पाच महिने मी घराबाहेर राहून हे कार्य सिद्धीस नेऊ शकले.

सरते शेवटी बोलेन ते थोरल्या मोठ्यांचे आशीर्वादाबद्दल. चितळे बाबा, आणि "तुझी वाट लागलेली आहे.. निश्चिंत रहा" असं पहिल्याच दिवशी सांगणाऱ्या चितळेमाई, "ताई तू याच वर्षी जाणार परिक्रमेला म्हणणारे अरविंद काकामुळे", या सगळ्यांच्या ऋणात मला राहू दे गं मैया ... असच म्हणेन..

*गुरु गोविंद दोनो खडे, का के लागू पाय*

*बलिहारी गुरु आपनो, गोविंद दियो बताये.... *

आणि अश्या माझ्या सद्गुरूला मी काय सांगावं? त्याच्या चरणी फक्त नतमस्तक होता येतं... आणि मग आपसूक काय घडायचं ते घडत जातं... परीक्रमा ही अशीच घडत गेली, आणि ही अनुभव मालिका ही अशीच उतरत गेलीये...याहीपुढे येणारा प्रत्येक क्षण हा असाच येत जाणारे, आपसूक.. आपण फक्त निमित्तमात्र.. आपण फक्त चालायचंय. ती मैया आणि सद्गुरू चालवतील तसं.. आपण फक्त भिनू द्यायचाय तिचा जयघोष, आपल्या देहात्म्याच्या कणाकणात... जीव, प्राण, आत्मा रोम रोम तेजाळून निघताहेत! ... आई म्हणून आपण फक्त हाक माराचीये तिला..... नर्मदे हर.. अशी!

या ५१ व्या भागात मी अनुभव सांगितला नाहीये याची मला जाणीव आहे. तुम्ही वाट बघताहेत हे माहितीये आणि म्हणून हा भाग इथेच संपवतेय. पुढच्या भागात मंडलेश्वरला जाताना चा अनुभव, आपण आपल्या गुरुस्थानाकडे कसे नकळत खेचल्या जातो तो अनुभव, आणि एक रहस्य सांगणारे.... २२ किमी अन्न आणि पाण्याविना आम्ही कसे चालू शकलो याचं, थोडा धीर धरा... येतेय भाग ५२ घेऊन.. नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५२

नर्मदे हर.

तर महेश्वरचं आमचं दाणा पाणी संपलं होतं. माताजी आणि हृदयजीं चा निरोप घेऊन आम्ही मंडलेश्वरच्या वाटेनी निघालो. हे अंतर जेम तेम सात किमी. पण इथे एक गंम्मत झाली. थोडं आधीपासून सांगते. कुबेर भंडारीला असताना आम्ही उसाचा रस प्यायचं ठरवलं होतं, आणि स्नान करून येऊन पाहतो तो रस संपलेला. मला फार आवडतो उसाचा रस, पण नाही मिळाला. ठीक आहे, नाही तर नाही... आता काय त्याचं विशेष.. पिऊ पुन्हा केव्हा तरी... असं वाटून तो विचार निघुनंही गेला...आणि त्या नंतर न मला उसाच्या रसाची आठवण आली आणि न कुठे उसाचा रस दिसला, मात्र मंडलेश्वरला जाताना वाटेत एक उसाच्या रसाचा ठेला होता. त्या रस वाल्यानी आम्हाला आवाज दिला आणि तो काय म्हणाला माहितीये? तो म्हणाला.. " आईये माताजी, मन की और गले की, दोनो की प्यास बुझा दिजीये, ठंडा गन्ने का रस है, मन खुश हो जायेगा आपका, पसंद तो होगा ही आपको"... तो कदाचित ते असच बोलला असेल, पण त्याच्या ह्या बोलण्यावरून मला गुजरात मध्ये रस मिळाला नव्हतं ते आठवलं... कुठेतरी सुप्त मनात असेल का ही उसाच्या रसाची इच्छा? वरपांगी पाहता मी तर विसरलेही होते... काय माहित बाबा, ह्या मनाच्या एवढ्या मोठ्या व्याप्तीत काय अडकून राहात असेल अन काय मोकळं होत असेल...? कदाचित म्हणूनच तो पिंजाऱ्यातला पक्षी उडू शकत नसेल आणि इतरांना हे अदृश्य सुप्त पाश दिसत नसतील... असो.. आम्ही उसाचा रस पीत असताना तिथे अजून दोन जण गाडीवर आले, त्यांनी आम्हाला न सांगताच उसाच्या रसाचे पैसे देऊ केले तर तो रस वाला त्या दोघांना म्हणाला " भैया जी चाहो तो आपके भी पैसे ना लू, लेकीन परिक्रमा

वासियोंको तो मै ही रस पिलाने वाला हू, जितना चाहे पिजीये माताजी, आप ही का दुकान है!" किती ही श्रद्धा! नर्मदा मैयाची सेवा करायची हा एकच भाव!

रस पिऊन आम्ही पुढे निघालो, साधारण तासाभरात पोचलो देखील. तिथे दत्त मंदिरात रहायचं असं सांगितलं होतं, पण आम्ही गेलो तेव्हा मंदिरात कुणीच नव्हतं. मग आम्ही राम मंदिरात जायचं ठरवलं, तर तिथेच एका दुकानदारांनी जहागीरदार यांच्या घरी सेवा देतात ते असं सांगीतल, आणि महाराष्ट्रीय नाव ऐकून छानच वाटलं, आणि आम्ही तिथे गेलो. जहागीरदार काकांशी खूप गप्पा झाल्यात.. काका आणि काकू खूप प्रेमाने करतात सगळं. सगळं आटोपल्यावर संध्याकाळी त्यांनी आम्हाला मंदिरात बोलावलं, म्हणाले "चटकन डोळे बंद करून बस, अजिबात इकडे तिकडे बघू नकोस... कसं वाटतं ते सांग आणि मग मी तुला सांगेन काय गंम्मत आहे ती. मी तिथेच पायरीवरच बसले आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे डोळे बंद केलेत. खूप छान वाटत होतं मला.. तिथला मंद सुगंध खूप शांती देणारा होता, आणि अगदी ओळखीचा वाटत होता. मला आठवलं.. परिक्रमेच्या पहिल्या दिवशी लेले काका जेव्हा रस्त्यात थांबून नमस्कार करायचेत नं तेव्हा, म्हणजे त्या नंतर असा मंद सुवास देणारी झुळूक यायची... आठवतंय का? या अनुभव मालिकेच्या तिसऱ्या आणि चवथ्या भागात मी लेले काकांविषयी बोललेय बघा...ते म्हणायचे " बेटा असा मंद सुवास कुठे असतो माहितीये का? ज्या सुवासाने मनाला शांती मिळते नं तिथे संत सद्‌गुरूचा वास असतो. परमेश्वराचा वास असतो".. मला लेले काकांच ते वाक्य आठवलं, आणि खूप समाधान वाटलं.

"कसं वाटतंय ताई?" जहागीरदार काकांनी विचारलं. उघडा डोळे आणि मी काय दाखवतोय ते बघा. त्यांनी एका मूर्तीकडे बोट दाखवलं.. " ही मूर्ती ओळखीची आहे का?.. मुर्तीवराची फुलं बाजूला करून ती मूर्ती त्यांनी मला दाखवली आणि मी गहिवरून गेले. ती मूर्ती माझ्या गुरुंची, माझ्या नानांची! मला इतकं शांत का वाटत होतं ते समजलं.. नंतर जहागीरदार काकांनी त्या मूर्तीची गंम्मत सांगितली. ती मूर्ती त्यांना मैया मध्ये स्नान करताना

सापडली होती. या वास्तू मध्ये वासुदेवानंद सरस्वती ही येऊन गेल्याचं त्यांनी सांगितलं तेव्हा खरंच आश्चर्य वाटलं... राम मंदिरात आम्ही का गेलो नाही? दत्त मंदिरात का कुणीच नव्हतं, नेमकं आम्ही आलो तेव्हा तिथे कुणीच का भेटलं नाही? कारण मी कुठे थांबायच हे मैयांनी आणि माझ्या गुरुंनी ठरवून ठेवलं होतं. जिथे माझे गुरु विराजमान आहेत, जी वास्तू मोठ्या महाराजांच्या स्पर्शाने पावन आहे तिथेच माझं वास्तव्य निश्चित झालं असल्यावर मी दुसरीकडे कुठेही कशी जाईन हो? बघा.. म्हणाले होते न मी, आपण असे नकळत ओढल्या जातो अश्या ठिकाणी... जशी मी बरोबर तिथेच गेले.. जाहागीरदारांच्या घरी... आणि तोच सुवास येणं, तसच शांत वाटण हा देखील एक संकेतच होता नाही का?

थोड्या वेळाने जहागीरदार काका मला बोलवायला आमच्या खोलीपाशी आले. "तुम्हाला भेटायला कुणीतरी आलंय, भेटून घ्या" म्हणाले. मला काही समजेना, इथे कोण मला भेटायला येणार? बाहेर येऊन बघते तो मांगीलाल आला होता. मांगीलाल म्हणजे लेपा गावात जो अन्नछत्र चालवतो तो. ज्याच्या घरी आम्हाला त्याच्या संपूर्ण कुटुंबांनी खूप प्रेम दिलं होतं. अगदी चवथ्या पाचव्या दिवशी परिक्रमेच्या.. ( ७व्या की ८ व्या भागात लिहिलंय बघा) लेपा हे पलीकडच्या तटावर, कसरावदच्या जवळ. मांगीलाल फक्त मला भेटायला नर्मदा मैया पार करून आला होता. २० किमी तरी अंतर असेल. येताना माझ्यासाठी द्राक्ष, बोरं, केळं आणि आईनी केलेले कणकेचे लाडू घेऊन आला होता. जेमतेम परिस्थिती असलेलं हे कुटुंब पण आपुलकी आणि प्रेम याची जराही कमतरता नाही. त्या माउलीनी माझ्यासाठी घाई घाईत कणकेचे लाडू करून दिले होते. किती प्रेम देते ही मैया आपल्याला?

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. आजचं अंतर बरंच लांब होतं. म्हणजे आम्ही ठरवलं काहीच नव्हतं पण एक अंदाज होता की धारेश्वरला पोहोचता येईल. पण आम्ही धारेश्वरला जाऊ शकलो नाही. त्या आधीच थांबावं लागलं. तरीही ३६ किमी चालून झालं पण याचं श्रेय आम्हाला नाही. एका गावातल्या शेतकऱ्याला. आम्ही शेतातून जात

असताना एक शेतकरी त्याची बैलगाडी घेऊन बसला होता. जणू काही आमच्यासाठी बसला असावा तो, कारण आम्ही त्याच्याजवळ पोचताच म्हणाला “अंधेरा होनेको है, बैठो गाडीमे” आम्ही गाडीत बसायला नकार दिला, अजून ७-८ किमी चालून जायचं बाकी होतं असं त्यांनी सांगितलं.. मग तो पुढे आणि आम्ही मागे असं चालू लागलो, आणि अचानक त्यांनी गाडी थांबवली, आमचं सामान आम्हाला त्याच्या गाडीत ठेवायला लावलं आणि तो पुढे निघाला... “आजाओ सब सुविधा हो जायेगी”.. गाडी पुढे निघून गेली होती. आमच्याजवळ काहीही सामान नव्हतं. आम्हाला त्या शेतकऱ्याचं नाव माहित नाही, आम्हाला नक्की कुठे जायचं आहे ते ही माहित नाही...आम्ही पोहोचू शकू की नाही ही पण कल्पना नाही... पण दुसरा पर्याय नव्हता. अंधाराच्या आत गावात पोहोचणं गरजेचं होतं आणि झपाझप पावलं टाकत जवळजवळ तासाभरातच ७ किमी अंतर आम्ही पार केलं सुद्धा. त्या शेतकऱ्याने सांगितल्याप्रमाणे परशुराम यादव यांच्याकडे आमची व्यवस्था करण्यात आली होती. अगदी पाय धुण्याला गरम पाण्यापासून तर भोजन प्रसादी आणि अगदी अंथरूण देखील टाकून तयार होतं. त्यांचं घर तसं लहान, त्यामुळे पडवीत आसन लावलेलं, आणि परशुराम जी स्वत: आमच्या बाजूला पडवीत झोपले होते.. आमची जरा हालाचाल झाली की ते विचारत “कुछ चाहिये बाबाजी”...रात्रभर जणू आमच्या दिमतीला असावेत इतकी सेवा त्यांनी केली आमची. आणि धारेश्वर फक्त ३ किमी होतं इथून, तरीही परशुराम जी यांच्याकडे आमचं येण लिहिलं होतं... म्हणून तेवढे ३ किमी आम्ही जाऊच शकलो नाही.

परशुराम भाई नी आम्हाला एक गोष्ट सांगितली. त्यांच्या धाकट्या मुलाची. तो लहान असताना सारखा आजारी असायचा. सगळं करून झालं तरी याचं आजारपण संपेना.. मोठा आजार असा काही नव्हता मात्र सतत तब्येतीची कुरकुर सुरु असायची. कधी ताप तर कधी सर्दी पण पोरगा ठणठणीत आहे असं कधी झालं नाही. त्याच्या आजीनी मैयाला साकडं घातलं आणि परीक्रमावासींची सेवा करायला सुरवात केली. वर्षभर न चुकता येणाऱ्या परिक्रमावासींची आपल्याच्याने होईल तशी सेवा ते करत गेले आणि मुलाची तब्ब्येत सुधारू

लागली. तेव्हापासूनची सेवा आजतागायत सुरु आहे. हा मुलगा आता १५ वर्षांचा आहे. त्याची आजी वारली पण घरच्यांनी सेवा सुरूच ठेवली. परशुराम भाई म्हणतात "अब तो बच्चा अच्छां ही है, लेकीन अब हमे सेवा करने मे आनंद आता है, परिक्रमावासी जिस दिन पेट भर खाना खाते है, हमारा दिल आनंद से भर जाता है".. ते इतके भावपूर्ण होऊन सांगत होते की आमचे ही डोळे भरून आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही धारेश्वरकडे निघालो. इथे रस्त्यात म्हणजे मैया किनारी रेती खोदण्याचं काम सुरु होतं. साधारण धारेश्वरच्या पुढे ४ किमी वरची गोष्ट असेल. आम्ही एका दगडावर आराम करत बसलो असताना खालून, म्हणजे मैयाचं पात्र साधारण ८ एक फुट खाली होतं तिथे, तिथून एक म्हातारी आजी वर आली. आल्या आल्या तिनी मला मिठी मारली आणि ती रडू लागली. "बेटा परिक्रमावासी बच्चा, तुम कितने चलते हो मेरे बच्चे, माई के लिये चलते हो... बस उसके दर्शन पाने के लिये कितने कष्ट लेते हो.. भुके प्यासे चलते जाते हो मेरे बच्चे... थोडा भोजन पा लो" आजी मला कुरवाळत होती, माझ्या कपाळाचे मुके घेत होती आणि रडत होती. माझा जीव तर तिथेच पाणी पाणी झाला. एक अनोळखी म्हातारी आजी, माझ्यावर इतका वर्षाव करतेय मायेचा, काय संबंध तिचा आणि माझा? आधी कधी पाहिलं नाही, नंतर कधी भेटणार नाही, आणि ही माउली मला एकच म्हणतेय, कळवळून..."भोजन पा लो"... जेवून घ्यायला सांगतेय... आणि आता तर जेमतेम सकाळचे साडे नऊ वाजलेत... इतक्यात मला भूकही लागली नाही.. पण ही आजी काही ऐकेच ना.. समोरच्या मोठ्ठ्या टेकडीकडे बोट दाखवत म्हणायची " उपर जा के खाना खालो... शरमाना नही, पेट भर के खाना मेरी बिटिया रानी...तुझे मेरी सौ.. " आता तर तिनी शप्पथच घातली.. तिचं मन मोडून पुढे जाण्याची न माझ्यात हिम्मत होती न इच्छा.. ती माझ्या जेवणासाठी स्वत:ची शपथ घालतेय? नाही, मी ऐकेन तिचं. ती भली मोठी टेकडी चढून जाईन वर आणि भोजन प्रसादी घेईन तिथे.. मी ठरवलं.. आणि मी आणि बाबा तिचा निरोप घेऊन टेकडी चढून वर गेलो. आम्ही थकलो होतो.. तिथे आश्रमात पडवीत एक साधू झोपलेले होते.. आम्ही नर्मदे हर केलं

पण ते काही उत्तर ही देईनात.... जे नर्मदे हरला उत्तर देत नाही ते भोजन प्रसादी तरी देतील का? मनात प्रश्न पडला आणि आता धर्म संकट उभं राहिलं.. आजीला वाचन दिलेलं.... आणि हा माणूस ढुंकून ही बघत नाहीये... मला आजीच्या शब्दाचा मान राखायचाय... काय करावं?

एक कल्पना सुचली.. ती अंमलात ही आणली मात्र नंतर जे झालं ते फार कष्टप्रद होतं. आयुष्यात असं कधीही केलं नव्हतं ते आज करावं लागलं. बळजबरिनी...अगदी अजिबात इच्छा नसताना... कारण कंबरेवर हात ठेऊन ते साधू महाराज जमदग्नीच्या अवतारात उभे होते समोर.... करवूनच घेतलं होतं त्यांनी!... पण त्याही नंतर जे झालं तो खरा अनुभव.. काय झालं असं टेकडीवर? भोजन मिळालं? आजीनी दिलेली शप्पथ पाळू शकले मी? ते संन्यासी का उभे होते रागात माझ्या समोर? तेही दोन्ही हात कमरेवर ठेऊन? काय करवलं त्यांनी माझ्याकडून? काय कष्ट झालेत मला? आणि त्यानंतर काय झालं? सांगते पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५३

नर्मदे हर.

तर मागच्या भागात मी सांगत होते त्या साधूबद्दल जे कंबरेवर हात देऊन माझ्या पुढे उभे होते आणि माझ्याकडे रागाने बघत होते. "उपर जाकर खाना खा लो अशी शपथ त्या आजीनी मला घातली होती. ती आजी माझ्यासाठी कळवळली होती रडली होती... तर आता सांगते काय झालं ते.

त्या आजीनी शपथ दिल्यामुळे आम्ही टेकडीवर गेलो. आम्ही टेकडी चढून दमलो होतो, म्हणून झाडाखालाच्या पारावर बसलो. समोरच हे संन्यासी छान लोळत पडले होते. आम्ही नर्मदे हर केलं पण हे काही उत्तर देईना. असं दोन तीन दा झालं... आम्हाला काही इथे भोजन मिळणार नाही कारण हे साधं "नर्मदे हर"ला उत्तर देखील देत नाहीयेत, मग भोजन प्रसादी काय देणार? आणि आता आजीच्या शपथेचं काय करायचं? आता मी पेचात पडले.. मग उपाय म्हणून समोरच्या पाण्याच्या टाकी मधून पोट भर पाणी आम्ही प्यायलो.. अगदी १ लिटर पाणी प्यायली असेन मी. म्हणजे पोट भरेल आणि आजीची शपथ मोडणार नाही. भोजन प्रसादी मिळणारच नसेल तर करणार काय? पण तिच्या सांगण्याप्रमाणे निदान "पोटभर" असं काहीतरी आम्ही पोटात घातलं हेच समाधान. आता थोडावेळ बसायचं आणि मग पुन्हा टेकडी उतरून पुढच्या प्रवासाला निघायचं.

आम्ही थोडं बसून निघालो, तेवढ्यात आतून एक अजून संन्यासी बाहेर आला. त्याच्या हातात एक ताट होतं. ते ताट त्यांनी आमच्या पुढे आणलं आणि जोरदार आपटलं...इतक्या जोरात की त्यातलं अन्न वर उसळल्या गेलं. तो रागानी आमच्याकडे बघत होता... " ये लो खाना.. पुरा खा लेना, इतनासा भी छोडा तो देखो फिर!.. हम मेहनत से खाना बनाते है और तुम थोडासा खाकर बाकी गाय, बकरी, कुत्तो को खिलाते हो? उनके लिये मेहनत नही करते

हम... एक निवाला भी कैसे छोडते है देखता हू" आणि असं म्हणत त्याने ते ताट अक्षरश: आदळलं आमच्या पुढे. बरं थोडं थोडकं काही असेल तर खाता ही आलं असतं.. पण त्यात ६ टिक्कड, भरपूर भात, पालकाची पातळभाजी, कारल्याची भाजी, भजी, वरण आणि पापड इतकं सगळं होतं. आधीच पोटभर पाणी प्यायालेलो आम्ही दोघं आणि आता हे सगळं खा म्हणतोय हा.... !

बरं ही टिक्कड काय असते ते सांगते, म्हणजे आमचा जीव का दडपला ते समजेल. आपल्याकडे भाकरी असते नं जाड त्याहून मोठी आणि जाड गव्हाच्या पिठाची भाकरी म्हणजे टिक्कड. एरवी आपल्या ४ ते ५ पोळ्या होतील एवढ्या पिठाची ही एक टिक्कड असते, आणि अर्ध्या टिक्कड मध्ये माझं पूर्ण जेवण अगदी पोटभर होतं हे मला माहितीये, आणि या ६ टिक्कड आणल्यात त्या साधुनी आणि त्यातल्या ३ मला खाव्या लागणार म्ह्टल्यावर माझं काय होणार? आधी पाणी प्यायलेले ते वेगळंच ! पण हा गडी काही ऐकेना. तो राहिला उभा तासभर आणि ३ टिक्कड मला आणि ३ बाबाला खायलाच लागल्यात. सोबत घेऊन जायची सुद्धा सोय नाही. कसं बसं, अगदी घशाशी अन्न येत असताना पोटात ढकलायचं म्हणजे कष्ट नाही का? बरं प्रेमाने आग्रह करत असेल तर काहीतरी समाधान हो? डोळे वटारून हे महाराज समोर उभे होते.. त्यातून फक्त आमच्यासाठी स्वयंपाक केलाय हे ही सांगितलं होतं त्यांनी आम्हाला'... नाईलाज.. दीड तास लागला जेवायला, हा मात्र ठाण मांडून बसला. काही बोलावं याच्याशी तर बोलायला तयार नाही... खाल्लं शेवटी... आणि ९. ३०चं आलेलो आम्ही १२. ३०पर्यंत हललोच नाही इथून... इतकं खाऊन झाल्यावर एक पाऊलही चालवत नव्हतं खरं तर, पण इथे जर थांबलो तर रात्री पुन्हा काय खाऊ घालेल हा, किंवा अजून काय रागावेल ती कल्पना ही करवेना... त्यामुळे इथून निघून जे पाहिलं गाव येईल तिथे थांबू असं ठरवलं.. जास्तीत जास्त ३ ते ४ किमी चालू शकू...त्यानंतर अशक्य होईल हे माहित होतं आम्हाला.. पण आपण ठरवतो तसं नसतं.

आम्ही ठरवलं खरं पण आम्ही वाट चुकलो. इथे शेतातून पुढे जायचं होतं, आणि आम्ही कदाचित भलत्याच दिशेला गेलो. दुपारची वेळ असल्यामुळे कुणी रस्ता विचारायाला ही दिसेना. किनाऱ्यावर मार्ग नाही, वरून जायचय इतकंच माहित होतं. वाटेत शेतं संपलीत आणि झाडी सुरु झाली, वाटलं माळरान असेल, हे झालं की लागेल गाव. संध्याकाळचे ५ वाजलेत तरी ही झाडी काही संपेना. तशी ही झाडी म्हणजे काही जंगल वगैरे नव्हतं, पण निवाऱ्याचं असं काही स्थान अजूनपर्यंत मिळालं नव्हतं. आता काय करावं काही समजेना कारण तासाभरात अंधार होणार. आम्हाला वाट सापडली नाही तर आम्हाला रात्र इथेच काढावी लागणार.... काही खायला नाही की प्यायला नाही... झाडाखाली बसून रात्र काढायची हा एकाच मार्ग उरणार होता, आणि ही वेळ आमच्यावर येऊ शकते हे त्या माईला कदाचित सकाळी ९. ३० लाच समजलं होतं... आम्हाला शपथेवर तिनी वर पाठवलं, आधी पाणी पाजलं आणि मग खाऊ घातलं, ते ही अगदी इतकं की दिवसभर आणि पुढे रात्रभर देखील काही मिळालं नाही तरी चालू शकेल....


आम्ही आता झपाझप चालत होतो.. अगदी धावत होतो म्ह्टलं तरी चालेल. पाउलवाट दिसत होती म्हणजे कुठेतरी ती जाणार इतकंच समाधान. आणि थोड्याच वेळात डोक्यावर काटक्यांची मोळी घेऊन जाणारी एक मैया रस्त्यात भेटली. तिला विचारलं “मैयाजी कहां जाना है अब हमे?” आम्हाला आम्ही रस्ता चुकलो आहे हे समजलच होतं. ती म्हणाली “गंगा खेडी की टीले से उतरे होंगे तुम लोग.. उलटे हात उतर गये.. तुमको नवा घाट जाना चाहिये था... मैयाजी को क्यू छोड दिये तो?” आम्ही कुठल्या विचारात असताना त्या रस्त्याला लागलो माहित नाही... मैया पासून बरच लांब येऊन गेलो होतो चालत चालत.. समजलच नाही काही.. पण नंतर या मैयांनी विमलेश्वर चा रस्ता दाखवला.. आम्हाला उशीर होणार होताच पण इलाज नव्हता.

विमलेश्वरच्या आधी कुठेशी एक अति प्राचीन शिवमंदिर लागलं. अंधार झालाच होता. तिथे चौकशी केली तर एक आजी होत्यात, अगदीच थकलेल्या त्या म्हणाल्या “बेटा तुम यहा आसन तो लगा सकते हो लेकीन भोजन प्रसादी की व्यवस्था नही हो पायेगी... मेरे लिये पास के गाव से खाना आता है सुबह, रात को भोजन नही करती, चाय पिला सकती हू” आम्हाला तरी कुठे जेवायाला हवं होतं? इतकं ठासून भरलेलं होतं पोट की अजूनही भूक लागली नव्हती. मोबाईल वर किमीचं एक एप आहे माझ्याकडे, त्यात पाहिलं तर २२ किमी अंतर दाखवत होतं टेकडी नंतर... कमाल वाटली... आपण रस्ता चुकणार हे तिला समजलंच कसं... का तिनी इतक्या आग्रहानी खाऊ पिऊ घातलं? का तो संन्यासी कमरेवर हात ठेवून दटावून खाऊ घालत होता, ते आता समजलं. आमचा निवारा मिळण हे ही तिला माहित होतं. असो..

दुसऱ्या दिवशी इथून निघून बडवाहला पोचलो आणि आज इथे थांबूनच गेलो. श्रीराम महाराजांची भेट झाली नाही कारण ते नाशिकला गेले होते. त्यांची भेट घेऊन उद्या निघू असं ठरवलं पण त्यांना यायला उशीर होईल असं माताजी म्हणाल्या आणि आम्ही पुढे जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही काहीच अंतर चालून होत नसेल तर वाईट बातमी वाऱ्यासारखी पसरली. श्रीराम महाराजांचा अपघात होऊन त्यात ते अनंतात विलीन झाल्याचं समजलं.. वाईट वाटलं. त्यांच्या आश्रमात राहून तिथल्या भक्तमंडळीशी झालेल्या चर्चेनंतर, त्यांनी लिहिलेले श्लोक वाचाल्यां नंतर, अचानक अशी वार्ता आली... पण नियतीचा नियम असतो तो... आमची भेट होणं लिहिलं नव्हतच..

इथून पुढे मोठं ध्येय आणि ज्याबद्दल ऐकून होतं असं म्हणजे लक्कडकोट की झाडी. बडवाह नंतर काही वेळाने जंगलाचा भाग सुरु होतो. डोलारा, कोठावा, मोहोरी असं करत करत च्यवन आश्रमात जायचं. काही लोक म्हणायचे ते आडवाटेला आहे, जाऊ नका, आणि काही म्हणायाचेत जायलाच हव... आम्ही जायचं ठरवलं आणि चांगलच झालं आमचं जाणं झालं ते. ही जागा अतिशय रमणीय आहे. निवांत, शांत आणि खूप सकारात्मक कंपन आहेत

इथे. इथे गरम पाण्याचे झरे आहेत. अगदी चुकवूच नये असं स्थान आहे हे. इथे आम्हाला भोलादास जी महाराज भेटलेत. उदासीन आखाड्याचे. त्यांनी आम्हाला सुकन्या आणि शर्तारी राजाची गोष्ट सांगितली. अश्विनी कुमारांनी दिलेल्या आशीर्वादाने च्यवन ऋषि पुन्हा कसे तरुण झाले आणि सुकन्येला आपला वर कसा प्राप्त करून घेता आला ते ही समजलं. आणीही बराच सत्संग झाला.



*अतिशय रमणीय, च्यवन ऋषि आश्रम*

इथे आमची भेट अजून एका तरुण बाबाशी झाली. मागे एकदंत महाराजांची गोष्ट सांगितली होती मी आठवतेय का? घोंगश्याला, म्हणजे शुलपाणीतल्या झाडीत असताना? या अनुभव मालिकेच्या २० व्या भागात आहे बघा! तर आज भेटलेला हा बाबा पण बऱ्यापैकी तसाच.. म्हणजे कशाचं काही भानच नसलेला...असे लोक नं अगदी मनापासून सुखी असतात, सुखी असतात असं म्हणणं पण चूकच आहे.. मला सांगता येत नाहीये नीट पण त्यांना कशा कशाचं भान नसतं.. ते त्यांच्या ध्येयात असतात फक्त.. विलीन झाले असतात.. देह आहे इतकंच काय ते जिते पणाचं लक्षण... काय भाग्य म्हणावं.. !

तर या बाबांबद्दल सांगेन थोडसं.. पण एक गंम्मत सांगते बरं का आधी.. इथे च्यवन आश्रमात तुम्हाला पिंजाऱ्यात राहावं लागतं.. हो, खोटं नाही काही ! घनदाट जंगल आहे इथे, आणि सगळे प्राणी पिंजाऱ्या बाहेर असतात म्हटल्यावर तुम्हाला पिंजाऱ्यातच राहावं लागणार नं.... अहो इथे खूप माकडं आहेत... त्यांच्या चेष्टा बघण म्हणजे पोरखेळासारखं होतं अगदी...सांगेन थोडी मजा म्हणून. पण आम्ही इथून निघालो आणि तीरांन्यापर्यंत गेलो तो प्रवास, नंतर जयंती माता मंदिरच्या आधी अनुभवलेलं ते थरारक हालचालींच साम्राज्य, नदीकाठी पाहिलेलं दृश्य, आणि जयंती माता मंदिरात आलेला अनुभव, जेव्हा ऐन थंडीत मला थेंब पडतील इतका घाम आला, माझ्या हृदयाची गती थांबेल असं वाटू लागलं आणि एका भयानक दु:खद सत्याचा परिचय जवळून झाला तो अनुभव कधी सांगते तुम्हाला असं झालय... पण हा भाग मोठा होईल खूप, म्हणून थांबू इथेच...

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५४

नर्मदे हर..

मागच्या भागात मी तुम्हाला जयंती माता मंदिरात आलेला अनुभव सांगत होते जेव्हा ऐन थंडीत मला थेंब पडतील इतका घाम आला, माझ्या हृदयाची गती थांबेल असं वाटू लागलं आणि एका भयानक दुःखद सत्याचा परिचय जवळून झाला तो अनुभव आता मी तुम्हाला सांगते.

तर जयंती माता मंदिरात आम्ही गेलो तेव्हापासूनचे अनुभव सांगते. बावडी खेडा गावा नंतर जयंती माताचं जंगल सुरु होतं. तसा इथे रस्ता मोठा आहे, टू व्हीलर देखील जातात, मात्र आजूबाजूला भरपूर झाडी आणि जंगल आहे. तर इथे बावडी खेडाला आम्ही दुपारी दोन वाजता पोहोचलो. इथून पुढे जयंती माता मंदिर साधारण ७ किमी असावं. आम्ही जायचं ठरवलं आणि पुढे निघालो. हळू हळू झाडी दाट होत गेली आणि कच्चा रस्ता लागला. वाळू चा रस्ता होता, कारण काही अंतर पुढे एक नदी लागत होती. मी आणि बाबा हळू हळू रमत गमत जात होतो. कारण सात किमी अंतर आमचं पूर्ण होईलच असं आम्हाला वाटत होतं. मी रेती मध्ये उमटलेले चाकांचे ठसे बघते होते, आणि अचानक मला काहीतरी दिसलं... मी बाबाला दाखवलं आणि मन धस्स झालं.

गाड्यांच्या येण्या जाण्यामुळे असेल, किंवा दव पडल्यामुळे असेल, वाळू ओलसर होती आणि त्या ओलसर वाळूत मोठ्या आकाराचे जनावराचे ठसे दिसत होते, ते ही अगदी नुकतेच उमटलेले. आता आम्ही फक्त ते ठसे बघत बघत पुढे जात होतो कारण पुढे जाण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. ते ठसे झाडीच्या दिशेला गेले आणि दिसेनासे झाले. तिथून पुढे जेम तें १० पावलं चाललो नसू आम्ही आणि अत्यंत वेगळा वास येऊ लागला. हा वास कशाचा आहे हे आम्हाला समजलं होतं... आम्ही झपाझप पण सावध पणे पुढे जात होतो आणि दिसेनाशी

झालेली पावलं, म्हणजे पावलांचे ठसे पुन्हा दिसू लागले.. म्हणजे वाघोबा आमच्या पुढे पुढे चालत होते आणि आम्ही मागे मागे... चला हे असं आहे हे बरं आहे, आम्ही पुढे आणि वाघोबा मागे असते तर काय झालं असतं तो विचार न केलेलाच बरा.



*वाघोबाचे ठसे दिसले तो हाच रस्ता*

या जंगलात वाघोबा आहेत हे तर समजलं होतं आणि पुढे नदी वर गेलो तेव्हा अजून एक गोष्ट बघायला मिळाली. इथे नदीच्या काठावर अनेदा लोक पिकनिक करायला येतात. आजही इथे लोकांची बरीच गर्दी होती. बहुधा सुटीचा दिवस असावा. तर इथे एक लाकडी पूल आहे आणि हा पूल पार करून गेलं की एक छोटासा डोंगर लागतो, या डोंगराच्या वर आहे जयंती माता मंदिर. तर इथे आम्हाला बघून अनेक लोक आमच्याशी बोलायला आले. त्यातल्या एकाने आम्हाला "ध्यान से जाना" असा सल्ला दिला, आणि एक विडीयो दाखवला... अगदी एक दोन दिवस आधी काढलेला, याच लाकडी पुलावरचा. या विडीयोमध्ये वन अधिकाऱ्यांनी एका बिबट्याला मारलं होतं कारण हा बिबट्या गावात शिरून माणसावर हल्ला करायचा. त्याला जिवंत पकडणं शक्य होऊ शकलं नव्हतं.... बापरे, म्हणजे इथे बरेच प्राणी आहेत तर.. आता लाकडी पूल पार करून वरची टेकडी चढायची होती आणि लाकडी पूल पार केला की रस्ता

एकट आणि जंगलातून जाणारा होता. नदीच्या अलीकडे जितकी हालचाल होती त्यापेक्षा कितीतरी पट जास्त शांतता पलीकडेच्या टेकडीवर होती.

आम्ही टेकडी चढून वर गेलो आणि जयंती माता मंदिर परिसरात सुखरूप पोहोचलो. मंदिर परिसर छानच आहे मात्र इथे आसन लावायची व्यवस्था म्हणजे एक भिंती नसलेला वरांडा आहे फक्त. आधीच थंडीचे दिवस, त्यात जंगलाचा भाग असल्याने अजूनच थंड वातावरण होतं. आश्रमातल्या मंडळीनी सगळ्यांनाच दोन दोन जाड चादरी आणि जास्तीचे पांघरूण दिले होते. त्यामुळे थंडी आटोक्यात आली होती.. रात्री दाल बाटीची भोजन प्रसादी घेऊन आम्ही झोपी गेलो.

रात्री झोपेत मला अचानक वेगळीच भीती वाटू लागली. आज काहीतरी अघटीत होणार असं राहून राहून वाटू लागलं. झोप उघडली ती भीतीमुळेच, पण काय ते समजेना..... मला खूप बेचैन होऊ लागलं.. जीव घाबरायला लागला, खूप घाम यायला लागला.. खूप काळजी वाटायला लागली. जवळ जवळ तास भर मला अशी भीती वाटत राहिली... कारण काही समजत नव्हतं...पण खूप भीती वाटत होती.. कशाची ते ही समजेना, आणि साधारण तासाभराने मला अचानक छातीत दुखू लागलं, हाता पायाला मुंग्या येऊ लागल्या.. कुणीतरी आपला श्वास दाबून धरतय असं वाटायला लागलं. मी पांघरूण काढून बाहेर फेऱ्या मारू लागले.. बाबाला उठवलं तोवर मी घामाघूम झाले होते.. कपाळावरून घामाच्या धारा येऊ लागल्या होत्या आणि मला काहीही सुचत नव्हतं. कधी छातीतली कळ जीव काढायची... आत... खूप आत कुठेतरी जोरात हिसका मारावा तसं व्हायचं तर कधी पोट आवळून यायचं... बाबाला वाटलं दाल बाटीमुळे झालं असेल, पण मी बाटी खाल्लीच नव्हती.. बाबा माझ्या पाठीवरून हात फिरवत होता..

माझ्या डोळ्यासमोर फक्त माझं लेकरू दिसत होतं, आणि मी आता जाणार.. यातून माझी सुटका नाही असं वाटू लागलं होतं. आता आजूबाजूचे परिक्रमावासी ही जागे झाले होते.

कुणी पाठ चोळतय तर कुणी मला वारा घालतय... मी मात्र उभे होते, की बसले होते, की लोळत पडले होते ते काही आठवत नाही.. तळमळत होते मी इतकं मात्र आठवतंय. साधारण एक ते पावणे तीन (पावणे तीन नंतरची वेळ आठवते... आणि एक वाजलेला बघितल्याचं आठवतं, झोप उघडली तेव्हा घड्याळ पाहिलं होतं मी. नक्की त्रास केव्हा सुरु झाला आणि केव्हा संपला ते आठवत नाही) हा प्रकार असाच सुरु होता. बाबा डॉक्टर चा शोध घ्यायला गेला असावा... तोवर लिंबू सरबत, पाणी पाजून झालं होतं मला.. आणि अचानक मला मळमळू लागलं... मला उलटी झाली आणि थोडं बरं वाटलं... हे असं मला अपचनामुळे झालं असेल असं सगळ्यांचं मत झालं पण मी सकाळपासून फक्त वरण भात खाल्ला होता.. त्यामुळे अपचन नाही हे मला माहित होतं. शिवाय ज्या वेळी मला अस्वस्थ वाटायला लागलं त्यावेळी मला काहीही शारीरिक त्रास झाला नव्हता.. तो त्रास मला जवळ जवळ तासाभरानी सुरु झाला होता. आणि अचानक बंदही झाला.

बाबानी माझ्या डोक्यावर हात ठेवून रामरक्षा म्हटली.. आणि कधीतरी मला झोप लागली. दुसऱ्या दिवशी मात्र मी अगदी ठणठणीत होते, काहीही न झाल्यासारखे. २६ किमीची लक्कडकोटची झाडी मी पार करू शकले इतकी ठणठणीत! किती विचित्र नं.. इतका त्रास की जीव जातो की राहतो समजेना... तो अचानक झाला अन अचानक बंदही झाला. काय कारण असावं? कारण होतं.. ते मला नंतर समजलं.. सांगते.

हे असं विचित्र पणे तब्बेत खराब होणं आणि पुन्हा ठीक होणं हे मला जरा वेगळंच वाटत होतं. फोनला रेंज नव्हती तोवर मी शांत होते आणि नंतर लगेच मला हे माझ्या आई वडिलांना सांगावसं वाटलं म्हणून मी घरी फोन लावला. मात्र पुन्हा एक भीतीचं सावट पसरलं. घरी कुणी फोन उचलेच ना. आईला लावून झाला, बाबांना लावून झाला, भावाला लावून झाला, घरचा फोन लावून झाला... कुणीही फोन उचलेना... मग माझ्या नवाऱ्याला लावला.. माझ्या मुलाला लावला... ते ही फोन उचलेना.. मी आता काल रात्रीपेक्षा ही जास्त घाबरले होते. आपल्या घरचं

कुणीच का फोन उचलत नाहीये? काहीतरी गडबड आहे नक्की हे समजत होतं आणि काय ते जाणून घ्यायचं होतं पण अजिबात हिम्मत होत नव्हती. "सगळं ठीक आहे, तू काळजी करू नको" फक्त हेच ऐकायचं होतं मला...पण आपण ठरवतो तसं नसतं होत ..... माझ्यासाठी काहीतरी वेगळंच वाढून ठेवलं होतं...

काळजी पोटी की काय देव जाणे, आता माझं अंग तापांनी फणफणलं होतं.. आता मला फक्त माझ्या बाबांशी बोलायचं होतं एकदा.. मी पुन्हा एकदा फोन लावला आणि या वेळी माझ्या भावजयीनी फोन उचलला. "रेणू, काय झालय? फोन का उचलत नाहीयेत कुणी?" मी रागावलेच तिला! आणि तीनी सांगितलेल्या बातमी ने मी मला आवरू शकले नाही.. "ताई बबन काका आजोबा काल रात्री गेलेत...तुला सांगावं की नाही समजत नव्हतं, सगळे तिकडेच गेलेत, बाबा आलेत की मी सांगते तुझ्याशी बोलायला"....

माझे काका आजोबा गेले होते... मला वाटणारी भीती अवाजवी नव्हती...काल रात्री पासून ही भीती वाटत होती मला.... काहीतरी होणार असं राहून राहून वाटत होतं..... लहानपणापासून त्यांच्या अंगा खांद्यावर खेळलेले मी.. त्यांनाही माझं खूप कौतुक...आणि परिक्रमेत असताना मला ही अशी बातमी मिळावी? फार फार वाईट वाटत होतं मला... मात्र हा अनुभव इथेच संपत नाहीये... माझं जेव्हा माझ्या रेवती काकूशी बोलण झालं तेव्हा वेगळाच उलगडा झाला. तो असा की आजोबा गेले ती वेळ आणि मला त्रास झाला ती वेळ अगदी एक.. रात्री साधारण एक ते तीनच्या दरम्यान मला त्रास झाला.. अगदी छातीत दुखून जीव जातो की काय इथवर त्रास, आणि तिकडे नागपूरला त्याच वेळी फक्त थोड्या वेळाच्या अस्वस्थते नंतर आजोबांनी देह ठेवला...जणू ती त्यांची आणि माझी शेवटची भेट! हे नक्की काय आहे ते मला सांगता येत नाहीये आणि आजही हे लिहिताना माझे अश्रू घळघळा वाहतात आहेत.

मी बाबाला (माझ्या सोबतच्या नर्मदा बाबाला) म्हणाले मला घरी जायचय तर मोठ्या धीराने त्यांनी मला समजवलं " आजोबांना तू परिक्रमा सोडून आलेलं आवडणार नाही.. तू

जायचं नाहीस…" मी नाही गेले परत घरी मात्र मला झालेला त्रास, आजोबांची ही बातमी, कशामुळे कोण जाणे पण माझी तब्ब्येत अधिकच बिघडली. पुढचे तीन चार दिवस ती अधिकच बिघडत गेली. मात्र पामाखेडी, फतेह गड, आणिक मध्ये एक गाव येतं तिथले जमीनदार, आणि पुढे नेमावर या सर्व ठिकाणी मैया माझ्या सोबत आहे हे तिनी जाणवून दिलं. नेमावरला तर कहरच झाला, पाऊलही उचलता येईना अशी अवस्था, आणि अशा वेळी जे झालं ते पुन्हा एकदा आपल्याला निशब्द करून ठेवतं… मी नेमावर मध्ये पाय ठेवताच असा विलक्षण अनुभव आला … पण आता नाही सांगत.. पुढच्या भागात सांगेन

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ५५

नर्मदे हर..

तर जयंती माता मंदिरात आलेला अनुभव मला संपूर्ण पणे हलवून टाकणारा होता. माझ्या काका आजोबांची बातमी ऐकून मला खूप कसं तरीच होत होतं. अर्थात त्या परिस्थितून मी बाहेर आले पण कदाचित या मानसिक आघाताचा माझ्या शरीरावर परिणाम झाला. मला खूप ताप चढला. लक्कड कोटची घनदाट झाडी पार केली खरी पण नंतर पामाखेडीला न थांबता दंठाला मुक्काम केला. गरम पाण्याने आंघोळ करायला मिळाली इतकंच आठवतंय..... मी लगेच झोपी गेले असावे, माझा ताप थोडा वेळ उतरून पुन्हा लगेच चढायचा...असं दोन दिवस सतत सुरु होतं.

मध्ये दोन मुक्काम अजून झाले, तमखान नंतर मी फार चालू शकत नव्हते, पण का कोण जाणे नेमावर लाच थांबायचं अशीच मागणी मी मैया जवळ करत होते आणि माझी तब्ब्येत मात्र अधिकच खालावू लागली. मला नर्मदा जयंतीला नेमावर लाच असायचं होतं, हट्टच होता तो माझा, मैयाकडे. तमखान नंतर तर माझ्याने एक पाऊलही चालवेना, चक्कर आणि उलट्या देखील सुरु झाल्या. अंगावर खूप पुरळ उठलं, आग आग होऊ लागली.. मात्र ती नर्मदा माई लेकराला सांभाळतेच... माझी अवस्था पाहून एक राजपूत सिंग नावाचे कुणी आम्हाला विश्राम करा, असा आग्रह धरू लागले... ते डॉक्टर आणतो म्हणून गेले ही, पण इथे त्यांना डॉक्टर मिळाला नाही.... त्यांनी घरी फोन करून जेवणाचा डब्बा, चहा आणि दोन स्कार्फ मागवलीत, त्यांचा मला फारच उपयोग झाला.. ते काही अंतर आमच्या सोबत पायी चालले देखील. आमची

व्यवस्था अविनाश करत आहे हे समजल्यावर ते घरी परतले...अविनाश सोळंकी यांचा फोन आला त्या वेळी, आम्ही नेमावरच्या जवळपास असू. मी फोनवर बोलू देखील शकले नाही मात्र बाबा बोलला... मला दवाखान्यात भरती करून घ्यावं लागणार असं बाबा आणि अविनाश दोघांनाही वाटू लागलं असावं.. काय बोलणं झालं ते मला आठवतत नाही मात्र अविनाशचे ४ ते ५ फोन येऊन गेले. मी डोळे बंद करून, बाबाचा हात धरून फक्त पावलं उचलत होते.. आता जिथे कुठे व्यवस्था असेल तिथे फक्त जाऊन आडवं व्हायचं इतकंच मला माहित होतं.. माझे पाय सुद्धा कसे उचलले जातात आहेत हे देखील माझ्या कल्पने बाहेर होतं..... आम्ही नेमावरला पोचलो तेव्हा वर्मा जी आमच्यासाठी उभेच होते. त्यांनी आम्हला एका हॉटेलच्या खालच्या रूम मध्ये जागा दिली... कुठे थांबायचं, डॉक्टर कोण, हे सगळे निर्णय अविनाश आणि बाबा यांनी घेतले, त्या वेळी अविनाश, राम बाबू, वर्मा जी या सगळ्यांनी फोनाफोनी करून माझी व्यवस्था केली होती, आणि मी मात्र फक्त आराम करत होते.

मला संध्याकाळी जरा बरं वाटलं आणि तेव्हा सगळं बाबानी सांगितलं, पण बिचारा बाबा पूर्णवेळ हॉटेलच्या रीसेप्शन वर बसून होता. एकतर हॉटेल मध्ये राहणं त्याला पटलेलं नव्हतं, त्यात मी खोलीत आराम करत असल्याने बाबाला पूर्ण वेळ बाहेर बसावं लागलं होतं...मला ही ते पटलं नाही आणि म्हणून आता थोडं बरं वाटतय तर आश्रमात जाऊ असं ठरवून आम्ही तयारी करायला घेतली. मी झोपून उठलेली पाहून हॉटेलच्या मालकाला हायसं वाटलं. त्याने देखील त्याच्या ओळखीच्या एका डॉक्टरला बोलावलं आणि “ये हमारे घर के ही डॉक्टर है, एक बार दिखा दो” असा आग्रहच केला. सत्तरी पंचहत्तरीचे डॉक्टर शर्मा मला तपासायला आले तेव्हा त्यांनी मला आपल्या दवाखान्यात येण्याचा आग्रह केला, एक इंजक्षन द्यायचं आहे आणि ब्लड टेस्ट करायची आहे असं सांगून बोलावलं. मी पण विचार केला की इतकं कुणी

करतय आपल्यासाठी तर दाखवून देऊ एकदा, म्हणून आधी दवाखाना करू आणि मग आश्रमात जाऊ असं ठरवलं, आणि दवाखान्यात गेलो.

तिथे इंजक्षन देऊन, ब्लड टेस्ट साठी ब्लड देऊन झाल्यावर डॉक्टरांनी मला जाउच दिलं नाही "आज आपको यही रहना है माताजी, अंडर ओब्जर्वेशन, कल फिर चले जाना". तुम्हाला हवं ते सगळं इथेच देतो पण माझ्याकडेच रहा असं म्हणून थांबवूनच घेतलं. आमचं सगळं सामान हॉटेलला आणि आम्ही दोघं डॉक्टरांच्या घरी. खाली हॉस्पिटल आणि वर घर, सगळी देखरेख.. त्यांच्या घराच्या समोरच्या खोलीत आमची व्यवस्था केली होती आणि दर दोन तासांनी एक नर्स येऊन माझी तब्ब्येत पाहून जात होती. दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर स्वत: जाऊन आमचं सामान घेऊन आले आणि दुसऱ्याही दिवशी मला जाऊ दिलं नाही. या दोन दिवसांची देखभाल आणि औषधा नंतर मात्र माझी तब्ब्येत सुधारली, आणि मग आम्ही पुढे जायचं ठरवलं.. पण नर्मदा जयंती नेमावरला करायची होती. माझी तब्ब्येत सुधारली तो दिवस नर्मदा जयंतीचा. आजच्या दिवशी परिक्रमावासी ना डॉक्टर आपल्या घरून जाऊ देणार नव्हतेच, म्हणून तो ही दिवस तिहेच थांबलो.. बहुधा याही मागे कारण असावं...

नर्मदा जयंतीचा सोहळा मी नुसता बघावा असं त्या मैयाला मान्य नसावं. त्यात माझा सक्रीय सहभाग असलाच पाहिजे अशी तिची इच्छा असावी आणि म्हणून ती माझ्या मनातही उत्पन्न झाली, आणि तसं तिनी घडवून आणलंही. सायंकाळी नर्मदा जयंती निम्मित्त आयोजित कार्यक्रमात आरतीच्या वेळी परिक्रमावासीच्या हाताने आरती व्हावी असं एका मैयाजीच्या मनात आलं आणि मी तीथे हजर होते म्हणून असेल पण ते भाग्य माझ्या पदरी येऊन पडलं. त्या आरतीच्या तेजाचं वलय पाहून मला दिवा लावण्याची इच्छा झाली आणि चितळे माईंचा ५०१ दिव्यांचा अनुभव आठवला...आणि वाटलं ५०१ नाही पण ५ तरी दिवे लावावे आपण... तिथेच एका दुकानातून मी ५ दिवे घेतले आणि विझणार नाही असं ठिकाण शोधावं म्हणून

जरा अंतर लांब गेले, मी माझे दिवे लावून ठेवत होते आणि तिथेच एका पायरीवर एक आजी बसल्या होत्या, त्यांच्या समोर ५-६ ताटात भारपूर दिवे तयार करून ठेवले होते आणि अजून त्या तयार करतच होत्या. त्यांच्या हाताशी त्यांची १५- १६ वर्षांची नात एक एक ताट घेऊन ते दिवे पायरी वर मांडत होती. सगळे दिवे मांडून झाल्यावर ते लावायचे होते… “इतने दिये छोडोगी माताजी” मी विचारलं.. ”नही बिटिया, सारा किनारा झगमग करे आज तो.... मैया मे नही छोडना है.. यही रखना है किनारे पर... मेरी मदत करदे.. तू भी आजा मेरे नातीन के साथ.. वो दिये सजा रही है, तू जलाती जा पीछे पीछे”.. मी फक्त ५ दिवे लावायची इच्छा व्यक्त केली होती.. किती तरी दिवे त्यादिवशी मी लावले असतील… पण मैयांनी माझी इच्छाच पूर्ण केली नाही तर मला हवं होतं त्याहीपेक्षा जास्त, खूप जास्त दिलं तिनी मला…त्याच दिवशी नाही…नेहमीच……

मैया किनारा त्या दिव्यान्नी उजळून निघाला होता… पायऱ्यावर लांबपर्यंत पसरलेले दिवे, त्यांच्या सात्विक, मंद पण प्रसन्न प्रकाशानी मन, आत्मा आनंदमय झाला होता.. “तमसोमा ज्योतिर्गमय” हा देहाचा मनाचा आणि आत्म्याचा प्रवास इथेच बसून बघत राहावा असच वाटत होतं… दिवे लावून झाल्यावर त्या आजी आपल्या नातीसह परतताना मी पहिल्या होत्या.. एकेक पाउल चालायला त्या आजींना बराच त्रास होत होता, नातीचा हा धरून त्या पायाऱ्या चढत होत्या…इतके कष्ट घेऊन त्या आजी इथे आल्या आणि माझी इच्छा पूर्ण झाली… नेमकी मला चितळे माईची आठवण यावी, नेमका तो दिव्यांचा अनुभव आठवावा, आणि नेमकं याच वेळी ह्या आज्जी मला भेटाव्यात! योगायोग वाटतो का हा?… मला इथून जावसं वाटत नव्हतं पण डॉक्टर साहेब वाट बघत असणार होते, त्यामुळे त्या उज्वल ज्योतिर्मय मैयाचं नववधू सारखं रूप डोळ्यात साठवून आम्ही घरी परतलो.



*<u>नेमावरला असंख्य दिवे लावले तो क्षण</u>*

पुढे छीपानेरला मुक्काम केला, आणि पुढचा मुक्काम डीमावर ला. डीमावरला जाताना बरीच वाट शेतातून जायला लागते. इथे एक खूप जागृत मंदिर आहे, तिथे मुक्काम करण्याचं ठरवलं, रस्त्यात भेटलेल्या रामसिंग दुबे जींनी आम्हाला या मंदिराची माहिती दिली. साधारण चार शे वर्ष जुनं हे मंदिर आहे, त्यामुळे इथेच मुक्काम करायचा असं ठरलं. तिथे जाईस्तोवर संध्याकाळ झाली आणि अचानक पावसाला सुरवात झाली. मंदिरात गेलो तर तिथे अजिबात जागा नसल्याचे समजले. बाहेर गावाची ४० ते ५० जणांची एक बस तिथे येऊन उभी होती. भागवत करण्यासाठी त्यांनी हे मंदिर आधीच बुक करून ठेवलं होतं. "प्रसाद के लिये आजाओ आप पर रुकने की व्यवस्था नही है" असं म्हटलं तेव्हा आता पावसात, अंधारात आम्ही जावं कुठे तेच कळेना. हे मंदिर तसं गावापासून थोडं लांब, म्हणजे आता ३ किमी चालून गावात जाण्याशिवाय पर्याय नव्हता, आणि गावातही सोय आहे की नाही याची खात्री नव्हती.... आम्ही निघालो.

मैया प्रत्येक गोष्ट करते त्यामागे कारणं असतात, कुणाचीही भेट ती उगाच घडवत नाही, त्या मागे कारणं असतात आणि असतातच. आम्हाला ज्या रामसिंग दुबे जींनी मंदिराची माहिती दिली होती, वाटेत चहा पाजला होता, तेच रामसिंग आम्हाला पुन्हा रस्त्यात भेटले, आणि "आपको ही लेने आ रहा हू, असं सांगितलं" आम्ही तर त्यांना काहीही सांगितलं नव्हत, किंबहुना त्या भागवत कथेबद्दल ही रामसिंग यांना माहित नसावं कारण तसं असतं तर मंदिरात राहा असा सल्ला त्यांनी दिलाच नसता.. मग यांना कसं समजलं आम्ही निवारा शोधतोय ते?... नाही.. त्यांना काहीही समजलं नव्हतं... ही मैयाची कृपा होती. दोन चांगल्या घरचे लोक आणि परिक्रमावासी रस्त्यात भेटल्याचं रामसिंग जी आपल्या बायको जवळ बोलले असता त्या बाई खूप भावूक झाल्या आणि "आज परिक्रमा वासी की सेवा का मन हो रहा है, आप उन्हे घर बुला लाईये, उनके पैर की मिट्टी अपने घर मे आनी चाहिये" असं इतकं कळवळून म्हणाल्या की भर पावसात, अंधारात, छत्री घेऊन हे रामसिंगजी आम्हाला शोधायला मंदिराकडे निघाले... आम्ही निवारा शोधत होतोच, पण सांगा, मी याला योगायोग कसं म्हणावं हे मला समजत नाहीये. नेमकं आम्हाला राम सिंग भेटणे, आम्हाला मंदिरात जागा न मिळणे, दुबे मैया असं कळवळून राम सिंग जी ना आम्हाला घरी आणण्याबाबत विनवणे...नेमकं कसं होतं असं?.. पण असं होतं...पुढे पाथोडा आणि होलीपुराला पण अश्याच प्रकारचे अनुभव आले. मात्र बुधनी आणि नांदनेर चा अनुभव अगदी हृद्य आहे...

बुधनीला आम्ही अज्ञानात सुख कसं असतं ते अनुभवलं तर नांदनेरला आमची चांगली कान उघडणी केली... नांदनेरला मैया नी खूप लाड केलेत, आणि अद्भुत कंपनाच्या स्वाधीन केलं आम्हाला, इथल्या मंदिराची विशेषता आहे ती, मात्र ते तसं भाग्य असावं लागतं. माझं भाग्य मात्र जोरावर आहे बरं का... पूर्व जन्मीची पुण्याई, माय बापाची पुण्याई, पण मी भाग्यवान आहे खरी... आणि हे अनुभव त्यामुळेच येतात...कोणते?.. सांगते पण पुढच्या भागात..

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५६

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला डिमांवरबद्दल सांगितलं होतं. रामसिंग दुबे यांच्याकडे आम्ही राहिलो होतो, आणि हा मुक्काम अचानक झाला होता. आता पुढे सांगते. इथून पुढे आम्ही पिथोडा होलीपुरा मार्गे नांदनेरला गेलो. वाटेत बुधनी, सरदार नगर, जैत ही गावं लागतात.

पिथोडाला पोहचते वेळी आम्हाला बर्यापैकी झाडी जंगल मार्ग लागला. अतिशय प्रसन्न अस वातावरण होतं दिवसभर आणि इथे आम्ही राहिलो होतो ते ठिकाण आधी जरा वेगळं वाटलं पण नंतर मात्र खूप आवडलं. किनाऱ्या किनाऱ्याने जाताना इथे खूप गमती जमती झाल्या बरं का! एक बगळ्या सारखा दिसणारा पक्षी आमच्या सोबत सोबत चालू लागला इथे, अहो म्हणजे तरी १. ५- २ किमी असेल.. हा नं आमच्या समोर समोर उडत होता, थोडं समोर जाऊन अगदी वाटेवर बसायचा, आणि आम्ही त्याच्या जवळ गेलो की उडून जायचा.. मजा वाटली बघून. इथे मोकळा मोठा पण कच्चा रस्ता आणि अगदी बाजूला मैया. त्या मैयाकडून येणारं वारं आमच्यात जणू कसलीशी ताकत भरत होतं. खूप प्रसन्न आणि शांत वातावरण, आपोआप जप केल्या जात होता इथे...एका ठिकाणी तर मी चक्क खाली बसले आणि त्या मैयाकडे दोन्ही हात पुढे करून तिला एक करकचून मिठी मारून घेतली.... हो न ! तिनी कवेत घेताल्यासारखं वाटलं मला. ही प्रसन्नता काहीतरी वेगळी होती बरं का, स्थान महात्म्य असेल की काय माहित नाही.. पण म्हणजे कसं सांगू? बघा जेव्हा आपली छान झोप झाली असेल आणि अगदी सकाळी सकाळी उठल्यावर खूप उत्साह वाटत असेल नं तसं, किंवा अनपेक्षित पणे काही हवं हवं सं वाटणारं मिळावं तसं काहीसं...मन नुसतं हसतच होतं आनंदानी... पावलं टाकल्या जात

होती पण त्या चालण्यात कसलीही उताविळता नव्हती, उलट आहे ते सगळं अगदी पिऊन टाकावं असं वाटत होतं..



*पिथोडाकडे जाताना*

याच रस्त्यावर नं एक अजून गम्मत झाली बरं का.... मैयाच्या पलीकडच्या काठावरून बकऱ्याचा एक कळप सुद्ध्धा आमच्या सोबत चालतोय की काय असा भास होत होता, आणि कुणी माणूस आहे असा भास झाला म्हणून बाबाने जोरात नर्मदे हर केलं.. इथे पात्र खूप लहान नाहीये, पण खूप मोठही नाही, त्यामुळे आवाज गेला असावा आणि सगळ्या बकऱ्या पण ओरडल्या, त्यात त्या माणसाचा आवाज काही आला नसावा असं वाटून बाबा पुन्हा नर्मदे हर म्हणाला...पुन्हा बकऱ्यांचा आवाज आला, आणि मग नीट पाहिलं तर तिथे कुणी माणूस नव्हताच.... त्या बकऱ्या कदाचित असंच, म्हणजे नर्मदे हरला प्रतिसाद म्हणून नसतील ही आवाज देत, पण आम्हाला वाटलं आमच्याच हाकेला प्रतिसाद दिला...आणि मग अजून मजा येऊ लागली....

इथे याच रस्त्यावर अजून एक गंमत पाहिली. दोन बेलाची झाडं होती.. म्हणजे त्यांची मुळं आणि बुंधे वेगळे होते. त्यांना फांद्याही वेगळ्या फुटल्या होत्या पण पुढे दोन झाडांची मिळून एक फांदी तयार झाली होती, सृष्टीत असं ही असतं.. आपण नाही का बघत कधी हात चिकटलेले जुळे भाऊ वगैरे, तसं...

तर अश्या अनेक गमती जमती बघत बघत अगदी आनंदात आम्ही पिथोद्याला येऊन पोचलो. इथे लोकांनी आम्हाला रामसिंग भाईचं घर दाखवलं... इथेही रामसिंग भाईच! हे एकटे इथे थांबून शेती बघतात आणि परिवार जबलपूरला असतो. इथे यांच्याकडे यांच्या स्वयंपाक घराचा ताबा त्यांनी माझ्या हाती सोपवला. रात्री बराच वेळ गप्पा झाल्यात आणि आता आसन लावायचं तर लाईट गेले. जी खोली आमच्यासाठी तयार करायची होती त्यात सगळा भुसा भरलेला.... आणि आता तो काढून दुसरीकडे नेण काही शक्य नव्हतं. बरं बाहेर झोपायाचं म्हटलं तर हवी तशी जागा नव्हती, गायी म्हशी बांधलेल्या होत्या, आणि आता रात्री अंधारात आपण कुणाला किती त्रास द्यावा असं वाटलं.. आपण टोर्च लाईट मध्ये करून घेऊ भुसा बाजूला, असं म्हणून आम्ही त्या खोलीत गेलो, आणि बाकी मंडळी पण आपापल्या घरी गेली.

आम्ही आत गेलो तर भरपूर भुसा खोलीभर पसरला होता, खोली म्हणजे व-हांडाच हो, ५ बाय ७च्या आसपास लहानशी ती खोली, तीन बाजूनी भिंत, एका बाजून जाळी, आणि वर कौलं, ती ही काही ठिकाणी निघालेली... तर आता तो भुसा झाडू नी एका कोपऱ्यात सरकावायाचा आणि मग तिथे अंथरूण घालायचं.. पण आम्हाला तसं करताच आलं नाही.. तो भुसा जसा झाडायला सुरवात केली तसं आम्हा दोघांनाही खूप शिंका येऊ लागल्या... आम्ही बाहेर आलो आणि कुडकुडणाऱ्या थंडीत जरा वेळ बसलो, पण ते ही सहन होईना... आता काय करावं... मग जरा शोधलं काही दिसतय का? तर प्लास्टिकच्या पोत्याची शिवलेली दोन मोठी कापडं सापडली... तेच कापड

घेऊन आत गेलो... भुसा खोलीभर पसरला होताच, अगदी बराच होता, त्यावरच हे अंथरलं आणि त्यावर आमचे अंथरूण घातलं, आणि दुसरं कापड जाळीला बांधल, आणि छांन झोप झाली.. अजिबात थंडी वाजली नाही... मैयांनी तो भुसा आमच्या थंडी साठीच अंथरून ठेवला असावा.. दुसया दिवशी रामसिंग भाई नी स्वत:च्या हातांनी आमच्या साठी बालभोग तयार केला आणि तो खाऊन आम्ही पुढे निघालो.

पुढे साततुमडी, निनोरा करत सप्त धाराला आलो. ही गावं नं अगदी चित्रामधल्या पेंटिंग सारखी गावं आहेत, प्रत्येकच घर कसं सुंदर लीपाई पोताई केलेलं.. एका घरातून नं खूपच खमंग वास येत होता, भूक बळावली असेल.. मला लोणचं तेल पोळीच आठवली अगदी... पण तिकडे दुर्लक्ष केलं आणि पुढे निघालो... निनोराला एका घरी चहाला बोलावलं असता तिथल्या मैया जी नी चहा सोबत खायला म्हणून चक्क पोळ्या आणल्या होत्या आणि ताटलीत आंब्याचं लोणचं! आता खरं मला इच्छा ही झाली नव्हती बरं, आठवण आली होती, आणि ती ही त्या खमंग वासामुळे... माझ्या मनात एकदाही असं आलं नाही की आपल्याला लोणचं तेल पोळी हवी आहे...आणि पुढच्याच गावात ती मिळावी ही.. खरंच सांगते, या वेळी मला फक्त आठवण झाली होती...इच्छा खरंच झाली नाही.... असो

मग आलो सप्त धाराला... हा रस्ता अगदीच एकट आहे. पण इथून दिसणारं मैयाचं रूप फारच वेगळं आहे.. अशा एका ठिकाणी तिच्या सात धारा वेग वेगळ्या दिसून पडतात अगदी.. बघत रहावसं वाटतं.. इथेच एका ठीकाणी एक चौकोनी चबुतरा आहे आणि त्या वर शिवलिंग बसवलेलं आहे, बाजूलाच दुसरा छोटा सां चबुतरा ही आहे.. हे अगदी रस्त्याच्या मध्य भागी बरं का... आणि रस्त्याच्या कडेला एक झोपडी आहे, पडवी असलेली, आणि झोपडीच्या मागे सगळी शेतं...बाबा पडवीत जाऊन बसला आणि मी त्या छोट्या चबुतऱ्यावर जाऊन बसले आणि आम्ही दोघं ही मैयाचं ते विलोभनीय बघत बसलो. अचानक कुठून आणि कसा काय माहित नाही, एक भला मोठा बैल धावत माझ्या दिशेनी येऊ लागला, तशी मी चबुतऱ्यावर

चढून उभे राहिले, मला वाटलं मी वर चढून उभी झाल्यावर तो काही करू शकणार नाही, पण हे सगळं इतक्या क्षणार्धात झालं की विचार करायला वेळ मिळाला नाही आणि हा आडवा उभा प्राणी माझ्या दिशेनी शिंग उभारू लागला, त्याचे पुढचे दोन पाय चबुतऱ्यावर, आणि मी मात्र पलीकडच्या भागाने खाली पडले.... तसा तो ही उतरून माझ्या दिशेनी येऊ लागला... त्या महादेवाला मी ११ प्रदक्षिणा नक्कीच घातल्या असतील त्या दिवशी... अतिशयोक्ती सोडून द्या, पण बाबा या नंदी मागे दंड घेऊन धावत होता तरी याला काही परवाच नाही.. तो बाबावर धावून जात नव्हता, माझ्याच मागे येत होता, त्याच्या आणि माझ्या मध्ये तो महादेव काय तो होता बस.. जर हा नंदी त्या महादेवाच्या चबूतऱ्यावर चढला असता तर काही माझी खैर नव्हती... पण त्याला तेवढं उंच चढता येईना बहुधा... एक क्षणभर तो नंदी जरा थांबला असेल आणि तो क्षण साधून मी झोपडीकडे धावले, एव्हाना माझा आरडा ओरडा ऐकून झोपडीचं दार उघडून तिथे राहणारा एक माणूस बाहेर आला होता आणि तो ही या नंदीला पळवून लावण्याला मदत करत होताच.. मी सरळ झोपडीत शिरले आणि दर बंद करून घेतलं... खिडकीतून बघितलं तर हा नंदी झोपडीच्या मागच्या बाजूच्या शेतांकडे निघून गेला होता.. तो खूप दूर निघून गेलाय याची खात्री झाल्यावरच मी झोपडीच्या बाहेर आले... पण असं का झालं याचं कारण मला आजवर समजलं नाही. म्हणजे आम्ही दोघं ही होतो नं तिथे, मग या नंदीला माझ्याशीच काय वैर? पण असं होतं बहुधा, कारण माझी लहान बहिण गायत्री देशमुख हिला सुद्धा असा अनुभव आलाय.. कुठे आला ते मला आता आठवत नाही, पण तिला तर अश्याच नंदी ने शिंग मारून खाली पाडलं होतं... मी तेवढी वाचले बाई.. असो..

इथून पुढे जाताना खूप शेतातून आणि उंच सखल म्हणजे कुठे चढाई तर कुठे खाली उतरून जावं लागतं. तेव्हा शेताला पाणी दिलं होतं आणि सगळीकडे नुसताच चिखल होता त्यामुळे अगदी शेताच्या किनाऱ्यावरून जावं लागत होतं. एक सांगू का, या भागातल्या प्राण्यांच माणसाशी किंवा परिक्रमावासीशी, किंवा माझ्याशीच असेल पण काहीतरी नातं नक्की होतं, किंवा हे इथले प्राणी असेच असतील की काय देव जाणे... मागे लागणारे... कारण आता माझ्या

मागे अजून एक प्राणी लागला.. एका ठिकाणी अगदी दोन तीन दिवसांचं बकरीच पिलू खेळत होतं.. आम्ही जवळून गेलो आणि ते मागे मागे येऊ लागलं.. मग त्याची सोबत करायला कुठूनशी आणिक पिल्लं... ही पिल्लं आम्हाला पुढे जाऊ द्यायची, आणि मग में में करत मागून पायात पायात करायची. यात एक अगदी लहान पिल्लू होतं ते तर असं हक्कानी माझ्या पायाशी यायचं... रस्त्यात चिखल होता, आणि चढ उतार खूप होते, ह्या पिल्लाला बरेच ठिकाणी चढता यायचं नाही, तेव्हा पिल्लू अक्षरश: मला किंवा बाबाला आवाज द्यायचं आणि मग आम्ही त्याला कडेवर धरून चालायचं... जवळ जवळ २ तास ते पिलू आमच्या बरोबर होतं आणि मग बाकी पिल्लं निघून गेल्यावरही होतं.. किती हाकलावं याला की "जा बाबा तुझ्या आईकडे परत" पण हे काही जायला तयार नाही, याचा मालक कोण काही माहित नाही, मग एका ठिकाणी एक ओढा पार करून जायचं होतं, तेव्हा मन कठोर करून त्याला कडेवर न घेताच पुढे निघून गेलो...काय ऋणानुबंध असतात माहित नाही... त्या नंदीला माझा भयंकर राग असावा, मला अगदी जीवानिशी संपवायला निघाला होता तो, आणि हे कोकरू मला सोडायला तयार नव्हतं... हक्क गाजवत होतं माझ्यावर.. परस्पर विरोधी... म्हणजे एक नक्की.. मी कुणाला तरी अगदी तुटेस्तोवर दुखावलंय आणि कुणावर तरी निस्सीम प्रेम पण केलंय... सगळीच कृपा तिची आहे

पण बुधनी सरदार सरोवर आणि नांदनेरला जे काही अनुभवलं त्यात पुन्हा एकदा माईच्या असीम कृपेची पावतीच मिळाली जणू... आणि एक कान उघडणी पण झाली माझी...सौम्य शब्दात चांगलाच रागावलं त्या मैयांनी मला.. "चुकतेयेस तू बेटा, वेळीच सावर" असा संदेश दिला..

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५७

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला नंदी आणि त्या बकरीच्या पिलाबद्दल सांगितलं होतं ना? कसे ते माझ्या मागे लागलेले? पण इथे काही तरी जादूच आहे बहुधा. किंवा माझं काही नातं असेलला भागाशी. कारण प्राणीच नाही, माणसाचं बाळ पण मागे लागलं माझ्या...सोडायलाच त्तायार नाही मला. पण असा अनुभव नं दोन तीन दा आला मला परिक्रमेत. बरं जेव्हाचा तेव्हा सांगेनच, आताचा आधी सांगते.

तर एका गावातून जात असताना आम्ही एका झाडाखाली बसलो होतो. लोक विचारतातच परिक्रमावासीना तसं एका लहानश्या मैया नी आम्हाला चहा विचारला आणि अंगणात बोलावलं. ह्या घरी एक अगदी १०-११ महिन्याचं बाळ होतं, खूप गोड, इतकं की त्याला घेतल्याशिवाय मला राहवलं नाही.. आणि एक बरं का, मी पण लहान मुलांना फार आवडते. अगदी नेहमीचा अनुभव आहे हा माझा. म्हणजे शाळा न आवडणारी मुलं माझ्या केबिन मध्ये आली की न त्रास देताना छान गप्पा मारायची माझ्याशी...आणि वर्गात जायला कंटाळा करायची...असो.. तर त्या बाळाला मी कडेवर घेतलं आणि त्याच्याशी खेळू लागले... काही ओळख पाळख नसताना हे बाळ अगदी परिचित असल्यासारखं हसायला लागलं... चहा देखील मी त्याला कडेवर घेऊनच प्यायले बरं का...आणि आता त्याला त्याच्या आईजवळ देवून निघणार तर हा गोडुला काही जायला तयार नाही...चक्क रडू लागला, पण काय इलाज असतो का...? जावंच लागलं पुढे.. अहो हे बाळ तरी न बोलू शकणारं होतं.. पुढे तर एकाने गोंधळ घातला होता...सांगेन पुढे.. पण हे ठिकाण काहीतरी वेगळं.. एका दिवसात एक नंदी, बकारीचं पिलू आणि आता हे बाळ, का असं वागत होते? काय संकेत



*<u>बघा हे पिलूबाळ कसं हसतंय</u>*

होता यात? का फक्त यो गायोग? असो बाबा काही... मैयांनी दिलं, आपण घेतलं...असो...पिथोडा नंतर लागणार मोठं शहर म्हणजे होशंगाबाद फाटा. तिथे जाताना वाटेत पिली कराल पासून पुढे मुकला गाव लागतं. इथून मग बुधनी. खरं तर होशंगाबाद फाट्याच्या नंतर कुठे तरी एका चहाच्या दुकानात आम्हाला चहाला बोलावलं तेव्हा तिथल्या माणसाने फिरून नं जाता आतून रस्ता आहे असं सांगितलं, त्या नुसार आम्ही बुधनी गावात जाऊ असं ही सांगितलं, मात्र कदाचित आम्ही वाट चुकलो असू. कारण आम्ही बुधनी गावाच्या आधीच तालपुरा रस्त्याला येऊन पोचलो. मध्ये बरीच झाडी होती, अर्थात जंगलच होतं पण खरी मजा आता झाली.

आम्ही आतल्या रस्त्याने बरच अंतर चाललो असू. मग आम्हाला भूक लागली आणि जवळूनच हायवे चा आवाज येत होता, म्हणजे हा रस्ता कदाचित तालपुरा रस्त्याला समांतर असावा कारण झाडी बरीच असूनही आम्हाला आम्ही जंगलात असल्या सारखं अजिबात वाटलं नव्हतं, पण गम्मत माहितीये का? आम्ही चक्क जंगलात होतो.. आणि साध्या सुध्या नाही, पट्टेरी वाघांच्या! समोर एक उंच डोंगर दिसत होता, त्याच्या पलीकडे पचमढीचं जंगल होतं, आणि इथलं बुधनी चं... तर आम्हाला भूक लागली म्हणून आम्ही हायवे वर यायचं ठरवलं आणि आवाजाच्या दिशेने चालू लागलो. थोड्याच वेळात आम्ही हाय वे वर आलो सुद्धा. मी मागे आणि बाबा पुढे होता, समोर एक मोठा फलक होता, त्यावरून आम्ही कुठे आहोत ते समजणार म्हणून बाबा पुढे गेला आणि बोर्ड वाचू लागला.... तो बोर्ड वाचताना त्यांनी आश्चर्याने आणि अवाक होऊन दोन्ही हात




*<u>हाच तो फलक</u>*

ओठावर ठेवले, आणि चक्क आ वासून तो माझ्याकडे बघत राहिला. “अरे बाबा, असा काय बघातोयेस, काय झालं? चुकलो की काय आपण रस्ता” मी लांबूनच विचारलं... तसा तो ओरडलाच.. “लवकर येऊन बघ जरा”.. मी पुढे गेले आणि जे बघितलं त्यावर माझा विश्वास बसेना... त्या फाकालावर वाघाचं चित्र असलेलं एक बँनर होतं आणि त्यावर “इस वन क्षेत्र मे वाघ एवं अन्य हिंसक प्राणीयो की वर्तमान मी उपस्थिती पायी गायी है, प्रतिबंधित वन क्षेत्र मे जाना सख्त मना है” अशी पाटी लागली होती, आणि त्या रस्त्यावरून आम्ही बाहेर आलो होतो. नाही बसत नं विश्वास? मी फोटो पण दिलाय बघा सोबत...आणि गम्मत म्हणजे आम्हाला काही झालं नाही, काही जाणवलं ही नाही.. कदाचित आम्ही हायवेच्या जवळच्या मार्गाला असू आणि घनदाट जंगल दूर असेल असं वाटलं क्षणभर.. हायसं वाटायला एवढं पुरेसं असतं नं! चला, आता तर आपण बाहेर आहोत, हुश्श, असं म्हणून आम्ही आनंद मानायला हवा होता, कारण अज्ञानात सुख असतं... बघा नं हा फलक वाचला नसता तर काही वाटलं नसतं आम्हाला, पण आता फाकल वाचला होता...बरं इथवर ही एकवेळ ठीक, पण माणसाला नको त्या वेळी नको ते सुचतं, आणि नसतं संकट आपण ओढावून घेतो उग्गाच...

असच झालं, या फलकावर वन विभागाचा फोन नंबर दिला होता. आणि मी त्या नंबर वर फोन केला...काही गरज होती का? पण केला... “ हा बोर्ड जुना आहे, काळजी करू नका” असं उत्तर मिळेल अशीच आशा होती मला, पण झालं वेगळंच... मी फोन केल्यावर त्या

माणसाने माझ्या अपेक्षेच्या अगदी उलट उत्तर दिलं.. "चलो अच्छा हुआ आप सही सलामत बाहर आये, अभी ५ दिन पहले उसी जंगल मे एक ८ साल की बच्ची पर बाघ ने हमला कर दिया, मर गयी बेचारी, अरे अभी कूछ दिन पहले तो बुधनी घाट के पास से भरी दोपहर एक गाय का बच्चा उठाकर ले गया बाघ.. कोशिश जारी है पकडने की, ५ बाघ है, शायद कोई सर्कस वालो ने छोडे है, शिकार करना आता नही होगा, और इंसानो की आदत होगी उन्हे... ठीक है, अब जंगल रास्ते नही जाना"

त्याचं बोलणं ऐकून मला धस्सं झालं... कल्पना ही करवली नाही कशाची, आणि आतापर्यंत बिनधास्त असलेल्या मला अचानक भीती वाटू लागली. आजची रात्र आम्हाला बुधनी मध्येच थांबायचं होतं. हा विषय मला अजिबात ऐकायचा नव्हता मात्र भेटणारा प्रत्येक जण आम्हाला वारंवार सावधानीचे इशारे देत ह्याच विषयावर बोलत होता. कधी एकदा हा पट्टा पार करते मी असं झालं होतं मला. शंकासुरांनी माझा वध करून झाला होता...

बुधनीला एका कपड्याच्या दुकानातून मी लुंगी घेतली, आणि त्याच दुकानात आमची राहण्याची व्यवस्था ही झाली. दुसऱ्या दिवशी "हाय वे से ही जाना माताजी" असाच निरोप मिळाला आणि आम्ही हायवेनीच जाऊ लागलो. "बांदराभानपर्यंत जंगलाचा पट्टा आहे मग नाही काही" असं लोक सांगायचे आणि शेवटी बांदराभान ओलांडलं आम्ही आणि जरा हलकं वाटू लागलं...

आपल्या लहानपणी घडलेल्या गोष्टींचा आपल्या मनावर किती खोल परिणाम होतो हे मला त्या दिवशी जाणवलं. मी लहान असताना मला अवांतर वाचनाची खूप आवड होती. खूप पुस्तकं वाचलीयेत मी. आणि त्यावेळी खूप गुंग होऊन जायचे मी वाचताना, डोळ्या समोर चित्र उभी राहाय्चीत माझ्या... मनावर कोरल्या जायचीत ही पुस्तकं, आणि याच पुस्तकांच्या यादीत काही अशी पुस्तकं होती जी नेमकी इथे आठवायला नको होती, त्याहून त्या काल्पनिक कथा नव्हत्या तर चक्क सत्यकथा होत्या, अगदी फोटो सुद्धा दिलीयेत त्या पुस्तकांमध्ये. जिम

कोर्बेटच्या सगळ्या पुस्तकांचा या यादीत समावेश होता. Man eating leaopard of Rudraprayag, Temple tiger, Man eater of Kumao, Tiger stories अशी ही सगळी पुस्तकं आणि त्यातल्या सत्यकथा माझ्या डोळ्यापुढे येत राहिल्या. हे दोन दिवस खरंच मी घाबरलेच होते पण जसं सरदार नगरला आलो तसं वन विभागापासून दूर गेलो असं वाटलं आणि भीती कमी झाली, पण मैयाला मी घाबारायलाच हवी होती बहुधा

सरदार नगर ते जैत हा रस्ता किनाऱ्याने जातो. जैत लांब असलं तरी समोर दिसत होतं, त्यामुळे एक समाधान वाटत होतं. आणि जंगल असलं तरी वाघाचं जंगल नव्हतं म्हणून जरा हायसं वाटतं न वाटतं तोच तडस, इथे याला लकडबग्घे म्हणतात त्यांचा झुंड समोरून आमच्या दिशेने येताना दिसला. तेव्हा पहिल्यांदाच मी हा प्राणी प्रत्यक्षात बघत होते, आणि जवळ जवळ १२- १३ तरी लकडबग्घे होते, मात्र आमचं अस्तित्व जाणवून त्यांनी वाट बदलली... हे काही फार धोकादायक नाही हे पुढे समजलं पण त्या वेळी असत्या भीतीत भर घालण्याचं काम या प्राण्यांनी केलं हे नक्की..... फोटो दिलाय सोबत, ते प्राणी दूर जाताना पाहून, उसनी हिम्मत आणून काढला बाबा..



मात्र माझं काय चुकत होत ते मला नांदनेरला समजलं. मैया कुणाकडून काय करवेल याचा भरोसा नाही. चूक समजली, माझी कान उघडणी ही केली तिनी, आणि लाड ही पुरवले... सांगते सगळं, पण ५८ व्या भागात.



# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५८

नर्मदे हर

तर मागच्या भागात मी तुम्हाला त्या वाघाच्या फलकाबद्दल सांगितलं होतं. नंतर तो तडसांचा झुंड पार करून गेला आणि आम्ही जैतला येऊन पोचलो. आता जेमतेम ३. ३० झाले असतील. इथे खरं राहता येणं शक्य होतं पण आम्ही पुढे जायचं ठरवलं.

नारायणपूर नंतर येतं नांदनेर.. आता आम्ही नांदनेरला आलो. इथे येता येता मात्र संध्याकाळचे सहा वाजले. आता आंघोळ पूजा आणि बाकी व्यवस्था बघायला गेलो तर एक छोटंसं मंदिर होतं, त्यात आधीच बरीच गर्दी होती, म्हणून आम्ही जागा शोधू लागलो. मैया किनारी एक आश्रम होता खरा, पण तिथेही भोजन प्रसादीची व्यवस्था नव्हती. तिथे फक्त एक माताजी होत्या, त्या बऱ्याच म्हाताऱ्या होत्या.. "देख लो बेटा, कही और नही मिले तो आ जाना" असं त्या म्हणाल्या.. त्या म्हाताऱ्या जीवाला त्रास देणं काही योग्य वाटलं नाही, म्हणून गावात कुठे सोय होतेय का ते बघायला गेलो असता एक तरुण मुलगा वाटेत भेटला... "एक पाठशाला है, चाहो तो खुलवा देता हू, भोजन के लिये हमारे घर आजाओ" आम्हालाही पटलं ते.... पाठशाळेत आसन लावलं.

ही पाठशाला जुनी. आता शाळा भरत नाही इथे पण क्लासेस चालतात. गावातलेच काही शिकलेले तरुण मुलं इतरांना शिकवतात. ह्या इमारतीचं छत मधून मधून आकाशाचे तुकडे दाखवतं, कधी पावसात पाणी बरसवत, आणि मला तर चांदण्या दाखवल्यात छताने... थोडक्यात सांगायचं तर मोडकळीस आलेली ही इमारत होती, पण प्रसन्न होती. शिवाय अंकित नी चटई आणि जास्तीची पांघरूण आणून दिली होती.

इथे समोर एक हापशी आहे, तिथेच आंघोळ उरकली… आणि रात्रीच्या आणि सकाळच्या साठी इथून हंडे भरून भरून पाणी शाळेत मागच्या अंगणाला असलेल्या टाकीत जमा केलं. खरंच या बायका पाणी भरताना किती थकत असतील ते पहिल्यांदा जाणवलं मला… असो

भोजन प्रसादी झाल्या नंतर बराच वेळ आम्ही दोघं आणि गावातली काही तरुण मुलं शेकोटी पेटवून शाळेच्या समोरच्या अंगणात बसलेलो. तिथे पुन्हा बुधनी मधल्या वाघाचा विषय निघाला. आणि एक विषय निघाला, सांगते पण त्या आधीची एक गम्मत सांगते. सरदार नगर ते जैत या रस्त्यात आम्हाला तडस दिसले होते, पण हे वाघाचं जंगल नाही हे सांगितल्यामुळे आम्ही निश्चिंत होतो. तेवढा तडसांचा झुंड सोडला तर आम्ही अगदी रमत गमत आणि आनंदाने हा रस्ता पार करून नांदनेर मध्ये आलो होतो. मात्र इथे आल्यावर या विषयाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. गावातल्या मुलांच्या गप्पांना उत आला होता अगदी. साधारण पंधरा दिवसापूर्वी इथेच, म्हणजे जिथे आम्ही बसलो आहोत तिथून साधारण २०० फुटावर वाघ पाहिल्याचं या तरुण मुलांनी सांगितलं. एकाने तर चक्क वाघाने कुणावर तरी हल्ला केल्याची घटना महिनाभर आधी इथेच, म्हणजे याच गावात घडल्याचं ही सांगितलं. एकानी बिबट्या झाडावरून उतरून एका घराच्या छतावर बसलेला पाहिल्याचं पण सांगितलं…अज्ञानात खरंच सुख असतं हे आता जाणवू लागलं…

अश्या गोष्टी सुरु असताना बाबा अचानक उठला आणि आत जाऊन आला, आल्यावर म्हणाला “पाठशाला को सामने तो दरवाजा है, लेकीन पिछे तो सिर्फ उंची दिवार है, कोई दरवाजा नही है…सुरक्षित तो होगा न?” आम्ही जिथे आसन लावलं होतं तिथे मागे फक्त एक भिंत होती कम्पाउंड ची. दार नव्हतच, आणि नुकतीच छतावरच्या बिबट्याची गोष्ट कुणीतरी सांगितली होती… आता रात्र ही बरीच झाली होती आणि सगळे घरी जाण्याच्या तयारीत होते.. न राहवून मी बोलून गेले.. “बापरे, आज ये ऐसी ही कहानिया क्यू सुनने मिल रही है? पता नही अजीब सां लग रहा है…थोडा डर तो लग ही रहा है”

माझं हे वाक्य ऐकून अंकित नावाचा २२-२५ चा तरुण उठून भा राहिला. तो बेचैन आणि रागात दिसत होता... होताच तो रागात... तो दोन्ही हात कमरेवर ठेवून माझ्या समोर येऊन उभा राहिला आणि मला बोलू लागला. “मैयाजी आप वापस घर चाले जाईये, आप को परिक्रमा करनी ही नही चाहिये.... आपको नही लगता आप गलत हो?” मला कळेच ना की असं हा का बोलतोय? मी विचारलं क्या हुआ अंकित बाबाजी, आप इतना नाराज क्यू हुये?” तर म्हणाला, “अपने आप को समझाईये, क्या कर रहे हो आप? गलतिया करते जा रहे हो.... कृपा करके अपने मन को साफ रखिये.... ” मला तरीही समजे ना.. शेवटी तो स्पष्ट बोलला.. “आप जिस दिन परिक्रमा उठाये है, उस दिन से आपकी जिम्मेदारी मैया ने ले लीयी है, आपको आपकी चिंता करने की जरुरत नही.. अरे जब आपको पता है की इतने घने जंगल से आप सुरक्षित बाहर निकली है, वो भी दो बार तो इसका मतलब क्या है मा? लोग तो कूछ भी बोलेंगे...क्योंकी उन्हे डर है.. आप क्यू डर रहे है, आपके साथ तो स्वयं माताजी है.. आईये आपको एक और कहानी सुनाता हू”.. तो सांगू लागला

कूछ दिन पहले की बात है, शायद ३ महिने हो गये. आप अब कल आगे जायेगी तो एक महुआ का पेड मिलेगा. वहा औरते महुआ के फुल जमा करने जाती है. वहा एक दिन गांव की एक माताराम गयी तो उसने एक परिक्रमा वासी को वहा विश्राम करते देखा.. दोनो में काफी बातचीत हुई, वह परिक्रमा वासी वहा २ घंटे से विश्राम कर रहा था. वो बिलकुल अकेला था. अपना विश्राम होने के बाद वह चला गया और उसके कुछही देर बाद इस माताराम पर वाघ ने हमला कर दिया.. वो तो उसके पास हथियार था तो वो बच गयी लेकीन एक बात समझो, परिक्रमावासी पर हमला नही किया उसने.. अरे परीक्रमावासी को कोई परेशान कर ही नही सकता... आप बस भरोसा रखो... मा आपके साथ है, जो करेगी आपका भला ही करेगी.... बस बोल दिया मैने तो”

खरंच मला माझी लाज वाटली... मी दोनदा रमत गमत जात असताना देखील मला भीतीचा स्पर्श ही झाला नाही आणि अचानक तो फलक पाहून मला भीती वाटली. मला माहित होतं ही माझ्या मनाची भीती आहे... जे काही वाचलं ऐकलं असेल त्यांनी असेल, पण आहे मात्र...पण आता यापुढे भीती वाटू द्यायची नाही... मी ठरवलं.. माझा भरवसा नाही मैयावर असं नव्हतं खरं, पण भीती होती हे ही तितकच खरं.. त्यानंतर मला अशी भीती वाटली नाही, पण हुरहूर किंवा सावधता कायम राहिली हे ही खरं.. मागे सांगितलं तसं मला मृत्युची भीती नाही, पण माझा जीव अजूनही माझ्या लेकरात अडकला आहे...अगदी कुणाचं कुणाशिवाय अडत नाही, आणि हे फेरे कसे असतात, आपण साक्षी राहायचं असतं, हे सगळं माहित असून सुद्धा "माझ्या पिलाची आई" काही सुटत नाहीये... हो, कमी झालय नक्की, पण सुटलं नाहीये अजून.... कदाचित जवाबदाऱ्या संपल्या की सुटेल...आणि तोवर मी असावी असं त्या ही वेळेस वाटलं.... पण अंकितच्या कान उघडणीचां एक परिणाम झाला.. जरा हूर हूर वाटली की मी मैयाशी डायरेक्ट बोलू लागले, आणि हळू हळू ही भीती कमी झाली...माझी मैया माझं जे काही करेल ते योग्यच असेल हे पक्क होवू लागलं आणि मैयाशी संवाद वाढत गेला...मग मात्र मी मैयाच्या जास्त जवळ गेले. आधी नव्हते असं नाही, पण विश्वासाची काच खरंच नाजूक असते...एखादा ओरखडा सुद्धा घातक ठरतो.

अंकितच्या रुपात तिनी माझी कान उघडणी केली, रागावली ती मला, पण नंतर तिनी भरपूर लाड केले. त्या रात्री त्या उघड्या खोलीत झोपताना हुरहूर वाटली नाही, आणि आता उद्या निघायचं म्हणून लवकर उठलो. हा दिवस होता ३० जानेवारी चा. अंकितकडे चहाला बोलावलं होतं, आणि मला सारखे फोन येत होते. हा माझा वाढदिवस. मागे कुक्षीला कुक्षी मा नी माझा वाढदिवस गायत्री यज्ञ करून साजरा केला होता, आणि आज मैया अजून काहीतरी करून देणार होती.

आज मैयांनी माझ्यासाठी खूपच खास काहीतरी ठेवलं होतं. माझी खूप खूप प्रेमाची माणसं करतील तसं सगळं आज अंकितच्या घरी करण्यात आलं होतं, ते ही अगदी कमी वेळात...

अंकितचं घर छान मोठं आहे, घरी आई बहिण सगळे आहेत. माझा वाढदिवस आहे हे समजल्यावर अंकितच्या आईनी माझं औक्षवण केलं. माझ्या हातापायाला तेल लावलं, गरम पाणी आंघोळी साठी दिलं आणि एक पांढरी मउ शाल पण दिली... गम्मत म्हणजे माझ्यासाठी खास खीर पुरीचं जेवण तयार करण्यात आलं, ते ही अगदी अर्ध्या तासात केलं त्यांनी. माझी आंघोळ झाली, आणि आधी मंदिरात जायचं ठरलं. इथे पण मला काहीतरी स्पेशल मिळणार होतं..



ह्या मंदिराची एक गम्मत आहे. इथे एक नव्हे तर दोन पिंडी आहेत, त्या ही आमोरा समोर, आणि तुम्ही भाग्यवान असाल तर तुम्ही एका वेगळ्याच अनुभवाचे धनी व्हाल, एक चमत्कार तुम्हाला नक्की बघायला मिळेल.. माझं भाग्य तर त्या मैयानी स्वतःच बसून लिहिलं होतं. कारण जन्मदिवसाच्या दिवशी अश्या अनुभवाची प्राप्ती होण हे भाग्य... पण या भागात सांगता यायचं नाही.. सांगते, पण पुढच्या भागात

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ५९

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला नांदनेरच्या दोन पिंडीबद्दल सांगत होते. तर इथे अंकितकडे माझा वाढदिवस साजरा होत होता आणि त्या आधी नमस्कार करून येऊ म्हणून मी मंदिरात गेले होते. अंकित म्हणाला "आपको अगर जाने की जल्दी नही हो और आपके भाग्यमें लिखा हो तो आपको एक चमत्कार दिखाता हु" आम्हाला काही घाई नव्हती आणि असेच विलक्षण अनुभव मिळणं म्हणजे तर भाग्यच होतं...आम्ही थांबलो...अंकित नी घरी फोन करून उशीर होईल असं सांगितलं आणि म्हणाला" अब ध्यान लगाकर बैठो.. जो भी होगा उसे सिर्फ महसूस करो.. और फिर बताना.... बहोत आनंद आयेगा... लेकीन ध्यान लगना जरुरी है, तभी चमत्कार मिलेगा...

मी, अंकित, बाबा आणि मंदिराचे पुजारी असे चौघही आम्ही तिथे बसलो. इथे खूप शांतता आहे... मी फक्त काय होणार आहे याच्या विचारात होते मात्र हळू हळू डोळ्यासमोर निळ्या लाल रंगाची ज्योत मंद मंद प्रकाश देत होती आणि नंतर ती प्रखर होऊ लागली. दरम्यान किती वेळ झाला असेल माहित नाही पण ह्या ज्योतीचा हळू हळू आकार बदलत गेला आणि ओंकार उमटत गेला. यात आत निळसर रंग आत आणि लाल रंग बाहेर असं रूप दिसू लागलं. हा आकार मोठा मोठा होत गेला आणि अगदी माझ्या डोळ्यासमोर मोठ्या रुपात येऊन स्थिर झाला.. मला आता या ओंकारा शिवाय काहीच दिसत नव्हतं.... आणि हळू हळू अगदी क्षीण असा एक ध्वनी ऐकू येतोय असं मला वाटलं...

हा ध्वनी या आकाराच्या मागून कुठूनसा येत होता आणि मागे मात्र फक्त अंधार होता. आता माझं लक्ष पूर्ण आणि पूर्ण या ध्वनिकडे गेलं आणि डोळ्या समोरचा आकार जसा पुसट पुसट होत गेला तसा तसा त्या आकारा मागचा ध्वनी हळूहळू प्रखर होत गेला. आता माझे कान फक्त आणि फक्त तो एकमेव आवाज ऐकू शकत होते मात्र तो आवाज बाहेरून आत येत नव्हता तर आतून बाहेर येत होता असा भास होऊ लागला. त्यानंतर फक्त त्या आवाजाचं अस्तित्व जाणवू लागलं, बाकी काहीही डोळ्यासमोर येईना. हा आवाज तार सप्तकातला ओंकार ध्वनी होता. कानांना सहन होईल इतकाच हा आवाज होता मात्र अतिशय तीव्र होता. हळु हळु तो आवाज माझ्या संपूर्ण देहभर किंवा मनभर किंवा माझ्या आजूबाजूच्या सृष्टीमध्ये भिनू लागला. फक्त तोच आवाज.... अगदी घनदाट होत गेला.... त्यानंतर तो आवाज आणि दुसरं काहीही नाही...

त्यानंतरचं मला फारसं आठवतच नाही... फारसं काय काहीच आठवत नाही..... तो आवाज खोल आत रुजेपर्यंत काय ते आठवतंय... त्यानंतर बाबाने मला हात लावून, हलवून जेव्हा उठवलं तोच क्षण आठवतो आहे. डोळे उघडता क्षणी तो आवाज बटन दाबल्या सारखा बंद झाला आणि क्षणभर सगळ्या जगाची विस्मृती झाल्यासारखं झालं. डोळे उघडले त्याक्षणी माझ्यासमोर त्या दोन शिवपिंडी होत्या आणि ह्या दोन पिंडी हा मधून ओंकार स्वर निघून एकमेकांवर आपटूनएक मोठा ध्वनी तयार झाला होता असं मला वाटून गेलं.

त्यानंतर कमीत कमी पंधरा ते वीस मिनिट मी एकही शब्द बोलली नसेन. मी हातानेच थांबा अशी खूण केली, मला अजून काही वेळ तिथेच त्याच अवस्थेत बसावसं वाटत होतं किंबहुना काय करावं, उठावं, बसावं, बोलावं की अजून काही करावं.... हे ही सुचतच नव्हतं. तो आवाज बंद झाला असला तरी त्याचं असणं अजून मिटलं नव्हतं... माझ्या मेंदूचा काही भाग बधिर झाल्यासारखं वाटलं आणि थेंब-थेंब पाणी जसं हळूहळू एखाद्या भांड्यात साचत जातं तसं हळूहळू आजूबाजूचे अस्तित्व त्या बधीर झालेल्या मेंदूच्या भागात पुन्हा थेंबा थेंबा सारखं

गळू लागलं. जवळ-जवळ वीस-पंचवीस मिनिटांनंतर अंकितने माझ्याकडे फक्त पाहिलं आणि म्हणाला “लगता है तुमने ओंकार ध्वनी सुना है....... अब मुझे आपको किसी चमत्कार के बारे में बताने की जरूरत नही...” अंकित म्हणत होता तो चमत्कार कदाचित हाच असेल किंवा अजूनही काही असेल तर मला माहित नाही परंतु माझ्यासाठी ही अनुभूती मला कुठल्यातरी शून्यात नेऊन सोडणारी होती. या शुन्याबाहेर बाहेर काही काही नसावं, आणि असेल तर ते अशाश्वत आहे किंवा ते नाहीच किंवा तो भ्रम आहे आणि हे शून्य अतिशय विलक्षण असं काहीतरी आहे.. सांगण्याच्या पलीकडचं, शब्दातीत, फक्त असं आरपार छेदून जाणारं किंवा विरघळवून टाकणारं.... वेगळंच, जिथे काही उरतच नाही असं कदाचित.... इतकंच समजत होतं... त्याचं नक्की विश्लेषण मला करता येणार नाही कारण कदाचित ते माझ्या आकलनाच्या पलीकडचं होतं. मात्र ती बधिरता जाणवावी, म्हणजे त्या अवस्थेतून डोळे उघडून मी जरी बाहेर आली होती तरी ती बधिरता मला जाणवत होती इतकी बधीर मी झाले होते... अर्थात ज्या वेळी ती बधिरता कमी होऊ लागली त्यावेळी ती बधिरता आली आहे हे जाणवलं... तोवर मी कुठे होते.. काय होत होतं ...ते ही मला माहित नाही...

ज्यावेळी आम्ही ध्यानाला बसलो होतो तेव्हापासून आतापर्यंत जवळजवळ दोन तास उलटून गेले होते. अंकितची आई आमच्या जेवणाची वाट पाहात बसली असणार होती आणि म्हणून तिथून निघुन आम्ही अंकितकडे येऊन पोहोचलो. आमच्या मागोमाग ह्याच मंदिरातले पुजारी मसाले भाताचा डब्बा घेऊन आले, म्हणाले “ध्यान मे बैठने से पहले बना लिया था आपको देना भूल गया अब आपके लिए लेकर आया हु......” ते बोलताना त्यांच्या डोळ्यात एक वेगळी चमक जाणवली.. ते फक्त हसत होते, माझं गुपित समजल्यासारखे.....

हे असे अनुभव कदाचित त्या त्या जागेवरील वेगवेगळ्या शक्तींच्या प्रभावामुळे येत असतील. हा अनुभव वेगळा होता मात्र याला मिळतेजुळते असे अजून अनुभव मला येऊन गेले होते. तुम्हाला आठवत असेल तर दत्त वाड्याच्या आश्रमातून मैया किनारी मी आरतीच्या

आवाजाच्या मागेमागे गेले होते होती आणि एका दगडावर बसले होते. ध्यान लागलं की माझा जप सुरु ते काही समजलं नाही पण कुठेतरी मी हरवून गेली होती हे नक्की. त्यानंतर मला सुरेखाताई शोधत-शोधत आली होती... कुठल्यातरी वरच्या भागात लिहिलय बघा मी.. पण आजचा अनुभव वेगळा होता. साम्य होतं ते माझ्या हरवण्यात. दुसऱ्या परिक्रमेत सुद्धा गोमती संगम म्हणजे येथे गोमती आणि नर्मदा माईचा संगम होतो त्या ठिकाणी किनाऱ्यावर एक आश्रम त्या आश्रमातही मला अशापैकीच एक अनुभव आला, पण तो दुसऱ्या परिक्रमेचे अनुभव लिहिल त्यावेळी लिहिल त्याचा उल्लेख करण्याचं कारण असं की या अनुभवा मागे काहीतरी प्रचंड शक्ती असते ज्याचा प्रभाव आपल्यावर पडून आपल्याला हरवायला होतं विसरायला होतं. असं काहीतरी असावं... तेव्हा त्यावेळची मनाची अवस्था असावी किंवा एकाग्रता असावी, काय ते सांगता येत नाही मात्र विलक्षण असतं.... विलक्षण असतं अगदी... इतकंच सांगू शकेन.

आमचं जेवण झालं. नर्मदामैय्या ने माझा वाढदिवस अगदी आनंदात आणि एक वेगळा अनुभव देऊन साजरा केला आणि साधारण बाराच्या सुमाराला आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.

पुढे कुसुमखेडा, भारकच्छ, सनखेडा, सतरावन, करत करत आम्ही कीवलीला येऊन पोहोचलो... आणि त्या पुढचा मुक्काम अलीगंजला केला. या मुक्कामात अनुभव म्हणून फारसा आला नाही पण आनंद मात्र खूप मिळाला. अलिगंजला मात्र गंमत झाली...सांगते पुढच्या भागात...

# नर्मदा परिक्रमा- एक विलक्षण अनुभूती – भाग ६०

नर्मदे हर

नांदनेर होऊन पुढे निघालो आणि वाटेत अंकित ने सांगितलेलं ते मोहाच्या फुलांचं झाड लागलं. आता मात्र भीती वाटत नव्हती. त्याच झाडाखालच्या सिमेंटच्या गोल पारावर बसून दहा-पंधरा मिनिटं आराम देखील केला. पुढे निघालो तो दूर कुठून तरी नर्मदे हर हर, नर्मदे हर चा आवाज आला. आम्ही आवाजाच्या दिशेने चालू लागलो आणि नर्मदे हर असं प्रत्युत्तर देखील दिलं. हा आवाज एका झाडी मागून येत होता…आम्ही त्या झाडीच्या मागच्या बाजूला वळलो तर तिथे सुंदरशी, छोटीशी फुलबाग केलेली होती. एक पायवाट होती आणि त्या पायवाटेच्या आजूबाजूला दोन्हीकडे फुलांची झाडं लावलेली होती. एक मोठं लिंबाचं झाड होतं आणि त्या लिंबाच्या झाडाला खूप लिंबं लागली होती. त्या लिंबाच्या झाडाखाली एक खाट घातली होती. त्या खाटेवर साधारण सत्तर पंच्याहत्तर वर्षाचे आजोबा आराम करत पहुडले होते.

थोडे पुढे नजर गेली तर काटक्यांनी बनवलेली एक झोपडी होती. त्या झोपडीचं दार उघड दिसत होतं. झोपडीच्या समोर दोन तीन बकऱ्या बांधलेल्या दिसत होत्या. आतून पुन्हा नर्मदे हर असा आवाज आला. “मैया जी आओ, हम तो बैठे बैठे आपका इंतजार कर रहे थे…” एक साधारण साठीची मैया आवाज देत देतच बाहेर आली. “आज यही रुक जाना… कहा आगे जाते हो?” आम्ही जेमतेम तीन चार किलोमीटर अंतर चालून आलो असू. जेवणही नुकतच आटोपलं होतं त्यामुळे भूकही नव्हती. इतक्या लवकर थांबावं असं वाटतं ही नव्हतं. पण का कोण जाणे त्या मैयाचा आग्रह मोडवता आला नाही. मग काय आज इथेच मुक्काम केला.

आम्हाला आजींनी छान ताज्या लिंबाचं सरबत करून दिलं आणि मग गप्पाटप्पा करत बसलो तिथे.

ही दोघं मैया बाबा इथे कधी असतात तर कधी नसतात. मात्र ही काट्याकुट्याची झोपडी आणि वेगवेगळ्या फळा फुलांच्या झाडांनी या आवाराला केलेलं कंपाऊंड हे इतकं छान ठेवलं आहे इथे कोणी नसेल असं वाटतच नाही. खरंतर दुरून पाहता इथे कोणी राहत असेल अशी शंकासुद्धा येत नाही. ही दोघं गावात राहायला तयार नव्हतीत. मी विचारल्यावर म्हणालेत आम्हाला जंगलातच बरं वाटतं, शांत वाटतं. इथे कसलाही ताप नाही डोक्याला. सगळं कसं व्यवस्थित निसर्गाप्रमाणे सुरू असतं. आता मात्र मला खरोखर माझी लाज वाटू लागली होती. ही दोघं म्हातारी इथे जंगलात काट्याकुट्याचा झोपडीत निर्धास्तपणे राहत होती आणि मी मात्र त्या विटा सिमेंटच्या भिंती मध्ये असून देखील घाबरत होते. अंकितचं रागावण कसं बरोबर होतं नाही? जो खरोखर श्रद्धा ठेवून असतो त्याला काहीच कसं होत नाही हे पुन्हा एकदा मला जाणवलं आणि त्या रात्री तिथे थांबून त्या बिनधास्त पणाचा, त्या निर्धास्त पणाचा मनसोक्त अनुभव मला घेता आला. इथून पुढे मात्र भीती म्हणून वाटली नाही आणि कदाचित वाटणारही नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी तेथून लवकर निघालो. तिथल्या मैया जींनी छान पैकी खिचडीचा बाल भोग करून दिला. येथून पुढे भारकच्छ, सनखेडा, मोतलसर, बागलवाडा, सतरावन अशी गाव लागलीत आणि त्यानंतरचा मुक्काम आम्ही किवली नावाच्या गावाला केला. हा प्रवास खूपच सुंदर झाला, अगदी निसर्गाच्या सान्निध्यात. दोन्ही बाजूला शेतामधून डांबरी पण छोटासा रस्ता, अगदी घाटा सारखी नाही, पण बरीच नागमोडी वळणं घेणारा असा हा रस्ता होता. या क्षेत्रातल्या गावांमध्ये मी एक विशेष असं पाहिलं की अंगणाच्या आत मध्ये बसण्यासाठी म्हणून त्यांनी मातीचे छोटे-छोटे म्हणजे पायरी एवढे म्हणू किंवा त्यापेक्षा उंची थोडी जास्त असलेले कट्टे बांधून ठेवले होते. हे प्रत्येक घरात दिसत होते. या ठिकाणी अजून एक गोष्ट पाहिली ती अशी की आपल्याकडे कोकणा परसबाग असते तशी परसबाग ही इथल्या बहुतांश घरांना होती.



*<u>गावाबाहेर एकांतात झोपडीत राहणारे मैयाजी व बाबाजी</u>*

असंच एका ठिकाणी चालता-चालता एक मैया जी आणि तिची मुलगी आम्हाला रस्त्यात दिसले आणि त्यांनी आम्हाला थांबवून घेतलं. "हमारे घर भोजन कीजिए, असा आग्रह धरला, पण नुकतच आधीच्या गावांमध्ये भरपूर ताक प्यायलो होतो, त्यामुळे फारशी भूक नव्हती. तेव्हा ती मैया म्हणाली "हमारे बगीचे का फल आपको देती हू बहुत बहुत मीठा है". त्या फळाला ती "बिही" असं म्हणत होती. हे बिहि नेमकं काय असतं हे काय मला माहिती नव्हतं. ती म्हणाली व "बाहर से हरा होता है और अंदर से लाल होता है, बहुत मीठा होता है आपने कभी खाया नही?" माझ्या डोळ्यासमोर पपई शिवाय काही येईना. शेवटी तिने आणलेले फळ चिरून आमच्यापुढे ठेवलं तेव्हा कळलं की पेरूला या भागात बिही म्हणतात त्यातही लाल पेरू म्हणजे बिही आणि पांढरा पेरूला काहीतरी वेगळंच नाव आहे.... असो तिच्याकडे गप्पा करत करत भरपूर बिही खाल्ले आणि मग तिथून पुढे निघालो. ही भारत कच्छ येथील गोष्ट आहे.

पुढे रस्त्यातून जाताना एका माणसाने आम्हाला खुणावलं आणि शेतातून जायला सांगितलं, म्हणाला "रास्ता थोडा कच्चा है लेकिन छोटा है आप जल्दी पोहोच जाओगे". आता नेमकं कुठे जायचं हेच आम्हाला माहिती नव्हतं मात्र परिक्रमा मार्गावर लोक असे रस्ते स्वतःहून सांगत असतात. इथ एक छान अनुभव आला बरका.... आम्ही शेतातून जात असताना

एक दहा बारा वर्षाची मुलगी सायकल वर आमच्या मागे आली. शेतातली पायवाट होती त्याच्यावरून सायकल जाऊ शकत होती. आणि ती मला म्हणते कशी “मैयाजी गाव मे मत जाना, बाजुमे आश्रम है वहा जाना. चलो मै तुमको लेकर के चलती हू, आज तुमको वही पे रुकना है” तिनी जणू आज्ञा द्यावी किंवा हुकुम सोडावा असं बोलली ती. तिच्या त्या भारदस्त हुकुमाची क्षणभर भीती वाटली आणि आश्चर्यही झालं. राहण्याचं ठरवू मग, आधी जाऊन तर येऊ… म्हणून गेलो त्या आश्रमात.

खरं तर आताच थांबावं अशी काही वेळ झाली नव्हती म्हणजे दुपारचे दोन वाजले असतील जास्तीत जास्त. पण ही लहानगी मैया काही ऐकायला तयारच नाही, हट्टच करू लागली… तिचा हट्ट मान्य करण्यामागे एक अजून कारण होतं. मी तिला तिच्याबद्दल माहिती विचारली. तिथल्या सरपंचाची नात. “मला म्हणाली आप तो बहुत अच्छी हो, हिम्मतवाली भी हो, मेरी सायकल चला कर देखो… गिरना नही…. अभी सायकल चलाओ फिर आगे सायकल से आना परीकम्मा मे” मलाही जरा मजाच वाटली खूप वर्षांनी सायकल चालवायला! मी अगदी छान सायकल चालवली, नंतर ती मला म्हणते, अरे वा आपको तो डर भी नही लगता… आप तो आज इस आश्रम मे ही रहना… तिच्या बोलण्यावरून ती काहीतरी सुचवते असं वाटू लागलं होतं मला…, ती प्रत्येक वाक्य काहीतरी उद्देशांनी बोलतेय असं वाटत होतं. पुढे सहज गप्पा करता करता तिचं नाव विचारलं तर म्हणाली मेरा नाम “अंकिता”…. लडकी हू इसलिये अंकिता लडका होती तो मेरा नाम होता अंकित…. ”

मागच्याच मुक्कामाला अंकितशी माझं बोलणं झालं होतं आणि त्यांनी मला न घाबरण्याचा मंत्र दिला होता… आता ही अंकिता मला धीर देत होती, आणि अंकितनी दिलेल्या शिकवणीची आठवण ही करून देत होती. तो अंकित आणि ही अंकिता, हा योगायोगच असेल निव्वळ?

पुढे ह्या किवलीच्या आश्रमात गेलो. हा आश्रम थोडा गावा बाहेर आहे. आश्रम म्हणजे एक छोटीशी खोली, आणि त्याला बाहेर एक पडवी, त्या पडवीला एक ताडपत्रीचं दार. बाहेर बरच मोठं अंगण. इथे बोराची खूप झाड आहेत. एकंदरीत छान मोकळा चाकळा आश्रम. आश्रमात गेलो तर इथेले महाराज जी मस्त पैकी चुलीवर भाकरी शेकत होते. अगदी छांन ज्वारीच्या भाकरी.. "मराठी आहात नं तुम्ही, या मग भाकरी भाजी जेवायला" त्यांनी छान मराठीतून हाक घातली आणि खरपूस अन टम्म फुगलेल्या भाकरी आणि तर्रीदार वांग्याची भाजी पाहून "यापेक्षा सुख ते काय" असं ठरवलं आणि जेवून घेतलं.... "तुम्हाला कसं माहित आम्ही मराठी आहोत ते" मी त्या महाराजांना विचारलं ... " सांगितलं होतं मैयांनी मला, मराठी पाहुणे येणार म्हणून...म्हणून तर पीठ घेतलं भिजवायला".... मला खरंच आश्चर्य वाटलं.. मी पुन्हा विचारलं..."असं कसं सांगितलं तुम्हाला, सांगा न बाबाजी" तर बाबाजी म्हणाले, अंकिता नी तुम्हाला मागच्या गावातच पाहिलं होतं, आल्यावर मला सांगितलं की "परिक्रमावासी तुम्हारी भाषा बोलते है"...परवाच अमरावतीचे एक गृहस्थ येऊन गेले, मला आवडतात वांगे आणि ज्वारी, म्हणून घेऊन आले होते माझ्यासाठी... म्हटलं चला, इथे तुम्हाला घरच्या सारखं वाटेल...खरंच घरच्या सारखं वाटलं इथे, आणि हो, या अंकिताची कमाल वाटली बाबा....

या आश्रमात गेल्यावर रात्री मी जे पाहिलं त्यानंतर मला मी खरोखर निडर झाल्याचा पुरावा मिळाला. अंकिता आम्हाला सोडून स्वतःच्या घरी गेली. संध्याकाळची पूजा-अर्चा आटोपल्यानंतर आम्ही बाहेरच्या अंगणात आसन लावलं, तसं तिथले महंत आम्हाला म्हणाले, "माताजी आतमध्ये आसन लावा... यह जगा हमारी नही है, यहा तो रात को लडय्ये आकर बैठते है"... त्या रात्री आम्ही आणि हे लडय्ये अगदी जवळजवळ होतो. आमच्यात सहा फूटपेक्षाही कमी अंतर होतं. खोलीचे दार हे अगदी साधी ताडपत्री होती, आणि बाहेर साधारण सहा बाय आठच्या ओट्यावर जवळजवळ दहा-बारा लडय्ये रात्रभर बसून होते, आणि रात्रीला येऊन बोर खात होते.... त्याहुनही गंमत म्हणजे रात्री बाथरूमला जायला उठावं लागलं त्यावेळेला दंड घेऊन या लकडबघ्यांना तेवढ्यापुरतं बाजूला करून बाथरूमला जाऊन मी

पण आले होते मी..... मला वेळेवर भीती वाटू नये म्हणून मैयाने आधी जंगलांमधून मला बाहेर काढल, त्यानंतर भीती कशी असते ते दाखवलं, तिच्यावर मात करून कसं राहता येतं याची शिकवण अंकित कडून मला दिली, त्यानंतर भीतीवर मात करून जंगलात सुद्धा ती दोन म्हातारी माणसं कशी राहतात म्हणजे ते कसं शक्य आहे ते पटवून दिलं, अंकिता म्हणून येऊन खरोखर मला ते पटलय की नाही, समजलंय की नाही याची खात्री करून घेतली, आणि मग माझ्यासमोर या लडय्याना यांना येऊ दिलं... त्यामुळे असेल पण मला अजिबात भीती वाटली नाही.....



*मी अंकिताची सायकल चालवताना, बाजूला किवली आश्रम. इथेच या पोत्याम्मागे आम्ही रात्री झोपलो होतो आणि अंगणात लकडबग्घे रात्रभर उच्छाद घालत होते.*

पुढचा मुक्काम अलीगंजला केला... ती एक मजाच आहे. आम्ही रात्रभर जागेच होतो तिथे...जागे नाही तर भर उत्साहात नाचत होतो अगदी... आणि खरं तर खूप थकलो असतानाही, मनात नसतानाही असं झालं होतं.. जीव वैतागला होता आधी, पण इलाज नव्हता

काही, अगदी उत्साहा आनंदाने नाचण्या शिवाय.... पण कसं? असं काय झालं होतं? सांगणारे पण ६१ व्या भागात.

## नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ६१

नर्मदे हर

किवली हून साकाळी लवकर निघालो. वाटेत खाण्यासाठी किवलीच्या शंकर महाराजांनी लोणच आणि भाकरी बांधून दिल्या होत्या. इथून पुढे बराच मार्ग किनारा मार्ग होता. या टप्प्यात वाटेत फारशी गावं अशी नव्हती. कीवलीच्या शंकर महाराजांनी बांधून दिलेलं लोणचं भाकरी बाल भोगामध्येच संपलं. आता भूक लागली की मगच गावाकडे वळायचं, तोवर आपण आणि मैया. मैय्याच्या काठी छानच वाटतं कायम. खरं तर नदी किनार सोडून जायची इच्छा होत नाही. तेव्हाही किनाऱ्यावरून आत मध्ये गावात जायची इच्छा होईना. वाळूमधून चालायला तसं कठीण होऊ लागलं होतं. पण तरीही याच रस्त्याने पुढे जायची इच्छा थांबवता येत नव्हती. बराच काळ गेला होता मात्र फार अंतर कापून झालं नसावं. तरी या पट्ट्यातून दिवसभरातून आमचं फक्त पंधरा-सोळा किलोमीटर चालणं होत असे. या पट्ट्या वरचा एक अनुभव सांगते.

लोणचे भाकरी आम्ही सकाळी म्हणजे साधारण नऊ-साडेनऊला खाल्लं. त्यानंतर दीड दोन वाजता कुठल्यातरी गावात, कुठल्यातरी आश्रमात विश्रांती घेऊ असं ठरवलं होतं. तिथेच भोजन प्रसाद घेऊन मग पुन्हा किनाऱ्याला यायचं आणि पुढे जायचं असा बेत होता. पण गंमत अशी की या गावांमध्ये जायला किनारा सोडून दोन-तीन किलोमीटर आत मध्ये जावं लागायचं. म्हणजे जायचे दोन-तीन किलोमीटर, यायचे दोन-तीन, इतकं चालावं लागणार. शिवाय किनारा सोडून जायची इच्छा होईना. त्यामुळे किनाऱ्यावरच एखादा पुढचा आश्रम बघू असं ठरवून दीड वाजता पासून तर साडेतीन वाजेपर्यंत किनाऱ्यावर एखादा छान आश्रम येईल याची वाट बघत आम्ही पुढे पुढे चालत राहिलो....

आता मात्र खूप भूक लागली होती. अगदी पोटात खोल खोल खड्डे पडत होते, इथून गावही दूर आणि किनाऱ्यावर ही काही नाही अशी परिस्थिती येऊन ठेपली होती. त्यात गंमत म्हणजे कदाचित दुपारची वेळ असेल म्हणून की काय किनाऱ्यावर चिटपाखरूही दिसेना. म्हणजे कुणाला भोजन प्रसादिबद्दल विचारावं तर तेही शक्य नव्हतं. मग मात्र माझा जीव कळवळू लागला. "दुर तर दुर, जाऊया रे बाबा आपण आश्रमामध्ये गावाच्या आत" मी बाबाला विनवलं आणि त्यांनीही ते ऐकलं, पुढचं गाव लागलं की सरळ गावात जाऊ अस आमचं ठरलं... पण हे पुढचं गाव येईच ना लवकर...



शेवटी त्या मैयाला म्हटलंच मी..."किती ग परीक्षा घेशील? आता माझ्याच्याने चालवत नाहीये. डोकं दुखू लागलेलं आहे... पोटात मोठाले खड्डे पडतायत.... एकतर गाव लवकर येऊ दे नाहीतर आमच्या जेवणाची सोय कर काहीतरी"..... अर्धा तास चालत राहिलो तरीही गाव येईना... मग मी रागवले मैया वर "आज तुला जेवायला घालायचं नाहीये का? ते काही नाही पुढच्या दहा-पंधरा मिनिटात जर मला भोजन प्रसादी मिळाली नाही तर आज जेवणारच नाही मी.... " खरंतर मला असं बोलायचं नव्हतं. म्हणजे मी असं बोलेल असंही मला वाटलं नव्हतं. असं आपसूक बोलल्या जात होतं बहुधा. भुकेने जीव कळवळत होता. खालची रेती तापली होती. जोडे घालून किंवा जोडे काढूनही

तिथून चालणं कठीणच जात होतं. गंमत म्हणजे मोठं असं एखादं झाड देखील नव्हतं विश्रांती घ्यायला.. उन्हातच बसून विश्रांती घेउन ती घेतल्यासारखी ही वाटत नव्हती.. या सगळ्या परिस्थितीत निघालं हो तोंडून असं.... मुद्दाम म्हणून नाही बोलले मी...

खरं तर काय होतं माहिती आहे का, कालांतराने ती आपल्या इतकी जवळची होऊन जाते की आपण तिच्याशी बोलू लागतो. तुम्ही आम्ही जसं बोलतो ना शब्दात, एकमेकांशी, तसं तिच्याशी बोलल्या जातं. मग ती नदी, मैया, देवी अशी उरत नाही...आईच असते फक्त आणि मग रुसवे-फुगवे, लाडावून हट्ट करणं हे सगळे आपण करू लागतो. तसंच झालं हो माझं पण.... बोलूनच गेले मी.... पण गंमत माहिती का काय झालं ते.. मी रुसले आणि दहा मिनिटात जेवायला मिळालं नाही तर मी आज जेवणारच नाही" असं म्हणाले खरे आणि तिनेही पुरवले की माझे लाड.... नाही नाही मी कुठल्याही गावात गेले नाही. मात्र मी तसं बोलण्याच्या अवघ्या दहा-बारा मिनिटात मला एक बोराचे झाड लागलं, त्या मोठ्या बोराच्या झाडाखाली बोरांचा इतका सडा होता, की पाय ठेवायचा तरी बोरं बाजूला करून पाया ठेवावे लागणार होते. मी अगदी मांडी घालून खाली बसले आणि चांगली लाल चुटूक, टपोरी बोरं माझ्या ओढणी वर जमा केली. कमीत कमी तीनशे तरी बोरं मी खाल्ली असावी तेव्हा... इतकी मधुर बरं होतीत म्हणून सांगू!आजचं सकाळचं जेवण असं गोड गोड बोरांनी झालं. आयुष्यात पहिल्यांदाच इतकी बोरं मी एकत्र बघितली असतील, आणि आयुष्यात पहिल्यांदाच इतकी बोर मी एका वेळी खाल्ली देखील असतील.... खातांना तर बोर खाऊन घेतली, पण सर्दी-खोकला व्हायला नको अशी प्रार्थना मैयाला केली आणि ती ही तिने ऐकली...

करत करत आम्ही अलीगंज नावाच्या गावाला येऊन पोहोचलो. इथला किनारा फार फार सुंदर आहे. मैयाचं भरपूर मोठं पात्र सुकलेलं असल्यामुळे वाळवंट असल्यासारखं दिसत होतं.... असं असलं तरी बरंच मोठं पात्र पाण्याने भरलेलं सुद्धा होतं.

एखादा टेबल टॉप बीच असावा असं वाटत होतं. इथे वाळूत बसून राहून मैयाच्या पाण्यात पडणारे संध्याकाळच्या आभाळाचे रंग बघत बसावसं वाटलं नाही तर नवल. निळा, जांभळा, नारिंगी, त्यांचे प्रतिबिंब मैयाच्या पाण्यात पडत होतं. मी आणि बाबा बराच वेळ तिथे फक्त बसून राहिलो. पाठीमागेच आश्रम दिसत असल्यामुळे आश्रमात जाण्याची घाई आम्ही केलीच नाही. ज्यावेळी अगदी अंधार पडायला लागला त्यावेळी स्नान, आरती आणि पूजा तिथेच करून मगच आम्ही आश्रमात गेलो.



मागच्या भागात तुम्हाला जे उत्साहाने आणि आनंदाने नाचण याबद्दल सांगत होते ना, ते इथलच बरंका, अलीगंज चं. इथे आल्यानंतर खूप छान भोजन प्रसादी झाली. इथले महंत स्वतः स्वयंपाक करुन सगळ्यांना स्वतःच्या हाताने जेवायला वाढतात. एकंदर आश्रम मोठा आणि मोकळा चाकळा आहे. इथे अखंड रामायण सुरू असतं. आम्ही गेलो तेव्हाही सुरू होतं. “आसन कहा लगा सकते है” विचारल्यानंतर मात्र खऱ्या गमतीला सुरुवात झाली.

जिथे अखंड रामायण सुरू होतं त्याच हॉलमध्ये, मंदिराच्या समोर आसन लावा असं आम्हाला सांगितलं. आता जेमतेम आठ साडेआठ झाले होते. या हॉलमध्ये एकही लाईट नव्हता. जनरेटर वर फक्त

देवापुढचे दिवे, माईक आणि स्पीकर्स चालू होते आणि हे स्पीकर आम्ही जिथे आसन लावलं आहे तिथेच आमच्या डोक्यावर बसवलेलं होतं. काही वेळानंतर रामायण कितीही गोड असलं तरी आम्हाला झोप लागणं अशक्य व्हायला लागलं. थोड्यावेळाने आपोआप झोप लागेल असं वाटलं परंतु तसं होईना कारण रामायण वाचणाऱ्याची ड्युटी बदली रामायण वाचायची की त्या वाचणाऱ्याचं वाद्य देखील बदलायचं. रात्री दहा साडेदहाला रामायण वाचायला येणाऱ्या माणसाजवळ एक मोठा ढोलक होता. हा ढोलक हा माणूस इतक्या जोरात वाजवत होता, की तिथे आलेले परिक्रमावासी सोडाच पण स्वतःची स्तुती आणि चरित्र ऐकता ऐकता जर एखादी लहानशी डुलकी जरी प्रभू रामचंद्रांना आली असेल तर ते देखील घाबरून, दचकून, खडबडून जागे व्हावे कदाचित हाच त्या माणसाचा हेतू असावा.

थोडावेळ ते देखील सहन केलं मात्र मग खरोखर डोकं दुखू लागलं. दिवसभराचं साधारण तीस बत्तीस किलोमीटर चालून झालं असेल. सकाळी बोरांच जेवण झालं आणि रात्री भरपूर छानशी जेवण प्रसादी झाली, त्यानंतर आराम मिळणं आणि झोप येण स्वाभाविक नाहीये का? बाबाला आता वैताग येऊ लागला. त्याने जाऊन "आपण फक्त स्पीकर बंद करावा" अशी विनंती केली. पण तिथला वाचणारा काही स्पीकर बंद करायला तयार होईना. मठाचे महंत आपल्या खोलीत गाढ झोपले असावेत कारण बाबाने दोन-तीनदा दार वाजवूनही ते उठले नाहीत. झोप तर पार उडून गेली होती मात्र निदान माईक थांबला तर डोकं दुखायचं थांबेल असं वाटू लागलं. पण ते काही शक्य होईना. तास-दोन तास तेही सहन केल्यानंतर, मी आणि बाबा त्या हॉल पासून बरंच दूरपर्यंत असलेल्या एका शेड खाली येऊन बसलो. मात्र या आश्रमातलाच काय तर या गावातला सुद्धा एकही माणूस रात्रभर, एकही मिनिट झोपता कामा नये अशा पद्धतीने बारा ते चौदा स्पीकर्स या आश्रमात लावलेले होते. त्यामुळे आता आम्हाला डोकं दुखवून घेण्यापलीकडे काहीही मार्ग उरला नव्हता.

बाबा पुन्हा एकदा त्यांच्याशी बोलून घेतो म्हणून गेला, आणि आमच्या डोक्यावरचा स्पीकर वाजयचा थांबला. वाटलं चला निदान येथे थोडा वेळ तरी डोळा लागू शकेल. पण बाबा आल्या आल्या लगेच स्पिकर पुन्हा सुरू झाला. मी बाबाला विचारलं काय म्हणाले ते, “बाबा म्हणाला ते ऐकतच नव्हते मग मी स्पीकर्सच्या बटनांच्या बोर्ड पाशी जाऊन स्पीकर्स बंद करून पाहिले, आणि स्पीकर बंद करून मी परत आलो” त्या बाबांच्या ते लक्षात आलं असावं म्हणुन बाबा इथे पोहोचायच्या आतच त्यांनी पुन्हा स्पीकर चालू केले आणि आता मात्र काहीही इलाज नाही हे आम्ही समजून चुकलो.

आता साधारण तीन झाले असतील रात्रीचे, म्हणजे दोन अडीच तासात उठून तयारीला लागायचं होतं. आता झोप लागणार नव्हती आणि कदाचित येणारही नव्हती वेळ टळून गेली होती. तेवढ्यात गावातल्या काही बायका आश्रमात आल्या. त्यांनी हॉल बाहेर शेकोटी पेटवली. आता रामनाम सुरू झालं. त्या रामनामाच्या तालावर ह्या माताजींचे पाय देखील थिरकू लागले. या पंधरा वीस बायका मोठ्या उत्साहाने रामनामच्या तालावर नाचू लागल्या. त्यावेळी मात्र त्यांचा तो भाव पाहून आपल्याला मुद्दामच जागं ठेवण्यात आलं असावं असं वाटलं. आम्ही तिथून उठून ह्या फेर धरून नाचणाऱ्या बायकांच्या घोळक्या पुढे जाऊन त्यांचा नाच बघत बसलो, आणि कधी उठून त्यांच्यात सामील झालो ते सुद्धा आम्हाला कळलं नाही. सीताराम सीताराम सीताराम सीताराम, जय श्रीराम जय श्रीराम जय श्रीराम जय श्रीराम,च्या तालावर नाचता नाचता अंगातला थकवा, डोकेदुखी, मरगळ कधी निघून गेली कळलच नाही.

सकाळी सहा वाजेपर्यंत हे राम नाम आणि त्याच्या तालावर आमचं सगळ्यांचं फेर धरून नाचणं, टाळ मृदुंग वाजवणे हे सुरू होतं. सकाळी सहा वाजता आरती झाली त्याच्यानंतर काळा चहा झाला. आम्ही सामान आवरलं आणि पुन्हा पुढचे तीस किलोमीट म्हणजे चौरसपर्यंत पायी गेलो. अगदी एकही मिनिट डोळा न लागता देखील दुसऱ्या दिवशीचा पूर्ण प्रवास जराही न थकता, कंटाळता पूर्ण झाला. आमची आदल्या रात्री एक मिनिटही झोप झाली

नसेल असं जाणवलं सुद्धा नाही. आपण फक्त आदली रात्र म्हणतो आहे मात्र नीट विचार केला तर कालचा पूर्ण दिवस, कालची पूर्ण रात्र आणि आजचा पूर्ण दिवस असे जवळजवळ तीस तास आम्ही झोपलेलो नव्हतो.

या तीस तासात आमच्याकडून तीन तासाचं आनंदाने आणि उत्साहाने नाचण, आणि 60 किलोमीटरचा पायी प्रवास करून झाला होता. कुठून येते ही शक्ती? असं तीस तास न झोपता इतकी शारीरिक अंगमेहनत करण्याची क्षमता खरंच माझ्यात आहे का? नक्कीच नाही.... ते अखंड रामायण माईकवर इतक्या जोरात चालू असण्याचं कारणच मुळी त्या रामनामाच्या तालाच्या गोडव्याची ताकत आम्हाला जाणवून देणं हे असावं नाही का?

पुढे बोरास, चौरास, आणि अनघोराला जे प्रेम मिळालं ते शब्दातीत आहे. हे प्रेम काही उगाच मिळत नाही. मैयाच कुणाच्या तरी रुपात येते आणि आनंदाची ओटी भरून जाते. जयहिंद भाई आणि उन्मेशानंद महाराज यांच्या रुपात मला मैयांनी जे दिलय ते मिळण्यासाठी भाग्य लागत' हेच खरं. आणि हो, उन्मेशांन्दाकडे आम्ही आसन लावलं ती जागा कशी होती माहितीय? तिथेच मैया नी माझ्याकडून तिची सेवा पण करवून घेतली...हक्कानी करवून घ्यावी तशी.. आणि हो... मस्त भरपूर आराम आणि अतिशय मधुर असा खाऊ पण मिळाला... कुणीही परिक्रमेत हा खाऊ खाल्लाच नाहीये.. कधीच.... असा खाऊ खाल्ला आम्ही..... सांगणारे, पण पुढच्या म्हणजे ६२ व्या भागात

# नर्मदा परिक्रमा – एक विलक्षण अनुभूती- भाग ६३

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला अनघोरा या जागेबद्दल सांगत होते. या जागेची आकृती समोर निमुळती आणि मागे उंचावर त्रिकोणाकार आहे. इथे या टेकडीला माती खोदून केलेल्या छोट्या पायऱ्या आहेत. रमणीय ठिकाण आहे हे. मागच्या भागात मी असं सांगितलं होतं की या जागेला एक रहस्य आहे, ते आता इथून पुढे सांगते. आम्ही अगदी बोरासला होतो तेव्हापासून उन्मेशानंद यांच्याशी फोनवर बोलणं सुरू होतं. आम्ही जितकं त्यांना भेटायला उत्सुक होतो तितकच ते देखील आम्हाला भेटायला उत्सुक होते. आम्ही इथे पोहोचण्याआधीच आम्ही इथेच राहावं हा निर्णय त्यांनी त्यांच्याकडून घेतलाच होता. खरंतर सकाळी चोरास होऊन निघाल्यावर दोनच तासात अनघोरा इथे आम्ही पोचलो होतो. त्यामुळे भोजन प्रसादी घेऊन पुढे निघायचं असा एक विचार मनात येत होता. मात्र जसजसं हे स्थान नजरेच्या टप्प्यात येऊ लागलं तसतसं या स्थानाबद्दल काहीतरी विशेष जाणवू लागलं हे नक्की. हे स्थान एकदम असं नजरेसमोर दिसत नाही. इथे नर्मदा मैया ने वळण घेतलेलं आहे. त्यामुळे थोडं वळल्या नंतर दूर उंचावर भगवे झेंडे दिसलेत. तरीही इथवर पोहोचायला अजून किमान अर्धा तास तरी लागणार होता. इथे वळणा अलीकडे बराचसा खडकाळ मार्ग आहे. थोडा विश्राम म्हणून आम्ही इथे थांबलो तेव्हाचा अनुभव सांगते. खरं तर या अनुभावा नंतरच या स्थानाकडे विशेष म्हणून लक्ष गेलं. जरी हे स्थान समोर दिसत होतं तरी ते बरच लांब होतं. उंचावर असल्यामुळे आणि मैया ने वळण घेतलं असल्यामुळे ते पलीकडच्या तटावर आहे की काय असा भास होत होता. अर्थात आपल्याला जायचं आहे ते स्थान हे नसून, हे स्थान दुसऱ्या तीरावर आहे असाच आमचा समज झाल्याने त्या आकर्षणाकडे सुरवातीला मी फारसं लक्ष दिलं नाही, मात्र आम्ही



ज्या दगडाळ भागात बसलो होतो त्या दगडातून हलके हलके कंपन जाणवू लागले तेव्हा जरा नीट लक्ष दिलं तर कुठून तरी अगदी हळू पण तीव्र स्वराचा घंटा नाद येतोय हे जाणवू लागलं आणि त्या घंटा नादाच्या संपता संपता मी बसले तो खडक किंचित थरथरतोय की काय असा भास झाला. हा घंटा नाद उंचावरून येणाऱ्या या देवळातून येत होता. शेतातून वाट काढत काढत आणि वळण पार करत जेव्हा आम्ही पुढे सरकलो तेव्हा हे स्थान पलीकडच्या तीरावर नसून इकडेच आहे आणि आपल्याला इथेच जायचं आहे हे समजलं. या स्थानाच्या खालपर्यंत आम्ही पोचलो. इथे मैय्याच्या वाळूतून पुढे उंच निघालेली लालसर मातीची एक छोटीशी टेकडी आहे त्यावर हे स्थान. आम्ही अजून स्थानावर पोहोचलो नव्हतो तरीही खाली सुद्धा आम्हाला या स्थानाची विशेष अशी कंपन जाणवत होती. आम्ही पोहोचलो त्या वेळेला इथला भाग हा जास्तच सोनेरी वाटू लागला होता. सूर्य महाराजांनी आपल्या कनक रश्मी कदाचित इथे थोड्या जास्त वेळ रेंगाळू दिल्या असतील.

या छोट्याशा टेकडीच्या डाव्या बाजूला मातीत खणून तयार केलेला एक जिना होता तो चढून आम्ही वर गेलो. आमच्या स्वागतासाठी महाराज उभेच होते. नर्मदे हर झालं आणि पहिलेच वाक्य ते बोलले ते असं. "ताई सामान वगैरे ठेवा इथे आज काही तुम्हाला जायचं नाहीये".. त्यांचं ते हक्काने सांगणं इतकं प्रेमाचं होतं की थांबण्या शिवाय पर्याय नव्हता. भोजन प्रसादी आटोपली आणि सत्संगाला सुरुवात झाली तेव्हा या जागेचे रहस्य समजलं. ते रहस्य सांगण्याआधी या महाराजांचं इथे येणं कसं झालं ते सांगते. हे महाराज अगदी तरुण. पस्तिशीच्या आतले. तसे व्यवसायाने वकील होते आधी. मात्र ह्या वकिली पेशात कराव्या लागणाऱ्या खऱ्या-खोट्या व्यवहारांना कंटाळून ते भ्रमंतीला निघाले. बरंच फिरल्यानंतर

कधीतरी या जागी आले आणि त्यांना या जागी विशिष्ट काहीतरी आकर्षण जाणवलं. काहीतरी दृष्टांत झाला आणि त्यांनी इथेच राहायचं ठरवलं. इथेच एका छोट्याश्या गुहेत तब्बल तीन वर्ष तपस्या केली. गावातले गावकरी शंका घेऊ लागले. गावकऱ्यांना वाटायचं हा तरुण संन्यासी इथे काहीतरी खोदकाम करतोय आणि याला काहीतरी खजाना सापडला आहे, म्हणून तो इथेच राहण्याचा आग्रह धरतोय, आणि म्हणून ते बराच त्रास देखील द्यायचेत. मात्र स्वामींचा आशीर्वाद आणि मनोबल यावर ही तपस्या पूर्ण झाली असता अचानक स्वामी समर्थ उन्मेशानंद महाराजांच्या स्वप्नात आलेत. "या छोट्याशा टेकडीवर हनुमानाच्या रूपात माझी स्थापना कर" असा आदेश दिला. त्रास देणारे गावकरी देखील बदलले आणि आता महाराजांच्या मदतीला आणि मारुतीच्या दर्शनाला पूजेला, येऊ लागले. एक दिवस अचानक "इथे गोशाला करावी" असाही स्वामींचा आदेश झाला आणि स्वामींच्या आदेशाप्रमाणे गोशाला ही तयार झाली. "इथे परिक्रमावासी यांची सेवा झाली पाहिजे, तपस्या झाली ती पुरे झाली आता सेवाच कर", असा पुन्हा एकदा स्वामी समर्थांचा आदेश झाला आणि मग उन्मेशानंद हे संपूर्णपणे नर्मदापरिक्रमा वासियांची सेवा करू लागले. महत्वाची गोष्ट अशी की या टेकडीच्या आजूबाजूला देखील अनेक छोट्या मोठ्या टेकड्या आहेत जिथे अनेक वेळा अनेक आश्रम तयार झाले आणि अनेक वादांमध्ये आपसातल्या भांडणांमध्ये लयीला सुद्धा गेलेत. अनेकांनी उन्मेशानंदाना त्रास देऊन ही जागा बळकावण्याचा देखील प्रयत्न केला मात्र स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने तयार झालेल्या या आश्रमाला आपल्या जागेवरून कुणीही हलवू देखील शकलं नाही. स्वामी समर्थांच्या आशीर्वादाची प्रचंड कंपन इथे जाणवतात. ज्या गुहेमध्ये उन्मेशानंद महाराजांनी तपस्या केली त्या गुहेत आजही स्वामींच्या पूजा अर्चा नियमित पणे सुरु असते. त्याच गुहेच्या वरच्या अंगाला आता एक छान स्वयंपाक घर तयार केलय. स्वामी समर्थांचा आणि अन्नपूर्णेचा आशीर्वाद असल्यासारखं हे स्वयंपाक घर! इथे कधीही कशाचीही उणीव जाणवत नाही, आणि हे मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी बघितलेलं आहे. संपूर्ण परिक्रमेत कधीही आणि कुणीही खाल्ला नसेल असा खाऊ आम्हाला इथे मिळाला, आणि हा खाऊ तयार

करण्यासाठीची एकही गोष्ट आश्रमात नसताना देखील हा खाऊ तयार झाला आणि आम्ही पोटभर खाल्ला देखील.... इतकंच कशाला? मैयांनी माझ्याकडूनच हा खाऊ तयार करवून घेतला. तुमची उत्सुकता फार शिगेला लावतेय का मी? सांगते. मी न्यूट्रिशन मध्ये पीएचडी केलय म्हटल्यानंतर महाराजांच्या मनातले अनेक विचार बाहेर आलेत. तिथल्या आदिवासींसाठी काही तरी करण्याची तळमळ ते मला सांगू लागलेत. निदान त्यांच्या पोषण आहाराबद्दल विशेषत:, लहान मुलींबद्दल काही करता येईल का असा प्रश्न जेव्हा त्यांनी माझ्यापुढे मांडला तेव्हा मी त्यांना अनेक पाककृती सांगितल्या. "त्यातल्या काही पाककृति तुम्ही मला शिकवाल का"? असं म्हटल्यानंतर ह्या खाऊची वेळ आली बरं का!इथे तयार होणाऱ्या काही वनस्पतीं पैकी मोहाची फुलं ही सहज मिळणारी आणि अतिशय पौष्टिक असे मी महाराजांना सांगितलं. मोहाची काय काय पदार्थ तयार करू शकता येतील यावर विचार करताना मोहाची खीर, मोहाचे साधे लाडू आणि मोहाचे तीळ घातलेले लाडू असे तीन प्रकार मी त्यांना सुचवले. "तू तर जाशील ताई, मग मी हे कुठून शिकू? त्यामुळे तू काही जाऊ नको आणि हे पदार्थ मला शिकव" अशी गळ च् घातली महाराजांनी.... आश्रमात मोहाची फुलं नव्हती, गूळही नव्हता आणि तीळ देखील नव्हते. खरं सांगायचं तर त्या दिवशी दूध देखील नव्हतं. "तू फक्त थांब ताई आपण उद्या सगळं करूयात", असं म्हणत महाराजांनी मला थांबूनच घेतलं... उद्या कशाला ताबडतोब दुधाची व्यवस्था झाली, मोहाची भरपूर म्हणजे ५ किलो तरी नक्की असतील, आश्रमात येऊन पडलीत, चांगले चार किलो तीळ देखील आश्रमात कोणीतरी आणून दिले. आणि हे सगळं अगदी लगोलग. म्हणजे आता फक्त करणं तेवढं काय ते शिल्लक राहिलं होतं. नुकतीच संक्रांत होऊन गेली असल्यामुळे तिळाचे लाडू हा एक महत्वाचा भाग होता. महाराजांना गेल्या काही दिवसांपासून अशक्तपणा जाणवत असल्यामुळे महाराजांसाठी खास शेंगदाणे आणि मोह घातलेले लाडू तयार करायचं मी ठरवलं होतं. आणि खीर तर करायचीच होती, मग काय लागले मी कामाला. ज्या स्वयंपाक घरात महाराजांशिवाय कोणीच जात नाही ते अख्खं स्वयंपाक घर माझ्या ताब्यात दिलं महाराजांनी. इतकंच नाही तर



“तू सांग ताई तुला काय हवंय” असं म्हणत अगदी लहान भावासारखे मला हवं त्या वस्तू काढून देऊ लागले... चार किलो तिळाचे आणि मोहाचे लाडु, मोह दाणे आणि गुळ यांचे लाडू शिवाय दूध आटवून आटवून घट्टशी तयार केलेली खीर, हे सगळे प्रकार होईस्तोवर संध्याकाळ झाली. आता मुक्कामाला आलेल्या परिक्रमावासी यांची भोजन प्रसादी करायची, तीसुद्धा माझ्या हातची झाली.



*अनाघोराचे उन्मेषानंद महाराज, माझा नर्मदा भाऊ*

त्या रात्रीला कोल्हापूर, पंढरपूर, पुणे असे मिळून जवळजवळ तेरा एक परिक्रमावासी असू आम्ही. खड्या आवाजातली हनुमानाची आरती, हनुमान चालीसा आणि अखंड हरिपाठ यांच्या आवाजात आधीच पवित्र असलेल्या ते स्थान एखाद्या तेजोमय ताऱ्यासारखं पावित्र्याच्या कंपनांनी लखलखू लागलं. या सगळ्यांमध्ये मी एकटीच माताराम. मग सगळी पुरुष मंडळी जेवायला बसलेली आणि मी वाढायला हातात घेतलेलं. मी आणि महाराज आम्ही दोघं मागवून बसलोत. मात्र या सगळ्यांची भोजन प्रसादी झाल्यानंतर महाराजांनी आधी मला ताटावर

बसवलं, मला हवं नको ते बघितलं आणि माझं भोजन प्रसादी जेवून होईस्तोवर ते जेवायला बसले नाहीत. या सगळ्या दिवसभरात महाराजांनी मला कितीदा तरी म्हटलं असेल, “ताई असं एक दिवस राहून चालणार नाही हं! माहेरपणाला कधी येणार आहेस? आज तुझ्याकडून खूप काम करून घेतलं, आता आराम करायला ये काही दिवस परिक्रमा झाल्यानंतर”! माझं अजून तरी जाणं झालं नाहीये पण तो गोडवा.... खाऊचा आणि प्रेमाचा, आणि हो महाराजांच्या रूपात मिळालेल्या भावाचा, तो मात्र अमिट आहे हे नक्की. अरे हो एक राहीलच की सांगायचं... इथे मी एकटी माताराम आणि बाकी सगळे पुरुष मंडळी, ही पुरुष मंडळी वर बांधलेल्या खोलीवजा जागेत आणि अंगणात अशी आसन लावून झोपलेत. खरं तर आम्ही परिक्रमावासी. तेव्हा आम्ही ही तिथेच आसन लावण्याच्या तयारीत होतो. पण उन्मेशानंद माराजान्नी मला अचानक बोलावून घेतलं. “ताई इकडून मागून उतरून या खोलीत ये” असं म्हणाले. मी खोलीत गेले तो सुबक अशी स्वामींची मूर्ती तिथे होती, मी त्या मूर्तीकडे बघत असताना अचानक महाराज म्हणाले, “ तुमचं आसन तुम्ही वर नका लावू, इथे लावा महाराजांच्या समोर”...अन मला बाबाला स्वामी समर्थांच्या मूर्तीच्या समोर म्हणजेच जिथे उन्मेशानंद महाराजांनी तपस्या केली त्या खोलीमध्ये आसन लावायची संधी मिळाली. दुसऱ्या दिवशी महाराजांनी स्वतःच्या हाताने भोजन प्रसादी करून जेवू घातलं. तळहाताच्या फोडासारखं माहेरवाशिणीला जपणाऱ्या भावाची, आणि अंगणभर, घरभर हवं तसं बागडणाऱ्या बहिणीच्या माहेराची भेट माझ्या पदरात घातली. अनघोरा मधले हे दिवस कसे गेले काही समजलंच नाही.... भरभरुन द्यायचं म्हटलं की देव काय काय अन किती किती देईल काही सांगता यायचं नाही बघा.... दुसऱ्या दिवशी इथून जेव्हा पुढे जायला निघालो तेव्हा महाराज आमच्यासोबत काही अंतर पायी चालत आले आणि त्या वेळेला इथल्या जागेच्या त्रिकोण आकाराबद्दल त्यांनी जे दाखवलं त्यातून इथल्या जागेच्या रहस्याच्या शेवटच्या भागाचा उलगडा झाला.

*मी मोहाची खीर करताना*



ही जागा नुसतीच त्रीकोणाकार नसून हिच्यात दुरून पाहिल्यानंतर गोमुखाच दर्शन होतं. कदाचित म्हणूनच इथे गोशाला करावी असा स्वामी समर्थांचा आदेश देखील महाराजांना झाला. महाराजांची तपस्या, स्वामी समर्थांचा आशीर्वाद, गोमुखा कार जागा गोशाला, नर्मदामैया, महाराजांनी नर्मदामैया मधील छोटे-छोटे दगडं गोळा करून त्यापासून स्वतःच्या हाताने बनवलेली शिवमुर्ती, हे असं इतकं भरभरून असल्यावर तिथल्या कंपन्यांमध्ये त्याची जाणीव होणार नाही असं कसं होईल? अन्घोरा गुरसी बरमान करत आम्ही रमपुराला आलो, मात्र बरमानचे आजोबा, गुरसीचं देऊळ आणि रमपुराला आलेला अनुभव हे मी पुढच्या भागात सांगणारे.



# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६४

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला अनघोरा आणि तिथल्या वेगवेगळ्या अनुभवांबद्दल सांगितलं होतं. इथून पुढे हिरापूर झिरी गुरसी असं करत करत आम्ही रमपुराला पोहोचलो. अनघोरा ते हिरापूर रस्ता अगदी रमणीय आहे. या रस्त्यात वाटेत प्रत्येक विश्रांतीला ताक मिळालं. हिरापूरला राजराजेश्वरी मंदिर आहे. हे मंदिर अत्यंत सुंदर आहे. इथेच आसन लावायचं ठरवलं. त्याप्रमाणे मंदिरात गेलो. तिथे काही विद्यार्थी वेद पठण करताना दिसले. इथे आसन कुठे लावता येईल असं विचारल्यावर एक अतिशय अस्वच्छ पडवी तिथल्या मुलांनी दाखवली. मंदिरात कार्यक्रम असल्याकारणाने इथे खोल्या किंवा सभामंडपात आसन लावता येणार नाही असं व्यवस्थापकांनी सांगितलं. याशिवाय भोजन प्रसादीची व्यवस्था देखील आज होऊ शकत नाही शिधा मिळेल असं सांगितलं. लाकडं सुद्धा जमा करून आणावी लागतील हे सांगितल्यावर मात्र येथे भोजन प्रसादी तयार करायला बराच वेळ लागेल हे लक्षात आलं. शिवाय दाखवलेली पडवी स्वच्छ करून घेणे हे काम सुद्धा मोठं होतं. तिथे जेवणाच्या उष्ट्या पत्रावळीं पासून तर कडबा चाऱ्यापर्यंत अनेक वस्तू अस्ताव्यस्त पसरलेल्या होत्या. आम्ही तिथे न राहता अजून कुठे व्यवस्था होऊ शकेल का अशी विचारणा केल्यावर, तिथला एक मुलगा आम्हाला एका जुन्या धर्मशाळेत घेऊन गेला. धर्मशाळा म्हटल्यानंतर तिथे निदान आसन लावायला व्यवस्थित जागा असेल असं वाटलं होतं. मात्र तिथे गेल्यावर वेगळेच चित्र नजरेस पडलं. ती धर्मशाळा पडकी आणि बंद होती. धर्मशाळेच्या आजुबाजूला काही अर्धवट बांधलेल्या बिल्डिंग होत्या. त्या भागात एकही विजेचा दिवा नव्हता. जवळपास पाण्याची हापशी किंवा तत्सम सोय नव्हती. धर्मशाळेच्या सगळ्या खोल्या बंद होत्या. आणि समोरची गॅलरी

किंवा कॉरिडॉर फक्त उघडा होता. खरं तर एक रात्र फक्त काढायची असल्यामुळे आम्हाला तेही चालू शकणार होतं, मात्र ज्या वेळेला त्या पायऱ्यांवर बसून सहज म्हणुन वर लक्ष गेलं त्यावेळेला त्या कॉरिडॉरच्या छतावर वटवाघळाचे थवे लटकलेले पाहिल्यानंतर तिथे देखील राहू नये असंच आमचं मत झालं.

आता अंधार पडत आला होता. आता गावातल्या एखाद्या झाडाखाली एखाद्या ओट्यावर आसन लावण्या शिवाय पर्याय दिसत नव्हता. किंवा मैया किनारी घाटावर आसन लावावं लागणार होतं. तोपर्यंत स्नानादी आटोपून घाटावरच जाऊन आरती पूजा करून घ्यावी असा विचार केला. भोजन प्रसादीचं बघू काहीतरी. असा विचार करून आम्ही मैया किनारी जाऊन पूजा आरती करू लागलो. आमची शेवटची आरती सुरू असताना तिथे एक आठ दहा वर्षाची मुलगी आली. आणि आम्हाला पैसे मागू लागली. आमच्याजवळ 10च्या नोटा शिल्लक होत्या त्यातली एक नोट काढून तिच्या हातावर देताच ती चटकन म्हणाली, "तुम्हारा गोत्र कोनसा है?" एवढ्याश्या या मुलीला गोत्र वगैरे कळतात तर, असं वाटून मी तिला विचारलं, "क्यू गोत्र सुनकर क्या करोगी?" ती म्हणाली, "सगोत्री के घर आपकी व्यवस्था हो जायेगी गोत्र तो बताओ". "भारद्वाज" मी उत्तर दिलं.... माझं उत्तर ऐकून ती लगेच म्हणाली "दुसरे चौराहे मे सीधे हात को जाना पाचवा घर भारद्वाज जी का है उनके घर तुम्हारी व्यवस्था हो जायेगी. "

या छोट्याशा मुलीच्या बोलण्यावर आपली व्यवस्था कशी होईल असाच विचार आम्ही करत होतो तरीही का कोण जाणे आम्ही गावाच्या दिशेने निघालो. ज्या चौकातून आम्हाला उजव्या हाताला जायचं होतं तिथेच दोन-तीन गावकऱ्यांनी आम्हाला अडवलं. त्यातला एक म्हणाला "आप हमारे घर चलो, " मी आणि बाबा एकमेकांकडे बघू लागलो, त्यावर तो म्हणाला "ऐसे क्यू देख रहे हो? हम अच्छे समाज से है, छोटी जाती के नही है, भारद्वाज गोत्र के है, पंडित है.... अभी अभी किसी ने बताया के कोई पंडित परिक्रमावासी मैया किनारे पूजा कर रहे है इसलिये आपको धुंडते धुंडते वही आ रहा था. !"

"किसने बताया आपको?" मी विचारलं.. "गाव के बच्चे बताने आये थे…" भारद्वाज जी म्हणाले… "उन्हे किसने बताया हम पंडित समाज के है?" मी पुन्हा विचारलं… तर "मंदिर के के बच्चों ने आपके बारे मे बताया था बाकी मुझे नही मालूम" असं उत्तर भारद्वाज यांनी दिलं….. त्यांच्या घरी आमची अगत्यपूर्वक व्यवस्था झाली. ती लहान मुलगी मात्र पुन्हा दिसली नाही. भारद्वाज जीशी बोलल्यानंतर ते म्हणाले "येतो देवी राजराजेश्वरी या नर्मदामैया दोनो मे से एक होगी". तिथून निघून आम्ही बरमान इथे आलो.

हा रस्ता लांबच लांब रस्ता आहे. इथे छान मार्केट आहे. या मार्केटमध्ये आम्हाला एक आजोबा भेटलेत. ते आम्हाला खूप आग्रह करून त्यांच्या घरी घेऊन गेलेत. तिथे गेल्यावर त्यांच्याबद्दल जे त्यांनी सांगितलं ते ऐकून आश्चर्य आणि कमाल दोन्ही वाटलं. या आजोबांना चार मुलं होती. त्यातली तीनही मुलं वयाच्या 39 व्या वर्षी अचानक वारलीत. त्यातल्या दोघांना मूलबाळ नव्हती, आणि एका मुलाला एकच मुलगी आहे. चौथ्या मुलांनी लग्न केलेलं नाही. आता ह्या आजोबांकडे जगण्याचं कारण म्हणून फक्त त्यांची नात आहे, ती नऊ वर्षांची आहे आणि अत्यंत हुशार आहे. ह्या नऊ वर्षांच्या मुलीने ज्याप्रकारे आमच्याशी संवाद साधला त्यावरून हे मुलगी नक्कीच कुठलीतरी पुण्यात्मा किंवा दिव्यशक्ती असलेली आहे असं कुणीही म्हणेल. सांगते….

तिच्या आजोबांनी तिला आम्हाला नमस्कार करायला सांगितला तसा तिने आम्हाला नमस्कार केला मात्र लगेच "अब मेरे पैर पडो, मै तो कन्या हू ना" असं म्हणून आम्हाला नमस्कार करायला लावला. नमस्कार केल्यावर आमच्या डोक्यावर हात ठेवून तिने "आपकी परिक्रमा सफल पूर्ण होगी, वीना विघ्न पूर्ण होगी, और आपको इसके बाद भी परिक्रमा करनेका अवसर मिलेगा असा पूर्ण आशीर्वाद दिला… कोणीही काहीही नं सांगता ती असं बोलली. त्यानंतर तिने आमच्यासाठी काळा चहा करून आणला. आम्ही चहा पीत असताना तिने नर्मदा पुराणातील काही श्लोक आम्हाला म्हणून दाखवले, त्यांचे अर्थ देखील सांगितले. बरमान

घाटाचं महत्व स्वतःच्या शब्दात सांगितलं. ब्रम्हाने कशी तपस्या केली इथपासून तर ब्रम्हांड पासून तयार झालेला अपभ्रंश बरमान हा कसा तयार झाला तेही सांगितलं. माझे आजोबा मला नर्मदामैया म्हणतात आणि म्हणून माझी आई माझे काका आणि माझे आजोबा या सगळ्यांचं पालनपोषण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे असंही ती बोलली. नऊ वर्षाच्या मुलीकडून यातली एकही गोष्ट आम्हाला अपेक्षित नव्हती. अगदीच कहर म्हणजे माझे वडील आणि माझे दोन्ही काका आपलं कार्य संपवून सदगतीला कसे लागले हे हे मी आजोबांना सांगत असते पण तरी त्यांचा जीव गुंतून राहतो असही ती लहान मुलगी बोलत होती. तिचा देह फक्त नऊ वर्षाच्या मुलीचा आहे आणि तिची वाणी, तिची बुद्धी, तिचं भाष्य हे तिच्या आतून कुणीतरी वेगळंच करतय असं वारंवार जाणवत होतं

कन्या स्वरूप असल्यामुळे तिच्या हातात दहा रुपयांची नोट घालून त्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो त्यावेळेला वरून आवाज देऊन ती म्हणाली “जहा मोका मिलेगा वहा नौ कन्या को भोजन खिला देना मैया”... मीसुद्धा होकारार्थी मान हलवून पुढे निघाले मात्र नऊ कन्या एकावेळी एका ठिकाणी आणि लगेचच म्हणजे दुसऱ्याच दिवशी सापडतील आणि त्यांची भोजन प्रसादी आपल्याकडून होईल तेही अचानक पणे हे आम्हाला अपेक्षितच नव्हतं. किंबहुना आम्हाला नउ कन्या शोधाव्या लागल्या नाही तर त्या कन्यांनी आम्हाला शोधून घेतलं होतं... कसं ते सांगणारे पण त्या आधी धुआधार बदल सांगते.

करत करत आम्ही पुढे निघालो तो छोटी धुवाधारकडे जाऊ लागलो. इथे साडेतीन चार वाजता सुद्धा बरंच पावसाळी वातावरण तयार झालं होतं. बरीच मोठी वालुकामय जमीन होती आणि दूरवर मैया वाहताना दिसत होती. तिथवर पोचतो तो मैया नी एक वळण घेतलेलं होतं. मैयाच्या मध्यभागी संगमरवराची मोठी टेकडीच होती. दोन्ही तटावर देखील मोठमोठ्या टेकडीवजा दगडी होत्या. या टेकड्यांवर मैया प्रचंड वेगाने आघात करत होती. इथे मयानी रौद्ररूप घेतलं होतं असंच म्हणा ना! इथे मैयाचं पाणी टेकड्यांच्या वरपर्यंत उडून धुक्यासारखी

भिंत तयार झाली होती. मैय्याच्या खळखळ आवाज इतका जास्त होता की आम्हाला दोघांना एकमेकांचे बोलणे देखील ऐकू येत नव्हतं. प्रचंड वारं सुटलेलं होतं आणि आमच्यासारखे जाड जुड, वजनी माणसं सुद्धा उडून जातील की काय असं वाटू लागलेलं होतं. इथून पुढे न जाता आज इथेच थांबावं या आशेने आम्ही जवळपास आश्रम शोधू लागलो.

इथे चिटपाखरू देखील नव्हतं मात्र एका दगडी टेकड्यावर मध्यभागी एक भगवा झेंडा रोवलेला दिसत होता. तोच आश्रम असावा, निदान तिथे कुणाला तरी काहीतरी विचारता येईल असं वाटून आम्ही ती खडकाळ टेकडी चढू लागलो. त्या भगव्या झेंड्यापर्यंत पोचलो तेव्हा लक्षात आलं तिथे कोणीही नव्हतं तिथे फक्त एक झेंडा आणि एक आडोसा असा तयार केलेला होता तिथे रात्र काढणं अशक्य होतं. मात्र वरच्या बाजूला एक बाण काढलेला दिसत होता त्यावरून परिक्रमावासी मार्ग हा हे टेकाड चढून वर जातो आहे हे लक्षात आलं.

आम्ही उंचावर असल्यामुळे वाऱ्याचा वेग अतिशय वाढला होता. मैयाच्या पाण्याचे तुषार आम्हाला भिजवत होते. इथे फक्त खडक असल्यामुळे चढणे कठीण जात होतं. तरीही आम्ही बाण दाखवलेल्या दिशेने चढू लागलो. बरंच चढून झाल्यावर एक खूप मोठी रेतीची टेकडी लागली. तिथे रस्ता संपत होता. ही रेतीची टेकडी चढून जाणं अतिशय कठीण होत होतं कारण थोडं वर चढल्या नंतर आम्ही रेतीबरोबर घसरून खाली येत होतो. दुसरा कुठलाही रस्ता दिसत नव्हता. टेकडीच्या गोल फिरायचं म्हटलं तर बरंच अंतर होतं आणि घनदाट करवंदाच्या जाळी सारखी कसलीतरी जाळी होती, त्यातून जाता येईल असं अजिबात वाटत नव्हतं. आम्ही आजूबाजूला नजर फिरवली... खाली नावेत एक नावाडी होता, आम्ही हातवारे करून मोठ्यामोठ्याने नर्मदे हर करून त्याचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत होतो, मात्र त्याला काही केल्या ऐकू जाईना.

या टेकडीच्या दुसऱ्या बाजूला अगदीच पायथ्याशी मैया होती त्यामुळे इथून खाली उतरणं निश्चितच शक्य नव्हतं. परत जायचं म्हटलं तर बरंच अंतर दूरपर्यंत काहीही नव्हतं हे आम्हाला

माहीत होतं कारण आम्ही त्याच रस्त्याने पुढे आलो होतो. आता मात्र हा रेतीचा चढाव एकतर पार करायचा किंवा इथेच बसून कोणाचीतरी वाट बघायची याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. थोडा वेळ वाट पाहिली पण कोणीही येण्याची काहीही शंका दिसत नव्हती आणि आता पावसाला सुरुवात झाली. आता मात्र आजची रात्र इथेच बसून काढावी लागेल, भिजत भिजत काढावी लागेल असं वाटत असताना एक आशेचा किरण अतिशय दुरून आमच्यापर्यंत येऊ शकतो असा भास झाला.

काय असावा तो आशेचा किरण? खूप दूर म्हणजे कुठून तर पलिकडच्या ताटावरून.... काय असेल तो आशेचा किरण, आणि जिथे आम्हाला एकमेकांचं बोलणं ऐकू येत नाही अश्या ठिकाणी पलीकडच्या ताटावरून काय मदत मिळणार होती आम्हाला...? की बिरबलाच्या खिचडी सारखं दूरवर आम्हाला काही दिसत राहिलं आणि त्याच्याकडे बघत बघत आम्ही मार्ग काढला? ती रेतीची टेकडी आम्ही कशी पार केली.... सांगणारे पण पुढच्या भागात

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६५

नर्मदे हर

मागच्या आठवड्यात मी तुम्हाला छोटी धुवाधारबद्दल सांगत होते. बरमान घाटच्या छोट्याश्या मात्र अतिशय तेजस्वी मैयाला भेटून आम्ही पुढे निघालो होतो. छोटी धुवाधार चा खडकाळ पहाड अर्धवट चढून झाला होता. नर्मदामैया चा आवाज आणि तिचा खळखळाट इतका जास्त होता की माझं आणि बाबाचं बोलणं आम्हाला एकमेकांना सुद्धा ऐकू जात नव्हतं. अशात मैय्याच्या पाण्याचे तुषार टेकडीच्या वरपर्यंत येत होते. आम्ही अर्ध्या टेकड्यावर पोचलो होतो. इथून पुढे आम्हाला वाटच सापडत नव्हती. अतिशय खडकाळ जागा, खाली मैया खळखळतेय समोर एक मोठे संगमरवरी टेकडी आहे आणि त्याच्या पलीकडे मैया चा पलीकडचा किनारा आहे. मैयाच्या पात्राच्या मध्यभागी एक मोठी संगमरवरी खडकांची टेकडी आहे. या टेकडीवर दोन्ही किनाऱ्यांकडून लाटा दणादण आदळत असतात आणि ती संपूर्ण टेकडी पाण्याने चिंब भिजलेली असते.

अशा वातावरणात आभाळ भरून आलं आणि हळूहळू पावसाला सुरुवात झाली देखील. ह्या या टेकडीवर अर्ध्यावर चढून आल्यावर रेतीचा एक मोठा डोंगर होता. या डोंगराच्या आत कदाचित मोठमोठे खडक असतीलही. ही रेती अगदी बारीकशी नसून अत्यंत जाड रेती होती आणि त्यावरून आमचे पाय घसरत होते. आम्ही अनेक प्रयत्न करून, हातातला दंड त्या रेतीत खुपसून वर चढत होतो मात्र पाच-सात पावलांवर चढल्यानंतर आम्ही खाली घसरून येत होतो. त्या टेकडीच्या आजूबाजूलाही जाऊन पाहिले. करवंदाच्या जाळीपेक्षा दाट जाळी त्या टेकडीच्या वरच्या बाजूला होती. आम्हाला रस्ता अजिबात सापडत नव्हता. अशात खाली नजर गेली तो एकच नावाडी आपली नाव घेऊन मैयाच्या मध्यभागी असलेल्या टेकडीच्या दिशेने जातांना दिसला. आम्ही त्याला बोलवायचा, आवाज द्यायचा खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ! त्याला

काही केल्या ऐकू जाईना. तो आला तसाच तो त्याच्या मार्गाने पुढे निघून गेला आणि आम्ही मात्र हताश होऊन तिथल्याच एका दगडावर प्रार्थना करत बसलो.

अशातच एक आशेचा किरण आम्हाला दिसला. तो असा की मैयाच्या पात्राच्या मध्यभागी असलेल्या टेकडीच्या पलीकडे दुसऱ्या किनाऱ्यावर असलेल्या टेकडीवर काहीतरी हालचाल जाणवली. मैयाचे तुषार हवेत उडत होते त्यामुळे धुकं असल्यासारखं वातावरण होतं. स्पष्ट दिसत देखील नव्हतं. नीट लक्ष दिल्यावर तिथे तीन मुलं बसली आहेत हे लक्षात आलं. आम्ही खूप हात वारे करण्याचा प्रयत्न केला. पण गंमत अशी की थोड्या वेळाने आम्हाला असं लक्षात आलं की त्यांची आमच्याकडे पाठ आहे. आम्ही आवाज देऊन काहीही फायदा नव्हता. आम्ही हातवारे केलेले त्यांना दिसणार नव्हते. फक्त ते तेथे आहे हाच एक जमेचा भाग होता.

आता आम्ही मैयाचा धावा करु लागलो. आता एकच आशा होती की त्यांनी आमच्याकडे बघावं. थोडा वेळ तसाच निघून गेला. आणि अचानक यातील एक मुलगा उठून उभा राहिला आणि पुढे चालू लागला. अजूनही त्याची आमच्याकडे पाठच होती. आता ही दुसरी दोघंही उतरणार आणि निघून जाणार असं वाटू लागलं. पुन्हा एकदा बेंबीच्या देठापासून आरडाओरडा कर, हातवारे कर असे आमचे प्रयत्न सुरू झाले. आणि अचानक आमच्या प्रयत्नांना यश आलं.

तो सगळ्यात आधी उठलेला मुलगा समोर गेला आणि त्याच्या मित्रांनी त्याला मागून आवाज दिला असावा, म्हणून त्यांनी मागे वळून पाहिलं. त्यांनी मागे वळून पहिल्या क्षणी माझी ओढणी दंडावर लावून मी उंचावली आणि झेंड्यासारखा हलवू लागली... त्याला ती दिसली आणि आमचे हातवारे करून एकमेकांना समजून घेणे सुरू झाले. खाणाखुणा करतच आम्हाला रस्ता सापडत नाही असं मी त्याला सांगितलं. त्यावर आधी वर चढा मग उजवीकडे वळा असा इशारा त्याने केला.

आम्ही आम्ही पुन्हा एकदा त्या रेतीचा टेकडीवर काही अंतर चढलो आणि तसंच पाय रोवत रोवत वर न जाता उजव्या हाताला वळलो. हा भाग म्हणजे दाट जाळीच्या थोडा वरचा भाग होता. इथली जाळी फार दाट नव्हती. इथून मी पुन्हा ओढणीचा झेंडा वर केला आमच्यासमोर मोठा खडक असल्यामुळे त्या तिघांना कदाचित आम्ही दिसत नसू मात्र



आम्हाला ते दिसत होते. आमचा झेंडा वर झालेला पाहून त्यांनी त्या जाळी मधून आत जा अशी खूण केली. आम्ही कसं बसं वाकत अडकलेल्या वेली काढत जाळीमधून आत गेलो. इथे आल्यावर आपण कुठल्याश्या पिंजऱ्यात आहोत की काय असं वाटत होतं. सरडे, पाली, साप आणि न जाणे कोण कोण आमच्या समांतर वावरत असतील, मैयाच जाणे.

इथून पुढे मात्र छोटी पाऊल वाट लागली आणि एक चढाव लागला. हा चढाव चढून वर आलो तो आम्ही रेतीच्या टेकडीच्या वर आलेलो होतो. इथून आम्हाला आजुबाजूचं सगळचं मोकळं आणि स्पष्ट दिसत होतं. ते तिघे आमच्याच दिशेने बघत होते. आता पुन्हा त्यांनी इशारा केला आणि उजव्या हाताला दूरवर आम्हाला छोटी छोटी घरांची छपरे दिसू लागली. ही घरं दूर होती पण आम्ही इथवर पोहोचणार होतो ते या तिघांमुळेच. अन्यथा येवढ्या दाट जाळीत वाकून आत शिरण्याची हिम्मत आमच्यात नव्हती, आणि अशी जाळी पार केल्यानंतर रस्ता असेल अशी कल्पना देखील आम्हाला आली नसती.

ते तिघे तिथे त्या तटावर उभे होते आणि मी इथे अलीकडे. मी खाली वाकून तिथल्या मातीवर डोकं टेकून त्या तिघांना नमस्कार केला. नर्मदे हर अशी मोठ्याने आरोळी ठोकली, त्यांना ऐकू जावो की न जाओ माझ्या भावना त्यांच्यापर्यंत नक्कीच पोहोचल्या असतील या आशेने मी "टाटा" केला, हात हलवला आणि पुढील शेताच्या वाटेवर चालू लागले. चार पावलं चालल्यानंतर कृतज्ञतेने एकदा मागे वळून बघितलं तो तिघंही तिथे नव्हती. रिमझिम पाऊस अजूनही सुरूच होता. पलिकडचा कडा संपूर्णपणे ओसाड दिसत होता. आता क्षणभरापूर्वी तिथे तिघं मुलं होती हे सांगूनही कुणाला खरं वाटणार नाही इतकी शांतता दोन्ही तीरांवर जाणवत होती. त्या तिघांचे कपडेसुद्धा मला स्पष्ट आठवतात. एकाने जांभळ्या रंगाचा शर्ट घातला होता दुसऱ्याने पिवळ्या रंगाचा टि-शर्ट घातला होता आणि तिसऱ्याने पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट घातलेला होता. पुन्हा एकदा मैयाने तिच्या आमच्यासोबत असण्याची प्रचिती दिली होती.

छोटी धुआधार चा हा प्रसंग डोळ्यासमोरून सरकत नाही इतका ताजा वाटतो... मी एकेक पाऊल पुढे टाकत होते आणि मन मात्र मागेच मागे जात होतं. बरमान घाटच्या मैयाचे शब्द आठवले, "जब मोका मिलेगा तब नौ कन्याओको भोजन खिलाना" असं ती म्हणाली होती. नर्मदा माईचे ऋण तर फेडणे अशक्य आहे, किंबहूना तिची कृपा अशीच बरसत रहावी हेच खरं! तरीही गावात गेल्यावर नऊ कन्यांना भोजन तयार करून खाऊ घालू ही इच्छा तीव्रतेने मनात आली.

अजून गाव बरंच दूर होतं. आम्हाला गावात जायला तास-दीड तास नक्की लागणार होता. त्यानंतर आसन लावायचं, अंघोळ पूजा करायची, आणि मग भोजनाची व्यवस्था होईल. आज काही नऊ कन्यांना जेवायला घालता यायचं नाही, ते उद्या सकाळ वर सोडावे असा

विचार करत करत आम्ही गावाकडे जात होतो. गाव बरंच जवळ आलं होतं आणि अचानक दहा-बारा मुलं मुली नर्मदे हर हर नर्मदे हर हर करत आमच्या जवळ आलीत...

“कहा जाओगे माताजी? किसके घर रहोगी मैया जी?” असा प्रश्न त्यातील मोठ्या म्हणजे दहा-बारा वर्षाच्या मुला मुलींनी विचारला. “आश्रम कहा है गाव में?” मी पण माहिती काढायला सुरुवात केली... तेव्हा त्यातली सगळ्यात मोठी मुलगी म्हणाली “आप हमारे घर चलो...”आम्ही तिच्या मागे मागे जाऊ लागलो. गावात गेल्यावर बघू काय करायचं ते असं ठरवलं, मात्र या मुलीकडून उद्या कन्या भोजनासाठी साठी नऊ कन्या मिळवता येतील का याचा प्रयत्न मी करू लागले. “बेटा जी मुझे कल कन्या भोज करना है नौ कन्या को खाना खिलाना है, तुम तुम्हारे दोस्तो को लेकरं आओगी?” मी तिला विचारलं... ती म्हणाली “आप हमारे ही घर चलो, हमारे घर कन्याये है उनको खाना खिला दे ना... मुझे दो बहने है, और मेरे दोनो चाच को तीन-तीन बेटिया है. हमारे घर मे हम नौ बहने और एक भाई है..... ” तिचं हे बोलणं ऐकून काय आनंद झाला म्हणून सांगू! बरमानच्या त्या छोट्या मैयाबद्दल बोलू? की आम्हाला शोधत येणाऱ्या या आठ बहिणीबद्दल बोलू? नऊ पैकी आठ इथे माझ्या अवतीभोवती होत्या आणि एक तीन वर्षाची असल्यामुळे आपल्या आईजवळ आपल्या घरी होती. आता मात्र आम्ही तिच्याच घरी जायचं ठरवलं.

ठरल्याप्रमाणे गुरसिला सरपंच अली ठाकूर यांच्या घरी आम्ही गेलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी यथेच्छ कन्यापूजन आणि कन्या भोजन केलं. त्या नऊ कन्यांनी ही अतिशय शांततेने, आनंदाने अगदी सगळं व्यवस्थित करून घेतलं आणि डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. यापेक्षा मोठं भाग्य ते काय? एक छोटी कन्या मैया स्वतःहून सांगून जाते की तुझ्या हातून नवदुर्गा जेवणार आहेत, आशीर्वाद देणार आहेत, तुझ्या भाग्यात हे लिहिलेलं आहे आणि जेव्हा तुला शक्य असेल तेव्हा ते कर असं सांगितल्यानंतर लागलीच म्हणजे त्याच दिवशी या नवदुर्गा

स्वतःहून मला त्यांच्या घरी घेऊन जातात आणि माझ्याकडून त्यांची पूजा आणि भोजन करवून घेतात.

सरपंच आली ठाकूर यांच्या घरचा मुक्काम हा खूप छान होता अगदी छोटसं घर त्यात बागडणाऱ्या या नऊ मैया जी, तीन अन्नपूर्णा जी यांच्या सान्निध्यात तो दिवस खूप छान गेला. पुढे रामपुरा आणि रोहिणीला देखील अनुभव आलेच...तसा रमपुरा चा अनुभव आपल्या अनुभव कथनाच्या सुरुवातीला मी सांगितलेला आहे. गुरूपासून तुम्ही कुठेही पळून जाऊ शकत नाही याची आलेली प्रचितीच ती... तिथून पुढे रोहणीला खरंतर थांबायचं नव्हतं पण अंधार होत आला होता त्यामुळे थांबावं लागलं आणि ते सुद्धा एका दिव्य पुरुषाच्या आशीर्वाद अचानक पणे मिळाला..... कसं ते सांगणारे पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६६

नर्मदे हर

मागच्या आठवड्यात मी तुम्हाला धुवाधार चा अनुभव सांगितला होता. बरमानची छोटीशी मैया जी आणि बगुरशीला सरपंच अली ठाकूर यांच्याकडे लाभलेल्या नऊ कन्या आणि त्यांचं कन्यापूजन याहीबद्दल सांगितलं होतं. आता तिथून पुढे जाऊयात. मागच्याच आठवड्यात “गुरूपासून पळून जाता येत नाही”याची प्रचिती आली असंही मी सांगितलं होतं. तिथून आता पुढे सांगते.

खरंतर सरपंच अली ठाकुर कडून पुढे निघालो त्याला उशीरच झाला होता. गुरुसीच्या थोडं पुढे आम्हाला आमच्या मागे पुढे असणारे मंदार वाळींबे, सुदिन पराडकर आणि पराडकर काका हे पुन्हा एकदा भेटलेत. वाटेत थांबत हळू हळू पुढे सरकत त्यादिवशी आम्ही फार काही पुढे जाऊ शकलो नाही. त्याला एक कारणच घडलं. मंदार आणि सुदिन दोघं तरुण मुलं. ती पुढे पुढे जायची आणि कुठेतरी वाट बघत थांबायचीत. आपल्यामुळे इतरांना उशीर होऊ नये म्हणून पराडकर काका आपल्या चालीने हळूहळू पुढे सरकायचेत. या गुरसी जवळ गंमत झाली बरं का.

तीन-साडेतीनची वेळ. मंदार आणि सुदिन पुढे होते पराडकर काका आपल्या चाली ने निघाले होते मी आणि बाबा मागे होतो. तेवढ्यात मंदार आणि सुदिन समोरून मागे आम्हाला शोधत शोधत येताना दिसले. “काय रे असे उलटे का येत आहात? आम्ही विचारलं तेव्हा म्हणाले काका कुठे दिसत नाही, काका हरवले, आता त्यांना शोधतोय!” अरे बापरे कुठे गेले असतील काका? शिवाय काका जवळ फोन सुद्धा नव्हता. आता त्यांना शोधल्याशिवाय काहीच पर्याय नव्हता. डोक्याला साईबाबां सारखा पांढरा रुमाल बांधून कुर्ता आणि लुंगी घातलेले, हातात काठी आणि पाठीला बॅग लावलेले असे परिक्रमावासी कुठे दिसतात का?

असा शोध घ्यायला आम्ही सुरुवात केली. मागच्या चौकातून उजवीकडे गेले का, डावीकडे गेले का, रस्ता चुकले का, असा सगळे जण शोध घेत होते... आम्ही सगळेच खरोखर गांगरलो होतो. शेवटी ठरलं आम्ही चौकाच्या पलीकडला भाग बघायचा आणि सुदिन नी चौकाच्या मागचा भाग बघायचा मंदारने पुढे जायचं, ते पुढे गेले का आहेत का ते शोधायचं आणि तिथून सगळ्यांनी एकमेकांशी फोनवर संपर्क ठेवायचा. सुदिन तर फारच बावरला होता, झपाझप पावले टाकत मागे पाच-सात किलोमीटरपर्यंत गेला, तिकडे दुसऱ्या दिशेला मंदार देखील दोन-तीन किलोमीटर पुढे गेलाच. आम्हीदेखील तिथल्या आसपासच्या भागात काका कुठे विश्रांती घेत बसले तर नाहीत हे शोधू लागलो.

शेवटी बराच वेळाने काका सापडले. सुदिन चा फोन आला. आम्हाला वाटलं तसंच झालं होतं, काका मागच्या चौकातून डावीकडे वळले होते आणि रस्ता चुकले होते. सुदिन काकांना घेऊन आला मंदार सुद्धा आला आणि आम्ही सुद्धा जिथून निघालो होतो तिथे परत आलो. सगळेच घाबरले ही होते आणि थकलेले ही होते. आता पुढे जाण्याची हिंमत नव्हती म्हणून तिथेच थांबायचा निर्णय घेतला. इथे कुठे व्यवस्था आहे ते शोधू लागलो तो गावात आश्रम असा नाही, राहायचं कुठे तर लोकांनी एक जुनं शिवमंदिर दाखवलं.

मंदिर फारच जुनं होतं. तीन पायऱ्या चढून आत मध्ये एक शिवाची पिंड होती आणि एक यज्ञकुंड होतं. दोन-तीन छोट्या छोट्या मुर्ती होत्या मात्र या मंदिरात नियमितपणे पूजाअर्चा होत नसावी हे स्पष्ट जाणवत होतं. गावातल्या लोकांनी तिथे बल्ब लावून लाईटची व्यवस्था केली खरी पण लाईट लावल्यावर लक्षात आलं की इथे बरीच जाळी जळमटी झाली होती. उंदीर आदि प्राणी इथे येऊन जाऊन असतात हे समजलं, त्यांची विष्ठा पडलेली दिसत होती. मग कुठून तरी झाडू फडे जमा करून त्या मंदिराची साफसफाई केली, आसनं लावली आणि आता भोजन प्रसादीची व्यवस्था म्हणून समोरच्या दुकानात विचारलं. तशी काही व्यवस्था

गावात नसल्याचं समजलं शेवटी जवळ असलेले मुरमुरे फुटाणे इत्यादी घेऊन त्यावरच आज गुजारा करायचा असं ठरवलं. पण पुन्हा तेच आपण ठरवतो तसं काहीच होत नसतं.

मंदिराच्या समोर असलेल्या एका घरातून हातपाय तोंड धुवायला आणि प्यायला पाणी आणलं होतं. त्यांच्याच घरी प्रातर्विधीसाठी व्यवस्था झाली, कारण असं की आम्ही भर गावात होतो, येथून बाहेर दिशेला जाण्यासाठी सुद्धा दोन-तीन किलोमीटर चालून जावं लागणार होतं. त्यामुळे ही व्यवस्था गावातच कोणाकडेतरी होणं आवश्यक होतं. ती झाली. आणि आम्ही प्रत्येकजण दोन-तीनदा पाणी आणायला गेल्यामुळे त्या घरच्या मंडळीशी थोडी थोडी ओळख झाली. रात्री त्यांनी आम्हाला खिचडीची भोजन प्रसादी आणून दिली. चला म्हणजे थोड्यावेळापूर्वी काकांना शोधणारी आम्ही सर्वजण आता जेऊन खाऊन निवांतपणे आराम करत बसलो होतो. काका सापडले आता काही नसलं तरी चालेल हाच आमच्या सगळ्यांच्या मनात काका हरवले त्यावेळी विचार येत होता. काका काय विचार करत होते हे मात्र आजतागायत समजलेलं नाही!

असो तर सांगायचा मुद्दा असा की मी आणि बाबा सरपंच अली ठाकूर यांच्या घरून उशिराच निघालेलो, आणि आता पुन्हा गुरुसीच्या थोडसं पुढे मुक्काम केला. आज दिवसभरात आमचं काही चालून झालं नव्हतं त्यामुळे आता आम्हाला पुढे जायचं होतं.... काका, सुदीन आणि मंदार आमच्यापुढे निघाले होते आणि मी आणि बाबा मागे होतो. इथून सातच किलोमीटरवर रमपुरा नावाचं गाव आलं. तिथे महाराष्ट्रीयन परिक्रमावासी दिसले की त्यांना बॅग घेऊन सरळ आत मध्ये घेऊन जातात आणि मुक्कामच करावा लागतो असं आम्ही ऐकून होतो. आता माझी थांबण्याची तयारी नक्कीच नव्हती. सुदिन आणि मंदारला आश्रम धारयांनी थांबवून घेतलं होतं आणि मंदार चा मला सतत फोन येत होता. "ताई तुला इथे थांबावच लागणार आहे" आणि मी देखील तितक्याच जिद्दीने मी इथे थांबणार नाही असं म्हणणारला वारंवार सांगत होते. मी विचार करत होते, मी या आश्रमाच्या समोरून जाणारच नाही, मी नं

मागून शेतातून निघून जाईन, दुसरा कुठला रस्ता असेल तर तो शोधेन पण मी कुठल्याही परिस्थितीत आज रात्री तिथे थांबणार नाही, मी पुढे जाणार.... ही कसली आणि काय जिद्द होती ते काही माहित नाही पण त्यावेळेला मी हट्टालाच पेटले होते. आणि अशातच गुरूपासून पळून जाता येऊ शकत नाही ही प्रचिती मला आली. मंदारचा पुन्हा फोन आला. यावेळी त्याचा आवाज गंभीर होता आणि तो मला सांगत होता ताई तू इथून पळून जाऊ शकत नाहीस, आता मी तुला जे सांगणार आहे ते सांगितल्यानंतर तुला इथे यावच लागेल.... तो पुढे म्हणाला आज गुरुवार आहे म्हणून इथे तुझे गुरु नाना महाराज तराणेकर यांची पूजा आणि त्यानंतर त्रिपदी करणार आहेत. हा आश्रम नाना भक्तांनी स्थापन केलेला आश्रम आहे त्यामुळे तुला इथे येण्या व्यतिरिक्त काहीही पर्याय नाही. त्याचं हे बोलणं ऐकल्यानंतर आता मी कुठेही पळून जाऊ शकत नाही याची मला खात्री पटली होती. त्याला कारणही तसंच होतं तिथे गेल्यानंतर मला लेले काकांविषयी महत्त्वाची बातमी समजायची होती. लेले काका आठवतात न? परिक्रमेच्या पहिल्या दिवशी ऐंशी वर्षाचे आजोबा मला भेटले होते ते लेले काका...मला म्हणाले होते मी कोण हे तुला तुझी परिक्रमा शेवटच्या टप्प्याच्या जवळ असेल त्यावेळेला तुझे लोक आणि नर्मदामैय्या सांगेन! आठवतंय का? हा अनुभव मी तुम्हाला आधीच सांगितलेला आहे. तर हे लेले काका साक्षात शंकर महाराज आहेत याचा उलगडा मला जिथे झाला तेच हे ठिकाण रमपुरा. लेले काकांचा अनुभव आधी सांगितलेला आहे म्हणून तो आता पुन्हा लिहीत नाही.... मात्र गुरु पासून आपण कुठेही पडूच शकत नाही याची आलेली प्रचिती तेवढी सांगितली.

रमपुरा हून पुढे निघालो तेव्हादेखील काका सुदिन आणि मंदार थोडे पुढे होते तर आम्ही थोडं मागे होतो. इथून आम्ही मैया किनाऱ्याचा रस्ता पकडला होता. रामपूरा, केरपानी, डोंगरगाव धूम गड आणि हिरापूर असा हा रस्ता. आज हिरापूरला थांबावं असं ठरवलं. हे अंतर तसे फारच कमी होतं मात्र नदी किनाऱ्याचा रस्ता हा जरा कठीणच जातो. आम्ही हिरापूरपर्यंत पोचू शकत नव्हतो. जिथे पाच-साडेपाच होतील तिथे थांबायचं असा अलिखित नियम होता.

रोहणी नावाचं गाव होतं. थोड्याच वेळात अंधार पडणार होता. नदी किनारा खाली आणि गाव थोडं उंचावर त्यामुळे चढून जायला आम्हाला वेळ लागणारच होता. गावात गेल्यावर आसनं लावण्याची व्यवस्था बघायची. आम्ही गावात गेलो. इथेदेखील आश्रम म्हणून विशेष अशी काही व्यवस्था नव्हती. गुरसी सारखंच एखादं मंदिर असेल तिथे राहू असा विचार केला, पण या गावात एकही मंदिर नाही, या गावात शाळा देखील नाही, मग आता कुणाच्यातरी घराच्या बाहेर आसन लावायचं म्हणून आम्ही लोकांना विचारू लागलो. इथे परिक्रमावासीबद्दल थोडी उदासीनता जाणवली कोणीही पटकन तयार होईना. आणि आम्हाला आग्रह करून विचारणं बरं वाटेना. अगदी पाणीसुद्धा न देता लोक हापशीकडे बोट दाखवत होती. आम्ही गावातून फेरफटका मारून एखादं झाड, एखादा कडप्पा, एखादा ओटा असं काही दिसतं का याचा शोध घ्यायला सुरुवात केली. तसा आमच्या मागून पांढरी वस्त्र धारण केलेला एक परिक्रमावासी येताना दिसला. आता आम्ही तिघे जण निवारा शोधू लागलो. सोबत आलेला हा परिक्रमावासी आम्हाला आधी कुठेही भेटला नव्हता. मात्र तो सोबत आहे हा आधारच वाटला. करता करता आम्हाला एक बंद घर सापडलं. त्या घराच्या बाहेर एक रिकामी पडवी दिसली. त्या पडवीच्या खाली पाचोळ्याचा प्रचंड ढीग होता. आम्ही तिघांनीही एकमताने तिथेच आसन लावायचं ठरवलं. आम्ही आमची पूजाअर्चा केली तोवर हा परिक्रमावासी ध्यानस्थ अवस्थेत बसला होता. त्याचं ध्यान झाल्यावर मग आमचं थोडाफार बोलणं सुरू झालं. "मै बेरागी हु श्रीरामजी का हनुमानजी का भक्त हू" असं त्यांनी सांगितलं... मग म्हणाला भोजन प्रसादी के लिये तुम्हारे पास कुछ है क्या? माझ्याजवळ दोन पेरू होते, वाटेत कोणीतरी दिले होते. ते पेरू काढून मी समोर ठेवलेआणि म्हणाले "इतना है बाबाजी इसी से काम चला लेंगे". ते बाबाजी जरा नाराजच झाले, म्हणाले आज तो मक्के की रोटी और तुअर की सब्जी खाने का मन हो रहा है... पण या गावातली उदासीनता पाहता असं होईल असं काही शक्य नव्हतं. हापशी वरची गर्दी कमी झाली होती आणि म्हणून पडवी समोरच असलेल्या हापशी वर मी माझे कपडे धुवायला घेतले. बाबा देखील मला मदत करू लागला

आणि हे बाबाजी फेरफटका मारायला निघाले. पाचच मिनिटात परत आले आणि म्हणाले "चलो मक्के की रोटी खिलाता हू"... कपडे वाळत टाकून आम्ही त्याच्यापाठोपाठ जाऊ लागलो. गावाच्या अगदी टोकाला एका शेताच्या मध्यभागी एक घर होतं तिथे ते बाबाजी आम्हाला घेऊन गेले. त्यांनी बाहेरूनच आवाज दिला. "नर्मदे हर माताजी मेहमानो को भोजन दिया हो तो परिक्रमावासी यो को भी खीलादो. .... "लगबगीने आतून एक माताजी बाहेर आल्या आणि आग्रहानी त्यांनी आम्हाला पानावर बसवलं. झणझणीत आंब्याचं लोणचं, गरम मक्याच्या भाकरी आणि तुरीच्या दाण्यांची उसळ असं जेवण पानात वाढलेलं बघताच आम्ही दोघही आश्चर्याने या बाबाजींकडे बघू लागलो. ते म्हणाले देखो मत भोजन पाओ नर्मदामैया ने इच्छा पुरी कर दी है.... अशावेळी प्रश्न पडू द्यायचे नसतात हे आतापर्यंत समजलं होतं. अशावेळी लुटायचा असतो तो फक्त तिच्या कृपेचा आनंद, पोटभर जेवून आणि मनभर आनंद लुटून आम्ही परत आपल्या पडवीत परतलो. बाबाजी पुन्हा ध्यान लावून बसले आणि आम्ही निद्राधीन झालो. मध्यरात्री एक-दोनदा झोप उघडली असता बाबाजी ध्यानातच बसलेले पाहिले होते, मात्र अगदीच पहाटे "नर्मदे हर मै आगे चलता हू" असा आवाज देऊन आम्ही उठायच्या आधीच ते बाबाजी पुढे निघून गेलेत.... कालची भोजन प्रसादी आणि आसन लावण्याची व्यवस्था बाबाजींच्या रूपात आलेल्या नर्मदा माई ने केली होती इतकं समजण्याइतके अनुभव आतापर्यंत तिने दिले आहेतच की.

रोहनी हून पुढे निघालो ते खरं मालकछारला जायचं होतं पण झासी घाटला पाऊस सुरू झाला आणि थांबावं लागलं. इथला आश्रम छानच होता मात्र तिथे बरेच नियम होतेत. आणि या ठिकाणी गेल्यानंतर म्हणजे तिथे गेल्यावर चहापाणी झाल्यावर ह्या आश्रमाबद्दल एक वेगळीच वार्ता समजली. अंगावर काटा आला आणि ती रात्र अतिशय कठीण गेली.. कसे ते सांगणारे पण पुढच्या भागात

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६७

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला रोहनी चा अनुभव सांगितला. काहीही सोय नसताना आम्हाला आसन लावायला पडवी मिळाली होती. शिवाय जेवणाची व्यवस्था होईल की नाही असं वाटत असताना एक बैरागी बाबा आम्हाला जेवायला घेऊन गेले आणि जेवण मिळालं. दुसऱ्या दिवशी ते बाबा निघून गेलेत...

आम्ही निघण्याच्या तयारीत असताना कालच्या माताजी हापशीवर आल्या. आम्ही तयारी करतोय बघून म्हणाल्या "रोटी आचार बांध के भेजती हू, खा लेना".. आम्हाला लोणचं आणि मक्याची भाकरी असं सकाळचं जेवण पण मिळालं. आता आम्हाला पुढे निघायचं होतं. आज झालोनपर्यंत जाऊ असं वाटलं होतं पण नदी किनाऱ्यावर चालताना पायाला वेग येत नाही. कुंडा नावाच्या गावी व्यवस्था झाली. तो दिवस ही छानच झाला, मात्र पुढे झांसी घाटला जो अनुभव आला तो सांगते.

आम्ही साधारण ३-३. ३०च्या सुमारास झांसी घाटला पोचलो. इथे एक आश्रम दिसला. इथे चहा घेऊ, थोडा आराम करू आणि पुढच्या प्रवासाला निघू असं वाटून आत गेलो. चहा झाला. आणि अचानक पाउस सुरु झाला. आता आम्ही पुढे जाऊ शकणार नव्हतो. मग तिथेच थांबायचं ठरवलं. या आश्रमात अनेक काटेकोर नियम होते जे पालनं जरा कठीणच होतं. साधू बाबांनी भोजन प्रसादीची तयारी केली. तेवढ्यात एक कार आश्रमापुढे येऊन उभी राहिली. हा आश्रम ज्यांनी बांधला तो हा माणूस. नर्मदे हर झालं आणि गप्पा सुरु झाल्या. बोलण्या बोलण्यात जी माहिती मिळाली आणि ज्याप्रमाणे मिळाली ते ऐकल्यावर "कुठून इथे आलो" असं वाटू लागलं.

तो म्हणाला “मै बहोत पैसे वाला आदमी हू.. मेरा बहोत राज चलता है गाव मे. मुझे किसी भी चीज के लिये “नही” कोई बोल नही सकता. सब डरते है मुझसे. मै आदमी बुरा नही हू लेकीन सनकी हू.. अभी अभी जेल से छुट कर आया हू, बेल पर हू... ” त्याचं हे बोलण ऐकून आता हा गेला लवकर तर बरं होईल असं वाटत होतं.. तो ही म्हणाला मी जातो, पण आज रात्री इथेच येतो म्हणाला.... आणि तो दारू प्यायलेला आहे हे समजत होतं. या आश्रमातील नियम ही खूप वेगळे होते. साधं बाथरुमला गेलं तरी आंघोळ करायची, सगळ्या वेळा पाळायच्या. तसं नियम पाळायाला हरकत नव्हती पण तरीही बाबाला इथे रहायचं नव्हतच. तो माणूस गेला खरा, आणि बाबा नी ठरवलं, आज इथे राहायचं नाही... आश्रमात कुणी बाई माणूस नाही, हा असा माणूस येतो म्हणतोय, पाउस येतोय, अशा परीस्थितीत जायचं तरी कुठे? पण इथे राहायचं नाही असा हट्टच धरला बाबाने. मग काय निघालो... मागे वस्तीत गेलो. लोक सांगायचे आश्रमात जा.. शेवटी बाबाने सांगितलच, तिथे बाई माणूस नाही, म्हणून तिथे राहत नाहीये, एका बाईनी तिच्या घरा बाजूच्या एका खोलीत आश्रय दिला... मात्र इथून पुढेही गम्मतच झाली.

रात्रीच्या आत आम्ही जाऊन पोचलो. चहा झाला, पूजा पाठ झाले. स्वयंपाक घरातून खमंग वास येऊ लागलेत. आता भोजन प्रसादी करू, सकाळी लवकर उठून इथून लवकर निघून जाऊ असा विचार केला, आणि भोजन प्रसादीची वाट पाहू लागलो मात्र बराच वेळ झाला तरी भोजन प्रसादी काही येईना. मग वाटलं चहा मागावा आणि चहा पिऊन झोपावं, म्हणून त्या बाई ना आवाज दिला..

त्या म्हणाल्या “ भोजन प्रसादी नही करोगे? आम्ही म्हणालो, भूक तो लागी है, त्यावर त्या म्हणतात, मैने तो बनाया ही नही.. मग आम्ही म्हणालो, कोई बात नाही, चाय भी चलेगी, तर म्हणे, अभी भोजन के समय पर चाय क्यू पी रहे हो... तिला नक्की काय म्हणायच होतं समजेना, म्हणजे ती भोजन देणार होती, की चहा देणार होती, की काही देणार नव्हती, माहित नाही..

“आपको तकलीफ ना हो, बाकी हमे कुछ भी चलेगा” असं सांगितलं, आणि आजचं जेवण मैयावर सोडलं. थोड्या वेळाने तिनी साखर आणि २ पोळ्या आणून दिल्या.

भोजन प्रसादी झाली, आता झोपी जायचं. झोपण्या पूर्वी फ्रेश व्हायचं म्हणून बाहेर जायला निघाले तर या मैया जीं नी दार बहरून लावलेलं. नर्मदे नर्मदे हर आवाज देऊन झाला तरी कुणी काही येईना.. शेवटी रात्र तशीच गेली.. म्हणजे बघा, आश्रमात रात्री जायला लागलं असतं तर आंघोळ करावी लागली असती, आणि इथे जाताच येईना.. दार बाहेरून बंद...सकाळी मैया नी उशिरा दार उघडलं तेव्हा बाहेर पडलो. पण त्यांनी दार का लावलं हे समजलं नाही.... असो

जबलपूर ग्वारी घाटला संस्कृत पाठशाळेत थांबलो होतो. तिथे एक म्हातारे आजी आजोबा पण थांबले होते. ते परिक्रमेत नव्हते पण कार नी भ्रमणाला आले होते. त्या आजी खूप शांत दिसत होत्या आणि आजोबा जरा बोलके होते. आमच्या थोड्या फार गप्पा झाल्या तेव्हा समजलं की आजोबा मोठे सायंटीस्ट म्हणून सेवा निवृत्त झाले. त्यांनी ए पि जे अब्दुल कलामांबरोबर काम केलं होतं. आजोबा अत्यंत हुशार व्यक्तिमत्व आणि तितकाच साधेपण त्यांच्या अंगी होतं. गप्पा करताना आजोबा मध्येच थांबायचे.. त्यांना काही बोलायचं आहे असं वाटलं आणि पुन्हा शांत झाले. मी विचारलं, दादाजी कुछ बोलना है आपको... तर म्हणाले “तुम्हारे आसपास के लोग, जगह, वस्तू, सब तुमसे बाते करते है, तुमको सुनाई भी देता है, तुम समझती क्यू नही हो? मला काही समजे ना... क्या हुआ दादाजी, क्या नही समझ पा रही हू मै... मी विचारलं... तेव्हा ते जे बोलले तसंच्या तसं तुम्हाला सांगते..

ते म्हणाले, दो तरीके होते है समझने के लिये... एक बंद आंखोसे, एक खुली आंखोसे.. जब तुम्हारी आंखे खुली है तब तुम्हे छोटी छोटी चीझो को देखना होगा.. गीलहरी क्या कहती है, पत्ते क्या कहते है, हवा क्या कहती है.. ध्यान देगी तो पता चलेगा. अगर तुम सवाल करोगी तो जवाब भी मिलेगा, तुम्हे समझाना होगा...कर के देखो, सवाल करो, सवाल करो इस बिल्ली

के बच्चे से, कुछ भी, असं म्हणत त्या आजोबांनी एका मांजराच्या पिल्लाकडे पाहिलं... मी मनात येईल तो प्रश्न विचारला, मी म्हणाले, “काय रे बाबा, तुला विचारलं तर सांगशील का तू मला माझ्या प्रश्नाचं उत्तर?” ते पिलू दोन चार मिनिटात उठलं आणि माझ्या पायाशी घुटमळू लागलं...दादाजी म्हणाले, “देखा, तुम्हारी जान न पेहचान, लेकीन फिर भी ये तुमसे लगाव जता रहा है.. तो इसके पास तुम्हारे लिये कुछ तो है...हम बस पढ नाही पाते.. खरंच असच असतं, आपल्याला हवी असलेली उत्तरं बरेचदा आपल्या अवती भवतीच असतात, माध्यम मिळत नसतं इतकंच.. मी हा उपाय करून बघण्याचं ठरवलं आणि लागलीच याची प्रचीती आली सुद्धा...आणि मग मला कांदरोज चा माझा अनुभव आठवला, हनुमान चालीसा म्हणताना कसं आजूबाजूचं सगळं हनुमान चालीसा म्हणतय असं वाटलं होतं मला! ह्या उपायाने एक होतं नक्की, आपला आपल्यावरचा विश्वास फार धृड होतो, कारण आपल्या सोबत अक्ख्ख विश्व उभं आहे याची जाणीव होते. आजोबांची ही शिकवण लक्षात ठेवण्यासारखी आणि अंमलात आणण्यासार्खीच आहे.

पुढे निवास मार्गे जावं का मंडला मार्गे हा एक प्रश्न डोळ्यासमोर उभा राहिला. इथे अनेक लोक अनेक मतं देतात. मार्ग दोन्ही आहेत, पण आम्ही निवास मार्ग धरला. मंडला मार्ग कठीण आहे असं म्हणतात, बाबाचा दुखरा पाय बघता आम्ही निवास चा मार्ग घेतला पण शक्य असल्यास मंडला मार्ग घ्यावा. कारण असं की इथे घनदाट अरण्य आणि निर्मनुष्य वनं आहेत, त्यामुळे अनेक योगी तपस्वी इथे तप करत असतात, पण आम्हाला हे कुणी सांगितलं नाही. ते आमच्या नंतर लक्षात आलं. असो.

निवास मार्गे जाताना मध्ये मणेरी नावाचं गाव लागतं. इथे एका शिव मंदिरात मुक्काम केला. इथे एक छोट मंदिर आहे. सोबत ग्राम देवतेचं मंदिर आहे. ही ग्राम देवता अतिशय जागृत आहे असं म्हणतात. इथे नवस बोललेला फळतो असं म्हणतात. याच मंदीराच्या नवसाने झालेला एक मुलगा आणि त्याची आई आम्हला भेटले. त्याच्या आईनी सांगितलं की त्यांच्या

लग्नानंतर दहा वर्षांनी मुलगा झाला, आणि त्या वेळी कुणीतरी एक साधू म्हणाला होता की ग्रामदेवतेला नवस घालायचा आणि परिक्रमा वासियांना जेवायला घालायचं, तेव्हापासून हा परिवार सेवेला हजर असतो.

आता या बाळाची गोष्ट सांगते. हा बाला साधारण एक वर्षाचा. त्याची आई स्वयंपाक करत होती आणि बाळाला मी घेतलं होतं. मी त्याच्याशी खेळत होते. तो ही आनंदाने तास दीड तास माझ्या बरोबर खेळला. मग माझ्याच हाताने जेवला देखील. आता भोजन प्रसादी करून आम्ही निघणार होतो. हे पिल्लू मला सोडायला तयारच नाही. आपल्या आईजवळ सुद्धा तो जायला तयार नव्हता. मग थोडं अंतर त्याला घेऊन गेले, वाटलं आईला दूर पाहून हा रडेल, तरी नाहीच, त्याला माझ्यापासून दूर जायचं नव्हतच...खरं तर तो अगदी झोपायला आला होता, तरीही मला सोडायला तयार नव्हता. शेवटी त्याला थोपटून निजवलं आणि मग आम्ही पुढे निघालो. काही तरी नक्की देणं घेणं असलं पाहिजे त्याचं अन माझ... मागच्या जन्मीचं.

आम्ही पुढे निघालो. आजोबांचा उपाय मी अमलांत आणत होते आणि मला अनेक उत्तरं मिळतही होते. आता पुढचा मोठा टप्पा होता विक्रमपूर आणि त्या आधी करोदि. करत करत आम्ही बिझोलीच्या जवळ पोचलो. आता इथून पुढे मुंडा महा अरण्य सुरु होणार होतं, त्या आधीचा हा चढाई चा भाग. घाटातला रस्ता होता. दोन्ही बाजूने दऱ्या आणि झाडी होती.. चालताना धाप लागेल अशी चढाई होती. रस्त्यात पाणी नाही की घर नाही... जवळचं पाणी संपल होतं.. भूक लागायला आली होती...अगदी १०० मीटर चालून झालं की थकायला होत होतं.. आजोबांचा उपाय आठवला आणि मी त्या आजूबाजूच्या सगळ्या झाडांना, रस्त्याला, डोंगराना प्रश्न विचारू लागले.... मला उत्तर मिळालं का? काय झालं? सांगते, पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६८

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला मला भेटलेल्या आजी-आजोबाबद्दल सांगितलं होतं. झांसी घाटच्या आश्रमात आलेल्या त्या गुंड माणसाचा अनुभव सांगितला होता आणि ते छोटसं बाळ कसं मला सोडत नव्हतं ते सांगितलं होतं.

आजोबांनी सांगितल्याप्रमाणे मला माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळत होती ती माझ्या भवतालच्या निसर्गाकडून. आम्ही बीझोरीच्या मार्गाने जात होतो. इथून पुढे मुंडा महाअरण्य सुरू होणार होतं. म्हणायला रस्ता मार्ग होता. अधूनमधून गाड्याही येजा करत होत्या, मात्र चढाव इतका जास्त होता की त्या गाड्या घसरून खाली येतील की काय असं त्यांच्याकडे पाहून वाटत होतं. अख्खा डोंगर चढून जाणं होतं. रस्त्याने असला तरी चढाव तो चढाव. इथं कुठे दुकान नव्हतं, घर नव्हतं, की काही व्यवस्था नव्हती. दोन्ही बाजूला जंगल. सारखी तहान लागायची.  पाणी संपलं होतं, उगाच घोटभर बाटलीत पडू देऊ म्हणून काय ते शिल्लक होतं. आम्हाला भूकही लागली होती. कधी एकदा हा चढाव पार करुन पहिलं जे काय गाव येईल त्या गावातच मुक्काम करायचा असाच विचार आम्ही करत होतो. मला आजोबांचे शब्द आठवत होते. “पुछो सवाल”, त्यांनी मला प्रश्न विचारायला लावले होते आणि मला प्रश्नांची उत्तरं मिळाली देखील होती. मग मी प्रश्न विचारायला सुरुवात केली. डोंगराला प्रश्न विचारला, रस्त्याला प्रश्न विचारला, येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांना प्रश्न विचारला, म्हंटलं, “भूक लागलीये मला, तहान लागली रे मला, होणारे का सोय काही? निदान थोडावेळ आराम करायची इच्छा आहे, मिळेल का काही जागा?” हा प्रश्न सातत्याने तीन-चार वेळा विचारल्यानंतर मला या सगळ्यांमध्ये थोडासा सकारात्मक फरक जाणवला. रस्त्याचा चढ किंचित कमी झाला,

डोंगरमाथा जवळ येतोय असं वाटलं, येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या धीर देऊ लागल्या, आजूबाजुच्या झाडांना सळसळवून सुखद वाऱ्याच्या झुळका आजूबाजूने वावरू लागल्या, थकवा कमी झाल्याचे जाणवू लागले, आणि साधारण पंधरा ते वीस मिनिटांनंतर रस्त्यावर बरीच गर्दी दिसायला लागली. आतापर्यंत गेलेल्या अनेक गाड्या तिथे थांबलेल्या दिसल्या. काय झालं बाबा इथे? असा विचार करत आम्ही त्या गर्दीपर्यंत पोचलो.

"परिक्रमावासी आगये, परिक्रमावासी आगये" असे म्हणत आठ-दहा लोकांनी आमच्या भोवती गराडा घातला. आम्हाला बसायला सतरंजी अंथरली. त्यातल्या दोघांनी दोन ताटल्या मध्ये गरमागरम, भरपूर तूप घातलेले मुगाची खिचडी, खीर आणि पाण्याने भरलेले मोठाले पेले आमच्या समोर ठेवले. इथे एक छोटसं देवीचं मंदिर आहे. इतकं छोट की ते गर्दीमुळे आम्हाला दिसेना. मंदिरात वाकून जावं लागतं. इथं कोणी पुजारी नाही की कुणी देखभाल करणारा नाही. मंदिराला दोन दारं, एक समोरच, एक मागचं. दारांना पल्ले नाहीच...उघडीच ती... आत देवीची मूर्ती.. लहानशी.. कुणी भक्तांनी या देवीचा भंडारा घातला होता. इथे रोजची पूजा देखील होत नाही. गावापासून अत्यंत लांब असल्याने फारशी कुणाची येजा ही नाही. वर्षा-दोन वर्षांतून एखाद वेळेस कोणी तरी भक्त असा भंडारा घालतो, अन आमच्या सारखे परिक्रमावासी तिथून तृप्त होऊन जातात... मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पुन्हा मिळालं होतं. नर्मदे हर म्हणायची देखील गरज पडली नव्हती. काही बोलायलाच नको होतं. फक्त प्रामाणिक पणे मनातल्या मनात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर माझे नर्मदामाई या निसर्गाच्या कर्वे मला देतही होती आणि माझ्या इच्छा पूर्ण ही करत होती.

गरमागरम खिचडी चहा झाल्यानंतर आम्ही तिथे थोडा काळ विसावलो. खरंतर आज इथेच थांबावं असं वाटत होतं. पण इतक्या छोट्या मंदिरात राहता येणं शक्य नव्हतं आणि अजून जेमतेम दुपारचे दोन अडीच झाले होते. तास दोन तास सहज चालू शकणार होतो,

म्हणून पुढे जायचं ठरवलं. पुढचा चढ-उतार बरंच अंतरपर्यंत सूरु होता. मध्ये काही गावं लागली देखील. पण आता थकवा नाहीसा झाल्यामुळे आम्ही पुढे चालत राहिलो.

आता सपाट रस्ता आला होता मात्र या सपाट पणा बरोबर आजूबाजूचा निसर्ग भकास झाला होता. दोन्ही बाजूला सपाट मैदान आणि मधून जाणारा कच्चा पण मोठा रस्ता. रखरख ऊन. नजर जाईल तिथपर्यंत नुसतं सपाट मैदान. इथे एक गंमत झाली बरं का. आमच्या मागून एक मोठी कार आली. गाड्या आल्या की लोक परिक्रमावासी ना काहीतरी दान करतात. त्यांनी आम्हाला थांबवलं, आम्ही थांबलो. त्यातून एक बडी असामी माणूस आणि त्याची नव्वदीच्या घरातली आई खाली उतरले. नर्मदे हर झालं. थोड्याफार गप्पा गोष्टी झाल्या. हा माणूस या क्षेत्राच्या सगळ्यात श्रीमंत व्यक्तींपैकी एक. भरपूर जमिनीचा मालक आणि कपड्याचा व्यवसायी. कशाची म्हणून कमी नाही. या काकांनी आम्हाला भरपूर बिस्किट, चिवडा आणि इतर खाऊ दिला. मात्र निघताना गंमतच झाली. ह्या आजी माझ्याकडे बोट दाखवून म्हणाल्या, तुम्ही डोक्याला बांधलेला रुमाल मला द्या. “मै तुमको दुसरा रुमाल दिलाती हू, लेकिन ये रुमाल मुझे चाहिये. हमारा कपडो का व्यवसाय है तुम्हारे लिये नये कपडे भिजवाती हूं लेकिन मुझे रुमाल चाहिए…” आजपर्यंत आमच्याकडं कधीही कोणी काही



मागितलं नव्हतं, फक्त सगळं दिलं होतं. मी डोक्यावरचा रुमाल काढला आणि आजींच्या हातावर ठेवला. त्यानंतर त्या आजींनी जे केलं ते पाहून

*हा असा भकास रस्ता, बिझौरीकडे जाताना चा*

माझे डोळे भरून आले. माझ्या डोक्यावरचा बांधलेल्या रुमाल त्या आजींनी स्वतःच्या डोळ्याला लावला छातीशी कवटाळला आणि तो रुमाल त्या काकांच्या डोक्याला बांधला. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू होते. त्यांनी त्यांचा एक हात माझ्या डोक्यावर ठेवला आणि म्हणाल्या, "अपने बेटे से ज्यादा एक मा को और क्या चाहिये? आप परिक्रमा मे हो, इसलिये मेरा रोना तुम्हारे सामने नही रोऊंगी, तुम्हारा ये रुमाल मेरे बच्चे के सर पर सुरक्षा छाया जैसा रहे यही प्रार्थना मेरे लिये करना..." त्या काकांना काय त्रास होता ते मी देखील विचारलं नाही. आजींनी मला मिठी मारली आणि त्या मिठीत असताना मनातल्या मनात नर्मदा माईला प्रार्थना केली "माऊली ह्या आईची इच्छा पूर्ण होवो.... "

त्या आजी आणि काकांना निरोप दिला आणि आम्ही हळूहळू पुढे निघालो. मध्ये एक दोन गाव लागलेत पण गावांमध्ये आश्रम नव्हता आणि राहता येईल असं घर ही दिसत नव्हतं. घर बरीच लहान होतीत आणि परिक्रमावासी ना आपल्या घरी बोलण्याची फारशी इच्छा कोणाची दिसत नव्हती म्हणून आम्ही पुढे पुढे चालत राहिलो. आता संध्याकाळ होत आली होती आणि कुठेतरी निवारा शोधण गरजेचं होतं. दूर एक सुंदर बंगला दिसत होता. कदाचित या गावातलं सगळ्यात मोठं घर असावं. गावाचं नाव बिझौरी. त्या घराकडे पाहून वाटलं ह्या घरची माणसं मालमत्ते दार दिसतात. इथे अंगणात जरी राहायला मिळालं तरी हरकत नाही. बघुया पुढे काय होतंय ते असा विचार करत करत पुढे निघालो. वाटेत सायकल चालवणारी लहान मुलं दिसली. त्यातला एक मुलगा, साधारण सात आठ वर्षाचा. त्याने थांबून आम्हाला नर्मदे हर केलं आणि म्हणाला "आगे एक आटाचक्की है, परिक्रमावासी की व्यवस्था होती है. " वा कुठे का होईना आमची आजची व्यवस्था होणार होती. आम्ही त्या मुलाला विचारलं "कहा है चक्की, तर म्हणाला व सुंदर सा बडा बंगला दिख रहा है उसके बाजू में आ जाओ आप". आम्ही ज्या बंगल्याकडे बघत होतो त्याच्याच बाजूला चक्की होती. चला सोय झाली म्हणायची! आम्ही हळूहळू त्या घरापर्यंत पोहोचलो. चक्की कुठे विचारलं आणि राहण्याची व्यवस्था होईल का ते विचारलं. त्या बंगल्यात न एक म्हातारे आजोबा बाहेर आले आणि म्हणाले " ये चक्की

भी मेरी है, बंगला भी मेरा है. चक्की मे क्यू रहोगे? हमारे घर उपर के मंजिल मे परिक्रमावासी की व्यवस्था की है. आप हमारे घर मे रहोगे. किसने बताया आपको हमारे बारे मे?" आम्ही त्या आठ वर्षाच्या मुलाचा वर्णन केलं तसं त्या आजोबांनी त्या मुलाला आवाज दिला "अमन बहार आओ.. " अमन हा त्या आजोबांचा पणतु. पण आमच्या घरी या असं काही तो बोलला नाही, या घरात सोय होते किंबहुना चक्की मध्ये सोय होते असं त्यांनी आम्हाला का सांगितलं ते तोच जाणे. एक मात्र नक्की या क्षणाला मनात विचार आला की या मोठ्या घरात सोय झाली तर आपलं ओझं कुणावर येणार नाही त्या क्षणाला अमन नी आम्हाला थांबवलं आणि त्या बंगल्याची वाट दाखवली. तिथेच आमची भेट भूपेनशी झाली. भूपेन हा या आजोबांचा नातू. त्याची आई, त्याची काकी... त्यांच्यातलीच एक मी होऊन गेले थोड्याच वेळात! मग स्वयंपाक घरात बसून स्वयंपाक करता करता गप्पा झाल्या. हे म्हातारे आजोबा आमचं जेवण होईपर्यंत थांबून होते. फाइव स्टार सोय इथल्या छोट्याशा गावात झाली होती. हो आंघोळीला वॉटर हीटर पासून तर थंडी वाजू नये म्हणून रुम हिटरपर्यंत व्यवस्था इथे होती.

दुसऱ्या दिवशी तिथून पुढे निघालो. वाटेतल्या अन्नपूर्णा मंदिरात अन्नपूर्णेचा प्रसाद घेऊन निघालो. तिथेही एक गंमत झाली. तिथल्या प्रसादीची वेळ दुपारी एक वाजताची मात्र आम्ही सकाळी सात वाजताच निघालो असताना मंदिरातून एका गृहस्थाने आवाज दिला. चाय नाश्ता तो करलो. दर्शनाला जायचं होतं त्यामुळे मंदिरात गेलो. हे मंदिर पुरातन मंदिर आहे गणपती मंदिर, देवी मंदिर, राम मंदिर अशी काही मंदिर येथे आहेत. ते दर्शन घेऊन मंदिरातल्या देखभाल करणाऱ्या बाईकडे गेलो तो त्यांनी साबुदाण्याची खिचडी बनवली होती. कुणालातरी उपास होता म्हणून खिचडी बनवली आणि तो प्रसाद आम्हाला ही मिळाला अगदी पोटभर.

तिथून पुढे करोंदी मार्गे विक्रमपूरकडे जायला लागलो हा रस्ता निलगिरीच्या झाडांनी भरलेला. बरेच चढ-उतार, बरेच पूल, पण वातावरण अगदी छान होतं त्यामुळे फारसा थकवा जाणवला नाही. पुढे विक्रमपुरला जाताना आम्हाला डॉक्टर पंकज जैन आणि डॉक्टर श्वेता जैन

भेटलेत, जोगी टिकरियाच्या आधी एक छोटासा कृष्ण कन्हैया भेटला. त्याची गंमत नक्की सांगेन. मात्र अनुभव आला तो जोगी टिकरियाच्या पुढे. देवरा ते इटोर म्हणजे शेष घाट कडे तर फारच रोमांचक असा प्रवास घडला. देवराला गेलो तो आमच्या सोबत कोणीतरी शक्ती चालत असल्याचा भास झाला, आपण अगदी शब्द बोलावा किंवा विचार करावा आणि चटकन तसंच घडावं असं आठ-दहा वेळा झालं. आणि काहीतरी झालं अविश्वसनीय ...सांगणारे पण पुढच्या भागात

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ६९

नर्मदे हर.

मागच्या भागात मी तुम्हाला बिझौरीच्या मुक्कामाबद्दल सांगितलं होतं. माझा रुमाल घेऊन काकांच्या डोक्याला बांधणाऱ्या आजीबद्दल सांगितलं होतं. आता पुढे चलू यात.

विक्रमपूर साधारणपणे दहा-बारा किलोमीटर दूर असेल. हा रस्ता हायवे आहे. अनेक पूल रस्त्यावर बांधलेले आहेत आणि आजूबाजूला पर्वत असल्यामुळे रस्ता निसर्गरम्य आहे. सगळीकडे नीलगिरीची झाडे कुणीतरी उभी करावी तशी रांगेत लागलेली आहेत. गंमत म्हणजे त्यांची उंची सुद्धा जवळ जवळ सारखी. त्यांच्याकडे पाहून मला शाळेत प्रार्थनेसाठी उभ्या असलेल्या मुलांची आठवण झाली.

तर या रस्त्यावरून मी आणि बाबा आम्ही रमत गमत जात होतो. एवढ्यातच आमच्याजवळ एक पांढऱ्या रंगाची मोठी गाडी येऊन थांबली. त्यात होते डॉक्टर पंकज जैन आणि डॉक्टर श्वेता जैन. ही दोघं जबलपूरची राहणारी. श्वेता लहान मुलांची डॉक्टर तर पंकज जी सर्जन. आम्हाला आनंदाने, रमत गमत चालताना पाहून दोघे उतरून खाली आली. नर्मदे हर झालं थोड्याफार गप्पा झाल्या. जवळच्याच एका छोट्याश्या टपरीवर त्यांनी आम्हाला चहा पाजला. आम्ही तुम्हाला जोगी टीकरियापर्यंत सोडून देतो, आम्हाला दिंडोरीला जायचय असा दोघांनी खूपच आग्रह धरला पण आम्ही गाडीमध्ये बसत नाही म्हंटल्यावर डॉक्टर श्वेता म्हणाल्या “मग मी देखील तुमच्यासोबत पायी चलेन”. मग मी बाबा आणि डॉक्टर श्वेता पाई चालू लागलो. डॉक्टर पंकज गाडी घेऊन थोडं अंतर पुढे जायचे आणि तिथे थांबून आमची वाट बघायचे. अगदी विक्रमपूर येईसतोवर डॉक्टर श्वेता आमच्याबरोबर पाई चालत राहिल्या.

विक्रमपूरला मात्र आता उशीर होईल असं म्हणत डॉक्टर पंकज ने डॉक्टर श्वेताला गाडीत बसवून घेतलं आणि आम्हालाही आग्रह करू लागले. आम्ही नकार दिलेला पाहून निदान तुमचं सामान तरी आम्हाला द्या आम्ही ते जोगी टीकरीयाला सोडतो असा हट्टच धरला. माझ्या पाठीवरचे सामान मी कोणालाही देणार नाही हे शूलपाणीच्या झाडी पासून मी ठरवलंच होतं. त्यामुळे माझा तसा संकल्प आहे म्हटल्यावर बाबाचं सामान आम्ही गाडीत टाकलं. ठरल्याप्रमाणे पंकज आणि श्वेता जैन यांनी जोगी टिकरीयाला ललिता बाईंच्या आश्रमावर आमचं सामान नेऊन पोहोचवलं. जैन दंपत्याला मुल-बाळ नाही मात्र गरीब लहान मुलांची सेवा करण्यातच मला आनंद मिळतो हे श्वेता ताईंचे वाक्य! "श्वेता खुश असली की मी ही खुश असतो, आम्हाला दोघांना कदाचित गरीब मुलांचा सांभाळ करण्यासाठीच देवाने निर्माण केल आहे त्यामुळे आम्हाला मुल नसण्याचा त्रास आता आम्हाला होत नाही. आधी फार वाईट वाटायचं, आता उलट बरं वाटतं की कुठल्याही जबाबदारी विना आम्ही आमचा संपूर्ण वेळ, संपूर्ण लक्ष, आणि संपूर्ण पैसा गरीब मुलांच्या स्वास्थ्यासाठी खर्च करू शकतो. एकच काय, तर ही सारी सारी मुलं आमचीच आहे असं मला नेहमी वाटत असतं. देव करतो ते योग्यच करतो फक्त त्याचा निर्णय आपल्याला समजायला वेळ लागतो हे आम्हाला पक्क समजून आलय. "

खरंच आपल्या आजूबाजूला असे अनेक लोक असतात ज्यांच्या कडून खूप खूप शिकण्यासारखं असतं. गरीब मुलांच्या स्वास्थ्याचा वसा घेणार हे दंपत्य! कुठली संस्था नाही की कुठली पब्लिसिटी नाही. औषधांच्या बॅगाच्या बॅगा यांच्या गाडीत असतात. आठवडाभर आपापल्या क्लिनिक मध्ये काम केल्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी ही दोघं कुठल्यातरी आदिवासी गावाच्या दिशेने पुढे निघतात आणि आदिवासी गावांची किंवा गरीब मुलांची विनामूल्य सेवा सतत दोन दिवस करून रविवारी रात्री पुन्हा जबलपूरला आपल्या घरी पोहोचतात. सेवा करायला पैसा लागत नाही सेवा करणारं मन असावं लागतं सेवा करणारं

हृदय असावा लागतं.... सेवा करावी हे फक्त तुमच्या मनानं घेतलं पाहिजे...खरंच डॉक्टर श्वेता डॉक्टर पंकज बरोबर घालवलेला फार थोडा वेळ मला फार मोठी गोष्ट शिकवून गेला.

पुढे ललिता बाईंकडे फार चांगली सोय झाली. तसा आश्रम सांभाळणारे अविनाश सोळंकी दुबई वासी. यांच्याबद्दल तुम्हाला मी या अनुभव मालिकेच्या सुरुवातीच्या भागांमध्ये सांगितलं होतं.

अरे हो कृष्ण कन्हैयाची गोष्ट राहिलीच नाही का सांगायची!

जोगी टिकरियाच्या साधारण तीन-चार किलोमीटर आधी असेल. एक छोटीशी चहाची टपरी आणि बाजूलाच बिस्किटे चिवडा असे मिळणारे छोटंसं दुकान होतं. आम्ही पाणी प्यायला म्हणून येथे थांबलेलो. पाणी पिऊन चार पावलं पुढे जात नाही तो दोन अडीच वर्षाचा एक छोटासा बालक धावत धावत आमच्या मागे आला. त्यांनी माझी ओढणी धरली आणि म्हणाला "आओ मैयाजी, चाय नाष्ता करलो" त्याचे बोबडेसे बोल मात्र मोठ्यांसारखे शब्द ऐकून त्याची जरा गंमत वाटली, पण तो इतक्यावर थांबला नाही. तो काही माझी ओढणी सोडायला तयार नव्हता आणि आम्हाला खेचत पुन्हा तो त्या दुकानात आम्हाला घेऊन गेला. या एवढ्याश्या बाळाला परिक्रमेबद्दल अनेक गोष्टी माहित होत्या हे बघून आम्हाला आश्चर्यच वाटलं. "अरे मा कुछ बिछा दो मैया जी के लिये कुरसी मे थोडे ना बैठेंगे" तो बोलू लागला... "दादी गुड चाहिये" आता त्याने त्याच्या आजीला हुकुम सोडला. पाणी आणि गुळाचा खडा घेऊन त्याची आई बाहेर आली आणि आमच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून म्हणाली "ये तो अपने दादाजी की कॉपी करता है; इसको सब मालूम है, पूछो आप, देखो कैसे जवाब देगा".. बघावं विचारून, "बाबाजी जोगी टिकरीया कितना दूर है? मी गंमत म्हणून विचारून पाहिलं, "६ किलोमिटर..." त्यांनी चटकन उत्तर दिलं. काही प्रश्न आणि त्यांची उत्तरं हे त्याच्यासाठी अगदी रोचेचच असलं पाहिजे. त्याच्या तोतड्या बोलातून गोडवा ओतप्रोत बाहेर पडत होता. हा काही साधासुधा बालक नसावा. इतक्या लहानपणापासून सतत येणाऱ्या जाणाऱ्या नर्मदा परिक्रमा

वासींशी यांचा संपर्क. रोजच हा येणाऱ्या जाणाऱ्या परिक्रमावासी ना चहाला आग्रह करतो असं याचे आजोबा सांगतात. वय वर्ष जेमतेम अडीच, तीनच्या वर अगदी नक्की नाही... काय ही मैयाची कृपा... इतक्या लहान वयापासून तो मैयाच्या आणि मैया भक्तांच्या इतक्या जवळ आहे. त्याच्याशी अगदी मनभर गप्पा मारून तास-दीड तासाने आम्ही तिथून निघून मग जोगी टिकरीयाला पोहोचलो. तुमच्या साठी त्याचा फोटो पण दिलाय बघा मी.




जोगी टिकरिया पासून पुढे मैया किनाऱ्याने मार्ग आहे. शेतातून आणि पुढे छोट्या छोट्या टेकड्या चढून उतरून आम्ही अशा एका ठिकाणी आलो जिथे पुढे रस्ताच नव्हता. आम्ही अगदी मैय्याच्या किनाऱ्यावर आणि पलीकडच्या किनाऱ्यावर दूरवर दिंडोरी गाव वसलेलं दिसत होतं. पण आता जायचं कुणीकडे? काही ठिकाणी शेतीला कुंपण लावलेली होती. एक ओढा मैया येऊन मिळत होता तो पार करूनच जाणं

*हाच तो कृष्ण कन्हैया*

आवश्यक वाटत होतं. इथून खरी एक गंमत सुरू झाली. मागच्या भागात म्हणाले होते न मी अविश्वसनीय असं काहीतरी घडलं त्याची सुरुवात म्हणजे हा ओढा. इथे आम्ही थोडावेळ आराम करत बसलो. या ओढ्याला साधारण गुडघ्याइतके पाणी असेल. पाय ओले करायचा

कंटाळा आलेला म्हणून मी बसले खरंतर. आणि तिथे बसल्या बसल्या दगडांचा छोटासा ढीग तयार केला... तो ढीग बघून बाबा बोलला, “वा काय मंदिर बांधलय ताईंनी.... चला आता नर्मदा मंदिरात जायचं पुढे, नाहीतर याच मंदिरात राहायला लागेल”... मी पण थट्टा मस्करीत बाबाला बोलून गेले, “हो मग राहील नं ह्याच मंदिरात, नाहीतर असं करेन जिथे कुठे मी राहील ना तिथे हे मंदिर पण येईल माझ्यासोबत”... या बोलण्याला काहीही अर्थ नव्हता. ही केवळ थट्टामस्करी. मात्र यानंतर आपल्यासोबत खरंच कोणीतरी चालतंय असा भास वारंवार होऊ लागला. ते लक्षात कसं आलं माहिती आहे का?

आम्ही पुढे चालू लागलो. देवरा गाव थोडं समोर होतं त्याआधी लंबे नारायण गुफा म्हणून एक गुहा लागते. शेतात काम करणाऱ्या एका माणसानं सांगितलं “वहा के दर्शन करना और वही रुक ना आज रात. ” आम्ही दर्शनाला आत गेलो, मात्र गुहेच्या तोंडाशी असताना तिथल्या साधू महाराजांकडे बघताक्षणी इथे राहायचं नाही असा विचार माझ्या डोक्यात डोकावला, खरंतर काहीही कारण नव्हतं, आणि पुढच्याच क्षणी बाबा मला म्हणतो “अगं इथे नकोय राहायला हं, मला या साधू महाराजांकडे पाहून अचानक काही तरी झालं आणि वाटलं इथे नकोच राहायला, खूप स्ट्राँग फीलींग आलंय त्यामुळे आपण इथे राहणार नाही पुढे जाऊ”. दोघांच्याही मनात एकाच वेळी एकच विचार आला वाटलं कोईन्सिडन्स आहे... दर्शन घेऊन पुढे निघालो.

देवरा गावाच्या तोंडावर असतानाच पुन्हा एक गंमत झाली. मी बाबाला म्हणाले आज आपल्याला निवारा शोधायला लागणार नाही सापडेल आपोआप, आणि त्याच क्षणी बाबा म्हणाला बघ गावात गेल्या गेल्या दुसऱ्या-तिसऱ्या घरातून आपल्याला बोलावणं येईल. पुन्हा एकदा आम्ही दोघांनी एकच विचार मांडला तोही एकाच वेळी... आणि गंमत अशी की हे विचार इतके इंस्टंट मनात येत होते की जणू कोणीतरी दुसरंच आपल्याला काहीतरी सांगतय.... आणि त्याहून अविश्वसनीय म्हणजे हे एक सारखे विचार आमच्या मनातत एकाच

वेळी यायचे. कोइंसीडन्स काय दोनदा होत नाही? असेल कोइन्सीडन्स...असं म्हणून आम्ही पुढे निघालो. दोन-तीन घर सोडले न सोडले तोच एका माताजींनी आवाज दिला. "अरे बाबाजी, मैया जी कहा जा रहे हो? अभी तो शाम होने को है यही रुक जाओ हमारे घर".... मी आणि बाबांनी एकमेकांकडे पाहिलं... जसं आमच्या मनात आलं होतं तसं झालं होतं.... अगदी तिसऱ्याच नाही, पण अगदीच चौथ्याच घरातून आम्हाला आवाज देण्यात आला होता.

आम्ही घरात केलो, चहापाणी झालं, समोरच्या खोलीतच आमच्यासाठी सतरंजी अंथरली. घरातल्या बायका भोजन प्रसादीची तयारी करू लागल्या. त्यांच्या घरातली एकंदर परिस्थिती पाहता मनात विचार आला, जेमतेम दोन खोल्यांचे घर आपण जर येथे यांच्या घराच्या समोरच्या खोलीत झोपलो तरी या मंडळींना स्वयंपाक घरात झोपण्या शिवाय पर्याय नाही... थोडसं वाईट वाटलं मला, आणि नेमका तेव्हा बाबा म्हणाला "घर लहान आहे यांचं, आपण अंगणात लावू आसन. मी म्हणतो त्यांना तसं", .. अरे हे काय? पुन्हा आमच्या दोघांच्या मनात एकच विचार मात्र यावेळी हा कोइंसिडन्स नाही हे ठरवणारी अजून एक घटना घडली. ज्या मैयाजींनी आम्हाला आत बोलवलं होतं त्या आल्या आणि म्हणाल्या, "यहा पे आपको परेशानी हो रही होगी तो सामने वाला घर बंद है उसको खुलवा देती हू आप वहा सोना आराम से", .. आतापर्यंत फक्त आमच्या दोघांच्या मनात एक सारखे विचार येत होते आता मात्र त्या माताजींनी ही आमच्या विचाराला दुजोरा दिला. आम्ही हो म्हणालो आणि समोरचं घर उघडून साफ करायला त्यांचा मुलगा किल्ली घेऊन गेला. घरात लाईट नव्हते त्यामुळे एक कंदील घेऊन त्या मुलाने एक खोली स्वच्छ करून दिली. भोजन प्रसादी झाल्यानंतर आम्ही आराम करायला समोरच्या घरी गेलो. तिथे पुन्हा गंमत झाली.

घरात पूर्ण अंधार. आमच्या जवळचा टॉर्च आणि आमचा मोबाईल. या घराच्या पायऱ्या चढताना जागा माहीतिची नसल्यामुळे थोडं डगमगले मी, ते पाहून बाबा म्हणाला, "जंगलात नाही घाबरलीस आणि अंधाराला घाबरतेय का? हनुमान चालीसा म्हण घरात भीती वाटत

असेल तर...” खरंतर भीती वाटण्याचे काही कारण नव्हतं. मला भीती वाटतही नव्हती. पण तरी का कोण जाणे, बाबा असं बोलून गेला.

तसं आमच्या संध्याकाळच्या आरती पूजेमध्ये रोजच हनुमान चालीसा असायचाच, तरीही बाबा म्हणाला म्हणून आणि मी हनुमान चालीसा म्हणायला सुरुवात केली उगाचच...मला हनुमान चालीसा फार आवडतो, म्हणून! आम्ही आत गेलो. सतरंज्या अंथरुन ठेवलेल्या होत्याच. आमच्या स्लीपिंग मॅट आणि पांघरूणं काय ती काढायची होती. मोबाईलचा टॉर्च लावला, आणि प्रकाशाचा झोत समोरच्या भिंतीवर पडला. भिंतीकडे नजर गेली तो जे पाहिलं ते खूप विलक्षण होतं. भिंतीला टेकून खुद्द मारुतीराया उभे होते. मारुती रायांचं खूप विलोभनीय चित्र भिंतीला टेकवून उभं केलं होतं. जणू मी हनुमान चालीसा म्हटला म्हणूनच मारुतीराया समोर येवून उभे राहिले. असे एकामागोमाग एकेक प्रसंग घडत राहिले. मनात एखादा विचार येतो, कधी बाबा बोलून दाखवतो, कधी समोरच्या बाई बोलतात, कधी आम्ही दोघही एकाच वेळेस बोलतो, कधी साक्षात मारुतीराया समोर येतात आणि हे सगळं आपोआप घडत नाही सारखं कोणीतरी सुचवल्या सारखं होत असतं इतक्या सगळ्या प्रसंगानंतर खरंच हे जाणवू लागलं की नक्की, नक्कीच कुणीतरी हे करवून घेणारं, हे घडवून आणणारं असलं पाहिजे.



*<u>जोगी टिकरीया चा आश्रम, हिरव्या साडीत ललिता बाई</u>*

असे आणि याहूनही वेगळे, अजूनही अनुभव आलेच.. कंचन पूर, शिवाला घाट, दम्हेडी.. तीन ठिकाणाचे तीन अनुभव... आणि तिन्ही अगदीच वेगळे... सांगणारे, पण पुढच्या भागात.. !

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७०

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला मारुतीरायांच्या फ्लेक्सबद्दल सांगितलं होतं. देवराला आम्हाला कसं बोलवून घेतलं, आमच्या मनात लंबे नारायण गुहेच्या साधू महाराजांबद्दल अचानक असे नकारात्मक विचार कसे आले आणि तिथे राहू नये असं ठरवलं, आमची एकूण एक इच्छा, आमच्या मनात येणाऱ्या एकूण एक विचार हा अगदी चपखलपणे खरा कसा ठरत होता, हे मी तुम्हाला मागच्या भागात सांगितलं होतं. जणूकाही आमच्यासोबत कुणीतरी चालतय आणि कुणाचे तरी विचार आमच्या विचारांच्या माध्यमातून बाहेर येतात असं काहीच आम्हाला जाणवत होतं. आता इथून पुढे सांगते.

देवरा नंतर धुरा, लूट गाव, रामघाट असं करत करत आम्ही दुधी घाटापर्यंत आलो खरं मात्र हा सगळा रस्ता कच्चा रस्ता होता. कधी शेतातून तर कधी मैया किनाऱ्याने वाट काढत काढत जायला लागलं. शेष घाटावर पोचायच्या आधी तर ओसाड माळरान असावं की काय असाच रस्ता होता. पाऊलवाट नाही, पक्का रस्ता नाही, कुणीकडे जायचं समजत नाही... आम्ही आपलं मैया उजव्या हाताला ठेवून चालत रहायचं इतकंच काय ते ठरवलं होतं. मात्र मध्ये पर्वता सारखा आकार असल्यामुळे मैया नेमकी किती दूर आहे हे दिसत नव्हतं. फक्त दिशा तेवढी कळत होती, तीदेखील सवयीमुळे.

शेष घाटाच्या अलीकडे तर मजाच आली. एक छोटंसं मंदिर दिसलं त्यात आम्ही थोडावेळ विसाव्यासाठी म्हणून थांबलो. मंदिरात कोणीही नव्हतं मात्र समोरून सायकलवर एक माणूस येताना दिसला. त्याला थांबवून पुढचा रस्ता विचारला, आणि दोन शेतं दाखवून,

त्याला वळसा घालून, दूरवर ते भगव्या रंगाचे मंदिर दिसत आहे तोच शेष घाट, असं त्याने आम्हाला सांगितलं. आता ते मंदिर डोळ्यापुढे ठेवून आम्ही चालू लागलो. पाऊल वाट किंवा रस्ता नाही. एक तर शेतातून जायचं किंवा शेतांना वळसे घालत घालत जायचं.

झाडं नाही शेतात, अगदी ओसाड माळरान. रस्ते सरळ नाही खूपच उंच-सखल. अशात खूप दूरवरून आम्हाला दोन परिक्रमावासी आमच्या दिशेने येताना दिसले. म्हटलं चला यांची सोबत होईल. आम्ही त्यांची वाट पाहू लागलो. ते हळूहळू आमच्यापर्यंत येऊन पोचले. नर्मदे हर झालं. "शेष घाट जा रहे हो महाराज जी?". मी विचारलं आणि त्यांनी होकार अर्थ मान हलवली. मात्र मजा अशी झाली की आम्हाला जो रस्ता त्या सायकल वाल्या मुलानी सांगितला होता त्याच्या अगदी विरुद्ध रस्ता या दोन परिक्रमावासी ना दुसऱ्या कोणीतरी सांगितला होता. आता तेही आणि आम्ही ही गोंधळात पडलो कारण रस्ता कन्फर्म करायला कोणीच नव्हतं. मग आम्ही आम्हाला सांगितलेल्या रस्त्याने चालू लागलो आणि ते त्यांना सांगितलेल्या रस्त्याने जाऊ लागले.

खूप भरकटत शेतातून वाट काढत काढत आम्ही जात होतो. कुठे जायचं काहीच समजत नव्हतं. अशातच अचानक चार-पाच बायका आल्या आणि त्यांनी शेष घाटचा रस्ता सांगितला. आम्ही पोहोचलो आणि पाठोपाठ ती दोघं परिक्रमावासी देखील पोहोचलेत. ते आणि आम्ही वेगवेगळ्या रस्त्याने आलो होतो का एकाच ते काही माहीत नाही, मात्र त्यांनाही रस्ता सापडत नव्हता आणि त्यांनाही चार-पाच बायकांनीच रस्ता सांगितला होता.

शेष घाटावर थोडावेळ विश्राम करून आम्ही पुढे कंडीकापा मार्गे शिवाला घाटला जायचं ठरवलं. पण कंडी कापापर्यंतच आम्ही जाऊ शकलो. इथे एक शेतातली झोपडी होती, इथे कसलीही सोय नव्हती. फक्त पाण्याने भरलेला एक घडा ठेवलेला होता आणि एक माणूस शेतात काम करत होता. अगदी तासाभरात अंधार पडेल अशी वेळ. तो म्हणाला "आप ईटोर चले जाओ. यहा रुकना सही नही है. " इटोर साधारण तीन-चार किलोमीटर दूर असणार.

म्हणजे तिथवर पोहोचेस्तोवर आम्हाला नक्कीच अंधार होणार होता मात्र इटोरच्या शाळेत व्यवस्था होईल असं या माणसाने सांगितलं आणि आम्ही झपाझप पावलं टाकत इटोरला पोचलो. इटोरच्या शाळेत गेल्यावर शाळा बंद आहे आणि इथे आता व्यवस्था होत नाही असं समजलं. आता कोणाच्या तरी घरी, अंगणात आश्रय घ्यावा लागणार होता. वस्ती अजून थोडी दूर होती. आम्ही वस्तीत शिरलो आणि एका किराणा दुकानात व्यवस्थेसाठी चौकशी केली. दुकानासमोर उघड्यावर झोपता येईल आणि भोजन प्रसादीची व्यवस्था आमच्याकडे होऊ शकणार नाही कारण आमच्या कुटुंबात मयत झाली आहे असं समजलं. मग इथे राहूच नयेत असं वाटलं मात्र आता अंधार पडून झाला होता. आता रस्त्यावर आसन लावण्या शिवाय पर्याय नव्हता आणि जवळ जे काही असेल ते खाऊन आजची रात्र घालवायची होती. रस्त्याच्या पलिकडे एका झाडाखाली थोडी मोकळी जागा होती तिथेच आसन लावायचं असं ठरलं.

पिण्याचं पाणी संपलं होतं म्हणून बाबा म्हणाला “मी पुढच्या घरातून प्यायचं पाणी घेऊन येतो” हे घर मयतिच्या घरापासून साधारण दोन इलेक्ट्रीकच्या पोल अंतरा इतकं दूर होतं आणि मध्ये ओसाड जागा होती. बाबा प्यायचं पाणी घ्यायला गेला तो येताना दोन तीन माणसांना घेऊनच आला. आमचं सगळं सामान उचलून घेऊन जाऊन त्या घरात नेण्यात आलं. तेही एक किराणा दुकानच होतं, मात्र दुकानातल्या वस्तू, पोती हलवुन त्या दुकानदाराने आमची राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था न विचारता केली होती. “परिक्रमावासी बाहर सोयेंगे अच्छा नही लगता. माताजी आई है तो हमारे दुकान मे ही आप सो जाओ” असं म्हणून दुकानातल्या मुलांना त्या दुकानदाराने आमचं सामान घ्यायला पाठवलं होतं. तिथे खूप छान व्यवस्था झाली. गरमागरम खिचडीची भोजन प्रसादी झाली. अगदी अनपेक्षित पणे नर्मदामैया जेवण आणि आसरा दोन्हीही देतेच. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर बाहेर पडलो आणि आज इतका उशीर लावायचा नाही, चार-साडेचारला जिथे कुठे असू तिथे थांबून जायचं असं आम्ही ठरवलं.

पण आपण ठरवतो तसं होत नसतं. आता आम्ही इटोर होऊन तेडी संगम मार्गे शिवाला घाटला जायला निघालो होतो. शेतातले रस्ते हा प्रकार काही संपत नव्हता. शिवाला घाटपर्यंत आम्ही पोचू शकलो नाही. चंदन घाटला तसा संकेत आम्हाला मिळाला होता पण, तेव्हा फक्त दोन वाजले होते त्यामुळे आमच्या हातात साधारण दोन-अडीच तास अजून आहेत, त्यामुळे आपण थोडं पुढे जाऊ शकतो असा विचार करून आम्ही पुढे निघालो. शिवाला घाटला पोचू शकलो नाही मात्र रस्त्यात गावं होती आणि गावात कुठेतरी व्यवस्था होईलच हे माहीतच होतं. आम्ही कन्चनपुर इथे येऊन पोचलो.

कंचनपूरला आल्यानंतर इथलं एकंदरीत वातावरण पाहून आम्ही जरा बिचकलोच. गावातल्या चौकाचौकात व्यसनाधीन माणसं शेकोटी पेटवून बसलेली दिसत होती. घरं अतिशय गरीब. घरातल्या बायकांना विचारल्यानंतर नवऱ्याला विचारून सांगेन आणि नवरा घरी नाहीत अशी उत्तरं मिळालीत. आता अशात एखादा शाळा शिक्षक किंवा गावचा सरपंच यांचेकडे जाऊन आपला प्रश्न मांडायचा असं ठरलं. गावात देऊळ नाही त्यामुळे याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

आम्ही सरपंचांच्या घरी गेलो. तिथे सरपंच यांची आई आणि बायको होत्या. त्यांनी आमची व्यवस्थित सोय केली. आम्ही गेलो त्या वेळी सरपंच बाहेर गेले होतेत. आमची भोजन प्रसादी होईस्तोवर सरपंच काही आले नाहीत. आम्ही आसनं लावली आणि झोपायची तयारी करू लागलो. बाहेरच्या ओसरीत आजींचा पलंग होता आणि खाली आम्ही दोघांनी आसन लावलीत. आम्ही झोपणार तेवढ्यात सरपंच आलेत. येऊन सरळ आमच्या पुढ्यात बसलेत. थोड्याफार गप्पा नंतर ते जातील आणि आम्ही झोपू असं आम्हाला वाटत होतं, मात्र हे सरपंच काही वेगळ्याच मूडमध्ये होते.. चंदन घाटलाच थांबलो असतो तर बरं झालं असतं असं राहून राहून आम्हाला वाटत होतं. बाबा तर फार वैतागला होता. कारणही तसंच होतं.. पण आम्हाला

संयमाने घेणं आवश्यक होतं. त्या म्हाताऱ्या बाईचा आधार वाटत होता. असं काय झालं असेल? का वैतागला असेल बाबा, काय केलं त्या सरपंचांनी... सांगते.

या गावात लाईट नाही ही आमच्या साठी जमेची बाजू ठरली. हा सरपंच येऊन बसला. तास भर गप्पा झाल्यात. तो तिथेच जेवला, तोवर सगळं ठीक होतं. नंतर तो काही उठायला तयारच नाही. तास झाला, दीड तास झाला. आम्हाचे डोळे पेंगू लागले. शेवटी बाबा बोललाच, म्हणाला, "सरपंच जी अभी आप भी सो जाईये, हमे भी नींद आ रही है, " तर म्हणतो कसा, " बाबा आप सो जाओ, हम मैयाजी से बात करेंगे" आता सगळं माझ्यावर आलेलं... मी पण म्हणाले, मुझे भी नींद आ रही है, तर म्हणाला, "इतने दिन बाद तो कोई मैयाजी मिली है, मुझे तो आपसे बाते करनी है. हे ऐकून बाबा खवळला.. डोक्यावरून पांघरूण घेऊन झोप असा मला इशारा केला, मी झोपले.. त्या आजी, सरपंचाची आई तिथेच होत्या, आणि अजून जाग्या होत्या, त्या ही आपल्या मुलाला समजावू लागल्या पण हा जाईच ना. मी डोक्यावरून पांघरूण घेतल्या नंतर ही तो बोलतच राहिला. मध्ये मध्ये "सुन तो रही हो मैयाजी" हे वाक्य असायचं. आता बाबा ही आडवा झाला. तरीही हा बोलतोच आहे. आमची आलेली सगळी झोप उडाली होती. याच्या मनात नक्की काय आहे, अशी विचित्र भीती आम्हाला वाटत होती. आम्ही निपचित पडून होतो. इथे लाईट नव्हते ही आनंदाची बाब होती आमच्यासाठी. साधारण पाऊण तासानी कंटाळून हा आत गेला. तो आत जाऊन १५ मिनिट झाले असतील, म्हणजे तो आता बाहेर येत नाही याची खात्री करून मग बाबा हळूच म्हणाला, "४ वाजताच अलार्म लाव, व्हायब्रेट मोड वर ठेव. हा उठायच्या आधी इथून निघायचं. "

ती रात्र कठीण जाणार होती, त्यातल्या त्यात थोडी सावरली गेली, असं म्हणायचं. आम्ही सकाळी अलार्मच्या आधीच उठलो. सगळं सामान सावरलं आणि बरोबर साडे चारच्या सुमाराला बाहेर पडायला तयार झालो, मात्र फाटकाला कुलूप घातलं होतं. आता पुन्हा थांबावं लागणार होतं आणि ते आम्हाला नको होतं... मग आता करायचं काय? आम्ही जाऊ शकलो,

की थांबावं लागलं आम्हाला? पुन्हा त्या माणसाचा सामना करावा लागला का? रात्री पूर्ण अंधार असल्याने त्याचा चेहरा आणि हावभाव आम्हाला दिसले नव्हते पण बोलण्यावरून अंदाज येत होता, आणि आम्हाला पुनरावृत्ती नकोच होती. पण मग झालं काय नक्की? सांगणारे पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७१

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला कांचनपूरच्या सरपंचाबद्दल सांगत होते. हा सरपंच रात्री उशिरा आला आणि त्यानंतर तो काही आमच्या समोरून जायचं नाव घेई ना. "मुझे मैया जी से बाते करनी है" असा हट्ट धरून बसला होता. कसाबसा टाळला त्याला आणि तो आपल्या खोलीत गेला. आम्ही सकाळचा अलार्म लावला होता साडेचारचा, त्याआधीच आम्ही उठलो आवर सावर केली आणि तिथून सटकायचा प्रयत्न करायला फाटकापर्यंत आलो पण फाटकाला कुलूप लागलेलं होतं. आता काय करायचं? आम्हाला आता त्या माणसाचा चेहरा सुद्धा बघायचा नव्हता. खरं काल अंधारात त्याचा चेहरा आणि त्याचे हावभाव आम्हाला दिसत नव्हते पण एकंदरीत अंदाज येत होता.

मात्र फाटकाला कुलूप होतं आणि आता थांबून राहण्याशिवाय आमच्याजवळ पर्याय नव्हता. ओसरीतच कुठेतरी किल्ली ठेवली असावी असं वाटून आमच्या नजरा किल्ली चा शोध घेऊ लागल्या. आमच्या हालचालीनी आजींची झोप उघडली. "जा रहे हो माता जी? सुबह का भोजन पाकर जाओ, " त्या म्हणाल्या... भोजन काय आम्हाला साधं पाणी सुद्धा प्यायची इच्छा नव्हती. किल्ली कुठे एवढेच काय ते आम्ही आजींना विचारलं. त्या म्हणाल्या, "मेरा बेटा बुरा इन्सान नही है, दारू सब बिघाड देती है". खरं तर नर्मदा परिक्रमावासीयांच्या बाबतीत असं घडावं असं कदाचित त्या आजीनाही पटलं नसावं, पण ती एक आई सुद्धा होती. शिवाय आपल्याकडून नर्मदा परिक्रमावासीयांची अशी गैरसोय झाली याचं तिला वाईटही वाटत असावं. ती पुढे म्हणाली, "वो दिल का बहुत साफ है, लोगो की बहुत मदद भी करता है, मेरे बहू के बारेमे बताती हू. मेरे बेटे और बहू में पंधरा साल का अंतर है. बहु पढने मे बहोत

होशियार है. घर की गरीब है, मेरे बेटे ने उसको बारवी तक पढाया. फिर दोनों एक दुसरे को पसंद आये तभी शादी करी”.

आपला मुलगा कसा चांगला आहे हेच तिला सांगायचं होतं. परिक्रमावासी ने आपल्या मुलाला शाप देऊ नये अशी तिची भावना स्पष्ट दिसत होती. “कम से कम चाय पी कर जाओ. उसको एक बार मिलकर जाओ. ” ती जीव तोडून आग्रह करत होती. एकीकडे तिथून लवकर निघून जावं असंही वाटत होतं आणि दुसरीकडे त्या आईची इच्छा, भावना समजत होती. बाबा म्हणाला आपण जाऊ पुढे, पण का कोण जाणे मी मी थांबायचा निर्णय घेतला. उजाडेस्तोवर थांबतो, चहापाणी नको, मग मात्र आम्ही निघू. मी आजींना सांगितलं. ऊजाडेस्तोवर आम्ही तिथेच बसून होतो. उजाडल्यावर आम्ही निघायची तयारी केली तेव्हा आतून सरपंच बाहेर आला. बाबाच्या पायावर डोकं ठेवलं आणि म्हणाला मुझे माफ कर दो. त्यांनी चुकूनही डोळे वर करून माझ्याकडे बघितलं नाही. काही न बोलता कुलुप उघडलं आणि आम्ही बाहेर पडलो. मैया अनेकक प्रकारचे अनुभव देते. त्यांतून अनेक शिकवणी देते. अनेक प्रश्न पुढे मांडते आणि त्याची उत्तरही स्वतःच देते. हा विषय तिथेच थांबला आणि कंचनपुर चा अनुभव तसाच आणि तिथेच सोडून आम्ही पुढे शिवाला घाटला निघालो.

शिवाला घाट हा अपभ्रंश आहे. या घाटाचं नाव शिवालय घाट असं होतं. इथे नर्मदा मैयाच्या पात्रा खाली अनेक शिवलिंग आहेत. त्यातली काही दिसतात. काहींवर मंदिरा सारखं बांधलेलं आहे. काही पूर्णपणे पाण्याच्या खाली आहेत. या शिवाला घाटावर एक कल्पवृक्ष आहे. त्या कल्पवृक्षाखाली बसले असताना हा कल्पवृक्ष आहे हे मला माहीत नव्हतं. त्यामुळे त्या कल्पवृक्षाखाली बसून देखील मी काहीही कल्पिलं नाही. माझ्याकडून कसलीही इच्छा त्या कल्पवृक्षाकडे व्यक्त केल्या गेली नाही, मात्र त्या कल्पवृक्षाच्या छायेत बसल्यानंतर अतिशय प्रसन्न, शांत, आनंददायक वातावरणाची अनुभूती झाली हे निश्चित. अर्थात माहित असतं तरी

कदाचित माझ्याकडून कसलीच कामना केल्या गेली नसती कारण माझ्या सगळ्या कामना आपोआपच पूर्ण होत होत्या....

"कल्पना विस्तार होतसे संहारू, आम्हा कल्पतरू चाड नाही...". आपण कल्पतरूच्या खाली बसून देखील काहीच मागितलं नाही हे ज्यावेळी लक्षात आलं त्यावेळी रामदास स्वामींचा हा अभंग आठवला, आणि प्रथमच काही न मागण्याचा मनापासून आनंद झाला.

थाडपठार, देवरी करत करत आम्ही दम्हेडीला आलो. इथे शिवमंदिरात मुक्काम केला. इथून पुढे बिलासपुर, भीमकुंडी, खाटी असा रस्ता घ्यायचा होता. हा रस्ता म्हणजे तसा जंगल मार्गच. दम्हेडी पासून आम्हाला एक तरुण अधून-मधून दिसायचा. तो ऑटोचालक होता. मध्ये त्यांनी आम्हाला पार्ले जी बिस्कीट देखील दिली. त्याचं नाव जलाल शेख. हा विलासपूर ते खाटी या अंतरात सवारी ऑटो चालवतो. तुमची बॅग खाटीला नेऊन सोडतो असंही तो म्हणाला पण आम्ही बॅग दिल्या नाहीत. खाटीला शाळा मास्तरांकडे राहण्याचा सल्लाही त्यांनीच दिला. इथेही सोय व्यवस्थित झाली. हा सगळा आदिवासी पाड्यांचा आणि जंगलाचा भाग. सगळे कच्चे रस्ते. रस्त्यांवर दगडंच दगड. आजूबाजूला सगळी सागवानाची झाडं. अंतर जरी फार नसलं तरी चालायला वेळच लागत होता. दुसऱ्या दिवशी खाटी होऊन निघायला उशीर झाला. थोड्या थोड्या अंतरावर छोटे-छोटे पाडे होते. मध्ये जंगलाचा भाग. रस्त्यांवर शुकशुकाट. एखादा सायकलवाला फार तर फार दिसायचा.

खाटी नंतर तासा-दोन तासाने असेल कदाचित, तीन मुसलमान तरुण आमच्या मागून चालू लागलीत, त्यांना कदाचित पुढच्या पाड्यांवर जायचं असेल असं आम्हाला वाटलं, मात्र आम्ही थांबलो की ती थांबायचीत, आणि आम्ही चालू लागलो की पुन्हा चालू लागायची. बाबाला थोडं वेगळंच वाटलं. एक-दोन पाडे झाल्यावर जरा हिम्मत करून बाबाने त्या तिघांना विचारलं, " क्यू भाई कहा जाना है".. "दमगड तक जायेंगे बाबाजी", त्यांनी उत्तर दिलं..."यांना पुढे जाऊ देऊ आपण मागून जाऊ" बाबाने निर्णय घेतला, पण ही तिघं काही उठायचं नाव घेईना. मात्र

जसं आम्ही उठून चालू लागलो तसं ती तिघं पुन्हा आमच्या मागोमाग चालू लागली. आता बाबाला खरोखर काळजी वाटत होती, सोबत मी असल्याने आणि नुकताच कांचनपूर चा अनुभव असल्याने बाबा थोडा घाबरलाच होता. बळ एकवटून बाबानी थोडं खडसावून त्या तिघांना पुन्हा विचारलं.. "आप हमारे पीछे ही आ रहे हो, हमे समझ आ गया है, ऐसा क्यू कर रहे हो?" बाबाचं बोलणं अर्धवट तोडत एक तरुण म्हणाला "हा तुम्हारे पीछे आ रहे है, बाबाजी तूम बूढे हो, धीरे धीरे जा रहे हो, जंगल का रास्ता है, दिदी को लेकर जा रहे हो, कुछ हुआ तो क्या करोगे? तुम आगे चलो हम तुम्हारे पीछे पीछे दम गड तक आयेंगे. ".. ही तिघं मुलं आमच्या मदतीसाठी येत होती तर! आमच्या मनात मात्र भलतेच विचार येत होते..."ऐसा है तो साथ में चलो ना, पीछे पीछे क्यू आ रहे हो?" बाबाला थोडं हायसं वाटलं आणि त्याने असा प्रश्न केला. त्यावर "तुम परिक्रमा वासी, हम मास मच्छी खाने वाले, तुम्हारा धरम भ्रष्ट हो जायेगा, इसलिए साथ नही चल सकते... तुमको क्या लगा? हम मुसलमान है तो क्या हुआ? पानी तो नर्मदा जी का पीते हे ना? हम भी नर्मदा जी को मानते है, तो परिक्रमावासी को क्यू तकलीफ देंगे?..."

आमच्या मनातले विचार त्या तिघांनी ओळखले होते. मात्र त्यांचं हे उत्तर ऐकून जीव भांड्यात पडला होता. "कल जलाल ने बताया था तुम दोनो के बारे मे, इसलिये ये साथ चले आये".. आम्हाला बिस्किट देणारा जलाल ऑटोवाला या मुलांना सांगून गेला होता. झालं असं की जलाल नी बिस्कीट दिले त्यावेळी आधी त्याने आम्हाला एक प्रश्न विचारला, "मै मुसलमान हू लेकिन मुझे परिक्रमा वासी की सेवा करना अच्छा लगता है, बॅग तो आपने दिया नही, मेरे हाथ से बिस्कीट खाओगे क्या?.. त्यावर "जरूर खायेंगे जलाल भाई" असं म्हणून आम्ही आनंदाने बिस्किटं खाल्ली होती.... खरंच किती छोट्या छोट्या गोष्टी कुणाच्या मनाला सुख देऊन जात असतात नाही? त्यावेळी खरंच असं वाटलं की फक्त माणूस बनून राहणं हेच योग्य आहे. ही तिघही दमगडपर्यंत आमच्यासोबत आली. खरंतर फेरी सेमलच्या पुढे अंधार पडू लागणार होता, मात्र या तिघांनी आम्हाला धीर दिला म्हणाले, फेरी सेमल तो निकल गया अब ज्यादा दूर नही है अंधेरा होने से पहले हम आपको पोहोचा देंगे... थोडा उशीर झाला, किंचीत

अंधार पडला, मात्र आम्ही राम कुटीरच्या दारापर्यंत पोहोचेपर्यंत ही तिघे आमच्या सोबत होती. आम्ही आश्रमापर्यंत पोचलो आणि ही मुलं परत फिरलीत. आम्ही जवळच गावात राहू, उद्या जाऊ, असा निरोप दिला आणि ति मुलं निघून गेली.

इकडे आम्ही आश्रमाचं दार वाजवू लागलो. इथे किर्र अंधार, लाईट नाहीच कुठे, दूर एक दिवा आणि आत आतल्या खोलीत एक कंदील दिसत होता. म्हणजे आत कुणीतरी होतं नक्की... पण नर्मदे हरला काही उत्तर नाही, फाटकाला कुलूप नाही, पण ते फाटक उघडताच येईना, काही दिसेही ना.. ती मुलं ही निघून गेलेली...आता अंधारात परत फिरता येणार नव्हतं... पण सद्य स्थितीला आत ही जाता येत नव्हतं... मग काय केलं आम्ही? काय झालं पुढे? कुठे निवारा झाला? भोजन प्रसादीचं काय? थंडी प्रचंड होती, त्याचं कसं?.. सांगते, पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७२

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला आमचा दमगडपर्यंतचा प्रवास सांगितला. जलाल शेखने आमची मदत कशी केली तेही सांगितलं आणि वाटेत भेटलेले तिघं मुसलमान तरुण आमच्या सोबत राम कुटिरपर्यंत कुठल्या भावनेने आले होते आणि आम्ही मात्र कुठला वेगळाच विचार करत होतो तेही मी तुम्हाला मागच्या भागात सांगितलं. आम्ही राम कुटिरपर्यंत पोहोचलो आणि तिथून मागे फिरलीत.

आता आम्ही नर्मदे हर, नर्मदे हर म्हणून आतून कुणीतरी येण्याची वाट बघत होतो. या भागात लाईट नाहीत. हा आश्रम गावापासून थोडा दूरच आणि अक्षरशः जंगलात. आम्हाला फाटक उघडता येईना, आतून कोणी बाहेर येण्याचं नाव घेईना. परत गावाकडे फिरणं केवळ अशक्य, आधीच अंधार पडून गेला होता. आश्रमाबाहेर राहणं देखील अशक्य होतं. कडाक्याची थंडी आणि शिवाय जंगल असल्याने निदान आश्रमाच्या आत तरी जाता यावं असं राहून राहून वाटत होतं. शेवटी बाबा म्हणाला, "आता जर कोणी बाहेर आलं नाही तर मला फाटकावरून आत जावं लागेल आणि मग फाटक उघडतो, मग तू आता ये".. बाबा जसा वर चढू लागला तोच आतून नर्मदे हर असा आवाज आला. साधारण अर्धा पाऊण तास वाट पाहिल्यानंतर आम्ही आश्रमाच्या आत दाखल झालो. आता आसन लावायचं, पूजा पाठ करायचा आणि भोजन प्रसादीचं काय ते बघायचं.

"आसन कहा लगाये बाबा", बाबानी विचारलं. "यही लगा दो"असं म्हणत त्या साधू महाराजांनी एक गवताच्या पेंढ्या खाली असलेल्या शेडमध्ये आसन लावायला सांगितलं. इतक्या थंडीत जंगलात असं बाहेर झोपायचं म्हंटल्यावर बंद आसरा नाही का असं विचारलं....

“नाही”, अगदी एका शब्दात आणि पक्क्या आवाजात साधू महाराजांनी उत्तर दिलं. रात्र थंडीमय जाणार... जशी मैयाची ईच्छा...

“आप के भोजन का क्या?” साधू महाराजांनी विचारलं. आम्हाला काहीही चालेल असं आम्ही उत्तरलो. त्यावर मात्र साधुमहाराज आणि आमचा जो संवाद झाला तो जसाच्या तसा लिहिते आहे.

साधु महाराज- नही मैने शाम को छ: बजे सारा खाना कुत्तो को खिला दिया है.. अब तुम क्या करोगे... आम्हाला भूक तर लागली होती, म्हणजे आता इतकं थकल्यावर स्वतः स्वयंपाक करावा लागेल तर... करूयात काय करणार... मी म्हणाले “अगर साधन मिल गया तो हम भोजन बना लेंगे”... साधु महाराज म्हणतात, “साधन तो सब है मैया, बर्तन धोने पडेंगे” आता इतक्या थंडीचं आधी भांडी घासायची आणि मग स्वयंपाक करायचा नंतर पुन्हा भांडी घासून ठेवायची... हे अति होणार होतं थकल्याभागल्या जीवांसाठी...., आज चहाच पिऊन झोपावं. आम्ही ठरवलं. “बाबाजी हम चाय पी के सो जायेंगे”. साधु महाराज अतिशय शांतपणे म्हणाले, ”आपकी कल्पना तो अच्छी है लेकिन शक्कर खतम हो गई है”, अरे देवा!! जाऊदे!! बिना साखरेचा प्यावा आता चहा, ईलाजच नाही काही! आम्ही बिना साखरेचा चहा पिऊ असं सांगितल्यावर साधु महाराज म्हणतात, “हा वो भी सही है, बिना शक्कर की चाय अच्छी लगती है, लेकिन माताजी इतनी रात को चूल्हा जलाने के लिए सुखी लकडी कहासे लाओगे?.... भगवंता!!! म्हणजे आता चहाचं पाणी पिण्यासाठी देखील आधी लाकडं जमवावी लागतील का? मैया उपाशी ठेवत नाही असं ऐकलं होतं खरं, पण आज कदाचित आम्हाला उपाशीच झोपावं लागणार होतं. बाबाची आता खरंच चिडचिड होत होती. बाबांनी रागातच आपलं अंथरून पसरलं आणि आडवा झाला. साधु महाराज मात्र माझ्याशी सत्संग करत होते. म्हणाले, “अगर थंडी लगे तो बोल देना ब्लॅकेटला दुंगा...” दूंगा काय द्याच बाबा वाजणारच आहे.... ब्लँकेट देऊन जरावेळ गप्पा करून बाबा झोपी गेले. म्हणाले सकाळी नऊपर्यंत मी खोलीच्या

बाहेर येत नाही स्वयंपाकाचं दारा बाहेर काढून ठेवतो उद्या लाकडं जमा करा भांडी घासा आणि स्वयंपाक करा. हे होईस्तोवर मी बाहेर येईलच....

राहून राहून मला एकच वाटत होतं, मैया उपाशी झोपू देत नाही म्हणतात मग असं कसं शक्य आहे? मला उपाशी झोपावं लागतं आहे यावर माझा विश्वासच बसत नव्हता आणि कुणीतरी येईल आणि काहीतरी देऊन जाईल असं सारखं वाटत होतं. आता तर नऊ साडे नऊ होऊन गेले होते... कोणी येण्याची फारशी शक्यता नव्हती. मी देखील माझं अंथरूण-पांघरूण बाहेर काढलं. त्या छोट्याशा शेडमध्ये एक मेणबत्ती तेवढी लागलेली होती. बाकी इथे काहीही नाही. साधू महाराज म्हणाले होते **"यहा सिर्फ एक नेटवर्क है फास्टेस्ट वाला, डायरेक्ट कनेकशन होता है कोई डिस्टर्बन्स नही, आपकी आवाज बराबर पोहोचती है, बस आपकी प्रार्थना में सच्चाई होनी चाहिये... डायरेक्ट कनेक्शन विथ गॉड.. "विचार करता करता मी माझं ब्लँकेट बाहेर काढलं आणि आनंदाने ओरडले च. माझा विश्वास जिंकला होता.** तीन-चार दिवसांपूर्वी कुणीतरी आम्हाला दिलेले मूग डाळीचे हल्दीरामचे पाकीट हरवलेत किंवा आम्ही कुणाला तरी दिलेत असं आम्हाला वाटत होतं. ती दोन्ही पाकीटं माझ्या ब्लँकेट मधून बाहेर आलीत. ती ब्लँकेटच्या घडीच्या आत कशी काय गेली देव जाणे. हो एक मात्र खरं माझ्याकडे दोन ब्लँकेट होते त्यातलं हे एक मी पाच-सहा दिवसांपासून काढलं नव्हतं, ते बॅगच्या सगळ्यात खाली ठेवलेलं होतं... कदाचित ही वेळ येणार आहे हे लक्षात ठेवून ती पाकीटं वापरल्या न जाणाऱ्या ब्लँकेट खाली दडवून ठेवली होती मैयाने.... ती उपाशी झोपू देत नाहीच... ती आई असते.

आम्ही मुगाची डाळ खाऊन पाणी पिऊन झोपलो. अगदी थोडीही थंडी वाजली नाही. थकलो होतो त्यामुळे झोपही गाढ लागली, आणि जागही उशिराच आली. उठलो तेव्हा साडेसात वाजले होते. उठून आश्रम भर फिरलो. अतिशय रमणीय स्थान आहे हे. आम्ही ज्या शेडमध्ये झोपलो होतो तिथून तीन-साडेतीन फुटावर नर्मदा माई वाहत होती, तीही अगदी बाल

स्वरूपात. राम कुटीर इतकं रमणीय आणि सकारात्मक स्थान आतापर्यंत कुठलंच नव्हतं... अगदी डायरेक्ट कनेक्शन विथ गॉड...



*राम कुटीर आश्रम*

स्नानादी आटोपून आम्ही स्वयंपाकाला लागलो, साधुमहाराज ही आलेत. जेवण झाले आणि आम्ही साधारण तीन सव्वातीनला चहा घेऊन पुढच्या प्रवासाला निघालो. म्हणायला हा रस्ता ८-९किलोमीटरचा असावा. पण संपूर्ण जंगलच. कुठे झाडांवर तर कुठे दगडांवर परिक्रमा मार्गाचे चिन्ह होते. साधारण अर्ध अंतर चालून आल्यानंतर एक सुंदर स शेड दिसलं त्याखाली थोडा विश्राम घ्यायला म्हणून आम्ही बसलो. आम्ही आपसात बोलतानाच अचानक आवाज आला, "कुठले पाहुणे तुम्ही? चहा घेणार का? आणतो करून. थांबा तिथेच. इकडे येऊ नका. परिक्रमा खंडित होईल तुमची. ".

इतक्या शुद्ध मराठीत कोण बोलतंय म्हणून आम्ही त्याच्याकडे धावत गेलो. पाहतो तर पलीकडच्या भागावर एक संन्यासी उभे होते. अतिशय प्रेमळ चेहरा, आणि बोलके डोळे होते त्यांचे. नर्मदे हर झालं, एकमेकांची चौकशी झाली. मी नागपूरची म्हटल्यावर ते चक्क वऱ्हाडी भाषेत बोलायला लागले. "नागपूरची हाय कावं मावशी, म्या पांढुरन्याचा हावो". त्यांची ती भाषा ऐकून मला इतकं छान वाटलं म्हणुन सांगु… चहा झाला गप्पा झाल्या आणि त्यांनी जे सांगितलं



*राम कुटीर ला लागून वाहणारी बाल नर्मदा*

त्यावरून खरंच वेड काय असतं, अभ्यास काय असतो, ध्यास कसा ते लक्षात आलं. यांचं नाव रामदास महाराज. गेली बावीस वर्ष ते इथे ज्ञानेश्वरीचं अखंड पारायण करतात आहेत. किती पारायण_ झाले माहित नाही. एक संपलं की दुसरं सुरू करायचं. आश्रम कसा चालतो माहीत नाही कुणीतरी येतं आणि काहीतरी देऊन जातं इतकंच काय ते माहीत मात्र परिक्रमावासी तुमच्या सगळ्या गरजा पूर्ण होतात हे नक्की.

रामदास महाराजांचा निरोप घेऊन पुढे निघालो. कपिलधाराच अप्रतिम सौंदर्य बघून सरतेशेवटी अमरकंटकच्या रस्त्याला लागलो. माझे कपडे फाटले होते. मला नवीन कपडे घेणं भाग होतं. येईल त्या दुकानात कपडे घ्यायचे आणि पुढे मृत्युंजय आश्रमात आजचा मुक्काम करायचा हे ठरलेलंच होतं. मृत्युंजय आश्रम अजून दूर होता. एका दुकानात थांबलो मी पांढऱ्या कपड्यांची चौकशी

करू लागले, तो दुकानदार मात्र मला पांढऱ्या वर डिझाईन असलेले किंवा काहीतरी भरतकाम केलेले असे कुर्ते दाखवू लागला. “अरे भाई पुरा सफेद हो तो दिखाओ हम परिक्रमावासी है” मी त्याला समजावून सांगत असतानाच मागून आवाज आला, “ओ सुरुची मैया एम्ब्रोईडरी है तो क्या हुआ? कुछ नही होता. एक कुर्ता ऐसा भी लेलो”.. माझं नाव घेवून मला कोण सांगतंय म्हणून मी मागे वळून पाहिलं तो चितळे माई उभ्या होत्या.. मोरटक्का नंतर आमची आताच भेट तेही अचानक... मी त्यांना कडकडून मिठी मारली... “दोन दिवस मृत्युंजय आश्रमात राहून आराम करा. अमरकंटक चा इकडला भाग फिरून घ्या, मग दक्षिण तटाला या. तिथे आपला आश्रम आहे तिथे तीन दिवस राहायचं आहे कमीत कमी... काही लागलं तर फोन करा तुमच्या आश्रमाच्या समोर मात्र मैय्याच्या दुसऱ्या किनाऱ्याला आपलं स्थान आहे तुम्ही येऊ शकत नाही मात्र आम्ही येऊ शकतो. ” माईंचा हुकूम आणि वर तुपाने माखलेल्या पोळीवर केशर पेरलेल्या गुळाचा खडा असतो तसा वाटणारा धीर, हे दोन्ही मनाला भिडलं. आम्ही मृत्युंजय आश्रमात आराम केला. पुढे माई की बगिया फिरून माईंच्या आश्रमात आलो. तिथे आल्यावर दोन गोष्टी खूप जाणवल्या. एक म्हणजे इथे असलेला प्रत्येक जण हा माझ्या जीवा भावाचा होता, आणि दुसरं म्हणजे इथून जाऊच नये असं वाटणार हे स्थान होतं.

मोहिनी ताई, रमा, शमिका ताई, मोना ताई, देव दादा, धनंजय दादा, अश्या मैया सेवकांनी खूप सेवा केली आणि खूप आनंदात तीन दिवस गेलेत. इथून निघताना मात्र असं काही झालं की काय करावं तेच समजेना... माई पण खूप रागवल्यात मला “नाही तू जाच आता, मी तुझं सामान बाहेर आणून देते” असं म्हणाल्या मला.... असं काय झालं माझ्याकडुन? अशी कोणती समस्या पुढे आली की मला काय करावं हेच कळत नव्हतं? सांगते, पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७३

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला दम्हेडी पासून ते अमरकंठपर्यंतच्या प्रवासाबद्दल सांगितलं होतं. जलाल शेख ऑटो वाला, मुसलमान मुलांनी राम कुटिरपर्यंत केलेली सोबत, राम कुटिर मध्ये भोजन प्रसादी, चहा, काहीही न मिळून सुद्धा आम्ही उपाशी झोपलो नाहीत तो अनुभव, राम कुटिर पासून ते अमरकंठपर्यंतच्या जंगल भागात पांडुरण्याचे भेटलेले रामदास महाराज, तो अनुभव याबद्दल सांगितलं होतं. चितळे माईंची दुकानातली भेटही सांगितली होती. चितळे माईंकडे तीन दिवस कसे आनंदात गेले ते सांगितलं होतं आणि चितळे माई मला रागावू लागल्या तिथं येऊन आपण थांबलो होतो. आता तिथून पुढे सांगते.

झालं असं की आम्ही तीन दिवस थांबून झालं होतं. माईंच्या आग्रहाखातर अजून एक दिवस आम्ही अमरकंटकला माईंच्या आश्रमात थांबलो होतो. त्यानंतरचा हा दिवस. आता मात्र पुढे जाणं भाग होतं. मी सकाळपासून कामाला लागले होते. माई अजूनही अधून मधून आग्रह करतच होत्या. मी निघते म्हंटल्यावर त्या रागावल्या. म्हणाल्या, "मी तुझी बॅग बाहेर नेऊन देते, आता काही तू आत येऊ नकोस.. जायचंय ना तुला जा मग.... "... तिथून पुढे खरी गंमत सुरू झाली. आम्ही बॅग भरून बाहेर काढली, सगळ्यांचे निरोप घेतले आणि आंगणा बाहेर रस्त्याला लागतो तोच पाऊस सुरु झाला. पाऊस सुरू झाल्यामुळे आम्ही पुन्हा आत मध्ये आलो. थोड्या वेळाने पाऊस थांबला आणि आम्ही पुन्हा बाहेर पडलो. पण हे काय! बाहेर पडताच पुन्हा पावसाला सुरुवात! हे असं कमीत कमी चार ते पाच वेळा झालं. मी आत आले की माई विचारायच्या "काय झालं जात का नाहीयेस तू", आणि मी निरुत्तर! सकाळी सात वाजल्यापासून तर साडेदहा वाजेपर्यंत हे असंच सुरू! शेवटी मी माईंना म्हणाले, नक्की काय करावं मी? जावं का थांबावं? मनातून विचार येतो, पुढे निघावं, असं वाटतं मैयाच सांगतेय...

पाऊस येतो तेव्हा वाटतं मैया म्हणते जाऊ नको.... यावर काहीतरी उपाय सांगा! मी काय करू मला काही समजत नाहीये....

माई म्हणाल्या "अग मग विचार मैयाला तुला नक्की काय हवय ते". ठरलं!मैयाला विचारायचं!! मी उजव्या हाताची दोन बोटं बाहेर काढलीत. एका बोटावर ठरवलं 'जायचं आहे' आणि दुसऱ्या बोटावर ठरवलं 'जायचं नाही'. आश्रमाच्या बाहेर गेले. मैया किनारी बसून तिला प्रार्थना केली. म्हटलं तू सांगशील तो शेवटचा निर्णय. मग पाऊस येऊ देत की ऊन वारा... तू जो निर्णय घेशील तो कुठल्याही परिस्थितीत मी पूर्ण करायचा प्रयत्न करेन, अर्थात तू पाठीशी आहेस म्हटल्यावर तुझा निर्णय पूर्ण होईलच. मी दोन बोटं मैयाच्या पाण्यात बुडवलीत आणि तात्काळ पाठमोरी फिरून समोरून येणाऱ्या अनोळखी बाईला एक बोट धरायला सांगितलं. तीने जे बोट धरलं त्यावर होतं 'जायचं आहे'. निर्णय झाला होता. कितीही पाऊस आला तरी आता मी पुढे निघणार होते. चितळे माईंना सांगितलं, त्यांचे आशीर्वाद घेतले, आणि पुन्हा एकदा बॅग घेऊन आश्रमाच्या बाहेर पडलो. मागच्या चार पाच वेळां सारखं याही वेळेस पावसाला सुरुवात झाली. मात्र अगदीच थेंब-थेंब पाऊस असल्याने आम्ही पुढे निघालो... काही अंतर पाऊस आला नाही, मात्र तेव्हा आम्ही जे अनुभवलं ते खरोखर अविश्वसनीय आहे.

पाऊस पडत होता, मात्र आमच्यावर पडत नव्हता. आम्ही पावसाच्या पुढे होतो. आमच्यापासून एक-दीड किलोमीटर मागे बघितल्यावर त्या भागात पाऊस पडतो आहे हे स्पष्ट दिसत होतं. आम्ही पुढे पुढे पाऊस मागे मागे... आज आम्ही जवळजवळ तीस किलोमीटर चाललो होतो. रुषाच्या थोडं पुढे कुठेतरी एका शिवमंदिरात सोय झाली. तो अनुभव थोडा विस्तारपूर्वक पुढे सांगते मात्र मंदिरात पाऊल ठेवेपर्यंत पाऊस नव्हता आणि मंदिरात पाऊल ठेवताच धो-धो पावसाला सुरुवात झाली. 'जायचं आहे' हा तिने दिलेला निर्णय होता. त्याप्रमाणे आम्हाला थेंबभरही पाऊस लागणार नाही याची तिनेच काळजी घेतली. थोड्याच

वेळात अमरकंटक होऊन माईंचा फोन आला, तुम्ही गेले आणि पंधरा मिनिटात धो-धो पाऊस सुरू झाला असं त्यांनी सांगितलं.

अमरकंटक होऊन पुढे रुषापर्यंत येताना आम्ही सडक मार्गे आलो होतो. जप व्हावा म्हणून बाबा पुढे आणि मागे असं नेहमीप्रमाणे सुरू होतं. सडक मार्ग असल्यामुळे बाबा जरा निवांतपणे पुढे गेला आणि मीही माझ्या स्पीडने हळूहळू मागे जात राहिले. आमच्यात आता साधारण एक किलोमीटर अंतर असेल. पावसाळी वातावरण, डांबरी रस्ता आणि आजूबाजूला जंगल. प्रसन्नता होतीच. मी जप करत करत पुढे जात होते आणि अशातच रस्त्याच्या कडेवरून अचानक एक माकडांचा घोळका माझ्या बाजूने आला. ती माकडं रस्त्याच्या मध्यभागी येऊन बसली. जणू काही वाट अडवत असावीत अशा पद्धतीने. मी शांतपणे तिथेच उभे राहून त्यांच्या जायची वाट बघत होते. थोड्या वेळात माकडांचा अजून एक मोठा घोळका आला आणि तो माझ्या मागच्या बाजूने गेला. मात्र तीही माकडं रस्त्याच्या मध्यभागी बसून होती. सगळी मिळून जवळजवळ शंभर माकडं तरी नक्की होती. मी ह्या माकडांच्या मध्ये होती. यांनी मला चहूबाजूंनी घेरलं होतं आणि आता मला पुढे जायचं होतं. माझ्या हातात दंड होता मात्र या माकडांना त्याची भीती वाटेल, की मी त्यांच्या वर शस्त्र उगारलं आहे असं वाटेल याचा अंदाज मला घेता येत नव्हता. मी पुढेही जाऊ शकत नव्हते, मी मागेही जाऊ शकत होते आणि बाबा मात्र बराच पुढे निघून गेला होता. पुढे जाणं भाग होतं. मी डोळे बंद केले मैयाचं नाव घेतलं आणि एक एक पाऊल पुढे टाकू लागले. ही मर्कट मंडळी जागची हलली देखील नाहीत. त्यांच्यामधून वाट काढत काढत मी पुढे निघून गेले. या मंडळींनी माझ्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केलेलं होतं. जणू त्यांना मी दिसतच नव्हते इतकं दुर्लक्ष. मैयाची सोबत होती हे काही वेगळं सांगायला नकोच!

आता तो मंदिराचा अनुभव विस्तारपूर्वक सांगते. आम्ही रुषाच्या पुढे आलो होतो. इथे आभाळ फारच भरून आलं असल्याने आणि आम्ही थकलो असल्याने आता रुषा नंतर जे

गाव येईल तिथे थांबून जाऊ असं ठरलं. मात्र पुढचं गाव लवकर येईना. हे मंदिर दिसलं आणि इथेच मुक्काम करायचा असं ठरलं. मंदिर अगदी लहान. फक्त प्रदक्षिणा करता येईल एवढीच जागा. हरकत नाही!आम्ही आपलं सामान ठेवलं. अजून अंधार पडायला वेळ होता त्यामुळे आसन काही लावलं नाही. मंदिराच्या समोर रस्त्याच्या पलीकडल्या बाजूला एक मोठी विहीर होती तिथेच संध्याकाळचं स्नानादी आटोपलं. या भागात घरंही अगदी मोजकीच होती कारण गाव बरच लांब होतं. संध्याकाळचं पूजापाठ करून झालं आणि आता पोटातली भूक आवाज देऊ लागली. आजूबाजूला मात्र फारसं कुणी दिसत नव्हतं दुकानं वगैरे देखील नव्हती आम्ही वाट बघायचं ठरवलं.

साधारण आठ वाजता एक बैलगाडी मंदिरासमोर येऊन थांबली. एक माणूस आत आला नमस्कार केला आणि देवासमोर आम्ही दिवा लावला आहे का असं त्यांनी विचारलं. तो आला तसा तो निघून गेला त्यानंतर थोड्यावेळाने मंदिराच्या मागच्या अंगणातून एक बाई आली आणि "महाराज भोजन कर लिजिए म्हणून आम्हाला बोलावू लागली". मंदिराच्या मागच्या अंगणाच्या एका कोपऱ्यात एक छोटसं फाटक होतं आणि मागे सगळी झाडी होती. त्या झाडीच्या मागे एका घराचं मागचं छोटं फाटक होतं त्यातून आम्ही त्या बंगलेवजा घरात गेलो. मंदिर आणि या घराच्या मध्ये एक छोटीशी गल्ली होती, मात्र झाडीमुळे ह्या मंदिराच्या इतक्या जवळ हे बंगलेवजा घर असेल हे कुणाला सांगता देखील येणार नाही, असं हे घर झाकल्या गेलं होतं. आम्ही मंदिरात आलो आहे याची खबर या घरातील बाईंना कशी मिळाली ते आम्हाला माहीत नाही. तसा विषयही निघाला नाही. त्यांनी भोजन प्रसादिला बोलावलं आणि आम्ही भोजन प्रसादिला गेलो एवढच. मंदिरात प्रदक्षिणा मार्गातच आम्ही आसनं लावलीत. आजचा दिवस अनपेक्षितपणे छानच झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुढच्या प्रवासाला सुरुवात केली. काल आमचे कपडे धुऊन झाले नव्हते. त्यामुळेच आज कपडे धुणं आवश्यक होते. मात्र रामनगरच्या पुढच्या भागात

पाण्याची टंचाई असल्याचं समजलं. कित्येक हापश्या बघितल्या पण त्यांना पाणीच नव्हतं. आम्ही कनकधारापर्यंत पोहोचलो. इथे एका हापशीला पाणी लागलं. मात्र खूप पंपिंग केल्यावर अगदी बारीक धार येत होती. आमच्याकडे पिण्याच्या पाण्याच्या बाटली व्यतिरिक्त साठवणीसाठी काहीही नव्हतं. असं असताना देखील इथे जो अनुभव आला ते पाहून आनंदाने रडावं का दुःखाने रडावं हेच कळेना. श्रद्धेला सीमा नाही इतकं मात्र समजलं... नक्की काय झालं ते सांगते पुढच्या भागात.. नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७४

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला अमरकंटक चा पावसाचा अनुभव सांगितला. नर्मदा माईच्या निर्णयानुसार पुढे जायचं हा निर्णय घेतला होता. तिने आम्हाला पावसात भिजू दिलं नाही.

रूषा गावाच्या पुढे एका शिवमंदिरात आजची रात्र काढली होती. इथेदेखील अनपेक्षितपणे उत्तम भोजन व्यवस्था मंदिराच्या मागच्या भागाला असलेल्या बंगल्यात झाली होती. इथून दुसऱ्या दिवशी सकाळी स्नानादि आटोपून आम्ही पुढे निघालो खरं मात्र वेळेअभावी आम्ही कपडे धुतलेले नव्हते. आज कपडे धूणं गरजेचं होतं कारण आज कपडे धुतल्या गेले नाही तर उद्या घालायला स्वच्छ कपडे आमच्याकडे नव्हते. वाटेत कुठे हापशी लागली तर तिथे थोडा विश्राम करून कपडे धुऊन घेऊ असं आम्ही ठरवलं. त्याप्रमाणे वाटेत बऱ्याच हापश्या लागल्या. मात्र एकीलाही पाणी नाही. "शे...एकाही हापशीला पाणी नाही, मला तर वॉशिंग मशीनची आठवण येते य".. मी अगदी सहजच बाबाला हे वाक्य बोलून गेले...

या भागात पाण्याची टंचाई असल्याचं समजलं. आम्ही सडक मार्गाने निघालो होतो त्यामुळे नर्मदामैया ही फार जवळ नव्हती. आता पाणी सापडेपर्यंत वाट पाहणे याशिवाय दुसरा इलाज नव्हता. शेवटी कनकधाराला एका मोकळ्या प्लॉटवर एक हापशी सापडली तिला पाणी होतं, मात्र खूप पंपिंग केल्यावर अगदी थोडंच पाणी यायचं. आमच्याजवळ साठवणीला देखील काही नाही. आता कपडे धुण्यापेक्षा निदान पाण्यातून काढणे महत्त्वाचे वाटू लागले. तिथेच मोकळ्या मैदानात आम्ही सामान मोकळ केलं. धुण्याचे कपडे वेगळे केले, आणि आलटून पालटून, जोर लावून, पाणी काढायला सुरुवात केली. दोन-तीन पाण्यातून कपडे काढल्या

जातील की नाही ही सुद्धा शंकाच होती. आमचे प्रयत्न सुरू होते. आणि शेजारच्याच घरातली एक बावीस पंचवीस वर्षांची मुलगी आमचा हा प्रयत्न बघत होती.

कनकधारा गाव फार मोठ असं नाही. इथे लोकांकडे मोबाईल हौसेखातर घेतलेले आहे पण नेटवर्क फारसं मिळत नाही. नाही म्हणायला इलेक्ट्रिसिटी आहे पण लाईट फारच जास्त जातात. अशा छोट्याशा गावात असताना त्या दिवशीची संध्याकाळ अतिशय अनपेक्षित अनुभवातून गेली.

अम्ही सतत पाणी काढण्याचा आणि कपडे धुण्याचा प्रयत्न करत होतो आणि शेजारच्या घरातली ती तरुणी आमच्याकडे बघत होती तिने आम्हाला आवाज दिला "मैया जी पानी नही आयेगा. हमारे घर मे पानी भर के रखा है. आप कपडे धो लीजिये"... आम्ही न मागताही आम्हाला पाणी मिळालं म्हणून आनंद झाला खरा मात्र ह्या घरच्या लोकांनी कुठून तरी पाणी भरून आणलं असेल आणि ते आपण वापरावं हे काही प्रशस्त वाटलं नाही. मी तिला म्हणाले, एक बादली पाणी दे त्यात कपडे बुचकळून काढतो. उद्या पुन्हा कुठेतरी व्यवस्थित धूवून घेऊ. आमचं हे बोलणं सुरू असतानाच आतून तिची आई बाहेर आली. आणि त्यांनी आम्हाला आग्रहाने घरात बोलावलं, अक्षरशहा हात धरून ती मला घरी घेऊन आली आणि आपल्या मुलीला जे बोलली ते ऐकून आम्ही थक्कच झालो.

ती आपल्या मुलीला म्हणाली "अरे इतना सारा पानी रखा है एक बाल्टी पानी क्यू देती हो परिक्रमावासीको? पहले एक काम करो जनरेटर सुरू करो, तब तक वो बक्सा खोलो" असं म्हणत तिने नवीन कोऱ्या वॉशिंग मशीन चा बॉक्स आमच्यासमोर उघडा केला. ती पुढे म्हणाली, "गुडिया की शादी तय हुई है, उसके लिए वॉशिंग मशीन लाया है, अभी शादी को समय है, आप इस मशीन मे पुरे कपडे धोलेना, मेरी गुडिया की मशीन अच्छी और लंबी चलेगी. अगर पहली बार परिक्रमावासीओके कपडे जायेंगे तो शुभ शगुन होगा"... किती ही श्रद्धा? मुलीच्या लग्नासाठी आणलेली नवी कोरी मशीन त्या बाईने परिक्रमावासींचे कपडे धुण्यासाठी

उघडून दिली... तिच्या श्रद्धेचा मान ठेवला आणि वॉशिंग मशीन मध्ये आम्ही कपडे धुतले. इतक्या छोट्या गावात जिथे मोबाईलच नेटवर्क नाही, इलेक्ट्रिसिटी चा भरोसा नाही, अशा ठिकाणी जनरेटर सुरू करून वॉशिंग मशीन मध्ये आमचे कपडे धुतल्या जावे याला काय म्हणायचं? पण हा अनुभव इथे संपत नाहीये... कारण पुढे जे काय झालं त्याने मी स्वतःला थांबवू शकले नाही आणि ओक्साबोक्सी रडू लागले. मीच काय तिथे हजर असलेलं प्रत्येकच जण रडत होतं. सांगते.

"आज यही सो जाओ कल सुबह निकल जाना". त्या आईंनी खूप आग्रहाने आम्हाला तिथेच थांबवून घेतलं. समोरच ओट्यावर आम्ही आमचं आसन लावलं. संध्याकाळची आरती पूजा झाली. भोजन प्रसादी साठी आम्हाला आत बोलावल्या गेलं. पंचपक्वान्नाचे भोजन आमच्यासमोर मांडून ठेवलं होतं. बटाट्याची भाजी, पुरी, खीर, शिरा आणि सुंदर सा पुलाव असं भरलेलं ताट. चविष्ट आणि पोटभर जेवण आम्हाला खाऊ घातल्यानंतर घरची मंडळी जेवायला बसलीत. त्यांच्या ताटात मात्र फक्त वरण आणि भात... त्यांची परिस्थिती सधन दिसत होती, मग तरीही ते फक्त वरण भातच का खात असावे?

"दीदी, बिटिया, आपने पुरी सब्जी खीर हलवा नही लिया? भैया जी को भी नही परोसा?" मी विचारलं... त्यावेळी तिथे घरची बाई, तिची मुलगी आणि तिचा मुलगा असे तिघे जण होते. तिघांनी फक्त नकारात्मक मान हलवली आणि ते मुकाट्याने जेऊ लागले. मला काही समजेना, मात्र तरीही त्यांचं जेवण होईस्तोवर मी शांत बसले आणि त्यांचं जेवण झाल्यानंतर माझा प्रश्न पुन्हा विचारला? "आपको मिठा पसंद नही है क्या दीदी?"... आता मात्र घरची मैया जी ढसा ढसा रडू लागली. दोन्ही मुलं देखील कावरीबावरी झालीत. मैया जींनी माझ्या गळ्यात मिठी मारली आणि म्हणाल्या..."आज बच्चो के पिताजी को गुजर के 17 दिन हो गये है. उनके जानेके बाद आप हमारे घर पधारे पहले परिक्रमावासी हो. मेरे पती परिक्रमावासीओकी बहुत सेवा करते थे. वे हमेशा कहा करते थे की परिक्रमा वासियों की सेवा मत छोडना. हम सब बाहर

गाव गये थे तब अचानक ही हार्ट अटॅक हुआ और चल बसे. जिस दिन चल बसे उस दिन भी उन्होंने अपने हाथो से परिक्रमा वासियों को चाय पिलायी थी, तब हमारी फोन पर बात हुई थी.... आज आप हमारे यहा पधारे है तो लगता है कि आपको यहा उन्होने ही रोक लिया है.... आपको देख कर लगता है हमारे पती यही आसपास है.... लेकिन हमे माफ करियेगा, यह बात हमने आपको पहले नही बताई"...

तिचं बोलणं ऐकून मला सुद्धा अश्रू थांबवता आले नाहीत. जिचा नवरा जाऊन फक्त सतरा दिवस झाले आहेत, ज्या मुलीचं लग्न वडिलांच्या निधनामुळे लांबणीवर पडलं आहे, त्या बाईची आणि त्या लेकरांची मैय्या वर आणि परिक्रमावासींवर इतकी श्रद्धा? इतका विश्वास?... नर्मदामय्याच्या परिक्रमावासींच्या येण्याने त्यांच्या कुटुंबाला मिळालेलं समाधान हे सगळ्यापेक्षा जास्त मोठं आहे. आम्ही दुसऱ्या दिवशी तिथेच थांबण्याचा निश्चय केला. "आप कल भी रुकोगे तो हमे बहोत अच्छा लगेगा" या विनंतीला आम्ही मान देऊ शकलो आणि त्या कुटुंबात दोन समाधानाचे क्षण देण्यासाठी नर्मदामैया ने आम्हाला तिथवर पाठवलं हे आमचं भाग्य! खरंच कमाल वाटते गं मैया तुझी... कधी तू तुझं रूप माझ्यातून दाखवते तर कधी तू तुझं रूप इतरांच्यात मला दाखवतेस.... मला भरभरून समाधान देतेस आणि कुणाच्यातरी समाधानाचं कारण मला बनवतेस... ते पुण्य तू माझ्या पदरात घालतेस.. खरंच तुझी लीला नं समजण्यासारखी आहे गं!... तिथून पाय निघत नव्हता तरीही दुसऱ्या दिवशी भोजन प्रसादी आटोपून आम्ही पुढे निघालो.. फोन नंबर एक्सचेंज केलेत. आज दोन वर्षांनंतरही दीदी माझ्याशी संपर्कात आहेत. परिक्रमावासींची सेवा आधी सारखेच आताही सुरू आहे, आणि दीदी आजही म्हणतात, "माताजी उस दिन तुम आये इसलिये हम यह सेवा आगे बढा सके... मै तो तूट ही गई थी, तुम्हारे आने के कारण मुझे सही रास्ता मिल गया"... त्यांची मुलगी गाडा सराईला स्वतःच्या घरी आता सुखाने नांदते आहे... नर्मदा माई तू तुझ्या भक्तांना कायम साथ देत असतेच, कायम सन्मार्ग दाखवतच असते...!!



*कनकधार येथील दीदी व त्यांचे कुटुंब*

दीदींचा निरोप घेऊन पुढे निघालो, तो सहा-सात किलोमीटर अंतर चालून झाल्यावर माझं स्वेटर दिदींकडे राहिल्याचं लक्षात आलं. आजवर अनेक गोष्टी मागे सुटल्यात मात्र ज्या सुटल्यात त्या सुटल्यात.. त्यासाठी परिक्रमेत असताना परत म्हणून फिरले नाही. तसंच स्वेटरचं... जे राहीलं ते मैयार्पण... त्याचा पुढे विचारही करायचा नाही. आम्ही पुढे चालत राहिलो. साधारण खरं गहनाच्या आगेमागे असताना एक बाईक वरचा माणूस आमच्या पाशी येऊन थांबला. "तुम्हारा सामान कनकधारा में छूंट गया है ना? यही रुक जाओ सामान मिल जायेगा"... दीदींनी माझं स्वेटर एका ऑटो वाल्याला दिलं होतं. ऑटो वाल्याला एक सवारी कुठेतरी सोडून मग आमच्यापर्यंत येणं शक्य होणार होतं म्हणून समोर जाणाऱ्या एका अनोळखी गाडीवाल्याला हा निरोप देऊन त्याने पुढे पाठवलं. सात-आठ किलोमीटर तो ऑटोवाला फक्त माझं स्वेटर मला देण्यासाठी आला होता. अशावेळी नेमकं काय करावं तेच समजत नाही.... शेवटी काहीही न करता अतिशय प्रामाणिकपणे आणि आदराने नर्मदे हर करण्यापलीकडे काहीही शिल्लक उरत नाही... मी देखील तेच केलं..

खरंतर आज खर गहना होऊन देखील पुढे जाण्याची इच्छा होती. मात्र बाबाचा पाय दुखत होता, माझी लुंगी फाटली होती ती शिवून घेणं आवश्यक होतं... वाटेत लहान-लहान गावं असल्याने एखादा टेलर सापडेल असं वाटत होतं. बाबाचा आराम देखील होईल आणि लुंगीचं काम देखील होईल असा विचार करून आमचा शोध सुरू होता. मात्र ह्या सगळ्यात काहीतरी वेगळं घडायचं होतं. काहीतरी शिकवण मिळायची होती. नेमकं काय घडलं आणि नेमकी कुठली शिकवण मिळाली ते सांगणार पण पुढच्या भागात.... नर्मदे हर..

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७५

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला कनकधारा या गावातील वॉशिंग मशीनचा आलेला अनुभव सांगितला. सतराच दिवस आधी ज्या घरचा करता सवरता पुरुष काळाने ओढून नेला होता त्या घरी आम्हाला मिळालेली अतिशय प्रेमाची वागणूक आणि तशाही परिस्थितीत संयमानं वागणारी घरची मंडळी यांच्याबद्दल मी तुम्हाला सांगितलं होतं. आता इथून पुढे जाऊयात.

मोहतरा, गाडासराय, बोंदरगाव, सूनिया मार, ही गावं पार करत करत आम्ही खरगहना येथे पोहोचणार होतो. बोंदरगाव चा एक अनुभव सांगते. मला वाटतं मागे कुठल्यातरी भागात मी या अनुभवाचा उल्लेख केलेला आहे. बोंदरगाव इथे आम्ही एका झाडाखाली विश्राम करत बसलो होतो. त्याच झाडाखाली काही लहान मुले खेळत होती. आम्ही त्या लहान मुलांचा खेळ बघत होतो. परिक्रमावासींना बघितलं की "नर्मदे हर" करायचं आणि टॉफी मागायची हा नर्मदा किनारी लहान मुलांचा चालणारा खेळच जणू. ह्या लहान मुलांनी देखील आम्हाला "नर्मदे हर" केलं आणि आमच्याकडे टॉफी मागितल्या. मात्र यातली एक लहान मुलगी आमच्याकडून टॉफी घ्यायला तयार नव्हती. ती मला पाहून ढसढसा रडू लागली. तिला असं रडताना बघून मलाही रडायला आलं. ती मला बिलगुन रडु लागली. आम्ही तिला तिच्या घरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे तिच्या घरी गेलो.

ती मुसलमान धर्माची. तिच्या आईने सांगितलं की गेल्या तीन दिवसांपासून ती कोणाची तरी वाट बघत होती. "मेरी मा ने वाली है" असं म्हणत होती. ह्या मुलीच्या घरी आम्ही गुळाचा खडा पाणी आणि चहा प्यायलो. तिला खूप खूप आशीर्वाद दिलेत. तिचं माझं मागच्या जन्मीचं

काय नातं असावं माहित नाही, पण परिक्रमेत अशाप्रकारचे दोन-तीन अनुभव आलेत हे मात्र खरं. माझे मागे सुटलेले किंवा मला मागे सोडलेले कुठलेतरी जीव माझ्या भेटीसाठी, काही कारणास्तव असेल कदाचित, पण अडकून होतेत... कदाचित माझ्या किंवा त्यांच्या, पुढल्या जन्मांतही ही एक भेट तेवढी घडून यायची होती असं असेल, पण ती भेट घडून आली आणि त्या चक्राला पूर्णविराम मिळाला हे मात्र नक्की. एक मात्र अगदीच लक्षात घेण्यासारखं आहे ते असं की असे अनुभव मला आले त्यावेळी मला भेटणाऱ्या चारही व्यक्ती या लहान मुलांच्या रूपात होत्या. एक छोटसं बकरीच पिल्लू ही होतं. स्वतःच्या आईकडे न जाणारं, माझ्याकडून दुसरीकडे कुठेही न जाणारं एक आठ महिन्यांचं बाळ होतं... विक्रमपूर जवळ भेटलेला साडेतीन चार वर्षाचा मुलगाही मला सोडायला तयार नव्हता... या सगळ्यांचं आणि माझं काय नातं होतं माहित नाही कारण आत्ताच्या म्हणजे ह्या जन्मात तरी त्यांची माझी पुन्हा भेट होईल याची शाश्वती देता येत नाही... असो असे प्रश्न फक्त सोडून द्यायचे असतात.

आम्ही पुढे निघालो. अगदी पुढचं गाव सुनिया मार. इथे एका बाईंनी आम्हाला चहासाठी बोलावलं. तिच्याकडे समोर छोटसं अंगण होतं तिथे विश्रामा साठी थांबलो. आतून एक सतरा-अठरा वर्षांची तरुणी बाहेर आली. आम्हाला म्हणाली "कुछ कपडा वगैरे सिलना हो तो बताओ मै टेलर हू"... मी तुम्हाला मागच्या भागातच सांगितलं होतं की मला लुंग्या शिवून घ्यायच्या आहेत आणि आज टेलर शोधून त्या शिवून घेऊ असं ठरवलं होतं. माझ्या दोन्ही लुंग्या काठापासून फाटत आल्या होत्या. त्या ताबडतोब शिवणं गरजेचं होतं. आम्हाला टेलर शोधायची गरजच पडली नाही. जिथे आम्हाला विश्रांतीसाठी, चहासाठी बोलावलं ते घरच मुळी टेलरचं निघालं... लुंग्या शिवून झाल्यात... त्या कापाव्या लागल्या त्यामुळे त्या उंचीला कमी झाल्या, म्हणून या तरुणीने लुंगीला स्वतःजवळचं कापड जोडून दिलं. एरवी एखाद्या टेलर न प्रोफेशनॅलिझम चा विचार केला असता, मात्र या तरुणीने मला न विचारताच, फक्त माझी गैरसोय होऊ नये यासाठी कुठलसं कापड वरच्या काठाला जोडून, लुंगीची उंची आधी सारखी केली आणि अशी तयार लुंगी मला दाखवायला बाहेर घेऊन आली.

जेव्हा इतकी आपुलकी, इतकं प्रेम, समोर येतं तेव्हा त्याची पैशात मोजणी करणं म्हणजे शुद्ध अपमान करणं आहे.... पण त्याची किंमत ही जाणिवेतून ठेवायला हवी.... अशावेळी परिक्रमावासी हा माईच्या आणि त्या तिच्या लेकरांच्या ऋणातच राहतो... तरीही फुल ना फुलाची पाकळी.. किंवा "टोकन ऑफ लव" म्हणू हवं तर, असं काहीतरी करायची प्रचंड इच्छा होत असते. तुम्हाला इच्छा झाली आणि मैय्या ने पूर्ण केली नाही असं होतच नाही... इथेही तसंच झालं. बोलता बोलता या तरुणीचं लग्न ठरलं असल्याचं समजलं. तिचा भाऊ शहरातून खरेदी करून आला होता. मग आम्हा परिक्रमावासी ना अगदी घरातल्या सारखं वागवून लग्नाची खरेदी दाखवण्यात आली. या खरेदी मार्फत मला आणि बाबाला ह्या तरुणी साठी प्रेम भेट देण्याची संधी मिळाली. "बहोत सुंदर चूडा है ये... ये मेरी तरफ से होगा आपकी शादी के लिये.... आपने मुझे मैय्याजी कहा है बेटा, तो आप अब इनकार नही कर सकते.. " माझ्याही नकळत मी बोलून गेले, अन् तिला सुद्धा नकार देता आला नाही. किंबहुना तिला इतका आनंद झाला की तो आनंद तिच्या डोळ्यातून घळाघळा वाहू लागला.... लग्नाचा चुडा म्हणजे सौभाग्याचा दागिना.. आणि तो नर्मदा माईच्या परिक्रमावासींकडून मिळतोय यात तिला इतका आनंद होत होता म्हणून सांगू.. ! आम्ही निरोप घेऊन पुढे निघालो.

आता खरं कुंडा या गावाला जायचं होतं. पण खरगहना जवळच अंधार पडेल असं वाटलं. आम्ही निवारा शोधू लागलो. एका मंदिरात डोकावलं तर तिथे कुणीही नव्हतं. आजुबाजुची घरं पाहिली. राहता येईल अशी काही ही अवस्था नव्हतीच. पुढे अजून एक मंदिर लागलं. तिथे एक संन्यासी होतेत. आम्ही नर्मदे हर केलं आणि इथे राहता येईल का अशी चौकशी केली. त्या सन्यासांचा मूड नसावा कदाचित. "यहा नही रह सकते जावो आगे".. कारण नसतानाच ते आमच्या अंगावर खेकसलेच... जाऊदे बघू यात पुढे असं म्हणून आम्ही पुढे निघालो.. तेवढ्यात त्याच सन्याश्याने पुन्हा आवाज दिला. "परिक्रमा में हो क्या? अगर यहाँ रुकना हुआ तो कब तक रूकोगे? भोजन व्यवस्था अपने आप करना होगा... चलेगा तो आजाओ..."

तिथे गेल्यावर सर्वप्रथम चहापाणी झालं. गरम गरम चहा पिऊन संन्यासी महाराज थंड झाले असावे. आम्ही कुठून अशी त्यांनी चौकशी केली. मग ते पुन्हा गरम झाले.. "परिक्रमा मे हो तो हुकुम क्यू नही करते? मंदिर मे आये हो, किसी के बाप का घर नही है! याद रखो, जब कभी भी मंदिर जाओगे तो अधिकार के साथ वहा रहो. मंदिर किसी की जहागिरी नही है... भगवान का घर है... और तुम परिक्रमा कर रहे हो, भगवान के घर निवास करने का पूरा अधिकार है तुम्हारा. एक रात रूक के आगे जाते हो तुम... हक से बोला करो की आसन लगाना है..." ही मात्र आतापर्यंत मिळालेली नवीन शिकवण होती. अर्थात एकंदरच परिक्रमेत असताना विनम्रता आणि स्वीकार या दोन गोष्टी अंगात रुजल्या सारख्या झाल्या होत्या, मात्र गरज असताना असा अधिकार देखील गाजवायचा हे नव्याने समजलं होतं. अर्थात या अधिकारात मगरूरी नसावी फक्त गरज आहे हे भान असायला हवं.

संध्याकाळी संन्यासी महाराजांनीच स्वयंपाक केला. छान सत्संग झाला. तुम्ही परिक्रमावासी बरेचदा आपले अधिकार गाजवत नाहीत हेच तुम्हाला शिकवायचं होतं असंही महाराज म्हणाले. इथून पुढे कुकरा मठ, बीच्छिया रोड, असं करत करत दिंडोरीला पोहोचलो. दिंडोरीला पोहोचण्याच्या आधी वाटेत आम्हाला कन्हैया भैया म्हणून एक जण भेटलेत. ते पुन्हा दिंडोरीला देखील भेटलेत, किंबहुना आमच्यासाठी खास म्हणून आलेत. दिंडोरी पासून ते सक्कापर्यंतच्या प्रवासात सुद्धा एक म्हातारे आजोबा भेटले होते. आणि याच प्रवासात सतीश भाई नायक भेटले होते.... याच प्रवासात पुन्हा एका अशा घरी थांबलो जो अनुभव थोडाफार कनकधारा सारखाच होता... नायक भाईंच प्रेम मात्र वाखाणण्याजोगं...कारण पहिल्याच नव्हे तर दुसऱ्याही परिक्रमेत नायक भाईंची आणि माझी भेट झाली, तेव्हाही त्यांचं मैयाप्रेम मैया इतकंच अथांग आहे हे जाणवलं.. त्याही अनुभवाबद्दल सांगेनच पण पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७६

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला बोंदरगावच्या मुलीबद्दल सांगितलं होतं. अचानक पणे रस्त्यात भेटलेली टेलर मुलगी आणि तिने दिलेली सेवा ही मी तुम्हाला सांगितली होती. खरंगहनाला झालेला सत्संग देखील आपण बघितला. इथून पुढे आम्ही कुकरा मठला गेलो. कुकरा मठला एका कुत्र्याचं मंदिर आहे. कुकुर म्हणजे कुत्रा. कुत्र्याचं मंदिर हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्या कुत्र्याची गोष्ट थोडक्यात सांगते.

ही गोष्ट एका बंजारी जमाती मधल्या बाईच्या कुत्र्याची आहे. ही बंजारी जमात गावोगाव फिरत असते. एकदा ही जमात दिंडोरी जवळ थांबली असताना एका बंजारी बाईला कर्जाची गरज भासली. तिथल्या सावकाराकडून तिने कर्ज घेतले मात्र गाव सोडताना ते कर्ज ती परत करू शकली नाही. काहीतरी ठेव ठेवायची म्हणून त्या बंजारी बाईने आपला कुत्रा सावकाराला दिला. कुत्र्याला समजवून सांगितलं की आता तुझे मालक सावकार आहेत. त्यांची तू सेवा करायची तरच माझं कर्ज फिटेल. हा कुत्रा देखील सावकाराची प्रामाणिकपणे सेवा करू लागला. एकदा सावकाराकडे चोरी झाली मात्र कुत्र्याने प्रसंगावधान राखून चोरांना पळून लावले आणि सावकाराचा जीव वाचवला. सावकाराला अतिशय आनंद झाला आणि ह्या बंजारी बाईच्या कुत्र्याने आपले प्राण वाचवले हे पाहून त्याने त्या बंजारी बाईचे सर्व कर्ज सावकाराने माफ केले. इतकेच नव्हे तर आपल्या जवळील सर्व दागिने एका रुमालात बांधून त्यात एक चिठ्ठी ठेवली. "मी तुझ्या कुत्र्याला बंधनमुक्त करत आहे आणि या दागिन्यांसह तुझ्याकडे परत पाठवत आहे" असं त्या चिठ्ठीत लिहिलं होतं.

कुत्रा अतिशय आनंदाने आपल्या मालकिणीकडे दागिन्यांचं गाठोडं घेऊन निघाला. मालकिणीला भेटला आणि तिच्या पुढ्यात दागिन्यांचं गाठोडं ठेवलं. ते दागिने पाहून बंजारीण चिडली, रागावली, तिला वाटलं या कुत्र्यानेच सावकाराकडे चोरी केली. दिलेली चिठ्ठी न वाचताच तिने कुत्र्याला काठीने चांगलेच बदडून काढले. आणि त्यातच त्या कुत्र्याचा जीव गेला. दागिन्यांची पिशवी घेऊन बंजारीण सावकाराकडे गेली असता झालेली हकीगत तिला समजली. आपल्या कुत्र्याच्या निधनामुळे आणि स्वतःच्या कृत्यामुळे ती फार फार दुखी झाली आणि जिथे त्या कुत्र्याने देह सोडला तिथेच तिने त्याचे मंदिर बांधले व शेवटपर्यंत या मंदिरात सेवा करत राहिली. हे मंदिर बघतो त्यावेळी आणि ही कथा ऐकतो त्यावेळी मन खरोखरीच भरून येते. या कुकरा मठ चा परिसर अतिशय रमणीय आहे.

कुकरा मठ होऊन पुढे ऋणमुक्तेश्वर मंदिर बघत पुढे आलो. आम्ही नर्मदा किनाऱ्यापासून साधारण तीन ते चार किलोमीटर दूर असू. इथे पुढे गोमती नदीचा संगम आहे. आम्ही मात्र रस्त्यानेच पुढे पुढे जात होतो. वाटेत एका दुकानात आम्हाला चहा आणि फराळासाठी बोलावलं. त्याच दुकानात एक गिऱ्हाईक आला होता. त्याला परिक्रमावासींबद्दल फार आस्था होती. जरा विश्राम झाल्यावर जाता जाता त्याने बाबाच्या हातात एक कागदाची पुंगळी कोंबली. बरेचदा लोक दक्षिणा अशी कागदात गुंडाळून देतात. आम्हाला वाटलं त्यानेही दक्षिणा दिली असेल. तो पुढे निघून गेल्यावर बाबाने कागदाची पुंगळी म्हणून पाहिली तर त्यात पैसे नव्हते. त्यात "कृष्णा" आणि खाली फोन नंबर लिहिला होता. सोबत एक नोट लिहिली होती ती अशी- "आपको मेरी जरुरत ना पडे तो अच्छा है, लेकिन आपको मेरी जरुरत पडने वाली है तब मुझे फोन करियेगा"... मैयानी दिलेलं दान समजून तो फोन नंबर फोन मध्ये सेव करून घेतला आणि आम्ही पुढे निघालो. कृष्णा ने आमचा फोन नंबर घेतला नव्हता. तो कुठला राहणारा याबद्दल आम्हाला माहिती नव्हती. त्याची गरज आम्हाला पडेल का? केव्हा पडेल? आणि त्याची मदत होईल का? असा कुठलाच विचार आम्ही केला नव्हता, मात्र त्याच्या मदतीची वेळ अगदीच समोर आहे हे आम्हाला तरी कसं समजणार?

आम्ही दिंडोरीला पोहोचलो. साधारण साडेचार पाच झाले असणार. किनाऱ्यावर आश्रम आहे तिथे गेलो. आश्रमात प्रचंड गर्दी होती. अजिबात जागा नव्हती. जी जागा आम्हाला दाखवण्यात आली की अतिशय कोंदट, कुबट, धूळ ग्रस्त अशी असल्याने तिथे रहावसं वाटलं नाही.

स्नान पूजादि आटोपून मग बघुयात, वाटलं तर अंगणात आसन लावूयात असं आम्ही ठरवलं. आमचं स्नानादी आटोपून झाल्यावर ठरल्याप्रमाणे अंगणात आसन लावणार तोच बाबाच्या मनात विचार आला, अजून कुठली जागा माहीत असेल तर ह्या कृष्णाला विचाराव का? जी चिठ्ठी मैया ने आपल्या हाती दिली कदाचित त्याचा उपयोग करण्याची हीच वेळ असेल? कदाचित अशी वेळ येणार आहे हे माहीत असल्यानेच मैया ने कृष्णाला त्याचा नंबर आम्हाला देण्याची बुद्धी दिली असेल?.. बाबांनी कृष्णाला फोन केला. फोन येताच कृष्णाने आम्हाला आम्ही कुठे आहे ते विचारलं आणि फोन बंद केला. मग कृष्णा चा फोन लागला नाही. मात्र थोड्याच वेळात आम्हाला शोधत शोधत दोघं मुलं आली. त्यांच्याजवळ दुकानात काढलेला आमचा आणि कृष्णाचा फोटो होता. "बाबाजी मैया जी चलो आपकी व्यवस्था दुसरी जगह कर दीयी है.. अभी अभी हमारे बडे भैया कृष्णा भैया का फोन आया था.. " असं म्हणत ती दोघं मुलं आम्हाला एका मोठ्या बिल्डिंगच्या फटका समोर घेऊन आलीत. ही बिल्डिंग बहुधा काही ऑफिसेस किंवा कमर्शियल कॉम्प्लेक्स सारखी असावी मात्र कुठलीही पाटी लिहिलेली नव्हती. "यहाँ नीचे एक रूम है, आप विश्राम कीजिए. भोजन थोडी देर मे आ जायेगा" असं म्हणून आमचं सामान रूम मध्ये ठेवून ती मुलं निघून गेलीत... सांगितल्याप्रमाणे थोड्यावेळात पुरी, भाजी, भात वरण आणि गुलाबजाम असा जेवणाचा डब्बा आला. कृष्णाचा फोन काही केल्या लागेना... मात्र ती रात्र अगदी फाइव स्टार फॅसिलिटी असल्यासारखी गेली... कोण कुठला हा कृष्णा मैयाच जाणे... पुढे अनेक दिवस कृष्णाचा फोन लावून पाहिला मात्र त्याचा फोन कधीच का लागला नाही हे कोडं उलगडत नाही. कृष्णाने देखील नंतर कधी फोन केला नाही. माझ्याकडे या व्यतिरिक्त कृष्णाबद्दल काहीही अजून माहिती नाही. इतकंच काय

तर आमचा आणि कृष्णाचा फोटो देखील कृष्णाने त्याच्या कॅमेराने काढला होता तो ही आमच्याकडे आलेला नाही.

दिंडोरी होऊन पुढे सलैया, किसलपुरी मार्गे नंतर आम्ही सक्काला येउन थांबलो. हा रस्ता डोंगराळ रस्ता आहे. दूर दूरपर्यंत रस्ता आणि चढाव दिसत राहतो. आजूबाजूला शेती आहे आणि झाडं अजिबात नाहीत. दुपारच्या टळटळत्या उन्हात विसावा म्हणून असा काही नाहीच. नाही म्हणायला कुठेकुठे पाण्याचे रांजण भरून ठेवलेले. आणि वाटेत येणारे जाणारेही फार म्हणून नाही. दुपारचं टळटळ ऊन मला जाणवू लागलं होतं. मजल दरमजल करत समोर दिसणाऱ्या टेकडीच्या वर असलेल्या वस्तीमध्ये आता आपण विश्राम करू असं आम्ही ठरवलं होतं. जवळचं पाणी संपत आलं होतं. क्वचित एखादा येणारा जाणारा नर्मदे हर करायचा. असाच कुठून सा एक माणूस आमच्या पाशी येऊन थांबला. त्याच्याजवळ हिरो पुक गाडी होती. त्याच्या गाडीच्या दोन्ही बाजूला कसल्याश्या मोठाल्या बॅग बांधल्या होत्या. शेताच्या एका कोपऱ्यात, नालीच्या बाजूला, एका काटेरी झाडाखाली, थोड्याशा सावलीत मी आणि बाबा बसलेलो होतो. ती गाडी आमच्या पुढे येऊन थांबली आणि त्या गाडीवाल्या तरुणाने मागच्या बॅगा उघडून सुंदर रसरशीत लाल टमाटे बाहेर काढले. पटकन खिशातून चाकू काढला. टमाट्याच्या चार फोडी केल्या त्यावर मीठ मसाला घालून एका पेपर प्लेट मध्ये आमच्या पुढ्यात ठेवल्या. "बाबुजी अभि खेत से तोडे है टमाटर, एकदम ताजे है, मुझे नमक मसाला डालकर खाना पसंद है इसलिये साथ नमक मसाला भी रखा है.. आपको देख के लगा आपको बहुत प्यास लगी होगी इसीलिए अभी काटके दिया टमाटर... और भी है रास्ते के लिए देकर रखता हु" असं म्हणत चार टमाटे बाबाला आणि चार टमाटे मला असे जबरदस्ती हातावर ठेवले. सोबतच दुसऱ्या पिशवीतून काही आवळे काढले आणि तेही आम्हाला दिले. मैय्या फक्त भुकेची काळजी घेते असं नाही. माझ्यासारख्या डायटीशियनला त्यावेळी टमाटे आणि आवळे मिळण्याचं महत्त्व समजू शकतं. योग्यवेळी रसदार आणि पोषक विटामिन असलेलं फळ मिळणं म्हणजे काही गंमत नाही हं!

याच रस्त्यावर एक स्कूटर वाले म्हातारे आजोबा येऊन थांबले. आमची चौकशी केली. आम्हाला दहा दहा रुपयांची दक्षिणा घेऊन परत फिरले आणि म्हणाले "मै अभी आ रहा हु, आप चलते रहो मै आपको पकड लूंगा"... आम्ही पुढे निघालो. त्या आजोबांची दक्षिणा देऊन झाली होती. आता कशाला परत येतील ते? असा विचार करून आम्ही त्यांच्यासाठी थांबलो नाही. पुढेच चालत राहिलो. तासा दीड तासांनी स्कूटर वाले आजोबा पुन्हा आमच्या मागून आले आणि एक भली मोठी पिशवी आमच्या हाती दिली. त्या पिशवीचं वजन साधारण तीन-साडेतीन किलो असेल. आम्ही एवढी जड पिशवी घेऊन चालू शकणार नाही. तुम्ही दक्षिणा दिली आहे. आता यात काय ते तुम्ही परत घेऊन जा. थोडं थोडं नावापुरतं वाटल्यास आम्ही खातो. असं आम्ही त्या आजोबांना सांगितलं. आम्हाला वाटलं त्या पिशवीत नक्कीच चिवडा, फळं किंवा तत्सम सामान असेल. मात्र त्या पिशवीमध्ये जवळ जवळ एक किलो तांदूळ एक किलो मुगाची डाळ, एक पाव तेल, हळद, तिखट, मीठ, मसाला, बटाटे, वांगे, कांदे, असं खिचडीला लागणारं रीतसर सामान आमच्या दोघांसाठी वेगवेगळे पॅक करून दिलं होतं. तेलाच्या प्लास्टिकच्या बाटल्या व्यवस्थित पॉलिथिन मध्ये बंद करून रबर बैंड लावून दिल्या होत्या. आणि हे सगळ आम्ही घेऊन जावं म्हणून ते आजोबा आम्हाला आग्रह करत होते. साधारण सत्तरीच्या आसपास त्यांचं वय असेल. आम्हाला दक्षिणा दिल्यानंतर हे आजोबा 20 किलोमीटर मागे घरी जाऊन हे सगळं सामान घेऊन आले होते. "बहुत दूर से सिर्फ आपके लिये लाया हु, आप कृपया रख लीजिए और बनाके पा लिजीये तो हमे अच्छा लगेगा".. असे आग्रह मोडवण्यासाठी खूप कठोर हृदय लागतं हो! आणि मैयाच्या सान्निध्यात हृदयाची कठोरता अगदी पूर्णपणे धूवून निघालेली असते. आमचा नाईलाज झाला आणि तेवढी वजनी बॅग घेऊन आम्ही पुढे चालू लागलो. मात्र त्या वेळी आजोबांच्या चेहऱ्यावर जे आनंदाचे, सेवेचे भाव दिसत होते त्या आनंदापुढे तीन-साडेतीन किलो वजन म्हणजे काहीच नाही!

याच रस्त्यावर पुढे एक कार येऊन आमच्या जवळ थांबली. खिडकी खाली करून आतल्या माणसाने आम्हाला खिडकीजवळ बोलावलं. शंभर शंभर रुपये दक्षिणा आमच्या

हातावर ठेवली. इतकी दक्षिणा नको असं म्हटल्यावर कार मधला साठीच्या आसपासचा माणूस आम्हाला म्हणाला "नर्मदा मैया की हम पर बहुत कृपा है. उनकी वजहसे आज मै जिंदा हू. उनके भक्तो के लिए जितना करुंगा उतना कम है, मुझे तो आपकी बहुत सेवा करनी है, वो तो हम करेंगे. यह रुपये तो कुछ भी नही"... आम्ही रात्री कुठे थांबणार आहोत अशी चौकशीही त्या माणसाने केली. आम्हालाच काही कल्पना नसल्याने "मालूम नही" असंच उत्तर आम्ही दिलं... "मै आपको धुंड लुंगा" तो म्हणाला. ते स्कूटर वाले आजोबाही असंच म्हणाले होते... पण ह्या कार वाल्या माणसाबद्दल एक शंका मनात आली. हा माणूस कार मधून उतरून खाली देखील आला नाही. त्याने आम्हाला खिडकीपाशी बोलावलं... सेवा करायची आहे असं म्हणतो मात्र वागणुकीतून तसं दिसत नाही असा विचार मनात येऊन गेला. तो तसाच ठेवून आम्ही पुढे निघालो.

आम्ही सक्का या गावाला पोहोचलो. तिथे एका चहा वाल्याने आम्हाला चहाला बोलावलं. डावीकडे आत एक दीड किलोमीटरवर एक मंदिर आहे तिथे तुम्ही राहू शकता असं त्याने सांगितलं. मात्र एक माणूस आम्हाला बोलवायला आला. "आप हमारे घर चलीये यही सामने तो है..." हे घर श्री नायक यांचं. त्यांच्या घरी गेल्यावर जी काही सेवा मिळाली त्यामुळे मन भारावून गेलं. कोण खरंच कुठल्या परिस्थितीत असतो आणि तरीही कशी सेवा, निस्सीम भक्ती आपल्यापुढे येते याचे आलेले प्रत्येक अनुभवच वेगळे आहेत. या नायक कुटुंबातल्या मुलीची गोष्ट सांगितली तर अंगावर काटा येईल.

तो कार मधला माणूस उतरून खाली का आला नाही त्याचंही उत्तर मिळालं. "मै आपको धुंड लूंगा, अभी तो बहुत सेवा करनी है" असं म्हणणारा कार मधला माणूस आम्हाला पुन्हा भेटला का? आमच्या मनात येऊन गेलेल्या विचारांच्या मागे इतकं काही असू शकतं याचा उलगडा आम्हाला झाला खरा पण तो कसा झाला हे पुढच्या भागात सांगणार आहे. तोवर नर्मदे हर

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७७

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला कुकरामठच्या कुत्र्याची गोष्ट सांगितली होती. रस्त्यात थांबून आधी दहा दहा रुपये आणि मग भरपूर शिधा देणाऱ्या काकांबद्दल पण सांगितलं. आम्हाला गाडी जवळ बोलावून, काच खाली करून, दक्षिणा देणाऱ्या माणसाबद्दल देखील सांगितलं. त्यावेळी मनात एक विचार येऊन गेला होता. मुझे "नर्मदामैया की बहुत सेवा करनी है" असं म्हणून भरपूर दक्षिणा देणारा माणूस कारमधून खाली देखील उतरला नाही, याचं आश्चर्य वाटलं होतं. कारण नर्मदापरिक्रमा वासींविषयी प्रेम असणारी व्यक्ती, नर्मदे वर श्रद्धा असणारी व्यक्ती, विनयशील असते असा आजपर्यंतचा अनुभव.... मग ह्या माणसाने साधं खाली उतरू नये हे वेगळं वाटलं. पण आपल्याला वाटतं तसं नसतं. काय झालं होतं ते आता सांगते.

शेतातले ताजे टमाटे, रसदार आवळे खात खात आम्ही सक्का या गावापर्यंत पोहोचलो होतो. चहा वाल्याकडे असतानाच समोर राहणाऱ्या नायक दादांनी आम्हाला त्यांच्या घरी बोलवलं. एक जिना खाली उतरून मग छोटसं अंगण आणि घर. नायक दादांच्या घरी आल्यानंतर घरातल्या मंडळींचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. घरातल्या मैय्या जींनी फटाफट हालचाली करून समोरची छोटी खोली आमच्यासाठी पूर्ण रिकामी करून दिली. नको नको म्हणताना सुद्धा खोलीतले जड लोखंडी पलंग मुलाबाळांना, तरूणांना बोलावून अंगणात काढून ठेवले. "आप पलंग पे नही आसन लगाते हो, हमे पता है" असं म्हणत खोली साफसूफ करून आमच्या आसनाची व्यवस्था करून दिली.

परिक्रमावासिंची सेवा करणं याहीपेक्षा नायकांच्या घरी होत असलेली सेवा ही अक्षरशहा तळहातावरच्या फोडाप्रमाणे कुणाला जपावं तशी होती. यांच्या घरी मागच्या घराचं बांधकाम सुरू होतं. पक्क बाथरूम तयार होत होतं तोवर पडदा लावलेली छोटीशी खोली बाथरूम सारखी वापरत होतेत.. मी स्नानाला जाणार म्हटल्यानंतर मैयाजींनी विहिरीतून स्वत: पाणी काढून गरम केलं आणि बाथरूमपर्यंत घेऊन आल्यात. इतकंच काय तर माझं स्नान होईस्तोवर त्या बाहेरच उभ्या होत्यात.. "आप स्नान कर लो माताजी मै खडी हू यहा" ... असं म्हणून पडदा उडू नये याची काळजी त्या घेत होत्या... मी बाहेर येताच तेलाची बाटली, क्रीम, कंगवा असं सगळं त्यांच्याकडे तयारच होतं... कशाची म्हणून कमी पडूच द्यायची नाही असाच जणू संकल्प होता त्यांचा... आम्ही यातलं काही आम्ही वापरत नाही म्हटल्यावर त्या थोड्या हिरमुसल्या झाल्या खऱ्या पण त्यांच्या उत्साहात कुठेही कमी झाली नाही.

त्यांच्या घरी स्वयंपाकात पंचपक्वान्न असणार हे काही वेगळं सांगायला नको. अंथरूण-पांघरूण, रात्री लागलं तर प्यायला पाण्याचा तांब्या पेला भरलेला, इतकंच काय तर कछुआ छाप, काड्या पेटी, लाईट गेले आणि रात्री गरज पडली तर मेणबत्ती, टॉर्च, बाहेर जाण्या-येण्यासाठी स्लीपर, अशी सगळी तयारी आमच्या या आसन लावण्याच्या खोलीत आधीपासूनच तयारी ठेवली होती. पण भोजन प्रसादीच्या वेळेस वेगळाच अनुभव आला.

मी पहिला घास घेतला आणि मैया जी रडू लागल्या. आपल्या घरी परिक्रमावासी येऊन राहतात आहे, आपल्याला त्यांची सेवा करण्याचा अवसर मिळतो आहे याचा तो आनंद असावा असं मला वाटत होतं मात्र मूळ कारण थोडं वेगळं होतं. आम्हाला मनसोक्त जेवतांना पाहून मैया जींचे डोळे भरून आले होते याचं कारण म्हणजे मैया जींची लाडकी, एकुलती एक लेक!.. या लाडक्या कन्येला गेल्याच वर्षी नियतीने या कुटुंबापासून हिरावून नेलं होतं.

मैया जी सांगत होत्या. "हमारी बिटिया को परिक्रमावासीकी सेवा करना अच्छा लगता था. उसे तो कन्या भोज भी बहुत पसंद था. वह जब छोटी थी तब कन्या पूजा के लिए जाया

करती थी. आज जब परिक्रमावासी हमारे यहा भोजन करते है तब लगता है की हमारी बिटिया भोजन कर रही है. " आम्हा परिक्रमावासीं मध्ये एक आई आपल्या मुलीला बघत होती. मी स्नानाला गेले असताना पडदा उडू नये म्हणून तो स्वत: धरून ठेवणारी एक आई होती, हातात क्रीम, तेल, कंगवा घेऊन उभी असणारी एक आई होती! आणि म्हणून ही सेवा केवळ सेवा नाही तर मातृत्वाचा वर्षाव होता आमच्यावर... या माऊलीचं हे प्रेम बघून नकळत माझ्याकडून त्यांना 'मैया जी' ऐवजी 'मां' अशी हाक गेली तर नवल ते काय?

आम्ही भोजन प्रसादिला बसलो होतो तेव्हाची एक गोष्ट अजून सांगते. आम्ही जेवायला सुरुवात केली असेल नुकतीच, आणि दोघ तरुण आत आले. त्यांच्याजवळ फळांनी भरलेल्या पिशव्या होत्या. एक मोठा डबा होता. ते सामान तिथेच ठेवून "हम आते है पाच मिनिट मे" असं म्हणून निघून गेले. पुन्हा आले तेव्हा त्यांच्यासोबत दुपारी भेटलेला कार मधला माणूस होता. खिडकीपाशी आम्हाला बोलावून दक्षिणा देणारा आणि "मै आपको ढूंड लुंगा म्हणणारा" हाच तो माणूस... हा खाली का उतरत नाही याचं कारण आता आम्हाला समजलं होतं. हा कारमधून खाली न उतरणारा माणूस दोन्ही पायांनी अधु होता. एका एक्सीडेंट मध्ये त्याचा कमरेखालचा पूर्ण भाग निकामी झाला होता. जीव तेवढा वाचला तेसुद्धा नर्मदा माईच्या कृपेमुळे, म्हणून परिक्रमावासींची मनःपूर्वक सेवा तो करत होता.

हा कार वाला माणूस काही साधासुधा माणूस नव्हता. यांचं आडनाव देखील नायक. दिंडोरीचे हे राहणारे. कपड्याचे मोठे व्यापारी. या भागात मोठं नाव असणारे. हे दिंडोरी पासून आमच्यासाठी फळं आणि गुलाबजाम घेऊन आले होते... "आपको कैसे पता चला के हम यह रुके है?" असं विचारल्यावर म्हणाले, "यहासे बीस- चालीस गाव आगे तक भी मुझे पता चल जाएगा के आप कहा हो.. हर जगह मेरे पहचान वाले लोग रहते है. जैसे ही आप दोपहर को आगे बढे वैसेही मैने अगले गावों मे फोन करके आपके बारे मे बता दिया था. आप किस गाव में, किसके घर में रुके है यह मेरे पहचान वाले लोग मुझे फोन करके बता देंगे. मैने कहा था

मै, आपको ढूंड लूंगा, मैने आपको ढूंड लिया"... हा एवढा अट्टाहास फक्त सेवेसाठी! खरंच काय परिस्थितीमधून हे कारवाले नायक काका गेले असतील? पुढचे पाच-सहा दिवस, जवळ जवळ शंभर -सव्वाशे किलोमीटरपर्यंत हे काका रोज संध्याकाळी आमच्यासाठी जेवणाचा मोठा डबा घेऊन येत राहिले.

पुढे जेवणाचा प्रश्न आठ दिवस आला नाही कारण नायक काका डब्बा घेऊन येत होते मात्र चावी नावाच्या गावात जरा गंमतच झाली. मंदिरात काहीतरी कार्यक्रम सुरू असल्याने राहण्याची व्यवस्था होऊ शकली नाही. खरंतर इथे स्वतःहून कोणी बोलावलं नाही नाही. तरीही सोय झाली ती अगदी फाईव्हस्टार सारखी. या फाईव्हस्टार सोयी नंतर लगेचचचा टप्पा आला मधुपुरी चा. इथे आम्ही चक्क गोठ्यात राहिलो, मात्र हा अनुभव देखील अत्यंत गोड असा होता...कसा ते सांगते पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७८

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला सक्का मधल्या नायक कुटुंबाची गोष्ट सांगितली. पायांनी अधू असलेले आणि दिंडोरीचे व्यापारी दुसरे नायक काका आमच्यासाठी पुढचे काही दिवस डब्बा घेऊन येत असत. त्यांनी मोबाईल मध्ये आमचा फोटो काढला होता आणि तो फोटो पुढच्या काही गावांमध्ये सर्क्युलेट केला. हे परिक्रमावासी जिथे कुठे थांबले असतील तिथे मी डब्बा घेऊन येईल, मला तशी माहिती कळवावी असं त्यांच्या संपर्कात असलेल्या त्या त्या गावातल्या लोकांना सांगण्यात आलं होतं. शेवटी एका ठिकाणी आम्ही त्यांना अगदी विनवणी केली. तुमच्याकडून भरपूर सेवा झाली आहे, आता कष्ट घेऊ नका. तुमची श्रद्धा आणि आईची इच्छा या दोन्हींचा आदर-सन्मान ठेवून आतापर्यंत आपण आमच्यासाठी बरंच अंतर रोज कार नी प्रवास करत आहात. आम्हाला आता ते बरं वाटत नाही. आमच्या तोंडून हे शब्द कदाचित नर्मदामय्याच्या इच्छेमुळे निघत असतील असं मानून त्या नर्मदा माई साठीच आता तुम्ही डब्बा घेऊन येऊ नका असं त्यांना सविनय सांगितलं आणि नंतर आम्ही पुढे चालू लागलो.

आता चावी गावातली गोष्ट सांगते. आम्ही चावीला गेलो असताना मंदिरात काहीतरी कार्यक्रम सुरू असल्या कारणाने आसन लावायची व्यवस्था तिथे होऊ शकत नव्हती. नायक कुटुंबाकडे घेतलेली सेवा पाहून कुणाच्या तरी घरी जाऊन राहणं मलाला तितकं प्रशस्त वाटत नव्हतं कारण इतका मान, इतकी श्रद्धा, इतकी सेवा, बघून ही आपली लायकी नाही हे मनाला आतून कळत होतं, काहीही कर्तुत्व नसताना हे असं सगळं मिळणं आणि उगाच चा मोठेपणा मिरवणं याची खरोखर लाज वाटत होती. अगदीच अशक्य असेल त्याच वेळी कोणाच्या तरी घराचा आसरा घ्यायचा असं ठरवलं. लोक मनापासून बोलवतात पण तरीही आपण कोण आहोत हे आपल्याला माहीत नसतं का? असं म्हणतात नर्मदा मैया वैराग्य देते, नर्मदा मैया

तुम्हाला तुमची पायरी दाखवते, तुमचा अहंकार गळून पडू लागतो... मात्र हे सगळं शिकवण्याची घडवून आणण्याची तिची पद्धत खरोखरच वेगळी आहे. एखादा धडा देऊन किंवा अद्दल घडवून कोणाची पायरी दाखवली तर कदाचित तो परिणाम तात्पुरता असू शकतो म्हणून नर्मदामैया वेगळाच मार्ग अवलंबत असली पाहिजे. अहंकारानी ठासून भरलेल्या पुतळ्याला ती इतकं वर नेऊन ठेवते की तिथून त्याला स्वतःची, कितीतरी खाली असलेली पायरी स्पष्ट दिसू लागते. माझ्या पायरीच्या वर असलेले अनेक लोक दिसू लागतात. माझ्याहून कितीतरी पायऱ्या वर असलेल्या लोकांमध्ये माझ्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात सात्विकता, अहंकार शून्यता, श्रद्धा, सेवाभाव आहे हे जेव्हा मी माझ्या डोळ्यांनी बघते आणि अनुभवते तेव्हा मला माझी पायरी दाखवायची गरज पडत नाही, ती मला आपोआप दिसते, हाच माझी पायरी दाखवण्याचा नर्मदामैया चा मार्ग आहे. प्रत्येक पायरी गणिक एक एक विकार सोडला किंवा सुटला की ती एकेक पायरी आपोआप वर चढल्या जाते, हे वरून दाखवून चटकन लक्षात येतं. खालून वर बघणं कठीण मात्र वरून खाली बघणं सहज आणि सोपं आहे, म्हणूनच कदाचित ही नर्मदा माई माझ्यासारख्या लायकी नसलेल्या व्यक्तीच्या भाग्यात इतका मान, इतकी सेवा, इतकं प्रेम लिहून देते की त्यानंतर मला त्या वरच्या पायरीची ओढ लागू लागते. हो पण ही ओढ लागता लागता माझ्या मधले विकार निघून जाण्याची इच्छा जरी प्रबळ असली तरीही.. म्हणजे विकार दूर होऊन माईचं सान्निध्य लाभावं ह्या केवळ ईच्छेनी देखिल ही लागणारी ओढ शुद्ध भक्तीमय ओढ होऊ लागते. मग ती सेवेसाठी, अहंकारासाठी, सन्मानासाठी लागत नाही, मात्र प्रेमासाठी, प्रेमापोटी आणि नर्मदामय्याच्या भक्तीसाठी लागते हे तिने जाणवून दिले आहे.

तर शक्यतोवर कोणाच्या घरी न थांबता मिळेल तिथे आणि मिळेल तसं आसन लावायचं असं आम्ही ठरवलं. आम्ही ठरवलं पण म्हणून असं घडत नाही. कदाचित स्वतःची पायरी स्वतःला ओळखता यावी इतकीच त्या नर्मदामय्याची इच्छा असेल. त्यानंतर मात्र स्वीकृती चा धडा द्यायला तिने सुरुवात केली. सांगते. मंदिरात जागा नव्हती त्यामुळे मंदिराच्या बाजूला

असलेल्या एका रिसॉर्टच्या अंगणात आसन लावावं असं आम्ही ठरवलं. जेवणाचा डब्बा नायक काका घेऊन आले होतेच. रिसॉर्टला छान कौलारू ओसरी होती तिथे आम्ही सामान ठेवलं. मंदिरात भजनाचा कार्यक्रम होता, तो झाला की आसनं लावू असं ठरलं... पूजा, भजनाचा कार्यक्रम, भोजन प्रसादी असं सगळं झाल्यावर तिथली जागा थोडीशी झाडून घ्यायला म्हणून मी झाडणी मागितली. रिसॉर्टच्या चौकीदारानी झाडणी आणून दिली आणि ती ओसरी मी झाडून घेतली. तोपर्यंत हा रिसॉर्टचा चौकीदार शांतपणे समोरच्या खुर्चीत बसला होता. आम्ही आसन घालणार तेवढ्यात त्याला कोणाचा तरी फोन आला. त्याने रिसॉर्टची खोली उघडून दिली आणि “हमारे साहब ने बताया है की परिक्रमावासी को रूम खोल के दो. पैसा नही लेना... उनकी सेवा करो, क्या चाहिये क्या नही पूछ लो” असं म्हणून आमचं सामान त्याने खोलीत नेऊन ठेवलं... अतिशय मोठी, एयर कंडीशन्ड, प्रशस्त अशा खोलीत आमची व्यवस्था नर्मदा माई नी केली होती. तो फोन कोणाचा होता हे आम्हाला माहित नाही. आम्ही विचारलं देखील नाही. साधारण बारा फूट बाय दहा फूट इतकं मोठं बाथरुम असलेली खोली किती मोठी असेल याचा नुसता विचार केला तरी आपण राजमहालात आहोत की काय असंच वाटेल न? वॉशिंग मशीन पासून गिझरपर्यंत इथे सगळं व्यवस्थित होतं. अर्थात यापैकी कशाचीच आम्हाला गरज भासली नाही तरीही आमच्या दिमतीला या सगळ्या वस्तू लागून होत्याच!... मात्र आता आम्हाला आमची पायरी समजली होती.. अजून अंगवळणी पडली नसली तरी डोळ्यांनी दिसली मात्र नक्कीच होती.

चावी होऊन आता पुढे देवगाव संगमाला जायचं होतं. इथे बुढनेर आणि नर्मदामय्याच्या संगम आहे. इथे जमदग्नी ऋषींच्या आश्रम आहे. त्यांनी इथे अनेक वर्ष तपस्या केली होती. हा रस्ता काही अंतरापर्यंत पळसाच्या जंगलातून जातो. मार्च महिना जवळ येत होता त्यामुळे पळसाला थोडी थोडी फुलं येऊ घातली होती. इथला पळस पिवळेपणाकडे झुकणारा पळस होता. काही भगवी झाडही होतीच.. पण भगव्यापेक्षा पिवळा रंग डोळ्यांना जास्त सौम्य दिसायचा. भगव्या पळसाबद्दल माझ्या काही वेगळ्या भावना आहेत पण त्या पुढे कधीतरी

सांगेन. एका वाक्यात सांगायचं झालं तर एखादा तेजस्वी संन्यासी उंच मान करून निळ्याआकाशाकडे बघतोय असं काहीसं मला भगव्या पळसाच्या झाडाकडे पाहून वाटत असतं... असो.. तर खाले दिठोरी, मोहगाव करत करत आम्ही देवगावला पोचलो च.

अत्यंत पवित्र कंपन असलेली ही जागा. प्राचीन मंदिर. लहान पण अतिशय आकर्षक घाट. प्रवाहात देखील एक दोन छोटी छोटी मंदिरं, आणि एकीकडून येणारी बुढनेर आणि दुसरीकडून वाहणारी नर्मदा मैया. या वातावरणात अशी काही जादू होती की इथून जायची इच्छाच होईना. शिवाय आश्रमाचा परिसरही व्यवस्थित मेंटेन केलेला आहे. आम्ही इथे आलो त्यावेळेला एका बैरागी बाबांनी नुकतंच इथे लक्ष द्यायला सुरुवात केली होती. स्वच्छता, मंदिरांची पूजाअर्चा, परिक्रमावासींचीची व्यवस्था सगळंच नीटनेटकं होतं. संध्याकाळचीची पूजा आरती आटोपून भोजन प्रसादीची वाट बघता बघता आम्ही घाटावरच बसून राहिलो, तेव्हाची एक गंमत सांगते.

इथे बुढनेर नदीला बुढी माई असेही म्हणतात. बुढी माई हा शब्द कोण का जाणे माझ्या हृदयाला भिडला होता. माझ्या डोळ्यासमोर पांढरे वस्त्र धारण केलेली कुरळे पांढरे केस असलेली, पाठीला किंचित वाक आलेली, चेहऱ्यावर अतिशय प्रेमळ भाव असलेली एक वृद्ध आजी डोळ्यासमोर आली. बुढी माईची ही प्रतिमा नकळत आणि अचानकपणे माझ्या डोळ्यासमोर तयार झाली होती. खरंतर ही बुढनेर नदी अशीच संथपणे वहात होती. अनुभव आणि वयाने आलेलं स्थैर्य, वैराग्य आणि सामंजस्य जसं असावं तसं या बुढी माईचं वाहाणं होतं... मी विचारच करत बसले होते आणि दिवेलागणी होऊन गेली होती. घाटाच्या पायऱ्यांवर मी आणि बाबा दोघजण बसलो होतो. अगदी पूर्ण शांतता. अशातच मागून काठी टेकत कोणीतरी चालतंय असा भास झाला. आम्ही मागे वळून पाहिलं.. मला आश्चर्याचा धक्काच बसला. माझ्या मनातल्या प्रतिमेच्या बरीच जवळ असलेली एक "बुढी माई" पायऱ्या उतरत होती. तिच्या हातात द्रोणांचे दिवे होते. ती पायऱ्या उतरून खाली आली. स्नान केलं आणि

ओलेत्याने दिवे सोडले. दिवे सोडत असताना एक कटाक्ष माझ्याकडे टाकला आणि अतिशय प्रेमळ असं स्मितहास्य दिलं... आली तशीच काठी टेकत टेकत, एकही शब्द न बोलता ती निघून गेली. मी मात्र हे सगळं खरं की भास याच विचारात तिथेच बसून होते... डोळ्यासमोर दिवे तरंगताना दिसत होते. बुढी माईच्या काठीचा आवाज येणे बंद झालं होतं... बाबा ही शांतच बसला होता, माझ्या मनात काहीतरी सुरू आहे याचा त्याला अंदाज असावा मात्र या बुढी माईची प्रतिमा आणि लगेच प्रत्यक्षात पाहिलेली बुढीमाई याबद्दल बाबाला काहीही माहीत नव्हतं. आजही नाही... भोजन प्रसादी साठी या असं बोलावणं आलं आणि आम्ही पुन्हा आश्रमात गेलो.

दुसऱ्या दिवशी बाबाजींनी आम्हाला सगळा आश्रम, सगळी मंदिरं दाखवली आणि खूप इंटरेस्टिंग अशा काही गोष्टी सांगितल्या. आरस्पानी या शब्दाचा खरा अर्थ जमदग्नी आश्रमात असलेल्या अतिप्राचीन मंदिरातल्या अर्ध्या तुटलेल्या शिवलिंगाला पाहून कसा कळतो आणि या शिवलिंगाची एक चमत्कारिक गोष्ट आम्हाला कशी समजली हे मी तुम्हाला पुढच्या भागात सांगणार आहे. पुढे मधुपुरीच्या गोठ्यातल्या अनुभव पण सांगणार आहे... पुढच्या म्हणजे ७९ व्या भागात.. तोवर नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ७९

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला बुडी माई चा अनुभव सांगितला. माझ्या मनातल्या कल्पनेतल्या बुडी माई सारखीच मला भेटलेली ही बुडी माई होती. मी तिला बुढीमाई म्हणत होते, मात्र बुडणेर वरून मी तिचं नामांकन बुडी माई असं केलं नंतर. तर ह्या बुडी माईचं दर्शन घेऊन आम्ही भोजन प्रसादी साठी वर आश्रमात परतलो. आमची भोजन प्रसादी आटोपली, मात्र नंतर लक्षात आलं की आज आम्ही ज्यांचे कडून भोजन प्रसादी घेतली होती ती मंडळी कोणी दुसरीच मंडळी होती. आश्रमातल्या मंडळींनी तयार केलेली भोजन प्रसादी अजून व्हायची होती. आश्रमातले साधूमहाराज आम्हाला पुन्हा प्रसादिला बसण्याचा आग्रह करत होते. मग आम्ही मागच्या पटांगणात घेतलेली भोजन प्रसादी कुणी दिली होती? सांगते. आश्रमातल्या महाराजांना आमची भोजन प्रसादी झाली असल्याचं आम्ही सांगितलं, आणि ते थोडे नाराज झाले. म्हणाले "इतने प्यार से आपके लिए भोजन बनाया था और आप पाओगे ही नही?" महाराजांच्या आग्रहासाठी थोडी खिचडी खाल्ली खरी पण गच्च पोट भरलं असल्यामुळे पुढे काही धकेना... आमची अशी अवस्था पाहून आश्रमातले महाराज म्हणाले.. "ऐसा क्या खाना पा लिया आपने? हमसे भी ज्यादा प्यार से बनाया था क्या? अब तो देखना पडेगा किस ने भोजन प्रसादी बनाई थी?" खरंतर आम्ही जेवत नाही हे पाहून बोललेलं हे वाक्य! पण अशा वाक्यांमध्ये ही काहीतरी संदेश असतो बरं का!

आश्रमातल्या बाबाजींच्या या वाक्यामुळे आम्हालाही असं वाटलं की आपण जिथे भोजन प्रसादी घेतली आहे तिथे जाऊन त्या मंडळींचे निदान धन्यवाद तरी करायला हवेत. दुसरा विचार मनात असा आला की ज्यांनी आम्हाला जेवायला वाढलं, ते किती सेवाभावी असतील,

परिक्रमावासी कोण कुठले कसलीही चौकशी न करता फक्त आलेल्या परिक्रमावासीला पोटभर खाऊ घालणं या व्यतिरिक्त त्यांच्या मनात कुठलाच विचार नव्हता हेच लक्षात आलं. कुतूहलापोटी आम्ही पुन्हा मागच्या पटांगणात गेलो. तिथल्या जेवणावळी आटोपल्या होत्या. तिथे आम्हाला जेवायला वाढणारे दोघं-तिघं तरुण एका सतरंजीवर बसले होते. मी त्यांनाच धन्यवाद दिला तर म्हणाले.. "हमने तो सिर्फ खाना परोसा था, एक अम्मा और उनका परिवार खाना लेके आये थे. " त्या मुलांनी सांगितलेल्या म्हाताऱ्या बाईचं वर्णन माझ्या बुडी माईशी तंतोतंत जुळत होतं. कोण मंडळी कुठून आली हे त्या मुलांनाही माहित नाही. "परिक्रमावासी को खाना खिलाना है तुम लोग भी खाना" असं म्हणून त्या परिवाराने या मुलांना मदतीला घेतलं होतं एवढंच!!

माझ्या बुडी माईनी मला दर्शनही दिलं आणि प्रसाद ही दिला! मलाच मात्र कळलं नाही! आता मैयाला येऊन मिळणारी ती बुडी माई नक्कीच कुणीतरी साध्वी असावी जी आता नदीच्या रुपात वाहते हे समजण्याइतकी काही मी खुळी नाही. मला कुब्जा आठवली. कुब्जेच्या कुबड असलेल्या शरीराचं रूपांतर एका सुंदर स्त्रीमध्ये झालं ती श्री कृष्णामुळे. श्रीकृष्णाने कुब्जेला अनेक युगे जिवंत राहण्याचा वर दिला आणि आपल्या तपस्ये नंतर कुब्जेचे रूपांतर नदीमध्ये झालं. ही कुब्जा नदी पुढे नर्मदेला येऊन मिळते.... तशीच काही अख्यायिका या बुडी माईची असली पाहिजे असं वाटतं. मला तरी अशी अख्यायिका अजून पावेतो माहित नाही... मात्र त्या माईच्या दर्शनाची कृपा माझ्यावर झाली हे निश्चित!

आम्ही रात्री लवकरच झोपलो. पहाटे तीन-साडेतीनला मला आपोआप जाग आली. मंदिरासमोरच्या ओट्यावरून खाली उतरून मी संगमाकडे बघत बसले होते. अंधार असल्याने मला फार काही दिसत नव्हतं. वारा वहात नव्हता, मात्र एखादी मंद झुळूक नक्कीच येत होती. थंडीही होती थोडी. या ब्रह्म मुहूर्ताला मी काहीतरी पाहिलं, पाहिलं नाही खरं डोळ्यांनी, पण अनुभवलं काहीतरी... मला नं नीटसं सांगता येणार नाही कदाचित पण प्रयत्न

करते. परिक्रमा मार्गावरच ज्या रस्त्याने आम्ही आश्रमाकडे आलो होतो त्या भागाला माझी नजर गेली. तिथे नर्मदा माई बघण्यासाठी एक कंपाउंड सारखं केलेलं आहे. बसायला जागा आहे, बेंच आहे. तिथून कोणीतरी येऊन नर्मदा किनारी जातंय असं मला वाटायला लागलं. दिसत काहीच नव्हतं.... मात्र त्या दिशेने अतिशय मोहक असा सुगंध आला आणि पुढे निघून गेला हे जाणवलं. नीट सांगायचं तर आधी सुगंध अगदी मंद होता मग तो तीव्र होत गेला आणि आपोआप माझी नजर जिकडून सुगंध येतोय तेव्हा दिशेकडे गेली.... कुणीतरी आपल्या बाजूने निघून जावं तसाच सुगंध बाजूनी निघून गेल्यासारखा वाटला... लेले काकांचं वाक्य आठवलं.. सुगंध येतो ना तेव्हा कोणीतरी संत सत्पुरुष किंवा कोणी शुद्ध आत्मा आपल्या आजूबाजूला असतात.. मी चटकन नमस्कार केला... तोवर तो सुगंध नाहीसा देखील झाला होता. मग मी बराच वेळ तिथेच जप करत बसले होते.. पुन्हा तो सुगंध आला नाही.

सकाळी स्नानादी झाल्यानंतर आश्रमातल्या महाराजांनी आम्हाला मागच्या बाजूला असलेली जुनी मंदिरं दाखवली. जमदग्नी ऋषी ज्याठिकाणी बसून तपश्चर्या करत असत ते स्थान दाखवलं. मागच्या भागात बोलले ते याच शिवलिंगाबद्दल. एका दगडाच्या शिवलिंगात डोकावून पाहता तुम्हाला तुमचं प्रतिबिंब स्पष्ट दिसेल असं कधी झालंय का? आणि शिवलिंग पॉलिश केलेले वगैरे नाही, अगदी नैसर्गिक बरं का! ह्या शिवलिंगाचा हा चमत्कार इंग्रजांना सुद्धा भुरळ पाडणारा होता. इंग्रजी राजवटीत इंग्रजांनी हे शिवलिंग उपटून मिळवण्याचा प्रयत्न केला होता मात्र त्याहीआधी मुस्लिम राजवटीत देखील हे शिवलिंग तोडून टाकण्याचा प्रयत्न झाला असं इथल्या महाराजांनी सांगितलं. आधी कितीतरी फुट उंच असलेलं हे शिवलिंग आता साधारण २ फूट उंच असेल. आम्ही शिवलिंगाला वाहण्यासाठी संगमावरचं जल आणलेलं होतच. ते वाहून झाल्यावर महाराजांनी आम्हाला एका विशिष्ट अँगलमध्ये उभे राहायला सांगितलं. त्या ठिकाणी उभे राहिल्यानंतर शिवलिंगावर डोकावून बघता आरशात बघावं इतकं लख्ख प्रतिबिंब पडतं. ह्याशिवाय लिंगात हिरे आहेत असं वाटून इंग्रजांनी ते तोडून नेण्याचा प्रयत्न केला मात्र ते त्यांच्याकडून पूर्णपणे तुटलं नाही. या शिवलिंगाच्या रहस्याचा अजूनही शोध

लागलेला नाही. हिऱ्या सारखं लखलखत करणार हे शिवलिंग आजही अर्ध्या तुटल्या अवस्थेतच जमदग्नी आश्रमाच्या मागच्या बाजूला असलेल्या मंदिरांमध्ये बघायला मिळतं.

इथल्या महाराजांनी सकाळी आम्हाला बालभोग तयार करून दिला. काल जेवण झालं नाही आता बालभोग झाल्याशिवाय जाऊ देणार नाही असा आग्रह केला त्यांनी. बालभोग झाल्यावर बुडी माईच्या पलीकडच्या टेकडीवरून खाली उतरायचं. या गावाचं नाव बहुधा बिलगाव पण नक्की आठवत नाहीये. इथे एक हनुमानाचं मंदिर आहे. बुडी माई पार करून झाल्यावर जी एक छोटी टेकडी आहे ती एकट पण रमणीय आहे. त्या टेकडीवरून एक मोठासा ओहोळ बुडी माईला जाऊन मिळतो. त्याच्या सुकलेल्या किनाऱ्यावरून ती टेकडी आम्ही पार केली. हनुमान मंदिरात आम्हाला पुन्हा एकदा चहा पाण्यासाठी बोलावलं... असंच थांबत थांबत आम्ही मधुपुरीला येऊन पोहोचलो. मधुपुरीला येत असताना अंधार झाला होता. मध्ये काही अंतर शेत होती आणि काही अंतर जंगलाचा भाग होता. वाटेत दोन तीन गुऱ्हाळ देखील होतीत. त्यातल्या एका गुऱ्हाळ्याचा अनुभव छानच होता. वाटेत एक जंगल लागलं त्याही वेळेला एक छान सोबत मिळाली... आणि मधु पुरीला तर एक रोटी आश्रमात मजाच आली खूप... हा अनुभव खुपच गोड गोंडस होता... पुढच्या भागात नक्की सांगते...

नर्मदे हर

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८०

नर्मदे हर

मागच्या भागात आपण जमदग्नीऋषींच्या आश्रमातील चमचमणाऱ्या शिवलिंगाबद्दल बोललो होतो. बुढी माईच्या दर्शनाबद्दल देखील बोललो होतो. मी तुम्हाला मधुपुरीच्या गोड अनुभवाबद्दल सांगेन असं म्हणाले होते. आता पुढे सांगते.

आम्ही देवगाव सोडलं आणि टेकडी पूर्ण करून बिल गावला येऊन पोहोचलो. आता पुढे रामनगर, मधुपुरी, सुखतरा, नारा, असं करत करत महाराज पुरला पोहोचलो म्हणजे एक टप्पा पूर्ण होणार होता. खरंतर बिलगाव ते मधुपुरी हा काही फार मोठा टप्पा नाही. मात्र आज आम्ही मधुपुरीला थांबलो. मधुपुरीला पोहोचेपर्यंतच अंधार व्हायला आला होता. खरं आज आम्ही अगदी हळूच चालत होतो. हा रस्ता अधून-मधून शेतातला, आणि मग पुढे वीरळ अशा जंगलातला होता. रस्त्यात लागणारे साइन बोर्ड आजूबाजूच्या जंगल परिसराची माहिती देत होते. आम्ही ज्या रस्त्यावरून जात होतो तो रस्ता पुढे जाऊन काली पहाडी नामक जंगलाकडे जात असल्याचं बोर्डवर दिसत होतं, आणि वाटेत आमचे मुक्कामाचे टप्पे येणार होते. वातावरण अतिशय प्रसन्न होतं. आम्ही आनंदाने मार्गक्रमण करत होतो.

वाटेत आम्हाला एका सायकल वाल्याने थांबवलं. "सामने आके रुकीये मैया जी, ताजा ताजा गुड खाईयेगा". थोडं पुढे गेल्यावर एका फाटका समोर तो माणूस सायकल लावून आमची वाट बघत होता. त्यानी आम्हाला फाटकाच्या आत बोलावलं, म्हणाला, "गन्ने का रस पीयोगी या चाय मंगाऊ?" आम्ही एका गुऱ्हाळ्यात आलो होतो. उसाचा रस काढून तो कढईत तापवतात तिथपासून तर सुंदर सोनेरी मधुर गुळ कसा तयार होतो याबद्दल तिथला मालक

आम्हाला माहिती सांगत होता. तो गरम गरम गूळ तोंडात टाकल्या टाकल्या विरघळत होता. जाताना आम्हाला बांधून द्यावा म्हणून छान पळसाच्या पानांचा द्रोण बनवून त्या द्रोणा मध्ये तिथल्या मालकाने आम्हाला भरपूर गूळ बांधून दिला. त्याच गुऱ्हाळ्यात आमची भेट एका संन्याश्याशी झाली. तेही परिक्रमेत होते आणि आमच्या बरोबरच पुढे येणार होते.

आमचा सत्संग सुरु झाला. ते म्हणाले, तुम्ही गूळ खाल्लात, तो कसा तयार झाला तेही बघितलं.. मग यातून तुम्ही काही शिकलात का? मी आपलं सर्वसाधारण उत्तर दिलं, उसाला पिळून त्यातला रस काढून घेतला, तो तापवला, मग गूळ तयार झाला... म्हणजे कष्टाला पर्याय नाहीत! महाराज हसले, ते म्हणालेत "बरोबर आहे मात्र आता तुमच्याकडून अशा उत्तराची मला अपेक्षा नव्हती. मी तुम्हाला अजून थोडा वेळ देतो. तुम्ही खरंच काही शिकला असाल तर मला सांगा..." खरंतर माझ्या मनात जे सुरू होतं ते मी दिलेल्या उत्तरांपेक्षा वेगळं होतं, पण त्या विचारावर मला बोलायचं नव्हतं, निदान माझ्या मनात काहीतरी वेगळं सुरु आहे हे मी जाणवू दिलं नव्हतं कारण माझ्या मनातला हा विचार मी कोणालाही बोलून दाखवणार नव्हते. तो माझ्या पुरताच होता... पण कदाचित हे महाराज त्याबद्दलच बोलणार असतील? पण हे कळणार कसं? कारण माझ्या मनातला विचार बोलून दाखवण्याची माझी इच्छाच नव्हती.. असं काही खास कारण आता सांगता येणार नाही पण बरेचदा आपण अंतर्मुख होतो, किंवा, आत्मकोषात आत्ममग्न होऊन जातो आणि विचार मनात येत राहतात तशातलाच हा भाग असावा. हे विचार आपल्याच आतल्या अनेक पाकळ्या एक एक करून मोकळ्या करत असतात.

म्हणजे उदाहरणच द्यायचं झालं तर एखाद्या कांद्याची आवरणंच्या आवरणं आपण जर काढत गेलो तर शेवटी एक कळी येते ज्याला आवरण असं नसतं... आणि आपण एका भरीव भागा पाशी येऊन पोहोचतो, तसंच येणारे विचार मनाच्या कोषांचे आवरण दूर काढत असतात बरेचदा, आणि मग शोध लागतो तो आतल्या त्या घट्ट भरीव भागाचा... ते विचार ज्यांनी मनाचे

आवरणं निघतात, ते विचार माझ्याकडून कोणाकडेही व्यक्त झालेले त्यावेळी मला नको होते. पण म्हणून ते नव्हते असं नाही.. आता अनुभवकथना द्वारे ते सांगायला हरकत नाही म्हणून सांगते.

भल्या मोठ्या लोखंडी कढईमध्ये घातलेला उसाचा रस उकळताना मी बघत होते. त्या रसाच्या अगदी वरच्या पातळीवर बराच काडीकचरा जमला होता. उसाचा रस चांगलाच तापला होता, खालची आच जरा मंद मात्र सातत्याने सुरूच होती आणि मोठे मात्र न संपणारे उकळीचे बुडबुडे त्या उसाच्या रसाच्या खालून वर येत होते. हळू हळू उसाच्या रसातलं पाणी आटून तो रस घट्ट होत होता. रसा मधला काडीकचरा कढईच्या काठाशी जमत होता आणि सुंदर सोनेरी रंगाचा गूळ कढईच्या मध्यभागी तयार होत होता. या सगळ्यात जर महत्त्वाचा काही भाग असेल तर तो म्हणजे त्या कढईच्या खाली लावलेला विस्तव! कधी तेज तर कधी मंद असलेला विस्तव! पण हा विस्तव गूळ तयार होईपर्यंत बंद केला गेला नव्हता. गुळ तयार करणारा कारागीर हा कढईतला रस परतवत होता. माझं मन मात्र त्या विस्तवाचा कृतीवर टिकून होतं. या विस्तवानी या रसाला तापवल्यामुळे हा गूळाचा गोळा तयार झाला होता.

सुंदर सोनेरी आणि मधुर गूळ तयार होण्यासाठी उसाच्या रसाला तापवणं गरजेचं होतं.. माझ्या मनात विचारांचे हलके हलके बुडबुडे येत होते. या बुडबुड्यांना तपाच्या तापाने तापवलं तरच यांच्यापासून सुंदर सोनेरी मधुरतेची निर्मिती होणार होती. तप किंवा तपश्चर्या का करायची आणि ती सफल केव्हा होईल याचं एक प्रात्यक्षिक माझ्या डोळ्यापुढे मांडून ठेवण्यात आलं होतं. ज्या तपामुळे माझ्यामधील काडीकचरा दूर लोटल्या जाईल.. दिशाहीन तरलता किंवा वाहते पणा दूर होऊन एक स्थीरता येईल, पक्का तरीही मधुर असा आकार मिळेल आणि सोनेरी म्हणजेच दिव्यतेचा किंवा ज्ञानाचा प्रकाश निर्माण होईल तेच खरं तप... ह्या तपा मध्ये तापून निघणं हे खूप महत्त्वाचं आहे हे मला समजलं होतं... भालोदला प्रतापे महाराजांनी “साधना कशी करायची” हे मला समजावून सांगितलं होतं. या साधनेचं तपा मध्ये रूपांतर

व्हायला लागणं, आणि त्यानंतर योग्य तितका वेळपर्यंत, योग्य तो रंग, प्रकाश, आकार येईपर्यंत तपत रहाणं, तापवत राहणं आवश्यक आहे हे विचार मनात येत होते.

महाराज आमच्यासोबतच चालत होते. मी ह्या विचारांमध्ये मग्न होते कदाचित. मध्ये कुणीतरी चहाला बोलावलं. मला चहाची अजिबात इच्छा नव्हती. अगदी नावाला घोटभर चहा पिऊन आम्ही पुढे सरकलो. महाराज मात्र तिथेच थांबणार होते. जाताना नर्मदे हर झालं त्यावेळेला महाराज म्हणाले "तुमने सोच लिया है शायद, सीख भी जाओगी धीरे धीरे, लेकीन प्रयास करो तो कुछ बात बनेगी.. गूड बनाना इतना आसान नहीं है...अभी तो बहुत समय लगेगा.. प्रयास करती रहो"..

विचारांची एकापाठोपाठ एक अशी रांगच लागून राहिली होती आणि पावलं मात्र पुढे पुढे जात होती. अंधार व्हायला आला होता. आजूबाजूला जंगलाचा पट्टा होता. अनावधानाने असेल पण मी वाजवीपेक्षा हळू चालत होते. बाबाने मला जरा स्पीड वाढवायला सांगितलं, मी स्पीड वाढवली देखील मात्र तरीही आम्हाला पोचायला उशीर होणार होता. आता गुडूप अंधार व्हायच्या थोडी आधीची वेळ. जंगलातला रस्ता असल्यामुळे स्ट्रीट लाइट वगैरे प्रकार नाहीच. आम्ही काठी टेकत टेकत पुढे जात होतो आणि रस्त्यावर चिटपाखरूही नव्हतं. अजून किती अंतर जायचे याचा फारसा अंदाज नव्हता कारण बरेचदा पुस्तकात लिहिलेली अंतर तितकीच असतील असं नाही, ती कमी जास्त लिहिल्या गेली असतात. रस्त्यावरून कधी दुचाकी तर कधी चार चाकी येत जात होती. अशातच आम्हाला दोघांना पाहून एक चार चाकी गाडी थांबली. "अरे जंगल रास्ता है पचमडी का जंगल पास है, आप कहा अंधेरे मे चलते जा रहे हो, गाडी मे बैठ जाओ". आम्हाला गाडीत बसायचं नव्हतं.. आणि हा गाडीवाला हट्ट करायचा थांबत नव्हता. शेवटी तो आमच्यासोबत उतरला आणि त्याने आपल्या ड्रायव्हरला मागे थांबून लाईट दाखवायला सांगितलं. जवळजवळ चार किलोमीटर हा माणूस आमच्यासोबत पायी चालत राहिला आणि त्याचा ड्रायव्हर आमच्या मागे हळूहळू येत राहिला. आम्ही मधुपुरी गावात

येऊन पोहोचल्यानंतर निरोप घेऊन हा पुढे निघाला. कोण कुठला काही कल्पना नाही मात्र जंगलाचा अंधाराचा रस्ता पार करून देण्यासाठी नर्मदामैयानेच त्याला पाठवलं यात काहीच शंका नाही.

मधुपुरीला आश्रमा सारखं जे काय होतं ते खरं एक घर होतं. तिथे एक परिवार राहत होता. आम्ही घरात शक्यतो राहायचं नाही असं ठरवल्याने अंगणात राहायचा निर्णय घेतला. यावेळेला प्रचंड आभाळ आलं होतं आणि थोड्याच वेळात धो-धो पाऊस सुरु झाला होता. आम्हाला अंगणात आसन लावणं शक्य नव्हतं म्हणून आम्ही गोठ्यात आसन लावलं. गोठा बराच मोठा आणि ऐसपैस होता. त्याच्या एका कोपऱ्यात एक गाय आणि एक वासरू बांधून ठेवलं होतं. वासराला बागडता यावं म्हणून त्याच्या गळ्यातली दोरी गोठा भर पुरेल इतकी लांब होती. गोठ्याच्या दुसऱ्या कोपऱ्यात थोडासा सारवलेला एक भाग होता, तिथे आम्ही आसन लावलं. भोजन प्रसादी आणि आश्रमातल्या आजींबरोबर गप्पाटप्पा होईस्तोवर हे वासरू छान पैकी बागडत होतं. त्याची आमच्याशी आणि खास करून माझ्याशी छानच गट्टी जमली होती. या वासराला एक सवय लागली होती, ती अशी की या आजी रोज त्याला थोपटवून झोपवत असत. मात्र त्या रात्री त्याला आजींच्या मांडीवर डोकं ठेवायचं नव्हतं. त्याला त्याची नवीन मैत्रीण जास्त आवडली होती कदाचित. कितीतरी वेळ ते वासरू माझ्याच जवळ येऊन माझ्याच मांडीवर डोकं ठेवून लोळत पडलं होतं… अगदी लहानसं! अंगावरची लव सुद्धा मऊ असलेलं, शींगांच्या ठिकाणी नुसताच उंचवटा असलेलं. कानांचा पानासारखा आकार चटकन वर करणारं आणि अतिशय बोलके पाणीदार डोळे इकडे तिकडे मटकवून आपले लाड पूर्ण करून घेणारं हे वासरू इतकं काही लाघवी होतं की त्याचे लाड पूर्ण केल्याशिवाय राहावयचंच नाही. रात्रभर अधून मधून हे गोंडस वासरू आपल्या आईजवळ जायचं आणि नंतर माझ्या अंथरुणाच्या बाजूला येऊन झोपायचं. हा प्रकार खूपच गोंडस होता. सकाळी त्या वासराला सोडून जावंसं वाटत नव्हतं पण पुढे जाणं गरजेचं होतं.

सुरज कुंडला पोहोचण्याआधी चा एक अनुभव सांगणार आहे. अमरकंटक हून निघाले तेव्हा मैयाची इच्छा जाणून घेतली होती. दोन बोटं तिच्या पाण्यात बुडवून मगच पुढे जाण्याचा निर्णय घेतला होता आणि तिने आम्हाला पावसात भिजू दिले नव्हते आठवतंय का? ह्या वेळेला मैया मध्ये दोन बोटं बुडवून तिची इच्छा जाणून घेतली नव्हती मात्र आलेला अनुभव तिची इच्छा सांगणारच होता.. तसंच सुरज कुंडाच्या वातावरणाबद्दल आणि तिथल्या मारुतीरायाबद्दल विशेष असं काही तरी सांगायचे... पण पुढच्या भागात सांगेन.. तोवर नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८१

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला गुऱ्हाळ्याचा अनुभव सांगितला होता. मधुपुरीच्या वासराचा अनुभव सांगीतला होता. आता इथून पुढे. मधुपुरीहून आम्ही सकाळी लवकरच निघालो. आजही वातावरण ढगाळ होतं. कधी पाऊस पडेल याचा नेम वाटत नव्हता. आम्ही ही मैयाच्या दिशेने चालू लागलो. इथे घोडा घाट नावाचा सुंदर घाट आहे. तिथेच स्नानादी आटोपून व पुढे जायचं असं ठरलं. वाटेत आम्हाला अनेक जण भेटलेत. आज जाऊ नका, घोडा घाटलाच थांबा असंही काहींनी सांगितलं. ढग येत होते मात्र पाऊस पडायला सुरुवात झाली नाही तोवर चालत राहायचं असं ठरलं. घोडा घाटला छान बालभोग आणि चहा मिळाला. इथे एक अश्व प्रतिमा आहे म्हणून या घाटाला घोडा घाट असं म्हणतात. इथे योगिनी गुहा असल्याचे देखील समजलं होतं मात्र आम्ही घोडा घाटला असताना हा मुद्दा आमच्या लक्षातच राहिला नाही आणि आम्ही योगिनी गुहेची चौकशी केली नाही. पुढे गेल्यावर जेव्हा पुस्तक उघडलं तेव्हा कळलं की इथे पुस्तकात योगिनी गुहेबद्दल लिहिलेलं आहे...

खरंतर हा रस्ता सूकतरा, सीता रपटन, बागली असं करत करत पुढे सुरज कुंडला जातो. आम्हाला मात्र बागली पासून एक फाटा असल्याचं सांगितलं. आम्ही पुढे नारा पश्चि चौराहाला न जाता बागली पासून चा फाटा पकडला. हा रस्ता खरोखर रमणीय आहे. दोन्ही बाजूला झाडं आहेत. रस्ता कच्चा आहे. मध्येच एक कॅनॉल लागतो. याच्या काठाकाठाने जाताना खूप प्रसन्न वाटत होतं. सुरज कुंडच्या ५-६ किलोमीटर आधीचा एक अनुभव सांगते.

वाटेत लहान लहान दोन-तीन गाव लागले. त्यातल्या शेवटच्या गावात एका घरी पाणी मागितलं होतं आम्ही. त्या मातारामची गोष्ट. तीने बादली भरून आणली. “हात पैर धोलो बाबाजी. चाय बना देती हू” तीनं आम्हाला घरात बोलवलं. आम्हालाही चहा हवाच होता. या

बाईने गुळाचा काळा चहा केला होता आणि तो अप्रतिम लागत होता. आमचा चहा पिऊन होईस्तोवर छान गप्पा गोष्टी झाल्यात. आता निघायचं असं म्हणताच त्या माताराम ने तिथंच थांबण्याचा आग्रह केला बोलता बोलता ढसाढसा रडू लागली.

“माझी परिस्थिती खूपच वाईट आहे मैया. तुम्हीच मला यातून सोडवू शकता”. आम्ही नक्की काय करू शकतो याचा आम्ही विचार करत होतो. फार तर फार थोडी आर्थिक मदत काय ती करता येईल, त्यापुढे आपण काय करणार? असा प्रश्न मला पडला होता. ही माताराम एका पडक्या घरात राहत होती. फक्तच समोरची खोली जरा बऱ्या अवस्थेत होती बाकी तुटक्या भिंतींवर प्लास्टिक अंथरुन छत तयार केलेलं होतं. मुख्य म्हणजे अश्या घरात देखील ती भाडं देऊन राहत होती.

अतिशय कृश देहाची ही माताराम, जेमतेम पस्तीस चाळीस किलो वजन असेल हीचं... डोळे खोल गेलेले होते. ही बाबाच्या खुर्चीच्या बाजूला बसून रडत होती. आम्हाला तिचं रडणं बघवत नव्हतं “बाबूजी, तुम मेरे बाबूजी की उमर के हो अपनी बेटी की मदत करो” अशी गळ बाबाला घालत होती... हृदयाचं आणि पाणी झालं होतं आमच्या. तिला विचारलं... काय मदत करू शकतो आम्ही तुझी? बाबांनी तिला काही रक्कम काढून दिली. ती रक्कम खरंतर तिला घ्यायची नव्हती पण तिच्या घरी गेल्या आठ दिवसात चहा शिवाय दुसरं काहीच शिजलं नव्हतं, नाईलाजास्तव तिने ती रक्कम स्वीकारली आणि म्हणाली, “मेरे बेटे को बुलाती हुं, आप उसको समझाओ... काम धाम करता नही, मेरे काम के पैसे जादा नही मिलते. ये बस गाव भर भटकता रहता है, काम करेगा तो उसके शादी बनाके मै परिक्रमा के लिए निकल जाऊंगी”...कोण्यातरी परिक्रमावासीचं माझा मुलगा कधीतरी ऐकेल या एका आशेवर ही बाई दिवस काढत होती. स्वतः उपाशीतापाशी राहून, गरज पडल्यास शेजारीपाजारी खाऊन मुलाची वाट बघत बसायची रोज. मुलगा रात्री यायचा आणि सकाळी निघून जायचा.... आणि

ही माताराम दिवसभर परिक्रमावासीना चहा करून द्यायची आणि माझ्या मुलाला समजवा अशी त्यांच्याकडे गळ घालायची.

शेवटी तिचं म्हणणं ऐकलं, बाबा तिच्या मुलाला समजवायला झाला. तो किती ऐकेल हे माहित नव्हतं आम्हाला, मात्र तिची विनंती आम्ही मान्य केली हे बघून तिच्या डोळ्यात जो विश्वास तयार झाला होता, जी आशा बळावली होती ते पाहून आम्हाला थोडं बरं ही वाटत होतं आणि थोडी भीती ही वाटत होती. बरं यासाठी की निदान आशेच्या भरवशावर ती काही कल्पनेतले आनंदाचे क्षण बघू शकत होती आणि भीती याची की आमचा केवळ प्रयत्न होता, तो सफल झाला नाही तर तिची आशा पार धुळीला लागणार होती... आणि खरं तर तो प्रयत्न असफल होण्याची शक्यता जास्त होती कारण कोण कुठेल आम्ही, अर्ध्या दिवसाचे पाहुणे... आमचं का ऐकेल तो मुलगा? हा एक प्रश्न होताच! तरीही निदान आम्ही तिची विनवणी ऐकली हे थोडं सं समाधान तरी तिला मिळेल ह्या सद्भावानेनी आम्ही तिच्या मुलाशी बोलून बघायचं ठरवलं.

तिनी मुलाला बोलावून आणलं. त्या मुलाला आधी बाबाने प्रेमाने विचारपूस केली. पण तो उर्मट उत्तर देऊ लागला. नंतर मात्र बाबाचा पारा चढला आणि आपल्या मोठ्या दमदार आवाजात बाबाने पोराला समजवायला सुरुवात केली. काय करायचं काय नाही ते सांगितलं तरीही त्याची उत्तरं कमी होईना. शेवटी वीस-बावीस वर्षांच्या तरुण मुलापुढे हात टेकले आणि शेवटचा उपाय म्हणून त्याच्याशी काहीही न बोलता त्याच्या आईला सामान भरायला सांगितलं स्वतःचं. बाबा म्हणाला. "माता जी आप हमारे साथ चलो... क्यू इस लडके की पीछे पडे हो? तुम्हारी खाने पीने रहने की व्यवस्था कर देंगे...इसको जो करना है करने दो.. तुम हमारे साथ चलो" बाईसुद्धा आतून एक गाठोडं घेऊन आल्या आणि आमच्या बरोबर चालू लागल्या. आधी मुलाने काहीही हरकत घेतली नाही, मात्र आई खरोखरीच जाते हे पाहून तो नरमला. उद्या पासून कामावर जाईन तू जाऊ नको म्हणून आईला थांबवू लागला.... बाबाने आपला फोन

नंबर त्या बाईंना दिला, आणि सांगितलं, ज्या दिवशी हा मुलगा पुन्हा काम सोडेल केव्हा गैर जबाबदार होईल तेव्हा तुम्ही मला फोन करून माझ्याकडे निघून या.... पुढे दोन तीन दिवसानंतर बाईंचा फोन आला... कोणाच्यातरी फोन वरून त्या बोलत होत्या. मुलगा कामावर जाऊ लागला होता. पुढे मात्र काही फोन आला नाही...

या परिक्रमेत आम्ही सततच घेतच आलो होतो. आज मात्र आमच्याकडून कोणाचं भलं होतं आहे हे पाहून खूप आनंद झाला. आतापर्यंत प्रेमाची एकच बाजू माहीत होती ती म्हणजे घेण्याची... आता देण्याची बाजूही समजू लागली होती..."इदम् न मम" शिकले होते मी आधी.. मात्र आता याहूनही पुढे जाण्याची वेळ होती... इदम् न मम हे म्हणताना देखील मी माझ्या मनाला "हे माझं नाही" असं समजावत होते मात्र आता हे जे काही आहे ते ज्याचं आहे त्यास मिळो ही भावना मनात येऊ लागली... आता "माझं आहे" किंवा "माझं नाही" ह्या विचारातला सुद्धा 'माझं' हा शब्द उतरवून काढावा कोणीतरी असं वाटू लागलं होतं.

थोडं वेगळ्या पद्धतीने सांगते. जे उदाहरण देते आहे ते फारच वेगळं आहे पण त्यावेळेला माझ्या मनात तेच उदाहरण आलं होतं. इलेक्ट्रिकची मेन लाईन, घरातली छोटी-मोठी बटणं, आणि विजेची उपकरणे, या तिन्ही चा विचार केला तर आपली भूमिकाही छोट्या-मोठ्या बटनांचा सारखी आहे. वीज आपल्याकडे येते आहे, आणि ज्या उपकरणाला गरज पडेल तिथे ती आपल्याकडून जात आहे इतकीच आपली भूमिका.... आता ह्या इलेक्ट्रिकच्या बटणाने वीज 'माझी आहे' किंवा वीज 'माझी नाही' या दोन्हीचा विचार करायला हवा का? मेन लाईन कडून वीज घेऊन तिला विजेच्या उपकरणाकडे वळवणं एवढंच त्या बटनांचं काम असतं. तिथे अधिकार कोणता?

या माताराम कडून निघाल्यानंतर एकच विचार मनात येत होता.. 'जो जे वांछिल तो ते लाहो...' ईश्वरा, माझ्यासाठी काय जे तू वाढून ठेवलं होतंस, आहेस ते माझ्यासमोर आहेसच... त्याहून जास्त किंवा कमी असं मला काहीही नको आहे. किंबहूना ज्याप्रमाणे मी समाधानी

आहे त्याप्रमाणे ज्याचं त्याचं समाधान ज्याला-त्याला लाभू दे हीच तुझ्या चरणी प्रार्थना.... अर्थात कोणाच्या तरी समाधानाचं निमित्त होणं हे योगायोग म्हणून ठीक आहे हो, पण फक्त त्यासाठी केवळ झटत राहणे म्हणजे संतपण... आणि तितकी कुवत किंवा लायकी आपली नाही, मात्र आजपर्यं मी फक्त माझा विचार करत आले, माझ्या मनात माझ्या शिवाय इतर कुणाला ही कधीही माझ्या इतकी जागा मी उदार पणे देऊ केली नाही, जिथे तिथे सर्वप्रथम मी मलाच ठेवले, अशा मनात, हे ईश्वरा आधी तू 'इदम् न मम' हा मंत्र पेरलास, आणि नंतर यज्ञात आहुती देताना 'स्वाहा' म्हणतो तसं सगळं वाहतं करण्याचा एक विचार...आचरण नाही हं, फक्त विचार माझ्या मनात अगदी अलगद पणे कसा आणून सोडलास याचं मला नवल वाटतं... आणि ह्या एका विचाराने, (आचरनाणे नाहीच नव् बरं, फक्त विचाराने म्हणतेय, कारण जे झालं तो निव्वळ योगायोग होता, आम्ही काहीही केलं नव्हतं) फक्त विचाराने जर माझ्या मनाला, आत्म्याला, परमसुखाच समाधान मिळत असेल तर ते आचरण किती आनंददायी असेल नाही? अर्थात ते तसं वागण्यासाठी कमालीचं अलिप्त पण, करुणा, जिद्द, विश्वास, सद्भावना, प्रयत्न, शुचिर्भूत अंतरात्मा आणि प्रेम हे सगळचं अत्युच्च कोटीचं असावं लागतं. आणि आपण सगळेच आपली स्वत:ची पायरी पूर्णपणे ओळखून असतो. आपण कसे आहोत हे आपल्याला प्रत्येकाला व्यवस्थित माहित असतं फक्त आपण त्याचा मनापासून स्वीकार करत नाही. दुसऱ्या समोर तर नाहीच, मात्र स्वत: समोर देखील आपण आपल्या स्वत:ला आपण जसं आहोत तसं स्वीकारत नाही, आणि तितकं जरी आपण करू शकलो तरी आपण समाधानाचे धनी होऊ हे मला समजलं .... अजून फक्त समजलंय... इम्पलीमेंट झालं नाहीये हं!

आम्ही पुढे चालत होतो तसं आभार हळूहळू भरून येत होतं. आम्हाला सूर्य कुंडला पोहोचायचं होतं. कॅनॉल पासून थोडं पुढे जाऊन उजवीकडे एक फाटा होता तिथे गेल्यावर सूर्यकुंड अजूनही तीन-साडेतीन किलोमीटर दूर आहे हे समजलं. वाटेत एक छोटसं गाव आलं. आभाळ इतकं भरून आलं होतं की कुठल्याही क्षणी ते कोसळणार. आज आम्हाला कदाचित गावातच थांबावं लागणार की काय असं आम्हाला वाटलं मात्र सूर्य कुंडला पोचलो तर बरं

होईल असा विचार मनात येत होता. आम्ही एक नजर आभाळाकडे टाकली... हलके हलके तुषार बरसायला सुरुवात झाली होती. आम्ही अजूनही चालतच होतो... मध्ये मध्ये सर येईल आता असं वाटायचं, दोन-चार थेंब पडले की थांबून जयची... कोणीतरी वरून या ढगांची चावी अजून पूर्ण सोडली नाहीये, धरून ठेवली आहे असं सारखं राहून राहून वाटत होतं. आणि होतही तसंच... आम्ही सूर्य कुंडला पोहोचलो, धर्मशाळेत बाहेरच्या ओट्यावर चपला काढल्या, बॅग ठेवल्या, आणि खूप वेळ धरून ठेवलेला पाऊस जोराने बरसू लागला. ढगांनी भरलेलं गाठोडं माझ्या मैयानी हाताने घट्ट धरून ठेवलं होतं आतापर्यंत आणि आम्ही पाऊल टाकताच ते गाठोडं संपूर्णपणे रितं केलं की काय असं वाटलं.

सूर्य कुंडला पोहोचण्याच्या आधीचा एक अनुभव सांगणार आहे. सूर्य कुंडाच्या महाद्वारा बाहेरचा परिसर आणि त्या परिसराशी माझा असलेला निकटचा संबंध, याबद्दलचा अनुभव... सूर्यकुंड येथील हनुमान मंदिर... आणि ह्या मंदिराचं आजपर्यंत न उलगडलेलं रहस्य.. केवळ ते बघण्यासाठी आम्ही उद्याचा संपूर्ण दिवस सूर्यकुंडला थांबणार होतो. इथल्या मारुतीरायाची गंमतच निराळी आहे. तुमचा तुमच्या डोळ्यावर विश्वासच बसणार नाही! अगदी सकाळ दुपार संध्याकाळ सुद्धा तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहिलेल्या प्रकाराला पडताळून बघाल! असं काहीतरी इथे रोज होत असतं! आणि तेच बघण्यासाठी मी थांबले होते.... सांगणारे पण पुढच्या भागात

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८२

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला सुरज कुंडच्या आधीपर्यंतचे अनुभव सांगितले होते. गरीब माता राम आणि तिच्या मुलाला भेटल्यानंतर मनात आलेल्या विचारांची साखळी सुद्धा तुमच्या पुढे मागच्या अनुभवात ठेवली होती. आता पुढे सांगते.

सूर्यकुंडला पोहोचण्याच्या आधी वाटेत एका गावात आम्हाला पुन्हा एकदा चहाला बोलावलं. तो खरं तर एक जुना आश्रमच असावा मात्र आता तिथे एक कोणी बाबाजी एकटेच राहत होते. बाबाजींनी छान गूळ आणि आलं घातलेला काळा चहा केला. चहा घेऊन आम्ही निघणार तेवढ्यात बाबाला कुणाचा तरी फोन आला आणि आम्ही पुन्हा काही वेळ तिथेच विसावलो. यावेळी आलेला अनुभव फक्त माझा होता आणि म्हणून तो फक्त मलाच मिळाला.

अनेक लोक नर्मदा परिक्रमा करतात पण एक अगदीच ठरलेले असते ते म्हणजे ज्याचे त्याचे प्रारब्ध. अनेकांनी केलेल्या नर्मदा परिक्रमेत बरेचदा रस्ते सारखे असतात, ठिकाणं सारखी असतात, अनुभव मात्र वेगळे असतात. आम्ही दोघं सहप्रवासी असून सुद्धा काही अनुभव फक्त मला मिळालेत तर काही अनुभव फक्त बाबाला मिळाले. त्यापैकी एक तुम्हाला आता सांगते आहे. या अनुभवाचा सूर्यकुंडाशी निकटचा संबंध आला तोही सांगते.

चहा घेऊन झाल्यावर बाबा फोनवर बोलत रस्त्यावर येरझारा घालत होता. मी आणि बाबाजी आश्रमाच्या पडवीत बसलेलो होतो. बाहेर आभाळ भरून आलं होतं आणि कोणत्याही क्षणी कोसळेल असं वाटत होतं. आम्हाला सूर्य कुंडला मुक्काम करण्याची इच्छा आधीपासून होती मात्र या बाबजींकडे आल्यावर ती इच्छा अधिकच बळावली. सूर्यकुंड हनुमान मंदिर

अतिशय छान आहे हे मी ऐकून होते. त्या मंदिराचं एक रहस्य आहे असं मी तुम्हाला मागच्या भागात सांगितलं होतं. ते आता सांगते. सूर्य कुंडाच्या हनुमान मंदिराचं एक वैशिष्ट्य असं मंदिरातील मारुतीरायांचे वेगवेगळे रूप आपल्याला दिसतात. पुस्तकात असंच लिहिलं होतं. आणि ते तीन वेगवेगळी रूपं बघण्यासाठी मला अख्खा दिवस सूर्यकुंडला घालवायचा होता. मात्र बाबाजींकडे आल्यावर ही इच्छा अधिक प्रबळ कशी झाली ते सांगते.

बाबा फोनवर बोलत असताना मी आणि बाबाजी सूर्यकुंड विषयी बोलत होतो. बोलता-बोलता बाबाजी म्हणाले, “हनुमांजी चिरंजीव है इसका प्रत्यय बहुत लोगो को आता है. शायद आपको भी ऐसा हुआ होगा, अगर नही हुआ होगा तो बहुत जल्दी हो जायेगा ऐसा मेरा विश्वास है”... त्यांच्या या बोलण्या नंतर मी मला झालेलं मारुतीरायांचं दर्शन आणि गुजरात मधल्या कांदरोज गावी जात असताना, ज्या वेळी मी एकटी होते तेव्हा आजुबाजूच्या सृष्टीने गायलेल्या हनुमान चालीसा चा अनुभव बाबाजींना सांगितला. ते ऐकून बाबाजींच्या डोळ्यात पाणी आलं... ते उठून आत गेले. त्यांनी एक भजनांचं पुस्तक आणलं आणि सुंदरकांडावर आधारित अवधी भाषेतलं एक भजन ते गाऊ लागले. मला आता शब्द आठवत नाहीत, पण अतिशय रसाळ शब्द आणि मधुर चाल असलेलं हे भजन बाबाजी खूप प्रेमाने, भक्तीने आणि गोड आवाजात गात होते. भजन गाण्यापूर्वी बाजूला एक आसन त्यांनी मांडून ठेवलेलं होतं. डोळे मिटून मी ते भजन ऐकत होते. भजन संपूच नये असं मला वाटत होतं. बंद डोळ्यात कुठे मारुतीरायांचं रूप उभं राहिलं होतं. भजन लवकरच पूर्ण झालं, बाबाजींनी बाजूच्या रिकाम्या आसनाला मनोभावे नमस्कार केला त्यावेळी अंगावर काटाच आला होता. बाबाजी रिकाम्या आसनाकडे डोकं टेकवून नमस्कार करत होते आणि क्षणभर मारुतीराया यांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला आहे की काय असा मला भास झाला.... हो हा भासच होता... पण त्यात सुद्धा एक क्षणासाठी का होईना मारुतीराया इथेच आहेत असं वाटलं होतं. मी आणि बाबाजी आम्ही दोघंही शांत बसलो होतो... बाबाचा फोन आटोपला आणि बाबा आत मध्ये आला तेव्हा कुठे आम्ही पुन्हा बोलायला सुरवात केली.

बाबाजींनी पुन्हा सुंदर गुळाचा चहा केला. “बहुत आनंद आया, बहुत आनंद आया, ” असं म्हणत त्यांनी लहान मुलासारखी स्वतः भोवती गिरकी घेतली. चहा घेता घेता ते म्हणाले “मै तो पागल हू... पागल! अपनेमेही मुझे बडा मजा आता है, देखो आज तो हनुमान जी को उनका ही भजन सुना दिया.... ” हे बोलताना ते मनापासून हसत होते. त्यांना खूप आनंद झालेला स्पष्ट जाणवत होता. त्यावेळी फक्त एकच विचार मनात आला... एका क्षणासाठी जे काही मला वाटलं होतं, जो काही भास मला झाला होता, तो खरा तर नसेल?... खरंतर एखादा दिवा चमकावा आणि विझावा याहीपेक्षा तो काळ छोटा होता. आकाशात विजेची रेषा दिसते न दिसते तोच कशी विझून जाते त्याहीपेक्षा कमी काळ ते दृश्य माझ्या डोळ्यासमोर होतं... किंवा तो भास माझ्या डोळ्यासमोर होता... तो त्या भजनाचा प्रभाव होता, की भास होता की सत्य हे मला सांगताच येणार नाही.

आमचा चहा घेऊन झाला. आम्ही पुढे निघणार तोच बाबाजींनी चटकन वाकून आम्हाला नमस्कार केला. परिक्रमावासी म्हणून अनेक लोक नमस्कार करतात, तेव्हा मी देखिल वाकून समोरच्या व्यक्तीला नमस्कार करत असते, मात्र बाबाजींनी मला वाकून नमस्कार करू दिला नाही. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाले.. ” जा बेटा जा, प्रभू तेरे साथ है”.

अजूनही संध्याकाळ व्हायला वेळ होता. आभाळ तसंच दाटून आलेलं होतं. आम्ही सूर्य कुंडाच्या दिशेनं निघालो. मध्ये एक वाट झाडीतून जाणारी होती. त्या वाटेवरून आजूबाजूचं, पुढचं मागचं काहीही दिसत नव्हतं, मात्र जशी ती वाट पूर्ण झाली तसा डांबरी रस्ता दिसू लागला. उजव्या हाताला दूरवर सात घोडे असलेला सूर्याचा रथ स्पष्ट दिसत होता. तेच सूर्यकुंड असावं. आम्ही त्या दिशेने वळलो. थोड्याच वेळा नंतर दूरवर रस्त्याच्या दोन्ही बाजूला काही पाट्या लावलेल्या दिसल्या. एक मोठं द्वार दिसलं. आम्ही आता सूर्य कुंडला पोचणार. तरीही अजून अंगावर शहारा येण्यासारखं काहीतरी उरलंच होतं. बाबाजींकडे झालेल्या प्रकारामुळे मी मंत्रमुग्धच होते अजूनही. गार वारा वाहात होता. दोन चार हलके हलके थेंब अंगावर पडतात

आणि पुन्हा थांबून जात, असा हा खेळ दुपारपासूनच सुरू होता. आम्ही हळूहळू पुढे गेलो तसं तसं माझ्या मध्ये जास्त ऊर्जा भरली जात आहे असे मला जाणवू लागलं. त्या पाट्या वाचता येईल तिथवर आम्ही पोहोचलो आणि मी स्तब्ध होऊन उभे राहिले.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला हनुमान चालीसाची दोहावली प्रत्येक पाटीवर लिहिलेली होती. येणाऱ्या आणि जाणाऱ्या अशा दोन्ही वाटसरूंना संपूर्ण हनुमान चालीसा वाचता येईल अशा प्रकारे ह्या पाट्या एका मागे एक लिहिलेल्या होत्या. मला हनुमान चालीसा पाठ आहेच, तरीही प्रत्येक पाटील जवळ उभे राहून मोठ्या आवाजात, मोकळ्या गळ्याने हनुमान चालीसाचा एक एक दोहा मी मोठ्या आनंदाने म्हणत होते. बाबा ही खूप उत्साहाने माझ्याबरोबर लिहिलेल्या पाट्या वाचत होता. अशात आता पाऊस आला तरी आम्हाला तमा नव्हती. तो आनंद घेतल्याशिवाय मी पुढे जाऊच शकत नव्हते. पाऊस मात्र आमच्या आश्रमात पोहोचण्याची वाटच बघत असावा. आमचा हनुमान चालीसा वाचून झाल्यानंतर आणि आश्रमात पोहोचलो, खांद्यावरच्या बॅगा उतरवल्या, जोडे मोजे काढले, आणि कधीचं कोसळायला आतुर असलेलं आभाळ ओतायला सुरुवात झाली... धुवांधार पाऊस सुरु झाला... तिथेच आश्रमाच्या पडवीत बसून मंदिराच्या वर असलेल्या सात घोड्यांच्या रथाकडे मी टक लावून बघत होते.... बाबाजींचा चेहरा माझ्या डोळ्या समोरून दूर होत नव्हता... आता सूर्यकुंडच्या मारुतीरायांचं दर्शन घ्यायचं होतं... ते रहस्य अजूनही उलगडलं नव्हतं.. तीन वेगवेगळ्या रूपा मधले मारुतीराय अजूनही बघणं बाकी होतं... खरंतर नक्की काय आहे तिथे हेही समजलं नव्हतं. एकाच मंदिरात, कदाचित एकाच मूर्तीमध्ये, कदाचित वेगवेगळ्या मूर्तींमध्ये, कदाचित वेगवेगळ्या वेळेला.... कसे आणि कुठले रूप दिसत असेल नक्की? सांगणार आहे पण पुढच्या भागात.. नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८३

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला सूर्यकुंड येथील हनुमान मंदिराच्या एका रहस्याबद्दल सांगत होते. मागच्याच भागात सूर्यकुंडच्या आधी घेतलेला बाबाजींचा अनुभव मी तुम्हाला सांगितला होता. सूर्यकुंडला पोहोचताच मुसळधार पाऊस सुरू झाला होता. जणूकाही आम्ही मुक्कामी पोचण्याची वाटच मैया बघत होती आणि तिने वरून आभाळाची पोठली घट्ट बांधून ठेवली होती की काय असं वाटलं. आता पुढे सांगते.

इथला परिसर अतिशय रमणीय आहे. सूर्याचे सात पांढऱ्या रंगाचे घोडे असलेला हा रथ मंदिराच्या वर आरूढ आहे. बाजूलाच एक एक हॉल आहे तीच परिक्रमावासीयांची धर्मशाळा. आजूबाजूला पुजाऱ्यांची घरं आहेत. 1-2 छोटी मंदिरही आहे. पाऊस साधारण तास दीड तास सुरू होता. बाबा आसन लावून आराम करत पडला होता. मी मात्र बाहेरच्या पडवीत पावसाकडे बघत बसले होते. आमच्यासोबत धर्मशाळेत आत मध्ये अजून कोणीतरी परिक्रमावासी डोक्यावरुन पांघरूण घेऊन झोपले होते. वातावरण थंड झालं होतं, आणि अशात चहा मिळावा असं शरीराचं मागणं होतं.. आतच एका कोपऱ्यात चूल, एक दोन भांडी आणि काही सामान ठेवलेलं मला दिसलं. जवळच पाण्याने भरलेला माठ देखील ठेवला होता. चहा करावा म्हणून मी साहित्य पाहू लागले. तोच अंगावर पांघरूण घेतलेले हे परिक्रमावासी उठले आणि मोठ्यांदा ओरडू लागले...

" अरे छूना मत, तुम हटो वहांसे..." मी दचकले, घाबरले अन तशीच मागे झाले.... प्रश्नार्थक नजरेने त्या परिक्रमावासी बाबांकडे बघू लागले... "हमको पहले अपनी चाय बनाने दो, हम तुम्हारे हाथ से बनी चाय नही पायेंगे.. कौन समाज की हो?" असं म्हणत ते बाबाजी सामानाच्या दिशेने सरसावले आणि मी दोन पावलं मागे झाले... "पंडित समाज की हुं बाबाजी, मी उत्तर देत असतानाच बाबाजी खाली वाकले आणि सहजतेने काहीतरी काडीकचरा चुलीच्या मागच्या बाजूने उचलून दाराकडे फेकला. ते चहा करू लागले... "हम किसी के हात का नही पाते है तुम पाओगे तो तुम्हारे लिए भी चाय बना देता हु" असं म्हणत त्यांनी चहा ठेवला आणि दारा कडचा फेकलेला काडीकचरा बाहेर फेकून देतो असं म्हणून दाराकडे येऊ लागले. मी निदान कचरा उचलण्याचं तरी काम करावं म्हणून त्यांच्यापाठोपाठ दाराकडे गेले... मी दाराकडे गेले आणि स्तब्ध उभे राहिले.. कारणही तसंच होतं... बाबाजींनी फेकलेला काडीकचरा हा साधासुधा काडीकचरा नव्हताच मुळी! तो चक्क हातभर लांब साप होता. धर्मशाळेत इलेक्ट्रिसिटी तर आहे मात्र फक्त एक छोटा बल्ब चालू अवस्थेत असल्याने हॉल भर बऱ्यापैकी अंधार होता. एका छोट्या बल्बचा काय तो उणा पुरा प्रकाश... त्यात चुली मागचा तो साप मला अजिबात दिसला नसता... बाबाजींना कसाकाय दिसला तेच जाणे... असो... प्रत्येक गोष्टी मागे कारणं असतात!

बाबाजींनी चहा केला. सोबत आम्हाला वाटेत मिळालेली पारलेजी बिस्किट होती. संध्याकाळचा नाष्टा छान झाला. आता पाऊस थांबला होता.. दिवेलागणीला अजून वेळ होता. आम्ही हात पाय धुऊन मंदिरांचं दर्शन घेतलं. त्यावेळी मारुतीराया यांचं रूप एका प्रौढ व्यक्ती सारखं दिसत होतं. चेहऱ्यावरचे हावभाव शांत से दिसत होते. त्यावेळी तिथल्या पुजाऱ्यांनी सूर्यकुंडच्या हनुमान मंदिराचे रहस्य उलगडून सांगितलं. दिवसाच्या सुरुवातीच्या प्रहराला बालरूप, दुपारभर मध्यम वयीन, आणि रात्री वृद्ध रूप असल्यासारखे हे मारुतीराय दिसतात. मंदिराच्या वर असलेल्या जाळीतून पडणारा प्रकाशाचा कोन हा जसजसा बदलत जाईल तसतसं यांचं रूप बदलत जातं हे यामागचं कारण. आता मला रात्रीचं वृद्ध रूप आणि दिवसाचं

बाल रूप बघण्यात जास्त रस वाटू लागला. रात्री भोजन प्रसादी झाल्यानंतर मंदिर बंद करण्या आधी आम्ही पुन्हा एकदा मंदिरात गेलो. पुजाऱ्यांनी सांगितलेल्या पद्धतीने बघितल्यानंतर मारुतीराया खरोखरच वृद्ध झालेली आहे असा भास होऊ लागला मात्र त्याच बरोबर दुपारचे किंचित शांत असलेले भाव बदलले आहेत असा मला भास झाला. हे वृद्ध मारुतीराय मला रागात असल्यासारखे वाटू लागले. पण मारुतीराय माझ्यावर नक्कीच रागवणार नाहीत कारण त्यांच्याप्रती माझी भक्ती ही संपूर्णपणे निस्वार्थ अशी आहे हा मला विश्वास होता. मग तरीही मला मारुतीराय रागात का दिसले असा प्रश्न क्षणभर वाटून गेला... आता पडलेल्या प्रश्नांचा विचार न करण्याची सवय एव्हाना लागली होती. ज्या प्रश्नांची उत्तरं मिळायची असतात त्या प्रश्नांची उत्तरं आपोआप मिळत जातात हे चांगलंच माहीत झालं होतं. ती उत्तरं मिळेस तोवर मनाची घालमेल न होऊ देता संयमाने फक्त वाट बघणं आपल्या हाती असतं एवढं समजलं होतं... आला तसा तो प्रश्न मी तिथेच सोडून दिला.

बाबाजींनी रात्रीची भोजन प्रसादी बनवली. आज दिवसभराचा प्रसंग डायरीत लिहीताना खूप समाधान वाटत होतं आणि त्या समाधानी अवस्थेतच मी झोपी गेले. दुसऱ्या दिवशी स्नानादि आटोपून पुन्हा मंदिराकडे धाव घेतली आणि मला माझ्या काल सोडून दिलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. कारण आता मारुतीराया माझ्याकडे एका गोंडस कोवळ्या मात्र तेजस्वी आणि बलवान बालकाप्रमाणे बघत होते. कालचे वृद्ध मारुतीराय कुठेतरी हरवले होते त्यांचा राग दूर निघून गेला होता आणि आता मला त्यांच्या चेहऱ्यावर लाघवी स्मितहास्य दिसत होतं. मारुती रायांची तिन्ही रूप पाहून झाली होतीत. सकाळचं बालभोग आटपून आम्ही पुढे निघायचं ठरवलं.

इथून पुढे महाराजपुर सहस्त्रधारा घाघा असा मार्ग आहे. घाघापर्यंतचा मार्ग शहरा गावांमधून जातो. मात्र घाघाच्या पुढील जंगल मार्ग सुरू होतो. त्यामुळे संध्याकाळ होईस्तोवर आम्हाला निदान घाघापर्यंत पोहोचायचं होतं. आज तिथून पुढे जायचं नव्हतच आम्हाला कारण

घाघापर्यंत पोहोचता पोहोचता नक्कीच संध्याकाळ होणार होती. आणि आम्हाला आज निघायला देखील उशीरच झाला होता.

आज मैया नी आमचे लाडच करायचं ठरवलं होतं बहुतेक. काल पाऊस पडला होता तरी आज वातावरण चांगलंच गरम होतं. शिवाय हवेत पाण्याचा अंश असल्यामुळे दमटपणा देखील फार होता. खरंतर सूर्यकुंड ते महाराजपूर फार अंतर नाहीये. पण तरीही महाराज पुरला पोहोचेस्तोवर थकायला झालं होतं. इथे बंजर आणि नर्मदामैया चा संगम होतो. संगमावर छान मंदिर आहे. धनीराम बाबा यांची समाधी आहे. खरंतर इथे छान धर्मशाळा आहे असं हे ऐकून होतो, मात्र थांबून जावं असं वाटलं नाही. डांबरी रस्त्याने आम्ही पुढे निघालो. रस्त्यात एक एक मध्यमवयीन माणूस आम्हाला भेटला. पाच मिनिटं थांबा तुमच्याशी काम आहे आलोच असं म्हणून निघून गेला... म्हटल्याप्रमाणे अवघ्या पाच मिनिटात तो परत आला आणि त्याने आमच्यासाठी आइस्क्रीमचे कोन आणले होते... दमट हवा आणि उकाडा यात ते आईस्क्रीम खाताना खूप आनंद होत होता आणि शरीराचा थकवा देखील कमी होत होता... तिथून पुढे निघालो तो एका बाईने दुकानातून आवाज दिला.. तिथेही मस्त गारेगार रबडी कुल्फी माताजींनी खाऊ घातली... आज नर्मदा माईच्या मनात काय होतं कोण जाणे... आज तिने आमचे खूपच लाड करायचं ठरवलं होतं... थोडं पुढे जात नाही तर एका उसाच्या रसाच्या ठेल्यावर आम्हाला थांबवण्यात आलं... हिरवाकंच गारेगार बर्फ घातलेला उसाचा रस म्हणजे त्या थकवणाऱ्या वातावरणात अमृत प्यायलासारखं वाटत होतं.... आज नक्की काय झालंय मैय्याला एवढे लाड पुरवते ती....

आम्ही पुढे निघालो. इथून घाघा साधारण 13 -14 किलोमीटर असेल. आमच्याकडे वेळही भरपूर होता. आम्ही घाघालाच मुक्काम करण्याचं ठरवलं. घाघाच्या दिशेने जाताजाता हळूहळू रस्त्यावरची गर्दी विरळ होत गेल्याचं दिसत होतं. आम्ही हळू हळू गाव सोडून जंगलाच्या दिशेने पुढे सरकत होतो. लोकवस्ती कमी झालेली होती. दोन-तीन किलोमीटर

नंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला केवळ झाडीच होती. अशात पुन्हा निसर्गाने आपलं रूप बदललं. घाघा आता आठ किलोमीटरवर होतं. मात्र आभाळ भरून येऊ लागलं. महाराजपुर ते घाघा या रस्त्यावर कुठलीही व्यवस्था नाही हे आम्ही पुस्तकामध्ये वाचलं होतं. अशा वातावरणात पुढे आठ किलोमीटर म्हणजे जवळ जवळ दोन संवाद दोन तास चालत जाणं योग्य नव्हतं. सध्या आम्ही गावाच्या थोडं तरी जवळ होतो. इथून पुढे झालो म्हणजे जंगलाच्या दिशेने जाणं होतं. त्यामुळे आम्हाला आता निवारा शोधणं गरजेचं होतं. मात्र कुठेच काही सापडत नव्हतं... मग कुठे गेलो आम्ही? घाघाला पोहोचलो का? वाटेत कुठे थांबलो का? निवारा मिळाला का? सांगणार आहे पण पुढच्या भागात, तोवर नर्मदे हर

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८४

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला सूर्यकुंड हनुमान मंदिरबद्दल सांगितलं होतं. तिथे भेटलेले परिक्रमावासी बाबाजी, तो साप, बाबाजींनी बनवलेला चहा आणि भोजन प्रसादी याबद्दलही सांगितलं होतं. मारुतीराया यांच्या बदललेल्या रूपाबद्दल देखील मी मागच्या भागात तुम्हाला सांगितलं होतं. महाराज पुरला मै यांनी केलेले लाड पण मी सांगितले होते. आइस्क्रीम, कुल्फी, उसाचा रस... अगदी न मागता मैयानी आम्हाला भरपूर खाऊ तिला होता. आता आम्ही घाघाच्या दिशेला निघालो होतो. इथून पुढे सांगते.

आम्ही निघालो त्या वेळेला ढगाळ वातावरण नव्हतं. मात्र आम्ही महाराजपुर सोडून काही अंतर होतं न होतोच वातावरण बदललं. आम्हाला उलट फिरून जाता येत नाही म्हणून जिथे आहोत तिथेच कुठेतरी निवारा शोधणं गरजेचं होतं. मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडी होती. फार तर फार झोपडी असायची एखादी छोटीशी, शेतात काम करताना आसरा म्हणून. आता अशाच एखाद्या झोपडीचा आसरा घेऊन आम्हाला राहणं भाग होतं. पण निदान विचारायला तर कुणी असायला हवं? आम्ही पुढे पुढे जात होतो. आभाळ भरुन आलं होतं. आता मात्र 1 - 2 किलोमीटरच्या वर जाता येईल असं वाटत नव्हतं.

थोडं पुढे गेल्यावर रस्त्यावर इलेक्ट्रिकच्या पॉलच्या बाजूला आम्हाला एक छोटा बोर्ड लागलेला दिसला. त्यावर 'कौशिक गोशाला' असं लिहिलं होतं. म्हणजे अजून कौशिक गोशाला यायची होती. "आज आपण गोशालेतच राहणार!" बाबा म्हणाला. आता काही उपाय नव्हता. आज भरपूर खाऊ मिळाला होता, वाटलं रात्री मिळणार नसेल कदाचित म्हणूनच मैया नी

आधीच तर दिला नसेल? पण मैया उपाशी झोपू देत नाही, आणि गोशाळेत जातोय म्हणजे काही नाही तर दूध तर नक्की मिळेल...

विचार करत करत आम्ही पुढे जात होतो. रस्त्यात एक सायकल वाला माणूस दिसला. त्यांना पुढच्या मुक्कामालाबद्दल विचारलं असता त्याने घाघाच्या पुढचा मौनी माताजींचा आश्रम असल्याचं सांगितलं. त्याआधी मात्र कुठलं ठिकाण आहे असं मला वाटत नाही असं तो म्हणाला. कौशिक गोशालेबद्दल विचारलं असता त्याचं दार नेहमीच बंद दिसतं त्यामुळे आपल्याला कल्पना नाही असं त्याने सांगितलं. जरा अजून पुढे चालून आल्यावर रस्त्याच्या उजव्या बाजूला एक मोठं फाटक दिसलं. इतकं मोठं गेट पाहून गोशाळा फारच मोठी असल्याचं लक्षात आलं. मात्र दारावर कोणी चौकीदार नसल्याने विचारायचं कोणाला हा प्रश्नच पडला. आता इथे जर थांबता आलं नाही तर मात्र अवस्था कठीण होती. अजून घाघा ८- १० किलोमीटर दूर होतं.

आता दार वाजवून हाक मारण्या शिवाय पर्याय नव्हता. आम्ही दोन-तीनदा दार वाजवलं मात्र आतून काही प्रतिसाद येईना. एक शेवटचा प्रयत्न म्हणून बाबाने जिवाच्या आकांताने दार ठोठावलं. नर्मदे हरच्या आरोळ्या ठोकल्या. तरीही कोणाचा प्रतिसाद येत नाही म्हणून आता वेळ न घालवता आम्ही पुढे चालू लागलो. या कौशिक गोशाळेचं कंपाउंड बरंच मोठं आहे असं लक्षात आलं. आत कुठे काही दिसतंय का म्हणून भिंतीवरून आम्ही कानोसा घेऊ लागलो. कसलाच अंदाज येईना. आत एक मोठं गवताचं मैदान होतं एवढं मात्र दिसत होतं. कदाचित या गवताच्या बरंच पुढे गायींचा गोठा असावा आणि तिथेच जवळपास चौकीदार असावा त्यामुळे आमचा आवाज तिथपर्यंत जात नसेल असं आम्हाला वाटलं. अजून पुढे गेल्यानंतर एक छोटं गेट देखील लागलं. हे फाटक देखील कौशिक गो शाळेचं होतं. आता हा आमच्या इथे राहण्याच्या आशेचा शेवटचा किरण.

इथे मात्र आम्ही दोघांनीही जोर-जोरात फाटक वाजवायला सुरुवात केली. फाटकाचा आवाज जोरात होताच गायी हंबरू लागल्या. गायींचा आवाज ऐकून कुणीतरी येतय अशी चाहूल लागली.. जीव भांड्यात पडला. चौकीदाराने दार उघडलं. "कौन है? क्या चाहिये?" त्याने विचारलं. आम्हाला आजची रात्र इथे राहता येईल का? आम्ही उद्या सकाळी लवकरच इथून पुढे प्रस्थान करू... जेवण खाण नसेल तरी हरकत नाही आम्ही परिक्रमावासी आहोत आम्हाला फक्त डोक्यावर छत मिळालं तरी चालेल... त्याने नाही म्हणूच नये अशा पद्धतीने आम्ही त्याच्याशी बोलत होतो. "अंदर आओ, पानी पियो, तब तक मै उपर पूछके आता हु, वैसे तो कोई मना नही करेगा आप आही जाओ अंदर". तो म्हणाला.

आम्ही आज जाऊन उभा राहिलो. समोर गाईंचे गोठे होते. गाईंना फिरण्यासाठी मोठमोठाले कुरण वजा गवताचे आळे बनवलेले होते. थोड्याच वेळात तो चौकीदार आला आणि आम्हाला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाऊ लागला. गोठ्याच्या मागच्या बाजूला सुंदर इमारत होती. एका रांगेत 6-7 खोल्या आणि समोर मोठा लांब कॉरिडॉर होता. त्या खोल्यांना परपेंडीक्युलर अशा अजून तीन चार खोल्या होत्या. आणि मध्ये एक छोटसं मंदिर होतं. त्यातल्या एका खोलीकडे बोट दाखवत म्हणाला "उस रुम मे आप रुक सकते हो"

आम्ही आत गेलो.. अबब.. एवढी अवाढव्य खोली... एसी, फ्रीज.. सगळं होतं तिथे. खोलीच्या मागे एक अजून खोली, यात कपाटं, अंथरुणं, ड्रेसिंग टेबल असं सामान होतं. त्या मागे एक अवाढव्य बाथरूम.. अवाढव्य म्हणजे एक टब, कमोड, शोवर, असं सगळं असून दोन मोठे पलंग आरामात मावतील एवढी जागा शिल्लक होती. पंधरा बाय पंधरा नक्की होती ती बाथरूम...आम्ही आवरसावर करून बाहेर येऊन बसलो तो चौकीदाराने आमच्यासाठी चहा आणि गरम पकोडे आणले... असा सुंदर चहा की काय सांगू... भोजनाची ही अशीच व्यवस्था.. स्वयंपाकाला बाई होत्या. अतिशय प्रेमाने त्या वाढत होत्या... दोन भाज्या, सुरेख वरण, भरपूर तूप, पुरी, आणि जेवणा नंतर आटवलेलं दूध... काय म्हणून लाड सुरू होते आज!

आम्ही काय विचार करत होतो आणि निघालं काय बघा ना! पण अजूनही इथल्या महंतांची आमची भेट झाली नव्हती. त्यांची भेट झाली तेव्हा आम्ही खरंच भाग्यवान आहोत हे आम्हाला समजलं. तिथल्या महंतांची भेट झाली त्यावेळी त्यांनी आम्हाला जे काही सांगितलं त्यावरून मी मैय्याचं लाडकं लेकरू आहे हे मला पटलं. जेव्हा आपल्या लेकरांचे लाड करायचे असतात तेव्हा आई त्यांच्यासमोर अनेक प्रकारचे सरप्राइजेस मांडून ठेवते आणि ते सरप्राइजेस तयार करण्यासाठी ती अनेक गोष्टी करत असते त्यातलीच ही गोष्ट असं म्हटलं तरी चालेल. महंतांनी आम्हाला असं काहीतरी सांगितलं की त्याक्षणी अश्रू आवरणं मला कठीण व्हायला लागलं. असं काय सांगितलं होतं महंतांनी आम्हाला? त्यांची भेट झाल्यावर नक्की काय घडलं? सांगणारे पण पुढच्या भागात... नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८५

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला मैयाने केलेल्या लाडांबद्दल सांगितलं होतं. आम्ही महाराजपूर, सहस्रधारा होऊन निघालो होतो. वाटेत आम्हाला उसाचा रस, आइस्क्रीम असं काय काय खाऊ देत देत मैया ने शेवटी कौशिक गोशाळेत आणून सोडलं. इथे आत येण्यासाठी सुद्धा बरेच कष्ट लागलेत मात्र आत आल्यावर झालेली फाइव्हस्टार सोय मी तुम्हाला मागच्या भागात सांगितली होती. रात्री आटवलेलं दूध प्यायल्यानंतर आम्ही निवांतपणे झोपी गेलो. सकाळी सहाच्या सुमाराला जाग आली. आम्ही समोरच्या अंगणात बसलो असतानाच चौकीदार बोलवायला आला. “स्वामी जी ने बुलाया है, बडे स्वामीजी सुबह सुबह ही आये है”

मागच्या अनुभवात मी तुम्हाला सांगितलं होतं की इथल्या मोठ्या महंतांना भेटल्यानंतर मी मैयाचं लाडकं लेकरू आहे याची मला खात्री पटली ते. त्याचं कारण आता सांगते. आम्ही स्वामीजींच्या खोलीत गेलो. एक छान साधीशी खोली. बसायला भारतीय बैठक केलेली. गंमत म्हणजे या खोलीत बाकीच्या खोल्यांसारखी फाईव्हस्टार व्यवस्था नव्हती. बाकी खोल्यांपेक्षा बहुदा आधी बांधलेली असावी ही खोली कारण या खोलीचे बांधकाम सुद्धा वेगळं होतं. खोली आकाराने लहान होती. खोलीत अवधेशानंद गिरींचं एक मोठं पोस्टर लागलेलं होतं. दुसऱ्या भिंतीवर दत्तात्रेयांचा फोटो होता. आम्ही खोलीत गेलो त्यावेळी स्वामीजी चहा सांगायला स्वयंपाक घरात गेले होते. ते आले आणि नर्मदे हर आणि इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी झाल्यात.

स्वामीजी बोलायला लागले आणि आम्ही ऐकायला लागलो. ते म्हणाले “वैसे तो यह गोशाला है, परिक्रमा वासियों के लिए बनाया हुआ आश्रम नही है, फिर भी कभी कबार

परिक्रमावासी आ गये तो उन्हे कोई मनाई नही है... लेकिन यहा परिक्रमावासी आते ही नही. सहस्त्रधारा मे ही रुक जाते है, लेकिन आप आने वाले थे यह अंदेशा मुझे हुआ था! आपने मुझे पहचाना नही?".. पहिल्यांदाच भेटलेले हे स्वामीजी मला असं का विचारताहेत ते मला काही समजेना. स्वामीजी म्हणाले " अभी २-३ दिन पहले की तो बात है. मै कुछ काम से जमदग्नी आश्रम गया था. उसके बाद मुझे लगने लगा था की परिक्रमावासी यहा आने वाले है. मैने फोन करके बताया था कि अगले चार पांच दिन के भोजन पानी की व्यवस्था तयार रखो परिक्रमावासी आयेंगे... जब से जमदग्नि आश्रम से लौटा हू, आप दोनो का ही खयाल आ रहा है... आपने मुझे पहचाना नही शायद... उस दिन जमदग्नी ऋषी के आश्रम मे है भी था, आपका भोजन हो चुका था फिर भी महंत जी के आग्रह से फिर से भोजन पाने गये थे... है ना? और देखो... आज आप मेरे यहा पधारे हो... आप मानो या ना मानो, दिल से मुझे लग रहा था के परिक्रमावासी गोशाला में जरूर आयेंगे.. वो आप ही होंगे.. और आप आगये यह मैया की कृपा है... पण मला मात्र त्यांना पहिल्याच अजिबात आठवत नव्हतं. आश्चर्यच आहे खरं म्हणजे... पण बघितल्यासारखं ही वाटलं नाही मला!

त्यांचं बोलणं ऐकून मला खरंच रडू आलं.. माझे लाड करायचं हे प्लॅनिंग तिनी खूप आधी केलं होतं.. जशी मी माझ्या लाडक्या लेकराच्या आवडीनिवडीची काळजी सतत घेत असते, त्याला माहीत असो वा नसो माझ्या मनात सतत माझ्या लेकराचा विचार कुठल्या ना कुठल्या रुपाने असतोच... तसेच मी सुद्धा नर्मदा माईची लाडकी लेक आहे हे मला पटलं होतं. सकाळचा बालभोग आटोपून आम्ही पुढे निघालो.

आता इथून पहिल्यांदा गाठायचं होतं ते घाघा. आम्ही दुपारपर्यंत तिथे पोचणार होतो. पण आज काय झालं माहित नाही, आम्ही अवघ्या दीड तासातच घाघाला पोचलो. आज आमच्या स्पीडला नक्कीच काहीतरी झालं होतं. एकतर आम्ही फास्ट चालत होतो किंवा रस्ता लवकर लवकर संपत होता. सुरज पुरा गावी एक गंमत झाली. हा घाटाचा भाग आहे. रस्ता अगदी

फिरून फिरून जातो. छोटा पण पक्का रस्ता. बस जाते या रस्त्याने. मात्र पायी चालणारा माणूस आणि बस असं एकावेळी या रस्त्यावर राहूच शकत नाही इतका जेमतेम रस्ता होता. इथे फक्त बसेस जात असल्यामुळे त्या भरधाव येत-जात. त्या मार्गावरून आम्ही जात असताना वाटेत आम्हाला एक माणूस भेटला. डोंगरावरून खाली दूरवर त्यानं एका मंदिराकडे बोट दाखवले... ये रस्ता ले लो बाबाजी, अच्छा रहेगा... तो म्हणाला. डोंगर उतरून पाऊलवाटेने आम्ही चालू लागलो... चालता चालता एका मोठ्या विहिरीपाशी येऊन थांबलो. ही विहीर शेत विहिरीपेक्षा ही मोठी होती. वरून संपूर्ण सिमेंटचं झाकण या विहिरीला होतं. एक छोटसं कपाटा सारखं दार लावलं होतं आणि तिथे आत् रहाटगाडगं बसवलेलं होतं.... तहान लागली होती. हातपाय तोंड धुवायला म्हणून आम्ही विहिरीतून पाणी काढलं... इतकं चवदार थंड पाणी होतं म्हणून सांगू ! आम्ही तिथेच विहिरीच्या काठावर विसावतो न विसावतो तोच मागून एक गावकरी माणूस आला.. त्याच्या हातात कुठलीतरी रानफळं होती... बोरांसारखी पण थोडी लहान.. त्याने ती टोपलीच आम्हाला दिली... म्हणाला, सीधा पाटण ही जाओ...

आम्ही कौशिक गोशालेतून पुढे निघालो होतो खरं, आणि पुस्तकाप्रमाणे पाहता तिथून पाटण बरंच दूर होतं. साल्हेदांडा, निचली, बुधेरा, डोकरकुई आणि मग पाटण असा मार्ग होता. आता पाटण म्हणजे जाओ म्हणतो कमालच झाली... त्या माणसाने सांगितल्याप्रमाणे पाटण फक्त दहा बारा किमी अंतर असेल... आम्ही डोकरकुईच्या आसपास कुठेतरी होतो. हा आडरस्ता आम्हाला इतकं दूर घेऊन आला होता! बाजूच्या झाडीतून दूर मैयाचा प्रवाह दिसत होता.. आम्ही नक्की किती अंतर चाललो होतो माहीत नाही मात्र मधली कुठलीही गावं आम्हाला लागली नव्हती. अजूनही आमच्याकडे बराच वेळ होता. आम्ही पाटणला पोचू शकत होतो. आम्ही पुढे निघालो.

इथे पाटणला जाण्याआधी एक मोठा डोंगर लागतो. गावातल्या लोकांनी आम्हाला या रस्त्याबद्दल सांगितलं. हा रस्ता खूप छान होता मात्र बरीच चढाई आहे. खूप थकायला होतं. आठ किलोमीटर नुसती चढाई. मध्ये पाणी देखील नाही. त्यामुळे आम्ही आमच्या पाण्याच्या बाटल्या भरून घेतल्या.. आणि पुढे निघालो. घनदाट झाडी आणि पूर्ण चढाई. बाबाला फारच दमायला झालं. बरोबर घेतलेलं पाणी संपायला आलं. साधारण अर्धा डोंगर चढणं अजून बाकी असेल. बाबा थकला, म्हणाला मी आता पुढे जाऊ शकत नाही... पण अशाने कसं होणार? निदान गावात पोचणं गरजेचं होतं कारण हा जंगलाचा भाग होता. थोडावेळ आराम करुन व मग निघू. बाबाला सांगितलं.. त्याप्रमाणे आम्ही तास दीड तास एका झाडाखाली बसून आराम देखिल केला. मात्र आता निघायला हवं होतं कारण संध्याकाळ होऊ घातली होती. अजून अर्धा डोंगर चढून बाकी होतं आणि त्यानंतर गाव किती दूर आहे याचा अंदाज नव्हता. हा भाग डोंगराळ असल्यामुळे आणि आम्ही घळीच्या बाजूने असल्यामुळे इथे थोडं अंधारून आल्यासारखा देखील वाटत होतं.

आम्ही चढायला सुरुवात केली पण बाबाचा थकवा अजूनही गेला नव्हता. त्याला सारखी धाप लागत होती. सामान नको असं तो सारखं सारखं म्हणत होता. हे सामान घेऊन मी चालूच शकणार नाही, असं म्हणून तो बॅग खाली ठेवून दिली. मग माझं सामान मी थोड्या अंतरावर नेऊन ठेवलं आणि पुन्हा बाबाचं सामान घ्यायला खाली उतरले. बाबाचं सामान घेऊन मी पुन्हा वर चढले. म्हणजे आता मला माझंही सामान न्यायचं होतं, आणि बाबाचं ही सामान न्यायचं होतं... शक्ती आणि वेळ दोन्ही दृष्टींनी माझ्यासाठी ते अशक्यच होतं.... पण अशाच वेळी काहीतरी होत असतं.... इथेही झालं... पण काय झालं ते सांगणार पुढच्या भागात.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८६

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला मैया ने आमचे कसे लाड केले आणि मी तिचं लाडकं लेकरू आहे हे मला पुन्हा एकदा कसं समजलं याबद्दल सांगितलं होतं. पुढे वाटेत लागलेली विहीर देखील मी तुम्हाला सांगितली होती. नंतर तिथून पुढे आपण पाटणच्या दिशेने निघालो होतो. आठ किलोमीटरचा हा पहाड चढताना माझी दमछाक झाली होती. आम्ही चढायला सुरुवात केली पण बाबा सारखी धाप लागत होती. सामान नको असं तो सारखं सारखं म्हणत होता. हे सामान घेऊन मी चालूच शकणार नाही, असं म्हणून तो बॅग खाली ठेवून दिली. मग माझं सामान मी थोड्या अंतरावर नेऊन ठेवलं आणि पुन्हा बाबाचं सामान घ्यायला खाली उतरले. बाबाचं सामान घेऊन मी पुन्हा वर चढले. म्हणजे आता मला माझंही सामान न्यायचं होतं, आणि बाबाचं ही सामान न्यायचं होतं... शक्ती आणि वेळ दोन्ही दृष्टींनी माझ्यासाठी ते अशक्यच होतं.... पण अशाच वेळी काहीतरी होत असतं.... इथेही झालं..

मी फार तर फार दोन चकरा मारल्या असतील. आधी मी माझं सामान घेऊन ठेवायचे आणि मग बाबाच सामान घेऊन जायचे. मी माझं सामान वर नेऊन परत येईपर्यंत बाबाचा थोडा आराम करायचा. मात्र हे करणं शक्यच नव्हतं, आणि हे मैयाला माहीत होतं. इथे जंगलात आम्ही कुणालाही साद घातली नव्हती, आवाज दिला नव्हता. मैयाची प्रार्थना तेवढी करत होतो की अंधाराच्या आत आम्हाला मुक्कामी पोहोचू दे. अशातच मी माझं सामान वर ठेवायला गेले त्यावेळी तिथे एक लाकूड तोडणारा माणूस येऊन उभा राहीला. “चलो माताजी, सामान मेरे पास दे दो तुमको गाव तक छोड देता हु तो म्हणाला.. ” बाबाचं सामान त्याच्याजवळ दिलं. त्याने बाबाचा हात धरला आणि झपाझप पुढे जाऊ लागला. थोड्याच वेळात आम्ही शाळेच्या

कंपाऊंड पाशी पोहोचलो. आता चढाव संपला होता त्यामुळे बाबाने आपलं सामान परत घेतलं. तो माणूस तिथे असलेल्या लहान मुलीला त्यांच्या भाषेत काहीतरी बोलला आणि आम्हाला त्या आठ-दहा वर्षांच्या मुलीकडे बोट दाखवलं. "यह आपको आगे का रास्ता दिखा देगी"- तो म्हणाला.

आता ती छोटी मुलगी पुढे आणि आम्ही मागे मागे जात होतो. मला तिच्याशी बोलण्याची फारच इच्छा होत असल्याने मी तिला छोटे-मोठे प्रश्न विचारू लागले. या शाळेपाशी तू एकटीच काय करत होती? तू शाळेत जातेस का? पण ते एकाही प्रश्नाचं उत्तर देईना... तिला बहुधा माझ्याशी बोलायचंच नव्हतं. एका घराकडे तिने बोट दाखवलं आणि म्हणाली "चाय पा लो आगे जायेंगे". त्या घरातल्या लोकांनी आमचं अगत्याने स्वागत गेलो आणि सुंदर चहा देखील पाजला. मग आम्ही पुढे निघालो. ही छोटी मुलगी आमच्या सोबत होतीच.. आम्ही तिघेही शांतपणे चालत होतो कोणीही कोणाशी बोलत नव्हतं. अशात ती मुलगी अचानक मला म्हणाली... "रोज वही खडी रहती हुं. बहुत परिक्रमावासी आते है. रोज उनको यादव जी के घर तक छोडती हूं. मेरा तो काम ही है परिक्रमा वासियों को मार्ग दिखाना.... तिने यादव जींच्या घराकडे बोट दाखवलं आणि धावत धावत आल्यावाटेने निघून गेली. मात्र मला अजिबात आश्चर्य वाटलं नाही. कारण कालपासून माझ्यासोबत जे घडत होतं त्यानंतर ती कुठल्या ना कुठल्या रूपात समोर येणं होणार आहे याची मला खात्री होती. अर्थात तेही छोटी कन्या असेल हा अंदाज मला नव्हता. तसं ती मी भासवलं सुद्धा नाही. मात्र परिक्रमावासी ना मुक्कामावर सोडणं हे माझं काम आहे हे धावत धावत जाण्याच्या आधी आणि माझ्याशी बोलतानाच शेवटचं वाक्य होतं तिचं. याहीवेळी मी तिला नमस्कार केला नव्हता पण यावेळी मला खंत वाटली नाही. कारण प्रत्येक वेळी नमस्कार करूनच भावना व्यक्त होत नसतात. अधीमधी का होईना आईचं लाडकं लेकरू आईच्या गळ्यात पडत असतं. तितका हक्क तिने मला कधीच देऊ केला आहे हे मला माहीत होतं.

आम्ही यादवजींकडे गेलो त्यावेळी यादवजी घरी नव्हते. त्यांची १६-१७ वर्षांची मुलगी मात्र घरी होती. तिने आमची छान आवभगत केली. ती एकापाठोपाठ एक घरातले काम आटपत होती. विचारपूस करता तिला आई नसल्याचं समजलं. घरची सगळी जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेऊन ही लहानगी मैया स्वरूपच झाली होती. घरी कोणी परिक्रमावासी माताजी आल्या तिला फार आनंद व्हायचा. कळत नकळत त्या आलेल्या परिक्रमावासी स्त्रीकडे बघताना ही लहानगी आपल्या आईला शोधायची. ते तिच्या वागण्यातून बोलण्यातून डोळ्यातून आणि मिठीतून स्पष्ट जाणवायचं. तीनी तीचं पूर्ण घर आम्हाला दाखवलं. शेतातून काढून आणलेलं पीक दाखवलं. अंगणातल्या मागच्या बाजूच्या विहिरीवर ती मला घेऊन गेली. ही तीची मनातले विचार मोकळं करण्याची जागा. आणि इथेच या विहिरीच्या पारावर मी बसले असताना तीनी माझ्या मांडीवर डोकं ठेवलं. न बोलता सगळं सगळं बोलून गेली ती! त्यावेळी खरंच खूप गजगत झालं, भरून आलं खूप... पण अनेकदा शब्द सुद्धा अपुरे पडतात व्यक्त होण्यासाठी, आणि अनेकदा अव्यक्तच राहणं योग्य असतं. तीच ही वेळ होती. काय कमाल आहे नाही नर्मदामय्याची, आम्हाला जेऊ खाऊ घालणारी आगत-स्वागत करणारी कुमारिका स्वरूपातली ही मुलगी आमच्यासाठी नर्मदामय्याचं रुप होती, तर नर्मदा मैयाची परिक्रमा करणारी जिच्या पायाला अनेक तीर्थस्थानांची माती लागलेली आहे अशी एक परिक्रमावासी स्त्री या लहानग्या मुलीसाठी तिची नर्मदामैया होती, थोड्या काळासाठी का होईना तिची आई झाली होते.. हे असं समाधान अगदी थोडावेळ मिळालं तरीदेखील त्याची किमया चिरकाल टिकणारी असते नाही?

आम्ही दोघींनी मिळून छान स्वयंपाक केला. अंगणातच चूल मांडलेली त्यामुळे छान गप्पा-टप्पा ही झाल्यात. ओसरीत ओले बिब्बे घातले होते. कसल्याशा लांब शेंगा देखील वाळत घातल्या होत्या. भोजन प्रसादी साठी आम्ही यादव जी आणि त्यांच्या मुलाची वाट बघत होतो. मुलींनी आपल्या वडिलांना फोन केला आणि नंतर “आप भोजन पालो मैया जी बाबूजी आज बहुत देर से आयेंगे” असं म्हणत तिने आम्हाला जेवायला वाढलं.. जेवण आटोपले यादवजी

बरेच उशिरा घरी आले. त्यांचं जेवण झाल्यानंतर मग गीत माझ्या बाजूला येऊन बसली.. "आज है यही सो जाऊ मैया जी?" तिनी आर्जवी स्वरात विचारलं आणि मी होकार दिला. ती माझ्या बाजूलाच होती रात्रभर. सकाळीच पहाटेलाच आम्ही पुढे जायला निघणार तेव्हा घरातले सगळे झोपले होते. आमचं व्यवस्थित आवरून झालं होतं वाट पाहूनही झालं होतं. त्या लहानश्या मुलीच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव पाहून तिला झोपेतून उठवायची आमची अजिबात इच्छा होत नव्हती. हळू आवाजात दारापाशी येऊन नर्मदे हर म्हणावं आणि पुढे जावं असा विचार मनात आला तोच तिने डोळे उघडले आणि म्हणाली "जा रहे हो मय्या जी चाय बना दू? मी नको म्हंटलं तरीही ती उठून बाहेर आले मला मिठी मारली आणि म्हणाली "कल बाबूजी शराब पी के आये थे, मुझे अच्छा नही लग रहा था, इसलिये मै आपके पास आके सो गयी, उधर वाले कमरे में होती तो बाबूजी डाट देते, जब भी शराब पीकर आते है बहुत दाटते है" पुन्हा एकदा हृदयात खोलवर घाव झाल्यासारखं वाटलं.. पण तिचं लगेच पुढचं वाक्य ऐकून लेकीचा समजूतदारपणा आणि लेकीचे मैया होणार काय असतं त्याचा प्रत्यय आला. ती म्हणाली "आप चले जाओ फिर बाबूजी को जगाती हू, अच्छा नही लगेगा के परिक्रमावासी घर मे थे फिर भी वो शराब पीकर आये, आप आने वाले हो यह शायद उन्हे पता नही था". तिच्या या वाक्याने एक प्रकारची मोकळीक तिने आम्हाला दिली. थांबलो असतो तर वडीलांची लाजेनी होणारी अवस्था आणि ज्या घरी थांबलो, जेवलो त्या घरच्या मुख्य व्यक्तीला न भेटता जातोय याची खंत या दोन्हीवर तिच्या या वाक्याने पांघरूण घातलं होतं... तिला पुन्हा एकदा घट्ट मिठी मारून आम्ही पुढे निघालो.

पुढे केदारपुर, केवलारी, पौंडी, किंदरई, दलका घुटिया करत-करत साल्हे पाणीला आलो. पाटण होऊन सकाळी निघालो होतो त्यावेळी आमचा चहा देखील झाला नव्हता. केदारपुरच्या पुढे आल्यानंतर थोडी भूक लागायला लागली. इथे जवळपास दुकाना नाही आणि एवढ्या सकाळी ती उघडण्याची शाश्वती पण नाही त्यामुळे आम्ही तसेच पुढे पुढे जात होतो. हे केदारपुर थोडं खाली आहे डोंगराच्या. साधारण सगळ्याच बाजूंनी डोंगर आणि मध्ये

केदारपुर असा काही भाग आहे. इथून आजूबाजूच्या डोंगरावरचे मोबाईल टॉवर दिसतात. तेच बघत बघत आम्ही पुढे जात होतो. वाटेत एक पार असलेलं झाड होतं तेथे विश्रांतीसाठी बसलो असताना एक गंमत झाली. दोन कुत्रे आमच्या अंगावर भुंकायला लागले. आम्ही त्यांच्या हद्दीत, त्यांच्या मालकीच्या जागी बसलो असू कदाचित, आणि म्हणून आम्ही उठू लागलो तोच एक माणूस आमच्या दिशेने येताना दिसला.. बैठो कुछ नही करेंगे, वह तों उनका नाश्ते का समय हो गया है ना यहा रोज नाष्टा करते है" असं म्हणत त्याने पार्लेजी पुडे त्या कुत्र्यासमोर मोकळे केले.. मग सोबतची पिशवी उघडली त्यातून काळा चहा भरलेली एक थर्मास सारखी बाटली बाहेर काढली. एक पेला काढला आणि माझ्या हाती काळा चहा दिला.. खूपच आश्चर्य वाटलं यावेळी रस्त्यावर इथे असा चहा मिळतोय तरी कसा.. मग विचारलं, तर म्हणाले हे दोन माझे शेतातले कुत्रे आहे. रोज हे निमूटपणे इथे येऊन बसतात. आज हे खूप भुंकत होते तेव्हाच इथे कोणीतरी आहे हे लक्षात आलं म्हणून मागावून येताना चहा घेऊनच आलो. इथेच या शेता पलीकडे माझी छोटीशी झोपडी आहे. कसे काय कोणाच्या मनात विचार येतील मै याच जाणे बाबा.. पण कोईन्सिडन्स नसतो हे नक्की..

आम्ही जेव्हा बरगी कॉलनीला गेलो त्यानंतरचा प्रवास हा कोईन्सिडेन्स वाटणाऱ्या मात्र को इनसीडन्स नसणाऱ्या घटणांने भरलेला आहे. ज्याप्रमाणे एकच वाक्य मला वेगवेगळ्या चार संन्यास यांनी सांगितलं होतं तसंच काहीसं या भागात घडलं. मात्र यावेळी संन्याशांची जागा घेतली चहावाल्यांने आणि आम्हाला जे सांगितलं त्यामुळे आम्ही कुठच्या कुठे जाऊन पोहोचलो... याच वाटेवर एका पांढऱ्या रंगाच्या कार ने आमच्या पुढ्यात एक सरप्राईज आणून ठेवलं, तेही सांगणारे पण पुढच्या भागात..

नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८७

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला पाटणच्या मुक्कामालाबद्दल सांगितलं होतं. त्यानंतर केदारपूरला कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे झालेली चहाची व्यवस्था पण मी तुम्हाला सांगितली होती. आम्ही आता केदारपुरहून देखील पुढे निघालो. चरगाव, बरेली, किंदरई पौंडी, दलका, घुटिया, साल्हेपाणी, बीच्छिया अतारिया, गोरखपुर असा हा मार्ग होता.

आजचा आमचा दिवस आळसात सुरू झाला होता. आज जणू काही घडत नाहीये असं वाटत होतं. वातावरणात किंचित उदासीनता आहे असे देखील जाणवत होतं. करत करत आम्ही किंदरईला पोहोचलो. किंदरई तसं थोडं मोठं गाव. इथे बस स्टॉप आहे. ज्या गावात बसेस थांबतात ते गाव मोठं गाव असं समजल्या जातं. आम्ही मेन रोड वर होतो. तेवढ्यात आमच्या बाजूला एक बस येऊन थांबली. कंडक्टर खाली उतरला आणि म्हणाला “चलो आपको आगे तक छोड देता हु उतर जाना, पैसा नही लूंगा ऐसेही छोड दुंगा बैठो तो सही” आम्ही नकार दिला तेव्हा हात जोडूनच मागे लागला... म्हणाला माझ्या नोकरीचा पहिला दिवस आहे तुम्ही बसलात तर बरं होईल. आम्ही त्याला सांगितलं, आम्ही पाई परिक्रमावासी आहोत... अगदीच तब्येत बिघडली किंवा तशीच काही अडचण असेल तरच गाडीमध्ये बसण्याचा विचार करू अन्यथा नाही.... तो ड्रायव्हरशी काहीतरी बोलला आणि पुन्हा आमच्यापाशी आला, “चालू गाडी मे नही बैठ सकते तो गाडी रोक देता हू, दो मिनिट तो आके बैठ जाओ फिर उतर जाना, मेरा ड्युटी का पहला दिन है. इसे मै आपका आशीर्वाद समझूंगा”.. आता नाही म्हणवलं नाही, त्याच्या आग्रहाखातर पाच मिनिटं आम्ही बंद बसमध्ये बसलो. मात्र त्या पाच मिनिटात त्या कंडक्टर ने अशी काही आव भगत केली की काय सांगू! त्या पाचच मिनिटात कुणाला तरी

फोन करून त्याने आमच्यासाठी समोसा, थोडी फळ, वेफर्सची पाकीटं, बिस्किटांची पाकीटं आणि आणि ज्युसच्या बाटल्या मागवल्या. त्यानं आम्हाला दाराजवळच्या कण्डक्टरच्या सीट वर बसवलं होतं. आमच्या हाताने शुभ म्हणून २-४ तिकीटं सुद्धा त्याने काढून घेतली. बस मध्ये नर्मदा मैया चा जयघोष केला आणि मग आम्ही खाली उतरलो. आश्चर्य म्हणजे खचाखच भरलेल्या बस मधील एकाही प्रवाशांनी याबद्दल विरोध दाखवला नाही. मोजूनच पाच मिनिटे बस थांबून होती खरी पण बस मधील प्रत्येक प्रवाशी या नर्मदा मातेच्या जयघोषात आनंदाने सामील झाला होता.

कण्डक्टर चा निरोप घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाला लागलो. मध्ये मध्ये गावं आणि मध्ये मध्ये पहाडी चढ-उतार असा हा रस्ता साल्हेपाणीपर्यंत जातो. मधी कुठेशी एका चहावाल्याने चहाला बोलावलं. खरं तर इथूनच चहा वाल्यांची गंमत सुरू झाली... पण ती आत्ताच समजणार नाहीये. हा चहावाला म्हणाला, "तुम्ही छोट्या रस्त्याने देखील जाऊ शकता, आणि मुख्य रस्त्याने देखील. छोटा रस्ता समजायला थोडा कठीण आहे, चढ-उतार ही भरपूर आहे. रस्ता चुकण्याची सुद्धा शक्यता आहे, तरीही का कोण जाणे मला वाटतंय तुम्ही छोटा रस्ताच घ्यावा". आता मात्र आम्हाला प्रश्न पडला. म्हणजे छोट्या रस्त्याने इतके सारे प्रॉब्लेम्स येणार हे या चहावाल्याला माहित आहे खरं तरीही हा आम्हाला त्याच रस्त्याने जायला सांगतोय.. असं का असावं? फक्त अंतर कमी पडेल म्हणून हे असेल का? खरं पाहता बाबाचं वय बघून इतर लोक आम्हाला कच्च्या रस्त्याला जाऊ नका असं सांगायचेत, पण हा पहिलाच माणूस.. अडचणी येतील तरीही कच्च्या रस्त्याने जा असं सांगणारा... तसं मला मुख्य रस्त्याने जायला फारसा आवडायचं नाही, डोंगर दरी निसर्ग मला नेहमीच जवळचे वाटले. बाबालाही आवड म्हटली तर कच्चा रस्ता आवडायचा पण बरेचदा चढ-उतार असले की बाबाचा गुडघा दुखायचा. मी बाबाला विचारलं, त्याचा होकार आला आणि आम्ही कच्चा रस्ता धरला.

फार निसर्गरम्य असा हा भाग नसला तरी गाड्यांच्या प्रदूषणापेक्षा बराच म्हणायचा. कच्चा आणि छोटा रस्ता असला तरी लांबच्या लांब. या भागातला प्रवास थोडा रटाळ वाटेल असा होता. एकंदरीत पाहता हा भाग गरिबीचा. पाण्याचा सुद्धा तुटवडा. रस्त्यात पुढचा रस्ता विचारायला चिटपाखरू देखील नाही. दिवस असाच जात गेला आणि आम्ही निवारा शोधू लागलो. आम्ही गोरखपुरपर्यंत जाऊ शकू असा आम्हाला वाटलं होतं पण गोरखपुर यायला अजून बराच वेळ आणि बरच अंतर असावं. मधेच वाटेत आम्हाला एक तरुण मुलगा भेटला. "आप आगे साल्हेपानी मे रुक जाना, उसके आगे नही जा पाओगे सुरज डूब जायेगा, मेरे पीछे पीछे आओ" असं म्हणत तो थोडा पुढे जाऊन थांबायचा. साधारण साडेचार पाचच्या दरम्यान तो आम्हाला भेटला असावा. आम्ही नक्की कुठे होतो ते आठवत नाही पण साल्हेपाणीला जायला साधारण तीन-चार किलोमीटर अंतर बाकी होतं. त्याने वस्तीकडे बोट दाखवलं आणि तो पुढे निघून गेला. आम्हाला रस्ता दाखवायला कुणीतरी भेटणार आहे असा त्या चहावाल्याला विश्वास असेल का? आम्ही साधे पाणीला पोहोचलो पण तिथे राहायचं कुठे हा प्रश्न होताच. खरं ज्यांच्या घरी आम्ही राहिलो त्यांचं नाव लिहायला मी विसरले आहे. पण गोंड की कुठलं आदिवासी जमातीचं हे कुटुंब. अगदी फार आदरातिथ्य नाही पण भोजन व्यवस्था आणि निवारा तिथे व्यवस्थित मिळाला. गरीबी आणि पाण्याच्या तुटवड्याने असेल कदाचित इथे घरी असलेल्या भागात पाहुण्यांना प्रती उदासीनताच असावी असं वाटतं, मात्र मैया ने आमची व्यवस्था छानच केली.

दुसऱ्यादिवशी लवकरच निघालो. आता गाठायचं बर्गी कॉलनी. आम्ही रस्त्याने रमत-गमत जात होतो. मागच्या भागात मी तुम्हाला एका पांढऱ्या कारबद्दल सांगितलं होतं नं, ते आता पुढे सांगते. आता मधला रस्ता सोडून आम्ही मुख्य रस्त्याला लागलो होतो. आमच्या मागून एक पांढऱ्या रंगाची कार् आली आणि थोडं समोर जाऊन थांबली. गाड्या थांबल्या की लोक उतरून दक्षिणा किंवा फळ किंवा तत्सम काहीतरी देतात याची आता सवय झाली होती. कारचा ड्रायव्हर खाली उतरला आणि आम्ही त्याच्याकडे येण्याची वाट पाहू लागला. आम्ही

गाडीजवळ पोहोचताच त्याने शंभर शंभरच्या दोन नोटा आमच्या हातात घातल्या आणि इतक्यात मागून कुणीतरी येऊन माझे डोळे धरलेत. अरे बापरे कोण असेल बरं इथे माझे डोळे धरणारं... " ओळख बरं सुरुची कोण आहे मी?" आवाज ओळखीचा होता, भाषा मराठी होती.. मुख्य म्हणजे त्या माझं नाव घेत होत्या.. बाईचा आवाज होता.. इथे कोण हार मारतंय मला नावासकट? आणि मराठी बोलतंय? मला काही समजेना. छे अशक्य, हरले आता, सोडा तरी... खरंतर तिथे नावासकट मला कोणीतरी बोलवतं आहे, माझे डोळे धरतय त्यातच त्या व्यक्तीची माझ्याशी असलेली आपुलकी मला दिसून येत होती...

त्या व्यक्तीने माझे डोळे सोडले आणि मी समोर उभ्या असलेल्या व्यक्तीच्या गळ्यात पडून रडू लागले. अशी इथे अचानक भेट होईल हे कल्पनेच्याही बाहेर होतं. या व्यक्तीला पाहिल्यानंतर माझा आनंद मला आवरताच आला नाही.. किती बोलू किती नको असं मला वाटायला लागलं... किती दिवसांनी ही भेट झाली होती. आमच्या मागच्या भेटीनंतर काय काय झालं हे मला भडाभडा सांगायचं होतं. इतका वेळ मिळणार नव्हता हे मलाही माहीत होतं... पण त्यांचा आशीर्वाद मला पुन्हा एकदा मिळणार होता, आणि त्यांचा मायेचा हात माझ्या डोक्यावरून माझ्या पाठीवरून फिरणार होता, हेच माझ्यासाठी खूप महत्त्वाचं होतं. मला माहितीये मी तुमची उत्सुकता ताणून धरली आहे. अशी कोण ही व्यक्ती असणार ज्यांना समोर पाहिल्यावर माझी ही अवस्था होते हे तुम्हाला जाणून घ्यायचंय.. सांगते.. माझे मागून डोळे धरणारी व्यक्ती म्हणजे अमरकंटकला भेटलेली अनुताई, आणि ज्यांच्या गळ्यात पडून मिठी मारली, ज्यांना पाहून माझा आनंद गगनात मावेनासा झाला ती व्यक्ती म्हणजे चितळे माई ज्यांना आपण प्रतिभाताई चितळे म्हणून ओळखतो. अर्थात बाबा ( सुधीर चितळे) होतेच तिथे. माईंचा दात दाखवण्यासाठी ते जबलपूरकडे निघाले होते, आणि आम्हाला दूरूनच पाहून असं सरप्राईज त्यांनी आमच्यापुढे आणून ठेवलं... अमरकंटक चा माईंजवळचा मुक्काम, शंकर महाराजांचा आलेला अनुभव, असं सगळं माझ्या डोळ्यापुढून सरकू लागलं... लहान मूल आईला मिठी मारतं तशी मिठी मी माईंना मारली अगदी कडकडून.. आणि माईंनी सुद्धा

डोक्यावरून हात फिरवला म्हणाल्या “तुला पहिल्यांदा भेटले तेव्हा म्हणाले होते मी तुला तुझी “वाट” लागली म्हणून.. योग्य वाटेवर चालते आहेस तू, आता एक काम करायचं दक्षिणा दिलीयेना, छान पोटभर जेवून घ्यायचं कुठेतरी, अजून भरपूर प्रवास बाकी आहे.. ” माई बाबांनी आमचा निरोप घेतला आणि त्या दूर जाणाऱ्या कारकडे मी एकटक बघत राहिले.

पुढे चालता चालता एक वेगळाच प्रश्न आमच्या डोळ्यापुढे उभा राहिला. आम्ही गावापासून दूर. मात्र स्थिती अशी होती की आम्हाला आता पुढे जाता येणं अशक्य होऊ लागलं होतं.. वाटेत कुठेही थांबता येण्यासारखं नव्हतं जागाच नव्हती तशी, आणि खरं सांगू थांबूनही फायदा नव्हता कारण आज थांबून आमचा हा प्रश्न सुटणारच नव्हता. त्या प्रश्नावर योग्य उपाययोजना केल्याशिवाय काही गत्यंतर नव्हतं. आम्हाला खरंतर मोठ्या गावात किंवा शहरात गेल्यावरच या प्रश्नाचे उत्तर मिळणार होतं पण अशा अवस्थेत चालता येणं कठीण होतं... नाही नाही आमच्या तब्येती अगदी व्यवस्थित होत्या. कुठली अंगदुखी नाही की काही नाही.. तरीही चालता येणं कठीण झालं होतं. नाही, माझे आणि बाबाचे जोडे पण व्यवस्थित होते, आणि जोडे खराब झाले तर काढून टाकता येतात ना... मग काय झालं होतं? खरं सांगायचं तर बाबाला काही झालं नव्हतं, माझाच प्रॉब्लेम होता.. अर्थात कसाबसा तो प्रॉब्लेम आम्ही तात्पुरता सॉल्व केला खरा, पण त्यावर उपाययोजना झाली ती निगरी नावाच्या गावात... तोवर फारच कठीण गेलं आम्हाला... असं काय झालं असेल... सांगते पण पुढच्या भागात..

नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८८

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला चितळे माई बाबांची अचानक झालेली भेट सांगितली होती. आम्ही रस्त्याने मजल-दरमजल करत जात होतो आणि अशातच आम्हाला एका वेगळ्याच प्रश्नाचा सामना करावा लागला असं मी तुम्हाला मागच्या भागात सांगितलं होतं. हा प्रश्न नक्की काय होता? आम्हाला चालणं का अशक्य झालं होतं हे आता सांगते!

तर झालं असं होतं की बाबाची बॅग काही वेळासाठी मी घेतली होती आणि माझी बॅग बाबाला दिली होती. हे अशासाठी की रस्त्यात कोणी काहीही दिलं तरी ते आम्ही बाबाच्या सामानात ठेवत असू. माझी बॅग लहान असल्यामुळे त्यात जागाच नसायची. पण मग वजन जास्ती होऊन बरेचदा बाबाचा खांदा दुखायचा. त्याला थोडं रिलॅक्सेशन म्हणून थोडावेळ ती जड बॅग मी घ्यायचे.. अर्थात तासा-दोन तासा साठीच बरं का.. यापेक्षा जास्त बाबांनी मला कधीच जड बॅग घेऊ दिली नाही. आताही ती बॅग माझ्या जवळ होती. आम्ही रस्त्याने चालत होतो आणि अचानक माझ्या खांद्यावर असलेल्या बॅगचे वरचे दोन पट्टे निखळले. कमरेला लावण्याचा पट्टा घट्ट असल्यामुळे बॅग जमिनीवर पडली नाही मात्र खांद्यावरुन निसटून पायापर्यंत लटकली. माझ्या कमरेला एक जोराचा हिसका बसला आणि मी खाली पडले. मला फार काही इजा झाली नाही कारण पडतांना मी बॅगवर पडले होते, मात्र आता प्रश्न असा होता ही इतकी जड बॅग घेऊन जायचं तरी कसं? अजून पुढचं गावही दूर होतं आणि त्या गावात या बॅगवर काही उपचार करता येतील किंवा नाही याची माहिती देखिल आम्हाला नव्हती.

मग आमचे वेगवेगळे प्रयोग सुरू झाले. थोडावेळ बाबाने ती बॅग डोक्यावर घेतली. पण फार अंतर चालता येईना. पाच-दहा मिनिटांच्या वर आपल्यासारख्यांना एवढं वजन डोक्यावर

घेऊन झाणं शक्यच नसतं. मग लहान मुलाला कडेवर घेतो तशी ती बॅग कडेवर घेऊन पुन्हा काही पावलं चालण्याचा असफल प्रयत्न आम्ही केला. नंतर दोन लुंग्या घेऊन ती बॅग पुन्हा खांद्याला बांधता येते का याचाही विचार केला आणि पुन्हा एकदा असफलता पदरात पाडून घेतली. नाही नाही म्हणता म्हणता दोन चार किलोमीटर आम्ही पुढे सरकलो असू, तेवढंच! मग आता त्या बॅग मधलं काही सामान माझ्या बॅगमध्ये अक्षरशहा कोंबलं आणि थांबत थांबत बॅग हातावर, कडेवर, सूटकेस सारखी धरून अनेक प्रकारांनी काही अंतर पुन्हा पार केलं. मग रस्त्यावरच एका ठिकाणी दोन्ही बॅगा पुन्हा मोकळ्या केल्या आणि काही सामान टाकून देता येईल का याचाही विचार केला. कपडा प्रकार सोडता येण्यासारखा नव्हता आणि बाकी दिलेलं शिध्याचं सामान सुद्धा असं रस्त्यावर सोडून देणे योग्य नव्हतं. निदान कोणाच्या तरी पोटाला लागावं म्हणून तेही तिथे टाकता आलं नाही. पुन्हा बॅगा भरल्या आणि गावापर्यंत पोहोचण्याची धडपड सुरू ठेवली.

जरा वेळाने एक कल्पना सुचली आणि ती बऱ्यापैकी अमलात आली. आता बरंच अंतर अशा पद्धतीने चालता येऊ शकतं याची खात्री पटली आणि हा उपाय व्यवस्थित लागू पडला. ह्या बॅगच्या वरच्या बाजूने बॅग उघड बंद करण्यासाठी जो झाकणा सारखा भाग असतो, त्यातून आमचा दंड आरपार घातला. त्याचं एक टोक बाबाने धरलो आणि दुसरं टोक मी धरलं. बाबा पुढे आणि मी मागे. आमच्या हातामध्ये दंड आणि दंडाच्या मधोमध लटकलेली बॅग. अर्थात यातही प्रॉब्लेम येत होताच पण तो निभावून नेण्यासारखा होता. बाबाची उंची सहा फूट आणि माझी उंची कमी त्यामुळे आम्ही धरलेला तो दंड तिरपा व्हायचा आणि बॅग माझ्याकडे घसरायला लागायची. पण काही काळ तितके वजन मी सांभाळू शकायचे. मग यातही व्हेरिएशन्स येऊ लागले. शेवटी माझा उजवा हात आणि बाबाचा डावा हात अशा पद्धतीने तिरपा दंड धरून आम्ही चालायला लागलो... मजल दर मजल करत, थकत, थांबत आम्ही निगरीपर्यंत येऊन पोहोचलो. आता शक्य असल्यास दुकान शोधून दुसरी बॅग घेणे किंवा एखाद्या टेलर कडून ही बॅक शिवून घेणे हे उपाय.

पण प्रॉब्लेम अजून संपले नव्हते. इथे मोठं असं एकही दुकान नव्हतं जिथे नवीन बॅग खरेदी करता येईल. इथे जवळपास तरी कुठलंच टेलरचं सुद्धा दुकान नव्हतं. यासाठी आम्हाला बरगी कॉलनीलाच जाणं भाग होतं. आणि बरगी कॉलनी अजून भरपूर दूर होतं. आज आम्ही पोहोचू शकतो किंवा नाही अशी अवस्था होती. मघा सांगितल्याप्रमाणे थांबूनही फायदा नव्हताच कारण सुधारून घेतल्या शिवाय आम्हाला वेगानं चालता येणार नव्हतं. आमचं चालणं असंच हळूच होणार होतं, म्हणून आम्ही थांबायचा विचार सोडून दिला आणि थोडं थोडं का होईना पुढे चालत राहू असं ठरवलं. मग जिथे कुठे संध्याकाळी होईल तिथे थांबून जायचं..

आम्ही पुढे निघालो. आता गाव संपत येऊ लागलं. अशातच मागून एक माणूस आला आणि आम्हाला म्हणाला, "ऐसे कैसे लेकर जाओगे आप यह बॅग, चलो, पीछे मेरा दुकान है कुछ करते है".. अरे वा, दुकान? आमच्या नजरेतून दुकान सुटलं की काय? खरं तर दुकान शोधण्यासाठी आमची इतकी तळमळ सुरू होती की दुकान आमच्या नजरेतून सुटेल ही शक्यता कठीणच होती. दुकान म्हटल्यावर आम्ही दोघही फारच सुखावलो होतो आणि म्हणून त्या माणसाच्या मागोमाग चालायला लागलो. एका झाडाखाली चार काठ्या रोऊन त्यावर एक कापड टाकलेलं त्याचं दुकान होतं. तो चांभार होता. ही बॅग तो शिवून देणार होता, हाताने! मात्र ही बॅग शिवल्यानंतर अडचण एकच होती ती अशी की नंतर ही बॅग फार काही ॲडजेस्ट करता येणार नव्हती. त्यामुळे बाबाच्या मापानेच ती बॅग शीवून घेणं गरजेचं होतं. तो चांभार सुद्धा वेगवेगळे प्रयत्न करून बघत होता, तो टेलर नव्हता मात्र त्याच्याकडे जे काही सामान होतं त्यात आमची जमेल तशी मदत करण्याची त्याची धडपड आम्हाला दिसून येत होती. त्याच्याकडे आलेल्या गिऱ्हाईकाला देखील त्याने थांबवून ठेवलं. मग मात्र आम्ही एक निर्णय घेतला. आज इथेच थांबायचं. बाबाने त्या चांभाराला राहण्यास योग्य जागा विचारली. "तुम तुम्हारे गिराईक पहले देखो, हम आज यही रुकेंगे, तुम्हारा काम खतम होने के बाद ये बॅग का काम करते है, यहा कहा रह सकते है वो बताओ".. तिथूनच थोडं पुढे जवळच असलेल्या एका वस्तीत एका माताजींच्या घरी त्याने आमची व्यवस्था केली. माताजी एकट्याच होत्या. त्यांच्या

घरी समोरच्या खोलीत आम्ही आमचं बस्तान बसवलं. हा चांभार बॅग घेऊन गेला आणि रात्रीपर्यंत येतो असं सांगितलं. मात्र हा रात्री बॅग घेऊन आलाच नाही. अर्थात आम्हाला कुठलीही काळजी नव्हती. सकाळी तरी फार उशीर न होता निघता यावं यासाठी आम्ही त्याची वाट बघत होतो. सकाळी आमचं पूजापाठ करून झालं, थोडं आजूबाजूला फेरफटका मारून झाला. एकट्या म्हाताऱ्या माताजी ना बाल भोगा बनवण्याचा त्रास नको म्हणून वस्ती बाहेरच्या एका छोट्याशा ठेलेवजा हॉटेलवर आम्ही बाल भोगही केला. आता जवळजवळ नऊ साडेनऊ होऊन गेले होते तरीही हा चांभार काही येईना. याच्या दुकानावर ही चकरा मारून झाल्या पण आज दुकानच उघडलं नव्हतं. माताजी ना याचं घर वगैरे काही माहीत नाही. आता अजून किती वेळ थांबणार? फार तर तासभर वाट पाहू आणि मग मात्र पुढे जाऊ, असा विचार केला आणि जास्तीत जास्त सामान बॅगमध्ये भरलं आणि उरलेल्या सामानाचं व्यवस्थित गाठोडं बांधून घेतलं. माताजींचा निरोप घेतला आणि आम्ही पुढे निघालो. आता आमच्या दंडावर बॅग ऐवजी गाठोडं होतं एवढाच काय तो फरक! हो मध्येमध्ये गाठोड्याची गाठ सुटून रस्त्यावर सगळा पसारा सांडला, पण असं एक दोनदाच झालं मग ती गाठ पक्की बांधण्यात आम्हाला यश आलं. एका ऐवजी आता दोन लुंग्या घेऊन गाठोडं पक्क केलं, आणि वाटचाल पुढे सुरू ठेवली.

साधारण चार पाच किलोमीटर चालून झालं असेल, समोरून एका गाडीवरून दोघं माणसं आमच्या दिशेने येत होते आणि आम्हाला थांबा थांबा असा इशारा दुरूनच करत होते. आमच्याजवळ येऊन गाडी थांबली आणि त्यातल्या मागे बसलेल्या वीस-बावीस वर्षांच्या मुलाने आमची बॅग आम्हाला सोपवली. अरे तो चांभार कुठे गेला? ही मुलं कोण? यांच्याजवळ आमची बॅग कुठून आली? आमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तर आम्हाला त्या मुलांनी दिली. रात्रभर प्रयत्न करूनही त्या चांभाराला आमची बॅग हवी तशी शिवता आली नव्हती म्हणून सकाळीच एका मुलाला घेऊन तो चांभार बरगी कॉलनीला एका ओळखीच्या टेलरकडे आमची बॅग घेऊन गेला होता. त्याने आमची बॅग व्यवस्थित शिवून दिली होती. हा चांभार बरगी कॉलनीलाच

थांबला होता. “बाबाजी आयेंगे तो मिलकर ही जाऊंगा”, असा निरोप सुद्धा आम्हाला त्याने धाडला होता. मात्र माताजी जवळ मोबाईल नसल्याने या चांभाराला आम्हाला फोनवर संपर्क करता आला नाही. पुढे बरगी कॉलनीला परिक्रमावासी मार्गावरच या चांभाराने आमची भेट घेतली. खरंच किती आस्था त्या चांभाराला ! किती खर्च आला असं बाबाने विचारताच तो माणूस पाया पडला, पैसे सांगायला तयारच होईना. शेवटी तिथल्याच एका दुकानातून मिठाई घेतली आणि घरी मुलाबाळांसाठी घेऊन जा म्हणून जबरदस्तीने त्याच्या हातात घातली. असंच असतं या मैयाचं.. “माई गं याचं घर आनंदाने, समाधानाने भरु दे” हे उद्गार ती आपल्या तोंडून काढून घेतल्याशिवाय राहात नाही. आणि मग असं करत करत आपण अगदी प्रत्येकाच्या बाबतीतच आणि प्रत्येकासाठीच या मैयाकडे सुखा समाधानाची मागणी करू लागतो. आता आपल्याकडे आपल्यासाठी मागायला काही उरलंच नसतं, नं मागता ती सगळ देते हे अगदी पक्कं असतं. स्वतःच्या सुखासमाधानातला आनंद आता छोटा होऊ लागतो आणि इतरांच्या सुखासमाधानातला आनंद हळूहळू मोठा होऊ लागतो. मी माझ्यासाठी ज्या तळमळीने काही मागत असेल त्यापेक्षा कितीतरी जास्त तळमळीने त्या चांभारा साठी माझ्याकडून हे उद्गार निघतात! संस्कार जे म्हणतो आपण ते असेच घडत असतात तिच्या किनारी.. प्रत्येकाच्या आपापल्या प्रवासातला मार्ग हा असा थोडा थोडा पुढे जात असतो...

आम्ही पुढे निघालो. बरगी कॉलनीला पोहोचलो. तिथे धर्मशाळेच्या बाहेर एका कुटुंबाची ओळख झाली. त्या कुटुंबाबद्दल पुढच्या भागात सांगणारे, पण पुढच्या भागात चहावाल्याबद्दल सुद्धा सांगणार आहे. 86 भागाच्या शेवटी खरंतर “चहा वाल्यांनी आम्हाला काहीतरी सांगितलं आणि आम्ही कुठल्या कुठे जाऊन पोहोचलो” असं एक वाक्य लिहिलं होतं. त्याचा उलगडा पुढच्या भागात करणार नक्की... तोवर नर्मदे हर

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ८९

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला अनुभव सांगितला होता बॅग तुटल्याचा. आता बर्गी कॉलनीला आम्ही येऊन पोहोचलो होतो. आम्हाला मेन रोड वरचा रूट सांगितला असल्याने आम्ही तसे आलो मात्र इथून मैयाकिनारी देखील रस्ता आहे, मात्र तिकडून जाऊ नका असं आम्हाला सांगण्यात आलं होतं...असो

आम्ही बरगी कॉलनीला पोहोचलो. इथली धर्मशाळा मोठी होती मात्र अस्वच्छ आणि अव्यवस्थित होती. रात्र व्यवस्थित गेली. इथे आंघोळीची काहीही व्यवस्था नव्हती. बाथरूम होते पण त्यात पाणी नव्हतं. खोल्या बांधल्या होत्या पण त्या अतिशय अस्वच्छ होत्या. बाहेर अंगणात एक हापशी होती. आम्ही आंघोळीला मैया वर जायचं ठरवलं. वाटेतच आम्हाला एका परिवाराने चहासाठी बोलावलं. "अंतर बरंच लांब आहे इथेच आंघोळ करा, आमच्याकडे मागे मोठी टाकी आहे हवं तितकं पाणी वापरू शकता, बंद आणि स्वच्छ बाथरूम देखील आहे" असा आग्रहच धरला. त्या निमित्ताने तुमचा पूजापाठ आमच्या घरात होईल आणि त्याचे फळ आम्हाला मिळेल अशीही परिवाराने व घातली. त्यांची विनंती आम्ही मान्य केली आणि त्यांच्या घरी स्नानादी व पूजापाठ झाला. हे सगळं होईस्तोवर घरच्या माताजीने भोजन व्यवस्था सुद्धा तयार ठेवली होती. "भोजन पा कर ही जाना बाजी" ही गळ सुद्धा सोबत होती... या तीन ते चार तासात या कुटुंबातल्या व्यक्तींशी छानच ओळख झाली. घरातले दोघेही भाऊ अशिक्षित. दोघेही ट्रक चालक. घरी पाच सहा ट्रक होते, काही भाड्याने दिले होते तर दोन ट्रक हे दोघं

भाऊ स्वतः चालवायचे. घरचं वातावरण अतिशय संस्कारी. लौकिक शिक्षण जरी नसलं तरी संस्कारांचं मोल जपलेलं हे कुटुंब. नवीन पिढीतली पोरं बाळ मात्र शिकत होती. भोजन प्रसादी आटोपून आम्ही पुढे निघालो त्यावेळी या घरातली प्रत्येक व्यक्ती आम्हाला बरंच दूरपर्यंत सोडायला आले.

त्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो तो रस्ता एखाद्या स्वप्नातल्या रस्त्या सारखा होता. अतिशय रमणीय. समोर छोटे-छोटे पहाड आणि त्यांना फोडून जाणारा हा रस्ता. इथे गुलमोहरा पळसाची खूप झाडे होती, आणि सगळी झाडं बहरून आली होती. आल्हाददायक वातावरण होतं. मनातून एक वेगळ्याच प्रकारचा आनंद ओसंडून वाहतोय असं वाटत होतं. ही किमया त्या वातावरणाची. उतार-चढाव, छोटे-छोटे पाडे, रस्त्यात ये-जा करणारी सायकल वाली लहान मुलं, हिरव्याकंच झाडीत उठून दिसणारा जर्द केशरी पळस... मनोहरच होतं सगळं काही. आणि अशा मनोहर वातावरणात नर्मदा मैया पण वेगळ्याच मूडमध्ये होती बहुदा. आज तिचा आमच्याबरोबर लपाछुपी खेळण्याचा मूड असावा. लहान बाळाशी खेळताना दारामागे लपून बाळ आपल्याला कसा शोधतोय हे बघते नं आई तसंच केलं तिनी आमच्यासोबत. सांगते सांगते..

सकाळी मला महेश्वरच्या माताजींचा फोन आला. त्यांनी सांगितलं आज तुला अनेक लोक रस्ता सांगतील, मात्र चहा वाल्या दुकानदारांनी सांगितलेल्या रस्त्यावरून चालत जा... आज सकाळी ध्यानात बसले असताना तीन चहावाले तुला रस्ता सांगतायेत असं मी बघितलं होतं. माताजींच्या फोनप्रमाणे असेल पण आम्हाला एका चहावाल्याने चहासाठी बोलावलं. त्यानी चहा पाजला आणि “तिलावारा घाट क्यू जा राहे हो, उलटा हो जायेगा ना.. यहासे आगे निकलके दाये मोड पे जाना, सीधा त्रिशूल घाट जाओगे” त्याच्या या सांगण्यावरून तिथेच असलेल्या एका त्याच्या गीऱ्हाईकाचं दुमत पण झालं त्याच्याशी... मात्र चहा वाल्याचं ऐेक असा फोन सकाळीच झाला होता आणि म्हणून आम्ही त्याचं ऐकलं, आणि आता त्रिशूल घाटाकडे निघालो.

वाटेत नाना खेडा नावाचं गाव लागतं, तिथे मुक्काम केला, तर तिथल्या माणसाने सांगितलं की तुम्ही उजवीकडे गेले असते तर तिल्वारा घाट लागला असता, आता उलटं जाऊ नका उद्या, त्रिशूल घाट जवळ आहे, तिकडे जा, पण दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एका चहावाल्याच्या दुकानात असताना त्याने सांगितलं, तिकडे कशाला जाताय, एक वाट शेतातून जाते, एक दोन नाले पार करावे लागतात, पण तुम्ही सरळ जा तुम्हाला डूंडवारा नावाचं गाव लागेल, तिथून भेडाघाटला जा सरळ. तसच झालं, आम्ही सरळ भेडाघाटला पोचलो देखील... जवळ जवळ ३० किमी चा रस्ता कमी झाला होता आमचा...

अजूनही हा शॉर्टकट चा सिलसिला थांबला नाहीच. भेडाघाटच्या आधीच एका छोट्याशा मंदिरात आम्ही आजची रात्र घालवली. नर्मदा किनारी भोजन प्रसाद मिळत नाही असं होतच नाही. पुजाऱ्यांनी आमची छानच व्यवस्था केली होती. दुसऱ्या दिवशी पुजाऱ्यांनी आम्हाला आणिक एक रस्ता सांगितला. काही अंतर चालून गेल्यानंतर पुन्हा एकदा एका चहा वाल्याची भेट झाली. आता आम्ही पुन्हा एका नवीन रस्त्यावर चालू लागलो. हा रस्ता म्हणजे गोटेगाव नर्सिंगपुर महामार्ग. हाच परिक्रमावासी मार्ग आहे इथून जा असे आम्हाला सांगण्यात आलं. मात्र मैया किनारी जाता येतं हे समजल्यावर आम्ही पुन्हा मार्ग बदलला. मात्र या मार्ग बदलण्याच्या आधी बिजोरी गावाच्या अलीकडे रजू पटेलशी झालेली भेट सांगणं महत्त्वाचं आहे.

या महामार्गावर चालत असताना एका छोट्याशा शेतातल्या एका छोट्याश्या झोपडीत आम्ही थोड्यावेळासाठी विसावलो होतो. तिथे असताना हे रजुजी पटेल आमच्यासाठी नाश्ता आणि चहा घेऊन आले होते. आम्ही झोपडी परिक्रमावासी साठी बांधून ठेवली आहे. इथे कोणी परिक्रमावासी आलेत आणि आम्ही शेतात काम करत असलो तर आम्हाला त्यांच्या सेवेचा लाभ मिळतो अशा नम्र भाषेत रजुजी आमच्याशी बोलत होते. आम्ही महाराष्ट्रीयन आहोत हे समजल्यावर रज्जूजीं कडून एक वेगळीच विनंती ऐकायला मिळाली. "आप महाराष्ट्र से हो, मैने

सुना है मराठी लोक कोई संस्कृत स्तोत्र रोज बोलते है, जो कोई कवच है, भगवान राम का श्लोक है, हम वो सीखना चाहते है. हमारे घर में आठ बच्चे बच्चिया है क्या आप वह श्लोक हमे सिखा सकते है? हमारी बडी बिटीया कुछ दिन जबल्पुर मे पढ रही थी, उसकी होस्टेल में एक महाराष्ट्रीयन बच्ची रोज यह श्लोक पढती थी.. उस बच्ची ने हमारी बिटिया को बताया के महाराष्ट्र में हर घर में रोज शाम को यह कवच पढा जाता है जिसका बहुत अनुभव मिलता है" यांच्या वर्णनावरून ते राम रक्षाबद्दल बोलत आहेत असा आम्ही अंदाज धरला, आणि तो खरा देखील ठरला. राम रक्षा शिकवण्यासाठी आपल्याला रजुजी घरी बोलवत आहेत आणि हे कार्य करायलाच हवं असा विचार करून आम्ही रज्जूजींच्या घरी गेलो. घरी जाताच तिथल्या बालगोपाल मंडळींनी आमच्या भोवती गराडा घातला. त्यांची सगळ्यात मोठी मुलगी ईशा, आम्हाला त्या स्तोत्राबद्दल विचारू लागली आणि, "मनोजवं मारुततुल्यवेगं"हा श्लोक म्हणून देखील दाखवला. आम्हाला राम रक्षा तोंडपाठ करावयाची आहे आणि ती तुम्ही आम्हाला लिहून द्या असा आग्रह केला.. भोजन प्रसादी झाल्यानंतर रात्री नऊ ते साडेबारापर्यंत ही मंडळी रामरक्षेचे श्लोक माझ्याकडून समजून घेत होती. एक श्लोक स्पष्ट उच्चारा सकट म्हटला गेला पाहिजे यावर या मंडळींचा जोर होता. त्यांनी माझ्या आवाजातली रामरक्षा मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून घेतली. आमच्याकडून राम रक्षा लिहून देखील घेतली. आणि गंमत म्हणजे पुढचे पंधरा ते वीस दिवस फोन करून जिथे जिथे अडचण येईल त्या अडचणी देखील या ईशाने दूर करून घेतल्या. मैया ने आमच्याकडून अशी सेवा करून घेतली.

पुढे नरसिंगपूर करेली करत करत आम्ही बरमान घाटला येऊन पोहोचलो. इथे आम्हाला एक हिमालयीन बाबा भेटले. या बाबांशी आमची ओळख झाली व त्यांच्याकडंन हिमालयातले काही किस्से ऐकायला मिळाले. या बाबांकडे 6-6 इंचाच्या कुठल्यातरी झाडाच्या छोट्या-छोट्या फांद्या होत्या. त्या औषधी तर होत्याच मात्र त्यांचे अजूनही काही फायदे आहेत ते सांगत होते. याच झाडांची सालं एका लाल कापडामध्ये बांधून तयार केलेले काही ताईत त्यांच्याकडे

होते. हे ताईत दोऱ्यात बांधल्यानंतर आलेले अनुभव त्यांनी आम्हाला सांगितले. मग मात्र मैयाने आमची परीक्षा घेण्याचं ठरवलं आहे की काय असं वाटू लागलं..

आम्ही पुलापासून उतरून आता मैया किनारी लागलो होतो. तेव्हा एका ठिकाणी एका चहाच्या ठेल्यावर हे बाबा बसले होते. तिथेच त्यांच्याशी ओळख झाली नर्मदे हर झालं. बाबा सांगू लागले... त्यांच्याजवळ असलेल्या वनस्पतीची महिमा फार मोठी आहे असे ते म्हणाले. ही वनस्पती हुडकत ते वर्षातील काही महिने हिमालयात असतात. वनस्पती मिळाल्यावर ते वनस्पतीची रीतसर पूजा करतात. कुठल्या धातूने न कापता फक्त दगडांनी ही वनस्पती कापायची. मग हे छोटे तुकडे दूधात रात्रभर भिजत घालायचे. त्या भिजलेल्या वनस्पतींचे तुकडे आणि ते दूध यांनी शंकराला अभिषेक करायचा. अशी पूजा झाल्यानंतर बाबाजींना या वनस्पतींचे तुकडे कुणाला द्यायचे त्याचा आदेश येतो. दुधात भिजवल्यामुळे वनस्पतींच्या खोडाचे साले निघतात ती सालं लाल कापडात बांधून ताईत तयार करण्यात येतात. ते ताईत सुद्धा कुणाकुणाला द्यायचे हे आदेश बाबांना येतात. त्याप्रमाणे इथे बाबा ती वनस्पती आणि ते ताईत पोहोचवण्याचं काम करतात असं बाबांनी सांगितलं. या वनस्पतीचे किंवा ताईतचे कुठलेही पैसे ते आकारत नाहीत. "मुझे बाकी कुछ नही समजता, मुझे बस अंदर से आवाज आती है, सामनेवाले के जरूरत का पता चलता है, और यह संकेत मिलता है कि उसे क्या देना है लकडी का टुकडा या गले मे बांधणे के लिए छिलटे"... असं म्हणत बाबाजींनी एक एक तुकडा मला काढून दिला. हा तुकडा फक्त स्वतःच्या पूजेच्या साहित्यामध्ये ठेवायचा आणि शक्यतोवर त्याला कधीही कुणाला दिसू द्यायचं नाही असं त्यांनी मला सांगितलं. मला खरं तर तो तुकडा अजिबात नको होता, पण का कोण जाणे मला नाही म्हणताच आलं नाही. मी तो तुकडा माझ्या हातात धरून ठेवला. तो एका वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेला होता. तो तुकडा मी घेतला खरं पण माझं मन काही धजेना. नक्की कारण सांगता येणार नाही पण फार विचित्र अवस्था मनाची झाली होती. मला माझे गुरु आणि माझी मैया सगळं काही व्यवस्थित देत असतात. माझ्यासाठी जे गरजेचं आहे ते माझ्यापर्यंत बरोबर येऊन पोहोचतं. मग मला या

वनस्पतीची काय गरज? माझं मग मला सारखं हेच सांगत होतं, तर दुसरीकडे “हे देखील मैया नेच पाठवलेलं आहे ना व याला मी कसं नाकारू “असाही विचार मनात येत होता. आणि याच विचाराच्या ओघात त्यांनी ती गुंडाळी माझ्या हाती दिली आणि मी ती हातात ठेवली पण बॅगमध्ये ठेवण्याची माझी इच्छाच होईना!

बाबाजीशी हिमालयातल्या बऱ्याच गप्पा झाल्यात. थोड्यावेळाने त्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो. पण माझे पाय पुढे बांधून ठेवले ती काय इतके जड होऊ लागले. म्हणजे फिजिकली नाही, पण पुढे जाण्याची इच्छा होत नव्हती. ती हातातली पुंगळी मला तिथून निघू देत नव्हती. ती वनस्पती मी फेकत हि नव्हते आणि ठेवत ही नव्हते. मी ठरवलं ही वनस्पती त्या बाबाजींना परत करायची. मी पुन्हा मागे वळले पण बाबाजी निघून गेले होते. आता माझ्यावर खूप मोठं दडपण असल्याचं मला जाणवत होतं. हे ओझं नक्की कशाचं हे समजत नव्हतं पण खूप खूप भार होता कसलासा. बाजूने वाहथ असणाऱ्या मैयाकडे मी बघितलं, आणि त्या क्षणी माझी पावलं तिच्या पात्राच्या दिशेने चालू लागली. तिथेच तिच्या निर्मल जळाला मी स्पर्श केला आणि हातातली पुंगळी तिच्या पाण्यात सोडून दिली.

“माई गं ओढून ताणून आणलेलं कुठलंही सुख मला नको. कुण्या दुसऱ्याच्या तिसऱ्याच्या वाट्याचं मला काहीही नकोच! आणि माझ्या नशिबात लिहिलेल्या वेळेच्या आधी मुद्दामून घडवून आणलेलं सुख सुद्धा मला नको.. माझ्यासाठी जे काय योग्य असेल ते तू माझ्या पदरात घालतेच आहेस यावर माझा पूर्ण विश्वास आहे. कदाचित ही वनस्पती मला मिळावी हा तुझा संकेत असेलही, पण माझ्या अज्ञान मनाला तशी खात्री होत नाहीये, तू जसा आतून आवाज देतेस तसं ह्या वेळेला मला जाणवलच नाहीये, आणि म्हणून ही वनस्पती तुलाच अर्पण.. ही वनस्पती तुला अर्पण केल्यानंतरही जर पुन्हा ती पुन्हा माझ्याकडे आलीच तर तुझा आशिर्वाद म्हणून मी त्याचा स्वीकार नक्कीच करेन, पण या क्षणाला माझं मन मला ही वनस्पती माझ्याजवळ ठेवायला अगदी स्पष्ट नकार देतंय, म्हणून की तुझ्याकडेच सोपवते”

माझ्या मनावरचं ओझं त्या वनस्पतीच्या छोट्याशा तुकड्या सोबत मैयाच्या पात्रात दूर दूर वाहून गेलं. आता माझं मन खूप शांत झालं होतं. आम्ही अंडीया घाटाच्या दिशेने पुढे निघालो. हा रस्ता टेकडीवरून जातो. छोटुशी पाऊलवाट. दोन बाजूला कमरे इतकी वाढलेली झाडी, या टेकडीच्या खाली थोड्या अंतरावर वाहणारी, झाडीतून अधून मधून डोकावून पाहणारी नर्मदामैया! खूप छान आणि खूप हलकं वाटत होतं चालताना... पुढे लिंगा घाटावर देखील एका बाबाजींची भेट झाली. या बाबाजींची भेट म्हणजे आश्चर्याचे मारे करणारा एक वेगळाच अनुभव. आपल्या कानांवर आपला विश्वास बसू नये, की आपले डोळे आपल्याला अगदी वेगळं वेगळं सांगता येत कानांपेक्षा, की आपल्या बुद्धीने जे आपलं केलंय तेच खोटं? की आपल्या पात्रतेची पातळी आपल्याला समजते हेच मला समजेना...सांगणारे लिंगा घाटाच्या बंगाली बाबांचा अनुभव पण पुढच्या भागात तोवर नर्मदे हर.

# नर्मदा परिक्रमा एक विलक्षण अनुभूती भाग ९०

नर्मदे हर

मागच्या भागात मी तुम्हाला हिमालयीन बाबांच्या भेटीबद्दल सांगितलं होतं. त्यांनी दिलेल्या छोट्या वनस्पतीच्या तुकड्या नंतर माझ्या मनाची बेचैन अवस्था देखील तुम्हाला सांगितली होती. त्यातून मैया ने केलेली सुटका देखील तुम्हाला सांगितली. आता पुढे जाऊयात.

पुढे आंडिया घाट, लिंगा घाट असा जाणारा हा रस्ता एका छोट्याशा टेकडीवरून जातो. सध्या मैयाला भरपूर पाणी नव्हतं मात्र पावसाळ्यात ह्या टेकड्या म्हणजेच नदीचा किनारा झालेला असतो इतकी त्याची पातळी वाढते. करत करत आम्ही लिंगा घाटाला पोहचलो. आम्हाला इथे पोहोचेस्तोवर संध्याकाळचे पाच वाजले होते. सामान ठेवून आधी स्नान व पूजा पाठ करावयाचे होते सूर्यास्ताच्या आधी. इथला आश्रम म्हणजे एक छोटासा हॉल. बाजूला एक मंदिर आणि बाहेर खूप मोठं अंगण. इथून दोनशे-अडीचशे फुटावर खाली मैया वाहतेय. आश्रमापासून तर मैयापर्यंत छोट्या-छोट्या पायऱ्यांचा घाट बांधलेला आहे. याच घाटावर थोडं पुढे गेल्यानंतर एक छोटसं टुमदार घर आणि त्याच्याच अंगणात असलेलं मंदिर लागतं. या मंदिरात एक म्हातारे से बाबा भागवत वाचत असतात. इथे अखंड भागवताचा नेम आहे. चोवीस तासांपैकी पंधरा-सोळा तास हे म्हातारे बाबा भागवत वाचतात आणि इतर वेळेला कुणातरीकडे थोड्यावेळासाठी हे वाचन सोपवण्यात येतं. माइक वर ही भागवत कथा सुरु असते. एरवी माइक वर कथा, भजन ऐकताना कर्णकर्कश्य आवाजाचा वीट येतो मात्र ह्या बाबांचा आवाज फारच मधुर होता. आम्ही सामान आश्रमातच ठेवून लगबगीने मैया वर गेलो. हा घाट उतरताना मध्ये सिमेंटच्या पायऱ्या आणि दोन्ही बाजूला हिरवीकंच शेतं होती. मैयावर स्नान करतेवेळी तिच्या पाण्यात सूर्यप्रकाशामुळे चमचमणाऱ्या लाटा असंख्य दिवे लावल्या

सारख्या दिसत होत्या. मैयाची आरती करताना ह्या लाटा जणू “कोटी रतन ज्योती” प्रमाणे भासत होत्या. मैयाच्या आरती मध्ये ह्या रत्नांच्या ज्योतींचा उल्लेख आहे तो असा.

मैया जी को कंचन थाल विराजत अगर कपूर बाती, अमरकंठ में विराजत, घाट अन् घाट पूजावत, कोटी रतन ज्योती!

आमचं स्नान पूजा करून झालं मात्र आता सूर्य अगदीच अस्ताला आला होता. बाबाजींच्या भागवत कथेचा आवाज आमच्यापर्यंत पोहोचत होता. आजच्या कथेमध्ये सत्यभामे चा अहंकार कसा दूर झाला याबद्दल महाराज सांगत होते. नारदांनी सत्यभामेला चिथवलं याचं वर्णन, कृष्णाचं वर्णन, तुलेचे वर्णन, आणि शेवटी वृंदा पत्र आणि तुलसी महात्म्य इतकं छान रंगवून, गाऊन सांगितलं की जणू हे सगळे दृश्य आमच्या पुढे तिथेच नर्मदा किनाऱ्यावर घडतायेत की काय असं वाटू लागलं. कथा ऐकता ऐकता वेळ कसा गेला समजलेच नाही. आता छान अंधार पडला होता. तरीही चांदणं आणि चंद्राचा उजेड बऱ्यापैकी जाणवत होता. आम्ही आश्रमात परतलो.

आम्ही आश्रमात आलो होतो त्या वेळेला मळकट कपडे घातलेले एक बाबाजी अंगणात असलेल्या झाडाच्या पारावर बसले होते. लिंगा घाटला आल्या आल्या आम्ही सामान कुठे ठेवावं म्हणजेच आसन कुठे लावावं व याबद्दल या महाराजांकडे विचारपूस केली असता “आ गये, क्यू आये, चलेजाव, हटो, भागो, अशी काहीशी असंबद्ध बडबड ह्या बाबांनी केली, त्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य कदाचित ठीक नसेल असे वाटून आम्ही यांच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. मात्र ती आमची मोठी चूक होती हे नंतर लक्षात आलं!

हॉल मध्येच एका कोपऱ्यात आम्ही आसन लावलं. थोड्यावेळाने गावातील दोन मुलं आमच्या चौकशीसाठी आलीत. इथे गावकऱ्यांनी परिक्रमावासी यांची सोय वाटून घेतलेली आहे. रोज एका घरातून भोजन प्रसादी तयार करून परिक्रमावासीं साठी ही मंडळी घेऊन

येतात. अशी तीस कुटुंब तयार आहेत. या नियमाप्रमाणे आज आमच्यासाठी देवेन भाई भोजन प्रसादी घेऊन येणार होते. आमची विचारपूस केल्या नंतर त्यांनी आम्हाला या बाबाजीबद्दल सांगितलं. म्हणाले “आपको देखकर चिल्लाये नही क्या स्वामीजी? दिखने मे सबको पागल जैसे लगते है, कोई ध्यान नही देता उनकी तरफ, लेकिन आप अगर चाहो तो उनकी बाते सुन सकते हो. अगर आपके भाग्य मे होगा तो उनकी दिव्यता का प्रणाम मिलेगा नही तो आपको भी वो पागल ही लगेंगे... बहुतसे परिक्रमावासी उन्हे पागल समज उनके तरफ ध्यान नही देते.. उन्हे भी कोई फरक नही पडता.. यह तो जिसको समजता है उसका भाग्य.. लेकिन इसके लिये पेशंन्स की जरुरत है.. और गॅरंटी कोई नही! अगर थके हो तो सो जावो कोई बात नही. ”

खरंतर उगाचच कुठल्या गोष्टीची परीक्षा पाहणं मला पटत नव्हतं. त्यातूनही एखाद्या संत महात्म्याला पडताळून पाहणं योग्य वाटत नव्हतं. ते महाराज दिव्य असतील किंवा नसतीलही कदाचित, पण हे पडताळण्याचा मला अधिकार आहे का? असे विचार माझ्या मनात राहून राहून येत होते. माझं आणि बाबाचं यावर दुमत होतं. बाबाचा दृष्टिकोन वेगळा होता. “अगं बोलता-बोलता कदाचित आपल्याला त्यांचा आशीर्वाद मिळेल, बोलून बघायला काय हरकत आहे?”असं बाबाचं मत होतं मात्र मुद्दाम जाणून-बुजून परीक्षा बघायची हे माझ्या मनाला पटत नव्हतं. मी साफ नकार दिला. बाबा मात्र महाराजांशी बोलायला त्यांच्या समोर जाऊन बसला. बाबांनी त्यांना नर्मदे हरं केलं.. महाराजांनी बाबाकडे साफ दुर्लक्ष केलं. बाबाचे प्रयत्न चालूच होते. आम्ही थकलो आहोत, भागवतकार बाबा कोण आहेत, इथल्या जागेबद्दल आम्हाला काहीतरी सांगा, असे अनेक प्रश्न बाबानी विचारले मात्र या महाराजांच्या चेहऱ्यावरची माशी सुद्धा हलली नाही. आता बाबा उठून परत हॉल मध्ये येणार येवढ्यात लहान मूल रुसुन पाठ फिरवतो तसे महाराज बाबाकडे पाठ फिरवून काहीतरी बडबडले. बाबाने विचारल्यावर म्हणाले “भोजन आगया भोजन आगया”.

थोड्याच वेळात देवेन भाई भोजन प्रसादी घेऊन आले. घडलेला किस्सा सांगितल्यावर "आपके भाग्य मे नही है जाने दो" असं म्हणून डबा घेऊन परत निघून गेले. अजून डोळा लागायला वेळ होता. हॉल समोरच्या पायरीवर मी थोडावेळ जाऊन बसले. महाराज अजूनही झाडाच्या पारावरच बसले होते. बाबा तिथेच शतपावली घालत होता. ते महाराज एकदम बडबडू लागले, माझ्याकडे बोट दाखवत म्हणाले "तू यहा क्यू आई है? तुझे तो आगे जाना है, किस्मत तेरा इंतजार कर रही है! तूने मेरा खाना खाया? मेरा पानी पीया तुने? अब वो तुझे बुलायेगी... मे पागल हू, तू पागल है, तू सब भूल जाती है, " असं काहीतरी असंबद्ध बडबडू लागले... मला खरंतर काही समजत नव्हतं. मी पडताळूननही पहात नव्हते. माझ्या कानावर त्यांची काही वाक्य पडत होती एवढंच.

थोडा वेळ शांत राहून बाबा पुन्हा बडबडू लागले. अर्थात बाबांनी खूप खूप वाक्य बोलली. त्यातली सगळीच माझ्या लक्षात राहिली असं नाही. मात्र जी लक्षात राहिली ती कशी लक्षात राहिली हा ही एक विलक्षण अनुभव आहे. मात्र आधी कुठली वाक्य माझ्या लक्षात राहिली ते मी तुम्हाला सांगते. हे बाबा मध्ये मध्ये बंगाली भाषेमध्ये काहीतरी बोलत होते. मधेच हिंदीमध्ये बोलायचे पण त्यांच्या हिंदीवर बंगाली भाषेचा प्रभाव होता. बोलता-बोलता मध्येच ते एखादं हिंदी वाक्य बोलायचे. त्यातलं एक वाक्य असं होतं "सबकुछ देख, सबकुछ सुन, सब कुछ याद कर, और चली जा"... मग पुन्हा काहीतरी असंबद्ध बडबड आणि नंतर एखाद्याची गंमत केल्यानंतर आपण जसं हसतो तसं हे महाराज हसायला लागले आणि म्हणाले "अभी तो जाओगे लेकिन जाओगे कहा, लौटके तो आनाही पडेगा". खरंतर त्या महाराजांच्या अशा असंबंधित बडबडीचा अर्थ लावणं हे सोपंही नव्हतं आणि असा काहीही विचार मी केलाही नव्हता. मात्र तो उलगडा मला हळू हळू आणि नंतर झाला. आता जवळजवळ साडे अकरा बारा झाले होते. थोडीफार झोपही येऊ लागली होती. आता मी महाराजांना नमस्कार करून आसनाकडे जाणार होती.

मी महाराजांना नमस्कार करायला गेली तसं महाराजांनी मला हकलूनच लावलं.. "ए चल जा, चल हट, दुर जा, भाग यहा से, जा सो जा" असं इतक्या रागात आणि जोराने ओरडून बोलले की थोडंसं वाईटच वाटलं मला. कुत्र्या मांजराला हाड हाड करावं तसा फील आला. मला दूर गेलेलं पाहून बाबा पुन्हा बंगालीमध्ये काहीतरी 5-7 वाक्य बडबडले. त्यानंतर मला एक वाक्य स्पष्ट ऐकू आलं ते असं "सोयेगा तो जागेगा... जागेगा तो भागेगा... भागेगा तो पायेगा.. पायेगा तो सोएगा..."असं काहीतरी ते वारंवार बोलत होते. आता मात्र मी त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं होतं. मी आडवी झाले आणि मला चटकन झोप देखील लागली.

सकाळी उठले तो महाराज आमच्याच हॉलमधल्या एका भिंतीला टेकून बसलेले होते. ते कधी झोपले, कुठे झोपले, झोपले की नाही, हे मला माहीत नाही. त्यांच्या चेहऱ्यावर अजिबात थकवा नव्हता उलट डोळे बंद असले तरी कालच्यापेक्षा त्यांचा चेहरा सोज्वळ आणि हसरा दिसत होता. ते झोपलेले नाहीयेत हे स्पष्ट समजत होतं. पुन्हा एकदा त्यांच्याकडे दुर्लक्ष करून मी मैयावर स्नानासाठी गेले. मैयात स्नान करत असताना डोळे बंद करून उभे होते त्यावेळी अंगातून विजेचे लोळ बाहेर पडल्यासारखं झालं आणि काही चित्र स्पष्ट दिसू लागलीत. अनेक गोष्टींचा उलगडा होऊ लागला. आतापर्यंत बेभान असलेला जीव भानावर आला की कसं होतं तसं काहीसं झालं. डोकं सुन्न झालं.. मन खूप मागे मागे फिरू लागलं... पण असं नक्की काय झालं आणि का हे मी तुम्हाला पुढच्या भागात सांगणार आहे.

## भाग २ समाप्त

लवकरच येत आहे…

# नर्मदा परिक्रमा

## एक विलक्षण अनुभूती

### भाग ३

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सुरूची नाईक यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक. त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्य आहेत.**

सुरूची नाईक गेली चौदा वर्षे लिहीत आहेत. काव्य, ललित, सामाजिक, आध्यात्मिक अशा विविध विषयांवर त्या लिहीतात. त्यांच्या ब्लॉगवर त्यांचं लेखन वाचता येईल. या लेखनादरम्यान त्यांनी इतर लेखक कवींसह पुढाकार घेऊन ग्रुप बनवला ज्याचे रुपांतर ई साहित्य चळवळीत झाले. त्या आपल्या लेखनातून अनेक प्रयोग करत असतात. आणि इतर प्रायोगिक साहित्यिकांना बळही देत असतात. नेटाक्षरी या काव्यसाप्ताहिकाच्या त्या संपादक होत्या. नवलेखकांना प्रोत्साहन देणे हा या चळवळीचा मुख्य गाभा. अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. नामवंत लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, सुरूची नाईक, शुभम पाटील, आशिष कर्ले, सौरभ कोरगांवकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, निरंजन कुलकर्णी, विनायक पोतदार, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान